म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. ६२३

# सागर कन्या

रमेश मंत्री

REFBK-0023510
REFBK-0023510

623
23590
2४/४/८2

# सागरकन्या

रमेश मंत्री

REFBK-0023510
REFBK-0023510

इंद्रायणी साहित्य
पुणे

प्रकाशक :
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

मुद्रक :
दामोदर अनंत घळसासी
वृन्दा प्रिंटर्स
६३५ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

प्रकाशन दिनांक :
९ फेब्रुवारी १९८२

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

© सौ. रजनी मंत्री

मूल्य पंचवीस रुपये.

माझे स्नेही

श्री. वसंत ऊर्फ बापूसाहेब गोखले

यांना–

## अनुक्रम


| | |
|---|---|
| तामिळनाडू – सहा हजार वर्षांचा साहित्य व संस्कृतीचा वारसा | १ |
| सागरकाठचे भव्य शिल्प | २३ |
| ऑरोव्हिल– विश्वबंधुत्वासाठी वसाहत | ३५ |
| तंजावर– बृहदीश्वर मंदिर आणि सरस्वती महाल | ४५ |
| सागरकन्या | ५८ |
| प्राचीन तीर्थक्षेत्र – रामेश्वर, मीनाक्षी, मंदिर आणि बालाजी | ७१ |
| तमिळ लेखक–प्रकाशकांशी बातचीत | ९० |
| महाराष्ट्र–तमिळनाडूचे जिव्हाळ्याचे संबंध | १०२ |
| परस्पर विरोधांचे केरळ राज्य | १०६ |
| कोचीनचा डच पॅलेस | ११८ |
| दहा लाख भक्तांची शबरी मलाई | १३२ |
| त्रिवेंद्रमचा कलात्मक ठेवा | १४२ |
| आधुनिक केरळमधील रंगमंच | १५३ |


□


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
823
23590
भूप्रवास 23/7/62
(स्थळ प्रत)

# १ : तमिळनाडू – सहा हजार वर्षांचा साहित्य व संस्कृतीचा वारसा.

'मद्रासमध्ये कोण रहातं?' असं मला कुणी विचारलं, तर मी उत्तर देईन, 'पंचम जॉर्ज.' कारण मद्रासमध्ये कोपऱ्या कोपऱ्याला, पंचम जॉर्ज पुतळ्यांच्या स्वरूपात उभा आहे. त्याच्या एका हातात सब-इन्स्पेक्टरच्या छडीसारखी राजेशाही छडी आणि दुसऱ्या हातात आईने लाडक्या मुलाला दिलेल्या लाडवासारखा एक गोळा आहे. डोकीवर मुगुट आणि पाठीमागे लोळणारा लांब झगा घालून अनेक पंचम जॉर्ज मद्रासमध्ये ठाई ठाई उभे आहेत. तरी बरे, की या लोकांनी पंचम जॉर्जचा वेष होता तसाच ठेवला. 'आपुणासारिखे करिती तात्काळ' या न्यायाने स्वतःसारखा ठिकठिकाणी या राजाचा पुतळा उभारला असता, तर पंचम जॉर्जने लुंगी नेसली आहे, वर शर्ट अडकवला आहे, एका हातात केळीच्या पानावर भात आहे आणि त्या भाताचे पिंडाच्या गोळ्यासारखे गोळे करून ते खात आहे, असे पुतळ्याचे दृश्य दिसले असते.

या शहरात आल्यावर एक मात्र जाणवते की ब्रिटिशांनी दीडशे वर्षे राज्य केले तरी मद्रासी लोकांनी आपला परंपरागत वेष सोडला नाही. पश्चिम बंगाल, केरळप्रमाणे अजूनही ते आपल्या प्रांताच्या वेषाला चिकटून आहेत. उत्तरेत आणि मध्य भारतातही धोतरखमीस जाऊन पँट व बुशकोट आले. पण दक्षिणेकडील राज्यांनी लुंगी कसोशीने संभाळली आहे. खाण्यापिण्याचेही तेच. सोलापूरपर्यंत ब्रिटिशांचा आवडता चहा आणि आपला आवडता बटाटेवडा कसाबसा स्टेशनवर मिळतो. पुढे गुलबर्गा, गुंटकल, रेणिगुंठाकडे सर्वत्र कॉफी आणि इडली, वडा, दोसा उपमाचे राज्य.

मात्र प्राचीन काळापासून या भागावर अधिक पराक्रमी लोकांची राज्ये येऊन गेली. तमिळनाडूचा इतिहास निदान सहा हजार वर्षांची कर्तबगारी सांगतो.



तमिळनाडू – हजारो वर्षांचा सांस्कृतिक वारसा

आशियातील द्रविड संस्कृतीचे हे माहेरघर. आर्य संस्कृतीपूर्वी एक हजार वर्षे तरी द्रविड संस्कृती प्रबळ होती. सिंधू नदीपर्यंत ही द्रविड संस्कृती पसरली होती. जवळ जवळ सबंध भारत खिस्तपूर्व चार हजार वर्षे द्रविडांच्या प्रभावाखाली होता. मात्र उत्तरेत आर्य आले आणि द्रविड दक्षिणेकडे हटले. आत्ताची आंध्र, कर्नाटक, केरळ आणि तमिळनाडू राज्ये ही द्रविडांची प्रभावस्थाने उरली. उत्तर हिंदुस्थान मात्र आर्यांच्याकडे राहिला. त्यामुळे भाषा, संस्कृती इत्यादी बाबतीत भारताचे दोन अलग भाग दिसतात. उत्तरेकडील भाषा या संस्कृतोद्भव आहेत तर दक्षिणे-कडील द्राविडीपासून आल्या आहेत. उत्तरेत देवनागरी लिपी आहे तर दक्षिणेत तमिळ, मल्याळी आणि तेलुगू या द्राविडीपासून कमीअधिक भेदाने आल्या आहेत. तमिळपासून नवव्या शतकात मल्याळी अलग होऊन तिला हळूहळू स्वतंत्र व्यक्ति-मत्व प्राप्त झाले.

चौल, पंड्या आणि चेरा अशा तीन आमदानी प्राचीन काळी या भागाने पाहिल्या. इसवी सनपूर्व चौथ्या शतकात चोला घराण्याचे राज्य होते. त्या घराण्या-तील एका राजाने सिलोन (आजचा श्रीलंका) जिंकून त्यावरही आपला अंमल बसविला होता. व्यापार आणि पांडित्य याबद्दल मशहूर असलेल्या पंड्या घराण्याने रोमच्या दरबारात आपला दूत पाठविला होता. चोला घराणे मुख्यत: तंजावर भागात तर पंड्यांचे राज्य मदुराई भागावर होते. चेरा घराण्याने मुख्यत: आजच्या केरळ भागावर राज्य केले.

कांचीच्या (कांजीवरम्) पल्लव राजांची इसवी सन चौथ्या शतकापासून अतिशय भरभराट झाली. त्यांनी सुमारे चारशे वर्षे दक्षिण भारतावर प्रभाव पाडला. शिल्पकला आणि साहित्य संगीत यांना बहर आला. अलवर आणि नयनार कवींची उत्कृष्ट रचना याच काळात झाली. पण नवव्या शतकात चोलांनी पल्ल-वांचा पराभव केला आणि आपले साम्राज्य स्थापले. तेराव्या शतकात पंड्यांनी त्यांना हतबल केले. आणि नंतर विजयनगरचे साम्राज्य उदयाला आल्यावर पंड्याही निष्प्रभ ठरले. याच काळात तमिळनाडू भाग छोटे संस्थान बनून अलग झाला. उत्तरेत मुसलमान राजांचा अमल सुरू झाला, तरी या मोंगलांचा प्रभाव दक्षिणेत फारसा पडला नाही. प्रचंड भौगोलिक अंतर आणि दुर्गम प्रदेशातून मोठे सैन्य पाठविण्यातील अनंत अडचणी ही याची प्रमुख कारणे आहेत.

१६३९ मध्ये मद्रास येथे स्थापन झालेल्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने मात्र या भागाचा जुनाट चेहरामोहरा बदलला. हळूहळू सर्वच दक्षिण भारत ब्रिटिशांच्या अमलाखाली आला आणि तमिळनाडूचे नागरिक चाकरमाने झाले. ब्रिटिश काळात या भागाने उत्कृट आय्. सी. एस्. हे सनदी नोकर दिले. तसेच भारताच्या स्वातंत्र्य-चळवळीत सी. राजगोपालाचारी, पट्टाभी सीतारामैय्या, कामराज, कृष्ण मेनन, रामस्वामी अय्यंगार असे ज्येष्ठ नेतेही या भागाने देशाला दिले. मद्रासचे राज-



तमिळनाडू : दृष्ट लागावी अशी पाण्याची समद्धी

गोपालाचारी हेच भारताचे पहिले गव्हर्नर जनरल होते. हा अलीकडचाच इतिहास आहे. राजगोपालाचारी, गिरी व डॉ. राधाकृष्णन् हे भारताचे तीन राष्ट्रप्रमुख एका मद्रास शहराचेच आहेत.

१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला, तेव्हा मद्रास प्रांतात सध्याचे तमिळनाडू आंध्र प्रदेशचा व केरळचा काही भाग होता. पण आंध्रने भाषावार प्रांतरचनेची जोरदार मागणी केली. ती यशस्वी झाली. प्रांतांच्या पुनर्रचनेत मलबार व कासारगौड हे मद्रासचे भाग केरळमध्ये गेले आणि आंध्र वेगळा प्रांत झाला. १९६९ मध्ये मद्रास राज्याने आपले नाव बदलून तमिळनाडू नाव घेतले. मात्र राज्याची राजधानी जुन्या मद्रास या नावानेच राहिली.

तमिळनाडू हा भाग सकस जमीन, भरपूर पाणी, उत्तम वने आणि वनश्री आणि उत्कृष्ट किनारा यांनी समृद्ध आहे. वीज उत्पादनात हा भाग पहिल्या दर्जाचा आहे. मद्रास हे भारतातील महत्त्वाचे बंदर असल्याने उद्योगधंद्यांना चालना आहे. साक्षरतेचे प्रमाण भारतातील सरासरीपेक्षा खूपच अधिक (५८ टक्के) आहे. प्रेक्षणीय स्थळांत तमिळनाडूचा क्रम भारतात पहिल्या तीन राज्यांत आहे. कन्याकुमारी, कांजीवरम्, महाबलिपुरम, कोडाईकॅनॉल, मदुराई, रामेश्वर, तिरुपती, तंजावर, उटकमंड, अशी अनेक निसर्गसुंदर, प्राचीन कलेची भांडारे आणि धार्मिक स्थळे याच तमिळनाडूमध्ये आहेत. भाताचे पीक अमाप येते. त्यामुळे खाण्यात भात, इडली, दोसा, अशी भाताच्याच विविध पदार्थांची रेलचेल असते. मात्र मासे मोठ्या प्रमाणावर मिळत असूनही लोकांच्यावर धार्मिक मतांचा जबर पगडा असल्याने मासे खाणारे लोक अगदी अल्प. बंगालमध्ये ब्राह्मणासह जवळ जवळ प्रत्येक जण मासे चवीने खातो. उलट तमिळनाडूमध्ये मांसाहारीचे खाण्याचे हाल व्हावेत एवढे शाकाहाराचे प्राबल्य आहे. बंगालमध्ये रुचीने धर्मावर मात केली आहे हे उघडच आहे. पण येथे मात्र धर्माचे निशाण जराही कलंडलेले नाही.

तमिळ ही जगातील सर्वश्रेष्ठ भाषा आहे, असे या राज्यातील सर्वसामान्यांनाच नव्हे, तर बऱ्याच पंडितांनाही वाटते. जपानी भाषा हे तमिळचेच एक रूप आहे, असे आग्रही प्रतिपादन अलीकडेच एका तमिळ पंडिताने केले असून, त्याला जपानी भाषातज्ज्ञांचा पाठिंबा आहे, असेही त्याचे म्हणणे आहे. तमिळचे आंतरराष्ट्रीय महत्त्व सिद्ध करण्यासाठी तमिळ साहित्य संमेलन १९७७ मध्ये लंडन येथे भरले होते. जानेवारीत मदुराईत भरलेल्या आंतरराष्ट्रीय तमिळ साहित्य संमेलनाला राज्य सरकारने पाच कोटी रुपयांचे भक्कम अनुदान दिले त्यावरून राज्य सरकारही आपल्या भाषेच्या व साहित्याच्या विकासाला किती महत्त्व देते हे दिसून येईल. या संमेलनाच्या निमित्ताने साहित्यिकांचे पुतळे उभारण्यासाठी नव्वद लक्ष रुपये मंजूर झाले आहेत. आमच्याकडे साहित्य संमेलनास हजर राहण्यासाठी लेखकांना प्रवासखर्च देतानाही जी खळखळ–वादावादी होते ती या तमिळ साहित्य संमेलनाच्या पाच कोटींच्या संदर्भात आठवली.

मी मद्रासला जाण्याची तयारी केली, तेव्हा बरोबर सूट, नेकटाय घ्यावा,


असा विचार प्रथम मनात आला, पण नंतर आठवले की तमिळनाडूचे मुख्यमंत्री-सुद्धा लुंगी नेसूनच पंतप्रधानांना भेटतात. मग अशा राज्यात सूट–टाय नेऊन तिथल्या साधेपणाचा अवमान करणे बरे नव्हे.

मुंबई–मद्रास प्रवासास सुरवात केल्यावरोबरच तमिळ–मल्याळी भाषा डब्यात ऐकू येतात, कारण बहुसंख्य प्रवासी तमिळनाडू आणि केरळचे असतात. त्यातूनही तिरुपती किंवा शेवटी मलईच्या यात्रेसाठी निघालेले बरेच असतात. तिरुपतीला जाणारे यात्री रेणिगुंठाला उतरले. आमची गाडी संध्याकाळी सहाच्या सुमाराला मद्रास सेंट्रल स्टेशनला पोहोचली. तिथून महाराष्ट्र मंडळ जवळच होते. तिथे गेलो.

मंडळाचे उत्साही चिटणीस श्री. पेठे व श्री. सूर्यकर यांनी माझ्यासाठी खोली ठेवलीच होती. मद्रासचे महाराष्ट्र मंडळ कलकत्त्याच्या महाराष्ट्र मंडळापेक्षा लहान आहे. पण निवांत आणि छान आहे. तीस खोल्यांच्या दुमजली इमारती-शिवाय दोन मोठे हॉल्स आहेत. कार्यकर्ते शक्य तो सर्वांची राहण्याची सोय कर-ण्याची कोशीस करतात. खोलीला फक्त आठ रुपये आणि हॉलमध्ये एकत्र राहायचे तर माणशी तीन रुपये असे नाममात्र भाडे आहे. ट्रॅव्हल सर्व्हिसमधून आलेली पथके किंवा खासगीरीत्या एकत्र आलेली कुटुंबे यांना महाराष्ट्र मंडळाचा मोठाच आधार आहे. मी फोन केल्यावर माझे मद्रासचे स्नेही श्री. श्रीधर लिमये लगेच मला भेटायला आले. श्री. लिमये हे मायर्स पंपाचे मद्रासचे अधिकृत प्रतिनिधी असून गेली पस्तीस वर्षे मद्रासला राहात आहेत. शंभु शेट्टी रस्त्यावर हायकोर्ट इमारती-समोर त्यांचे छान ऑफिस आहे. महाराष्ट्रातून मद्रासला आलेल्या लोकांना ते सर्वतोपरी सहाय्य करतात. कन्याकुमारीच्या विवेकानंद स्मारकाच्या उभारणीतही श्री. लिमये यांचा वाटा आहे. त्यांना साहित्य व संगीताची चांगली जाण असून मद्रास येथे मराठी लोकांचे कार्यक्रम व्हावेत, म्हणून श्री. लिमये नेहमी प्रयत्न करीत असतात. त्यांनी मला दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्या कचेरीत बोलाविले आणि तमिळ लेखकांच्या गाठीभेटी घडवून आणण्याची व्यवस्था केली.

मद्रास शहराची रपेट करायला सकाळीच बाहेर पडलो. मुंबईच्या तुलनेने हे शहर बरेच शांत, स्वच्छ आणि स्वस्त आहे. तमिळनाडूत एक पाहिले. सर्वांचा वेष एकसारखा लुंगी आणि वर शर्ट. राहणी अत्यंत साधी. कपड्यावरून तुम्हाला एखाद्याचे समाजातील स्थान ओळखू यायचे नाही. तीच गत जेवणाचीही. जेवण म्हणजे भात, सार, थोडीशी भाजी. अजून बहुतेक हॉटेलांमध्ये मसाला दोसा, इडली, वडा वगैरे खाद्यपदार्थ केळीच्या पानावर देतात.

मोठमोठे अधिकारीही कपाळावर भस्माचे पट्टे ओढून सचिवालयात जातात. भस्म लावणे म्हणजे सनातनी दिसणे किंवा मागासलेपणा असा विचार त्यांच्या मनात येत नाही. मी पाहिलेल्या भारतातील अनेक राज्यांपैकी प. बंगाल, केरळ



मद्रास शहरातील 'पॅरीस कॉर्नर' हे एक मध्यवर्ती ठिकाण आहे

व तमिळनाडू ही तीन राज्ये अशी आहेत की त्यांनी वेषाबाबतीत पाश्चात्यांचे अनुकरण केलेले नाही. महाराष्ट्रासकट उत्तरेत सर्वत्र बुशकोट, पँट, सूट यांचे राज्य आले, पण या तीन राज्यांत या पाश्चात्य कपडयांचे बस्तान कधीही बसले नाही. त्यांनी आपले पारंपारिक कपडे टिकवून ठेवले आहेत.

मद्रासवासियांचे निरीक्षण करीत मी हायकोर्टसमोरच्या शंबू शेट्टी रस्त्यावर आलो. तिथे श्री. श्रीधर लिमये यांची प्रशस्त आणि प्रसन्न कचेरी आहे. तमिळ साहित्यिकांना मला भेटायचे आहे, अशी मी त्यांना आधीच कल्पना दिली होती. त्यांनी भराभर तीन लेखकांना फोन केले. श्री. अकिलन, श्री. चो आणि श्री. श्रीनिवासाचार्य तिघांनीही लगेच त्याच दिवशी भेटीची वेळ दिली आणि माझा लेखक–संपर्काचा कार्यक्रम तत्काळ सुरू झाला. श्री. लिमये यांनी मला आपल्या मोटारीतून श्री. श्रीनिवासाचार्य यांच्या घरी पाठविण्याची व्यवस्था केली.

का. श्री. श्रीनिवासाचार्य हे मूळचे महाराष्ट्रातले, कल्याणचे. पण साठ वर्षांपूर्वी ते सातआठ वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांनी मद्रासला स्थलांतर केले. घरात मराठी व बाहेर तमिळ अशा दोन्ही भाषा ते वापरू लागले. त्यांनी श्री. वि. स. खांडेकर यांची वीस पुस्तके तमिळमध्ये रूपांतरित केली आहेत. त्यांच्याशी माझ्या छान गप्पागोष्टी झाल्या. ते म्हणाले ‘ रूपांतर करताना मी त्या त्या कथेतील किंवा कादंबरीतील पात्रे तमिळनाडूतील आहेत असेच दाखवले. त्यांची नावेही इकडचीच ठेवली. त्यामुळे वाचकांना ती पुस्तके आपल्यातीलच वाटू लागली. मुख्यमंत्री करुणानिधींच्यासारख्या नेत्यांनी जाहीर सभांतून खांडे-करांची वचने उद्धृत केली. खांडेकर हे तमिळ लेखक आहेत, असाच अनेक वाचकांचा समज आहे, इतके त्यांचे साहित्य या समाजात रुजले आहे.’

आधुनिक तमिळ साहित्य व लेखक, मराठी–तमिळ संबंध वगैरे प्रश्नांवर चर्चा करून मी श्रीनिवासाचार्यांचा निरोप घेतला. श्री. अकिलन यांची मुलाखत चार वाजता ठरली होती. आणि नाटककार चो यांची मुलाखत साडेपाच वाजता होती. मला तमिळ नाटकांविषयीही माहिती हवी होती म्हणून मी ‘ हिंदू ’ या दैनिकाच्या कचेरीत गेलो. ‘ हिंदू ’ हे तमिळनाडूतीलच नव्हे तर सबंध भारतातील एक भारदस्त असे दैनिक आहे. जगातील दहा सर्वांत महत्त्वाच्या दैनिकांपैकी ‘ हिंदू ’ हे एक आहे. वीस सप्टेंबर १८७८ रोजी सहा तरुण देशभक्तांनी स्वदेश-कार्यासाठी त्याची स्थापना केली. त्या काळची इंग्रजी वृत्तपत्रे बहुतांशी ब्रिटिश-धार्जिणी होती, त्यांना इंग्रजीतूनच उत्तर द्यावे म्हणून जी. सुब्रह्मण्यम् अय्यर, वीर राघवाचारियर, एन्. सुब्बाराव, टी. टी. रंगाचारियर, पी. व्ही. रंगाचारियर आणि डी. केशवराव पंत यांनी हे वृत्तपत्र काढले.

‘ हिंदू ’चे पहिले भांडवल होते फक्त पावणेदोन रुपये ! पहिल्या अंकाच्या प्रती काढल्या होत्या फक्त ऐंशी. संपादक म्हणून जी. सुब्रह्मण्यम् अय्यर यांचे नाव

होते. १८८३ पर्यंत हिंदूला स्वतःची कचेरीही नव्हती. द्वारा पोस्ट मास्तर, ट्रिप्लिकेन, मद्रास हाच त्याचा पत्ता होता. पण १८८३ अखेर १००, माऊंट रस्ता, मद्रास या ठिकाणी 'हिंदू'ने आपली कचेरी सुरू केली. दरम्यानच्या काळात हे पत्र चालविणाऱ्या तरुणांची देशभक्ती आणि त्यांचे प्रखर, घणाघाती लिखाण यांनी लोकांची मने जिंकून घेतली होती. महाराष्ट्रांत लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'चे जे स्थान, तेच मद्रास प्रांतात 'हिंदू'ला मिळाले. ब्रिटिश राज्यकर्त्यांना 'हिंदू'ची भीती वाटू लागली. त्यांनी या वृत्तपत्राला अडचणीत आणण्याचे अनेक प्रयत्न केले.

भारतात काँग्रेस पक्ष स्थापन करावा, ही बहुमोल सूचना प्रथम 'हिंदू'ने केली आणि त्याप्रमाणे मुंबईस ठरावही मांडला. १९०५ मध्ये श्री. कस्तुरी रंगा अय्यंगार यांच्याकडे 'हिंदू'ची मालकी आली. त्यांनी या पत्राचा खूप विकास केला. १९१२ पासून त्यांनी दररोज वीस ते बावीस पानांचा 'हिंदू' काढण्यास सुरवात केली. पहिल्या महायुद्धात 'हिंदू'ने दररोज दुपारी व सायंकाळी असे दोन जादा पुरवणी अंक काढून रोज तीन आवृत्त्या देण्याचा विक्रम केला. २२ सप्टेंबर १९१४ रोजी एम्डेन या जर्मन युद्धनौकेने मद्रास शहरावर तोफा डागल्या. त्यावेळी तीन लोक ठार व तेरा जण जखमी झाले. युद्ध असे दाराशी आले, तरी 'हिंदू'ने राष्ट्रीय बाण्याने ब्रिटिशांवरील प्रखर टीका चालूच ठेवली. तेव्हा सरकारने 'हिंदू'वर बंदी घातली. तेव्हा लोकमान्यांनी लिहिले की पत्रावर बंदी असली, तरी 'हिंदू'च्या संपादकांनी भाषणे करून आपली मते मांडावीत. त्याप्रमाणे कस्तुरी रंगांनी भाषणे देऊन सरकारवर कडक टीका केली.

पण ही बंदी सरकार फार काळ टिकवू शकले नाही. 'हिंदू'वर लोकांचे एवढे प्रेम होते, की 'हिंदू'शिवाय आम्हाला जगणे शक्य नाही.' अशी वाचकांनी ब्रिटिश सरकारला प्रतिक्रिया कळवली आणि या रेटयापुढे सरकारला बंदी उठवावी लागली. तेव्हा 'हिंदू'चा खप सतरा हजारावर होता. 'हिंदू'चे संपादक श्री. रंगास्वामी अय्यंगार हे महात्माजींच्याबरोबर द्वितीय गोलमेज परिषदेलाही गेले होते. स्थापनेपासून सतत ऐंशी वर्षे 'हिंदू' आपल्या पहिल्या पानावर जाहिराती व आत संपादकीयाच्या पानासमोर महत्त्वाच्या बातम्या छापीत असे. लंडनच्या 'टाईम्स'चेही बरीच वर्षे हेच धोरण होते. १९५८ पासून मात्र 'हिंदू'नेही पहिल्या पानावर प्रमुख बातम्या द्यायला सुरुवात केली. आज 'हिंदू'च्या मद्रास, कोईमतूर, बंगलोर, हैदराबाद व मदुराई या पाच ठिकाणांहून पाच आवृत्त्या निघतात. भारतातील सर्वांत दर्जेदार दैनिक म्हणून आजही 'हिंदू'चा पहिला क्रम आहे. स्वतःच्या विमानाने आज 'हिंदू' दूरच्या वाचकांच्या सेवेस हजर राहतो.

या श्रेष्ठ दैनिकाच्या कचेरीत ओळखपाळख नसताना जाणे जरा धाडसाचेच होते. पण त्याचे माझ्यावर दडपणही नव्हते. कारण लंडनचा टाईम्स आणि न्यूयॉ-

कॅचा ' न्यूयॉर्क टाईम्स ' यांच्या दैनिकांतही मी पूर्वी बिनदिक्कतपणे गेलो आहे. त्यामुळे 'हिंदू'च्या कचेरीतही मी आत्मविश्वासानेच शिरलो. संपादक जी. कस्तुरी परगावी गेले होते. म्हणून त्यांचे सहाय्यक संपादक व रविवार आवृत्तीचे संपादक श्री. एस्. व्ही कृष्णमूर्ती यांना भेटलो. मी माझ्या अल्प परिचयाचे एक टिपण इंग्रजीतून टाईपकरून घेतले होते. ते टिपण व माझे व्हिजिटिंग कार्ड त्यांच्या हाती दिले. आगगाडीत काही मुके लोक काचेत फ्रेम केलेले विनंतीपत्रक उतारूंच्या हाती देतात. उतारू ते वाचत असताना त्या मुक्यांची जी अवस्था होत असे, तसाच अनुभव मी तेव्हा घेत होतो. माझे अल्प चरित्र वाचून श्री. कृष्णमूर्ती म्हणाले, ' वा:! तुमच्यासारखे लेखक महाराष्ट्रातून इतक्या दूरवर आले याचा मला आनंद होतो. आपल्याला काही सहाय्य लागल्यास ते करण्यास मला आनंद वाटेल. '

मी म्हटले, ' तमिळ नाटकांवर तुमच्याकडे जे कोणी समीक्षणे लिहीत असतील त्यांना मला भेटायचे आहे. मला तमिळ रंगमंचाची माहिती घ्यायची आहे. ' त्यावर श्री. कृष्णमूर्ती यांनी सांगितले. ' आमच्याकडे फुलटाईम समीक्षक नाही. कारण तमिळ भाषेतील नाटकांची समीक्षणे तमिळ वृत्तपत्रांत जेवढी सविस्तर येतात तेवढी आमच्याकडे येऊ शकत नाहीत. आपण ' दिनमणी ' या तमिळ दैनिकाचे संपादक व रविवार आवृत्तीचे संपादक यांना भेटलात तर हे काम अधिक सुकर होईल. ' हिंदू 'मध्ये टी. पी. राजगोपालन् हे प्रादेशिक भाषांतील नाटकांवर लिहितात. त्यांनाही अवश्य भेटा. ' त्यांनी मला 'दिनमणी'चा पत्ता व राजगोपालन् यांचा फोन क्रमांक दिला. त्याशिवाय ' आनंदविकटन, कलकी, कुमुयम् ' यांच्या संपादकांनाही मी भेटावे असे त्यांनी सुचविले, ' दिनमणी ' हे इंडियन एक्स्प्रेसचेच (आपल्याकडे लोकसत्ता आहे तसे) दैनिक आहे. ते 'हिंदू' जवळच माउंट रस्त्यावर आहे. आजचे तमिळ साहित्य, वृत्तपत्रे वगैरे विषयांवरही श्री. कृष्णमूर्तींनी माझ्याशी चर्चा केली आणि चो या नाटककाराला अवश्य भेटा असे सुचवले.

' हिंदू ' मधून मी ' दिनमणी 'च्या कचेरीत गेलो. ' इंडियन एक्स्प्रेस ' व 'दिनमणी' ही दोन्ही एकाच कचेरीत आहेत. वास्तविक इंडियन एक्स्प्रेस या साखळी वृत्तपत्रांची मुख्य कचेरी मद्रासमध्ये असूनही ही इमारत फारशी मोठी किंवा छाप पडण्यासारखी नाही. तिच्यापेक्षा मुंबईची एक्स्प्रेस टॉवर्स ही कितीतरी भव्य आणि अद्ययावत इमारत आहे.

' दिनमणी 'चे संपादक श्री. नारायण म्हणाले, ' मी मुख्यत: वृत्त क्षेत्रातील आहे. साहित्याच्या दृष्टीने तुम्हाला आमच्या साप्ताहिक आवृत्तीचे संपादक श्री. एन्. ए. ए. पार्थसारथी यांचा अधिक उपयोग होईल. कारण ते स्वत: आघाडीचे लेखक आहेत. आणि साहित्य ॲकॅडमीवर तमिळचे प्रतिनिधीही आहेत. तमिळनाडूमधील सर्व प्रमुख साहित्यिकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत.' श्री. नारायण यांनी माझी श्री. पार्थसारथी यांच्याशी ओळख करून दिली.

श्री. पार्थसारथी हे उंच, पन्नाशी ओलांडलेले आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे आहेत. त्यांनी मला तमिळ साहित्याविषयी भरपूर माहिती दिली, मी कोणा-कोणाला भेटावे याची यादी व त्यांचे पत्तेही दिले. ते म्हणाले, 'कोमल स्वामिनाथन् या प्रतिभाशाली नाटककाराला तुम्ही अवश्य भेटा. नव्या सामाजिक जाणीवा रंगमंचावर प्रभावीपणे मांडणारे ते नाटककार आहेत.' केवळ ही माहिती देऊनच ते थांबले नाहीत तर त्यांनी लगेच श्री. कोमल स्वामिनाथन् यांना फोन केला आणि मला भेटण्यासाठी दिनमणीच्या कचेरीत बोलावले. श्री. पार्थसारथी म्हणाले,

'आमच्याकडे प्रायोगिक रंगमंचही आहे. त्यातील सर्वांत आघाडीच्या नाट्य संस्थेचे नाव आहे. 'परीक्षा'. हे अत्यंत समर्थक नाव घेऊन या संस्थेने नव्य-दमाची नाटके आणि अगदी तरुण कलाकार तमिळ रंगमंचाला दिले आहेत.

मुंबईतही छबिलदास रंगमंचावरील प्रायोगिक नाटकांची माहिती मी श्री. पार्थसारथी यांना दिली. ते म्हणाले, 'निरनिराळ्या राज्यातील लेखकांच्यात सुसंवाद साधावा म्हणून आम्ही साहित्य अकॅडमीतर्फे काही आर्थिक सहाय्यही वाटतो. तुम्ही स्वतःच्या खर्चाने हेच काम करीत आहात हे विशेष कौतुकास्पद आहे.


मी स्वतः विनोदी लेखन करीत असल्याने मला त्या क्षेत्राविषयी उत्सुकता होती. म्हणून मी विचारले, 'तमिळमध्ये विनोदी साहित्याची काय परिस्थिती आहे?' त्यावर श्री. पार्थसारथी म्हणाले, 'आमच्याकडे श्री. चो यांच्यासारखे काही राजकीय किंवा सामाजिक विडंबन करणारे लेखक आहेत. पण स्थूलमानाने पाहता तमिळमध्ये विनोदी साहित्य फारसे समृद्ध नाही हे मान्य केले पाहिजे. कादंबरी हे आमचे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. अकिलन यांच्यासारखे ज्ञानपीठ पारितोषिक विजेते मुख्यतः कादंबरीकारच आहेत. कुमुदम, आनंद विकटन, कलकी अशा पाच ते आठ लक्ष खपाच्या साप्ताहिकांत प्रत्येक अंकात तीन कादंबऱ्यांची एक एक प्रकरणे येतात. नाटक हा साहित्य प्रकारही तमिळमध्ये बराच प्रभावी आहे. त्या पाठोपाठ लघुकथेला महत्त्व आहे.

# २ : सेंट जॉर्ज किल्ला आणि कपालेश्वर मंदिर

मद्रासला गेल्यावर तेथील लेखकांना, प्रकाशकांना भेटावे आणि नाटके पाहावीत हा माझा उद्देश होताच. पण टूरिस्ट मंडळी ज्यांना 'प्रेक्षणीय स्थळे' म्हणतात, तीही पाहायची होती. खरे तर परदेशात किंवा परप्रांतांत सर्वांत अधिक पाहायची असतात ती तिथली माणसे. पण माणसांचे इतिहास, त्यांच्या भावना अनेकदा इमारती, डोंगर, उद्याने, समुद्र यांच्याशीही निगडीत असतात. त्यामुळे माणसांच्या इतकेच अनेकदा त्यांनाही महत्त्व असते. कधी कधी एखाद्या इमारतीत त्या त्या भागातील समाजाचा, त्या राज्याचा किंवा राष्ट्राचाही इतिहास प्रतिबिंबित झालेला असतो. लाल किल्ला, रायगड, शनिवार वाडा अशी या संदर्भात अनेक नावे सांगता येतील. लंडन टॉवर, व्हर्सायचा राजवाडा ही परदेशातील स्थळेही त्या त्या राष्ट्राचा बोलका इतिहासच आहे.

मद्रासमध्ये असे जे सर्वांत महत्त्वाचे ठिकाण आहे, त्याचे नाव सेंट जॉर्ज किल्ला. तीनशे वर्षांपूर्वी राजसत्तेचे अधिष्ठान किल्ला हेच असे. किल्ला किंवा कोट म्हणजे सुरक्षितता, प्रजेवर राज्य करण्याचे प्रमुख केन्द्र, परचक्राला तोंड देण्याचे सर्वांत सोयिस्कर ठिकाण. तेथे आक्रमणाच्या कारवाया होत, संरक्षणाच्या लढाया होत आणि राजकीय कारस्थानांचे कूट खलही होत.

मद्रास शहराचा प्रारंभ जेथे झाला, तो सेंट जॉर्ज किल्ला पाहायला मी एकटाच गेलो. कारण टूरिस्ट बसने बहुधा अशी महत्त्वाची ठिकाणेही 'उरकून' घेतली जातात. तीस–चाळीस प्रवाशांना गाईड सांगतो, 'हे चर्च बघा. हे १६४८ मध्ये बांधले. ही घंटा पाहा. ही पोर्तुगीजांनी १६६३ मध्ये दिली. ही तोफ. ही १५४८ मध्ये अमक्यानं तमक्याला दिली. चला बस पकडा. हा किनारा पाहा. तो घुमट बघा.' अशी नुसती धावपळ असते. त्यापेक्षा मी कोणत्याही शहरातली महत्त्वाची ठिकाणे स्वतः भरपूर वेळ हाती ठेवून पाहतो. तसाच या किल्ल्यातही गेलो.



ब्रिटिश सत्तेचा पाया ब्रिटिशांनी भारतात जिथून रोवला, तो सेंट जॉर्ज किल्ला

किल्ल्याची जुनी इमारत आणि त्याच आवारात बांधलेले राज्य सरकारचे अवाढव्य सचिवालय अशी काहीशी विरोधी पद्धतीच्या बांधणीची ही दोन ठिकाणे एकाच आवारात आहेत. इथे भरपूर झाडी आहे एवढीच काय ती समाधानाची गोष्ट. पण आधुनिक पद्धतीची सचिवालयाची प्रचंड इमारत सेंट जॉर्ज किल्ल्याच्या साडेतीनशे वर्षांच्या जुन्या बांधणीशी विसंगत दिसते हे मात्र खरं. त्यातच याच आवारात लष्करी केंद्रही दाटीवाटीने बसवले आहे.

ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली त्या सुमारास ब्रिटिश लोक आपला पाय भारतात रोवण्यासाठी चांगल्या जमिनीच्या शोधात होते. मद्रासपट्टिनम् या छोटया मच्छीमारी खेड्याजवळ तीन मैल लांब व एक मैल रुंद अशी जमीन फॅक्टर फरॅन्सिस डे या ब्रिटिश अधिकाऱ्याला आढळली. त्याने तो पट्टा त्यावेळच्या अधिपतीकडून विकत घेतला. २२ जुलै १६३९ हा तो दिवस. त्याच दिवसापासून आधुनिक मद्रास शहराला प्रारंभ झाला, तो याच पट्टयावर. येथे सेंट जॉर्ज किल्ला उभा आहे. नदी व सागर यांनी ही जागा तीन बाजूंनी सुरक्षित असल्याने किल्ला बांधण्यास आदर्श होती. १ मार्च १६४० रोजी डे याने या किल्ल्याचा पाया खोदण्यास सुरवात केली. २३ एप्रिलला पहिला भाग पूर्ण झाला. तेव्हा 'सेंट फरॅन्सिस दिवस' होता. म्हणून डे याने हेच नाव किल्ल्याला दिले. सप्टेंबर १६४१ पासून कंपनीची ही मुख्य कचेरी झाली.

या किल्ल्याशी अनेक मोठी नावे निगडित आहेत. वॉटर्लूची लढाई लढणारा अॅडमिरल वेलिंग्टन इथे होता. रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज, विल्यम बेंटिक, कॉर्नवॉलिस आणि मन्टो अशा ब्रिटिश साम्राज्याचा पाया घालणाऱ्यांनी येथे निवास केला आहे. १७४६ मध्ये हा किल्ला फ्रेंचांनी जिंकला. पण तीन वर्षांनंतर ब्रिटिशांनी तो परत जिंकून घेतला. त्यावेळी रॉबर्ट क्लाईव्ह या किल्ल्यात आला. त्याने अर्काटच्या व इतर लढायांत विजय मिळविले. 'क्लाईव्ह हाऊस' हे नंतर भारतातील ब्रिटिश राजसत्तेचे प्रमुख केंद्र झाले. याच किल्ल्यातील चर्चमध्ये रॉबर्ट क्लाईव्ह याने १७५३ मध्ये मार्गारेट मॅस्कीनशी विवाह केला.

क्लाईव्हच्या पूर्वी येल हा गव्हर्नर म्हणून या किल्ल्यात राहात होता. (१६८७ ते १६९२) त्याने मिळविलेल्या अमाप संपत्तीतून पुढे अमेरिकेत येल विद्यापीठ सुरू झाले. कारण येल याचा जन्म अमेरिकेतील बोस्टन येथे झाला होता. येल याने खुद्द मद्रास शहराच्या विकासातही बराच हातभार लावला. त्याने मद्रास नगरपालिका स्थापन केली. त्याने मोंगलापासून कोरोमॅंडेल किनाऱ्यावरील अनेक बंदरे विकत घेऊन ब्रिटिश साम्राज्य बळकट करण्यास मोठा हातभार लावला.

या किल्याच्या आवारातील सेंट मेरीज चर्च हे अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. मद्रास शहरातील ही सर्वांत जुनी इमारत. हे भारतातील पहिले 'अँग्लिकन'

चर्च आहे. १६७८ ते १६८० पर्यंत याचे बांधकाम सुरू होते. येलच्या तसेच क्लाईव्हच्या विवाहाची या कागदपत्रात नोंद आहे. तसेच कलकत्ता वसविणारा चॉरनॉक याच्या मुलांच्या बाप्तिस्म्याचीही नोंद आहे. चर्चच्या गाभाऱ्यात ख्रिस्ताच्या मूर्तीच्या वर 'लास्ट सपर' हे ख्रिस्ताच्या जीवनातील अखेरच्या भोजनप्रसंगीचे सोळाव्या शतकातील उत्कृष्ट तैलचित्र आहे. या चर्चच्या आवारात दोन गव्हर्नरांच्या पत्नींचे दफन झाले आहे. त्याशिवाय अनेक लष्करी अधिकाऱ्यांचे स्मारकस्तंभ आवारात आहेत.

फोर्ट म्युझियम या नावाचे लष्करी वस्तुसंग्रहालय या किल्ल्यात आहे जुन्या तोफा, बंदुका, लष्करी गणवेष, महत्त्वाची ऐतिहासिक कागदपत्रे इथे पाहायला मिळतात. सेंट जॉर्ज किल्ल्याचे आवार एकंदरीत स्वच्छ, रेखीव आणि वृक्षांमुळे शोभिवंत आहे. प्रवेशद्वाराचे बांधकाम बोटीच्या आकाराचे असून, त्यावर नौदलाचे एक उंच निशाण आहे. हे भारतीय नौदलाचे सर्वांत उंच निशाण आहे, असे सांगण्यात आले. याच किल्ल्याच्या आवारात तमिळनाडू विधानसभागृहदेखील आहे.

सेंट जॉर्ज किल्ला जितका प्रसिद्ध आहे, त्यापेक्षा जुने आणि अधिक प्रसिद्ध असे मद्रासचे अत्यंत प्रेक्षणीय ठिकाण म्हणजे कपालेश्वर मंदिर. शहराच्या दुसऱ्या टोकाला, मैलापूर भागात हे उत्कृष्ट शिल्पकलेचे प्राचीन मंदिर आहे. हे शिवमंदिर कपालेश्वर या नावाने ओळखले जाते. दक्षिणेत शिवाची मंदिरे अनंत नावांनी ओळखली जातात. त्यांपैकीच हे एक.

ज्या भागात हे मंदिर आहे, त्याचे नाव मैलापूर पडण्यामागेही अशीच एक दंतकथा आहे. तमिळमध्ये 'मइला' म्हणजे मोर. एकदा शिव आणि पार्वती बोलत बसली असता जवळून जाणाऱ्या सुंदर मोराकडे पार्वतीचे लक्ष गेले आणि शंकराच्या बोलण्याकडे तिचे दुर्लक्ष झाले. त्यामुळे शंकराने संतापून तिला शाप दिला की, 'तू मोर होशील.' ती मोर झाली. पार्वतीने मोराच्या रूपात या ठिकाणी शंकराची तपस्या केली आणि त्याने तिला पुन्हा पूर्वीचे रूप दिले. म्हणून या कथेला अनुरूप असे शिल्प आहे.

मंदिराचे गोपूर सव्वाशे फूट उंच आहे. या आवारात पार्वती, मोर, दुर्गा, ब्रह्मा, विष्णू इत्यादींचीही लहान–मोठी मंदिरे आहेत. पोर्तुगीजांनी सोळाव्या शतकात या प्राचीन मंदिराचा काही भाग उद्ध्वस्त केला. पण सतराव्या शतकात हे पुन्हा भव्य स्वरूपात बांधले गेले. मंदिराच्या आवारात मोठे व सुंदर तळे आहे. तसेच एका झाडाखाली मोराच्या रूपातील पार्वती शिवलिंगाची पूजा करतानाचे दृश्य कोरले गेले आहे. मार्चच्या सुमाराला मोठा उत्सव होतो आणि शिवाचा रथ निघतो. तेव्हा लक्षावधी यात्रेकरूंची मैलापुरात रीघ लागलेली असते.

थिरुवल्लुवर हे दोन हजार वर्षांपूर्वीचे तमिळमधील सर्वांत आदरणीय व ज्येष्ठ कवी मैलापूर येथे आपल्या अखेरच्या काळात राहात होते. त्यांनी लिहिलेले

'कुरुल' काव्य हे तमिळ महाकाव्य. हा तमिळ भाषिकांचा श्रेष्ठ ग्रंथ आहे. वल्लुवटकोटम् येथे थिरुवल्लुवर यांचे भव्य स्मारक बांधले आहे. राज्य सरकारने त्यासाठी तीन कोटी रुपये खर्च केले आहेत. भारतातील इतर कोणत्याही लेखकाचे एवढे स्मारक क्वचितच उभारले गेले असेल. महाभारत, रामायण यांच्याइतकेच 'थिरुकुरल' या ग्रंथास तमिळ भाषिक महत्त्व देतात. 'थिरुकुरल' हे काव्य २६६० ओळींचे आहे. माणसाने जीवन, धर्म, अर्थ, काम यांच्या संबंधात कसे वागावे यावद्दल त्यात मार्गदर्शन करण्यात आले आहे. या ग्रंथाचे मराठी भाषांतरही झाले आहे. मंदिर, सभागृह, रथ इत्यादी अनेकांचा मिलाफ या स्मारकात करण्यात आला आहे. त्यासाठी तीन चौरस किलोमीटरर्स जागा देण्यात आली आहे. प्रथम द्रविड पद्धतीचे भव्य गोपूर लागते. त्यानंतर छानशी हिरवळ आहे. मग साडेतीन ते चार हजार लोक बसतील असे भव्य प्रेक्षागृह आहे. प्रेक्षागृहातील खांबांवर थिरुकुरलमधील निवडक वचने कोरण्यात आली आहेत. सभागृहावर प्रशस्त गच्ची आहे.

सभागृहामागे बत्तीस फूट उंचीचा भव्य दगडी रथ आहे. दोन दगडी हत्ती हा रथ ओढीत असल्याचे दाखविले असून, रथाचे कोरीव काम अत्यंत मनोहर आहे. रथाचे एक एक चाक अकरा फूट व्यासाचे आणि चाळीस टन वजनाचे आहे. सभागृहाच्या गच्चीवरून गेले की, रथाच्या वरच्या बाजूला बसविलेला संत थिरुवल्लुवर यांचा सुंदर पुतळा दिसतो. वरच्या व्हरांड्यात संपूर्ण थिरुकुरुल ग्रंथातील ओळी विविध रंगातून लिहिलेल्या आहेत. एका संत कवीचे हे स्मारक अत्यंत स्फूर्तिदायक आहे.

'कुरुल' ग्रंथातील विशाल तत्त्वज्ञान वल्लुवर कवींनी समजावून सांगितले, तेव्हा तेथील पंडितांनी त्यांचा 'थिरु' म्हणजे संत म्हणून सत्कार केला व त्यांचे नाव थिरुवल्लवर असे झाले व त्यांचा कुरुल ग्रंथ थिरुकुरुल झाला. तुकारामाप्रमाणेच थिरुवल्लुवर यांनी सामान्य लोकांसाठी जीवनतत्त्वे उपदेशिली. त्यांची राहाणी अतिशय साधी होती. आजचे समानतेचे व समाजवादी विचारही थिरुकुरुलमध्ये आढळतात. म्हणून तमिळ लोक त्यांना द्रष्टे कवी मानतात. 'गरजू माणसाला आपल्या जेवणात सहभागी करून घ्या' अशा तऱ्हेची त्यांची वचने 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो अपुले' अशा संत तुकारामांच्या अभंगाशी जुळतात. आर्थिक विषमतेमुळे समाजाचे अधःपतन होते हे त्यांनी सांगितले होते. अशा श्रेष्ठ संत कवीला उचित असेच स्मारक त्यांच्या तमिळ भक्तांनी बांधले आहे. त्यात भक्तीचा किंवा धार्मिकतेचा बडेजाव मांडण्यात आला नसून, शुद्ध ज्ञानाचे श्रेष्ठत्वच वर्णिले आहे.

तमिळनाडूमधील आघाडीचे नाटककार श्री. स्वामिनाथन यांना 'दिनमणी'चे श्री. पार्थसारथी यांनी बोलावून त्यांची व माझी ओळख करून दिली. श्री. स्वामि-



मंगळूर येथील शिवाचा रथोत्सव

नाथन पन्नाशीचे, साधे, बुद्धिमान आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव असलेले प्रभावी नाटककार आहेत. ते राष्ट्रीय चळवळीत भाग घेतलेले आणि समाजाच्या तळातील लोकांशी संबंध असलेले असे लेखक आहेत. नाटक हा त्यांचा प्रेमाचा आणि चरितार्थाचाही विषय आहे. त्यांची स्वतःची 'स्टेज फ्रेंड्स' नावाची कंपनी आहे. त्यांनी आतापर्यंत २६ नाटके लिहिली असून या नाटकांचे दीड हजारांवर प्रयोग झाले आहेत. १९६१ मध्ये त्यांनी स्वतःची नाट्यसंस्था काढली.

श्री. स्वामिनाथन् यांनी 'पुदिया पादै' (नवा रस्ता) या नावाचे एक नाटक लिहून रंगमंचावर आणले. त्यात त्यांनी खेड्यातून रस्ते बांधण्याचा विषय घेतला असून, ग्रामसुधारणेबाबत जुन्या व नव्या विचारसरणींतील संघर्ष दाखवला आहे. 'स्वर्गभूमी' हे त्यांचे नाटक तमिळनाडूतील नक्षलवादी चळवळीवर लिहिलेले आहे. 'चेकमॉडिगल' या त्यांच्या नाटकात तमिळनाडूतील गरीब मजूर अजूनही बड्या जमीनदारांच्या घाण्याला कसे जुंपलेले आहेत हे दाखवले आहे. चेकमॉडिगल याचा अर्थच 'तेल्याचा घाणा' असा आहे. श्री. स्वामीनाथन् यांच्या निमंत्रणावरून त्यांचे 'तन्नीर तन्नीर' हे नाटक मी पाहिले. त्यात सुमारे तीस कलाकारांनी भाग घेतला होता. एका खेड्यात पाण्याचे दुर्भिक्ष असताना एक भूमिगत नक्षलवादी येऊन त्या गावाला पाणी आणून देतो, पण पोलिसांना त्याचा सुगावा लागताच तो पळून जातो आणि जंगलात पाण्यावाचून तडफडून मरतो असे या नाटकाचे कथानक आहे. हे नाटक कलाकारांनी अतिशय प्रभावीपणे सादर केले.

तमिळ भाषेतील पुस्तक प्रकाशनाबद्दलही मला विशेष उत्सुकता होती, म्हणून तमिळ पुस्तकालयम्चे श्री. मुथैया यांना भेटण्यासाठी मी ट्रिप्लिकेन भागात गेलो व त्यांची मुलाखत घेतली. ते म्हणाले, 'मी १९४६ मध्ये प्रकाशन व्यवसाय सुरू केला. आतापर्यंत मी पाचशे पुस्तके प्रकाशित केली. पूर्वी हा धंदा चांगला होता. पण अलीकडे साप्ताहिकांनी या व्यवसायावर फार प्रतिकूल परिणाम झाला आहे. फक्त ७५ पैशांत कुमुदम्, आनंद विकटन, कलकी अशी साप्ताहिके ९६ पृष्ठांचा मजकूर देतात. तीन चालू कादंबऱ्यांची प्रकरणे प्रत्येक अंकात असतात. शिवाय चार कथा, दोन लेख, छायाचित्रे व व्यंगचित्रे असतात. ७५ पैशांत इतका मजकूर मिळाला तर पाच रुपये खर्चून पुस्तक कोण घेणार? त्याशिवाय ही साप्ताहिके ओणम्, दिवाळी अशा वेळी ७५ पैशांतच नेहमीच्या अंकाबरोबर एक संपूर्ण कादंबरी मोफत देतात. त्यामुळे तमिळ प्रकाशकांचा सारा भरवसा आता ग्रंथालयांवर आहे. आम्ही पुस्तकाच्या एक हजार प्रती काढतो. त्यांपैकी ६०० ते ७०० ग्रंथालयांतून खपतात. तेवढ्यावर आमचा खर्च सुटतो. उरलेल्या प्रती चार-पाच वर्षांत खपतात. तेवढाच फायदा.

'तमिळ पुस्तक प्रकाशनाचा धंदा अगदी मंदीत आहे. साप्ताहिकांचे प्रचंड खप, त्यांना मिळणाऱ्या लाखो रुपयांच्या जाहिराती व न्यूज प्रिंट कागदावरची

रोटरीची छपाई यामुळे त्यांना अत्यंत स्वस्त दरात भरपूर मजकूर देणे परवडते. आम्हाला चांगला कागद उत्तम छापखाना, चांगली बांधणी, यांचा आश्रय घ्यावा लागतो आणि एक पैशाचीही जाहिरात मिळत नाही.'

तमिळ पुस्तकांच्या किमती मराठी पुस्तकांच्या किमतीच्या तुलनेने बऱ्याच कमी आढळल्या. श्री. मुथैयांनी मला शंभरावर पुस्तके दाखविली. मराठीत शंभर पष्ठांना दहा रुपये असे किमतीचे प्रमाण पडते. तमिळमध्ये हेच प्रमाण दोनशे पृष्ठांना दहा रुपये असे आहे. तरीही तमिळ पुस्तकांचा खप यथातथाच होता. याला कारण साप्ताहिकांचे संपादक असा मुथैया आणि अकिलन यांच्या बोलण्याचा रोख होता. त्यांचे याबाबतचे काय मत आहे हे विचारावे म्हणून मी कलकी, कुमुदन् आणि आनंद विकटन् या तिन्ही साप्ताहिकांच्या संपादकांना भेटलो. त्या तिघांच्याही मतांचा रोख एकाच दिशेने होता. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा :

आम्ही आमच्या वाचकांची जास्तीत जास्त सेवा करतो. त्यांना किमान पैशांत अधिकात अधिक मजकूर द्यावा हा आमचा उद्देश आहे. आम्ही वाचकांना त्यांच्या पैशाचा भरपूर मोबदला देतो. म्हणूनच ते रोख पैसे देऊन आमची साप्ताहिके घेतात. आमच्या स्वस्त किमती आणि प्रचंड खप यांचा परिणाम पुस्तक-प्रकाशनावर होत असेलही, पण त्यातून कसा मार्ग काढायचा हा प्रकाशकांचा प्रश्न आहे. आमचा नाही. उपक्रमशीलता नसलेल्या प्रकाशकांच्या सोयीसाठी आम्ही वाचकांना कमी सेवा द्यावी असे त्यांचे म्हणणे असेल तर ते आम्हाला मान्य नाही.

साप्ताहिकांच्या संपादकांनी असे ठणकावून उत्तर दिल्याने तमिळ प्रकाशकांचा प्रश्न तसाच दीर्घकाळ लोंबकळत राहणार अशी माझी खात्री झाली. इतकेच नव्हे तर साप्ताहिकांच्या संपादकांचे म्हणणे असे की आम्ही प्रवाही (प्रकरणवार) कादंबऱ्या प्रसिद्ध करतो म्हणून पुस्तक-प्रकाशकांना त्या आयत्या मिळतात. केवळ पुस्तकासाठी लेखन करण्यापासून साहित्यिकांना इतका कमी पैसा मिळतो की साप्ताहिके नसती तर प्रकाशकांना छापण्यासाठी पुस्तके मिळणेही कठीण गेले असते.

अद्याप मला मद्रासमध्ये बरेच पाहायचे होते. दिवस तर संपला होता. मी महाराष्ट्रभवनावर परतलो. दुसऱ्या दिवशी पुन्हा बाहेर पडलो तो मद्रास पाहण्यासाठी. येथील मरीना बीच ही चौपाटी फार प्रशस्त आणि स्वच्छ आहे. जगातील ही दुसऱ्या क्रमांकाची मोठी चौपाटी असे मद्रासचे गाईड्स सांगतात. पहिल्या क्रमांकाची चौपाटी अमेरिकेतील मायामी बीच मी पाहिली आहे आणि दोन वेळा मायामीला राहिलोही आहे. मात्र पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाच्या चौपाट्यांत मला महदंतर दिसले.

मरीना बीचवर एक उंच दीपगृह आहे. दीडशे फूट उंचीचे हे दीपगृह एक रुपया प्रवेशमूल्य देऊन कोणालाही पाहता येते. तिथून समुद्राचे घडणारे दर्शन मनोहर आहे. दीपगृहासमोरच आकाशवाणीचे केन्द्र आहे आणि जवळच दूरदर्शनचा

टॉवरही आहे. बीचवर अनेक नेत्यांची स्मारके आहेत. अण्णा दुराई यांचे स्मारक विशेष प्रसन्न व आकर्षक आहे. अण्णा दुराई तमिळनाडूचे अत्यंत लोकप्रिय नेते होते. उत्कृष्ट संघटक, पट्टीचे वक्ते आणि अफाट वाचन करणारे, स्वतः ललित लेखन करणारे होते. त्यांची राहणी सामान्य लोकांप्रमाणेच साधी होती. तमिळनाडूत त्यांना देवासमान मानणारे लक्षावधी लोक आहेत. त्यांचे उचित स्मारक मरीन बीचवर आहे. सुंदर हिरवळ, संतांचे पुतळे, फुलझाडे यांनी सुशोभित असलेल्या या स्मारकाचे प्रवेशद्वार हत्तीच्या सुळ्यासारखे केले आहे. स्मारकाच्या चबुतऱ्यावर 'कोणत्याही आपत्ती सहन करणारे विशाल हृदय' असा इंग्रजीत उल्लेख असलेले वाक्य कोरले आहे. चबुतऱ्यावर अखंड तेवणारी ज्योत आहे.

मरीना बीचवर जे अनेक पुतळे आहेत त्यात 'श्रमाचा विजय' हे शिल्प विशेष अर्थपूर्ण आहे. काही श्रमिक एक प्रचंड वजन लाकडांचा जोर लावून उचलत आहेत असे हे शिल्प आहे. बीचवर चेपॉक राजवाडा आहे. आठराव्या शतकात बांधलेल्या या वास्तूत १८५५ पर्यंत कर्नाटकाच्या नबाबांचे वास्तव्य होते. वाड्याजवळच स्टेडियम आहे. तेथे क्रिकेटसारखे मोठे सामने होतात. पन्नास हजारांवर प्रेक्षक ते पाहू शकतात. पोहण्याचा तलाव आणि मत्स्यालय मरीना चौपाटीवर आहे, पण मुंबईपेक्षा त्यात वेगळे असे काही नाही.

मद्रासमधील गुंडी रस्त्यावरील सर्पोद्यान मात्र प्रवाशांचे लक्ष वेधून घेते. तेथे सुमारे चारशे सर्प आहेत. ते एका खास खोलगट जागेत व त्या जागेतील झाडावर सोडले आहेत. तेथील गाईड म्हणाला, 'सापाबद्दल लोकांचे अनेक गैरसमज आहेत, ते दूर करणे हा या उद्यानाचा मुख्य हेतू आहे. साप म्हटला की तो भयंकर विषारी असलाच पाहिजे या भीतीने लोक सर्पांची हत्या करतात. पण सर्पांच्या ३५० जातींपैकी फक्त ७० जातीच विषारी असतात. इतर जातींचे सर्प उंदीर व इतर उपद्रवकारक प्राणी खाऊन माणसावर उपकारच करतात. विषारी सापांचाही माणसाच्या औषधासाठी उपयोग होतो. या उद्यानात अजगर व मगरीही आहेत. तसेच जवळील क्रोकोडाईल फार्ममध्ये शास्त्रीय पद्धतीने सुसरींची पैदास केली जाते.

महात्मा गांधी, राजगोपालाचारी व कामराज यांची उचित स्मारके याच गुंडी रस्त्यावर आहेत. दहा एकरांच्या प्रशस्त जागेत गांधी मंडप आहे. तेथे एक भव्य प्रार्थनागृह आहे. गांधीजींची निवडक वचने विविध भाषांत कोरण्यात आली आहेत. १९५६ मध्ये हे स्मारक पूर्ण झाले. राजगोपालाचारी हे मद्रासचे सुपुत्र व थोर राजकारणी भारताचे पहिले गव्हर्नर जनरल होते. त्यांच्या लहान पण सुबक स्मारकाचे जयप्रकाश नारायण यांनी १९७५ मध्ये उद्घाटन केले. कामराज यांच्या साध्या जीवनाला शोभेल असेच त्यांचे स्मारकही साधे आहे. काळा संगमरवरी चबुतरा, पांढरे स्तंभ आणि सिमेंटची जाळी असे या स्मारकाचे स्वरूप आहे.

मद्रासच्या म्युझियममध्ये मुख्यत: द्रविड पद्धतीच्या शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने आहेत. त्यातल्या त्यात नटराजांच्या शिल्पकृतींची संख्या खूप मोठी आहे. मात्र या शिल्पकृती मोकळ्या आकाशात, मंदिराचा भाग म्हणून जशा उठून दिसतात, तशा वस्तुसंग्रहालयातील बंदिस्त जागेत दिसत नाहीत. भारतातील हे एक अत्यंत जुने वस्तुसंग्रहालय आहे. १३० वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी हे सुरू केले. त्यात दक्षिणी नृत्यकलेविषयी एक खास दालन आहे. तसेच एक बालविभागही आहे. पशुपक्ष्यांचे पेंढा भरलेले नमुने इतर वस्तुसंग्रहालयांप्रमाणेच आहेत. या म्युझियम-जवळच आर्टगॅलरी व ग्रंथालयही आहे. मात्र त्रिवेंद्रम, तंजावर येथील आर्ट गॅलरीज सरस वाटल्या.

मद्रास भागात पक्षीतीर्थ नावाचे एक ठिकाण बरेच प्रसिद्ध आहे. सर्व प्रवासी पुस्तिकात त्याचे महत्त्व वर्णन केलेले आहे. मद्रासपासून तीस मैलांवर एका उंच पर्वतावर एक मंदिर आहे. त्या मंदिराजवळच्या खडकावर दररोज दुपारी बारा वाजता दोन पक्षी येऊन देवाचा प्रसाद खातात आणि या पक्ष्यांचे दर्शन घेणे फार पुण्यप्रद असते, असे सांगण्यात येते. पाखरे पाहून पुण्य मिळविण्यात मला विशेष स्वारस्य नव्हते, पण वाराणसीहून बरोबर बाराच्या ठोक्याला हे पक्षी येतात तरी कसे हे पाहण्याची मला उत्सुकता होती. म्हणून मी एका सकाळी तेथे गेलो. माझ्या बरोबर दहिसरचे श्री. केसकर व त्यांचे कुटुंबीय होते.



पक्षीतीर्थाचे एक दृश्य

डोंगरावरील मंदिर चांगलेच उंचावर होते. साडेपाचशे पायऱ्या होत्या. दोन पक्ष्यांना पाहण्यासाठी इतका त्रास घ्यायचा का असा विचार मनात आला पण त्या सुमाराला म्हणजे साडेअकरा वाजता अनेक टूरिस्ट बसेस डोंगराच्या पायथ्याशी उभ्या राहिल्या आणि उत्साही प्रवाशी पायऱ्या चढू लागले. ज्यांना हे झेपत नव्हते त्यांच्यासाठी दहा रुपयांना डोलीने वर नेऊन खाली आणण्याची सोय होती. मी विचार केला की इतक्या दूर आलो आहोत तर हळू हळू वर चढून त्या पक्ष्यांना वेळेवर पाहावे. म्हणून काहीसा थांबत थांबत साडेपाचशे पायऱ्या चढून वर गेलो. वर चारपाचशे लोक पक्ष्यांची वाट पाहात होते. मंदिरातील देवापेक्षा त्याचा प्रसाद खाणाऱ्या पक्ष्यांना अधिक महत्त्व आले होते. आम्हीही थांबलो. बारा वाजले, साडेबारा वाजले, पाऊण झाला तरी पक्ष्यांचा पत्ता नव्हता. ऐकलेल्या गोष्टींवर लोक आपसात कुजबुजताना अविश्वास दाखवू लागले. एकजण सांगू लागला, " मी काल आलो आणि आजही आलो, दोन्ही दिवस पक्षी आले नाहीत. "


एक वाजून गेल्यावर लोक निराशेने परतू लागले. काहीजण म्हणू लागले की, खायला ठेवल्यावर पक्षी येतातच. तसेच अधून मधून इथे होते. हे पक्षी म्हणजे पुराणकालातील ऋषी आहेत अशीही दंतकथा सांगितली जाते. बारा वाजल्यानंतर येणाऱ्यांना तिथले पुजारी सांगतात, तुम्ही वेळ केलात, आज पक्षी आधीच येऊन गेले, कधी असे सांगितले जाते की आज पावसामुळे आले नाहीत. एवढे मात्र खरे की या उंच टेकडीवरील शिवमंदिराच्या आवारातून खालच्या जमिनीचे दृश्य फार सुंदर दिसते.

❋ ❋

## ३ : सागरकाठचे भव्य शिल्प

मद्रासजवळच्या महाबलिपुरम्‌ची ख्याती खूप वर्षे ऐकून होतो. मद्रासपासून साधारण चाळीस मैलांवर समुद्रकिनारी ही प्राचीन मंदिरे आहेत. पल्लवकालीन शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने येथे पाहायला मिळतात. महाबलिपुरम्‌चे मूळ नाव मामलपुरम्‌ असे होते. पल्लव कुळातला नरसिंहवर्मन नावाचा राजा पराक्रमी योद्धा होता. 'मामल' म्हणजे शूर योद्धा. नरसिंहवर्मनला 'मामल' म्हणत व त्याच्यावरून या गावाचे नाव मामलपुरम्‌ असे पडले. उत्तर तमिळनाडूवर पल्लव राजांचा प्रभाव इ. स. ६०० ते ९०० पर्यंत होता. आमचा गाईड सांगत होता, "या समुद्रकिनारी जे अप्रतिम कोरीव कामाचे देवालय आहे, त्याला शोअर टेंपल म्हणतात. अशी सात देवालये इथे होती. पण तुफान सागरी लाटांनी बाकीची सहा वाहून गेली. हे एकच बचावले आहे. याच्यावर लाटांच्या तडाख्याचा परिणाम होऊ नये म्हणून समुद्र आणि मंदिर यांच्यामध्ये क्रेनच्या साहाय्याने प्रचंड शिळा टाकण्याचे काम सरकारतर्फे चालले आहे."

दक्षिणेतील दगडी शिल्पकलेचा पाया पल्लव राजांनी घातला. प्राचीन काळी या मंदिरावर सोन्याचा घुमट होता, असे सांगतात. पण सबंध दगडी मंदिरच्या मंदिर जिथे वाहून जाते, तिथे लहानशा घुमटाची काय कथा! मंदिराच्या गाभाऱ्यासमोर अनेक नंदी आहेत. त्यावरून हे शिवमंदिर आहे हे सांगायला नकोच. मला भेटलेल्या एका गाईडने दक्षिणेतील देवळांची छान वर्गवारी मला सांगितली. तो म्हणाला, 'ज्या गाभाऱ्याबाहेर नंदी असेल ते मंदिर शिवाचे, ज्यासमोर गरुड असेल ते विष्णूचे आणि मोर असेल ते कार्तिकेयाचे.' शिवाचे दोन मुलगे गणपती आणि कार्तिकेय यांची अनेक देवालये दक्षिणेत असली, तरी महाराष्ट्रात आणि दक्षिणेत हे दोन्ही देव अगदी विरुद्ध रूपे घेतात. आपण गणपतीला दोन पत्नी आहेत असे मानतो. उलट कार्तिकेय हा मात्र कडक ब्रह्मचारी अशी



महाबलिपुरम् येथील समुद्राकाठचे मंदिर

आपली समजूत. महाराष्ट्रात कार्तिकेयाची फारच थोडी मंदिरे आहेत, पण जी आहेत त्यात स्त्रियांनी प्रवेश करणे निषिद्ध मानले जाते. दक्षिणेत मात्र अगदी उलट परिस्थिती आहे. तिकडे गणपतीला ब्रह्मचारी मानतात आणि कार्तिकेयास दोन पत्नी असल्याचे मानले जाते.

महाबलिपुरम् येथील कलाकृती चार प्रकारच्या आहेत. मंदिर, गुहेत कोरलेली मंदिरे, शिळेवरील कोरीव काम आणि रथ. शोअर टेंपलच्या शिखराचे कोरीव काम उत्कृष्ट तर आहेच, पण जवळच्या सागरामुळे त्याला अत्यंत देखणी नैसर्गिक पार्श्वभूमीही मिळाली आहे. अर्जुनाची तपस्या या नावाचे प्रचंड कोरीव काम (बास रिलीफ) इथे आहे. नव्वद फूट लांब व तीस फूट उंच शिळेवर सव्वाशे ते दीडशे मूर्ती कोरल्या आहेत. त्यापैकी अर्जुनाची तपस्या दाखवणारा भाग विशेष महत्त्वाचा आहे. अर्जुन तप करीत असतानाचे, एका पायावर उभा राहून दोन्ही हात वर एकमेकात अडकवून उभा असल्याचे उत्तम चित्र कोरले आहे. त्याजवळच्या प्रचंड हत्तींची व हत्तींच्या पिलांची चित्रे लक्ष वेधून घेतात. भारतातीलच नव्हे तर, जगातील हे सर्वांत मोठे ' बास रिलीफ ' आहे.

मात्र अशा तऱ्हेच्या गुंतागुंतीच्या कलाकृती निवांतपणे, सावकाशीने पाहायच्या असतात टूरिस्ट बसने आपण गेलो, तर कलेचा असा सावकाशीने आस्वाद घेता येत नाही. माहिती सांगणाऱ्या गाईडने त्या कलाकृती शेकडो वेळा पाहिलेल्या असतात. त्यांच्याबद्दलची माहिती पोपटपंचीसारखी धडाधड सांगून टाकली की आपले काम झाले, अशा समजुतीत काही गाईड असतात.

महाबलिपुरम्च्या केव्ह टेंपल किंवा गुहेत कोरलेल्या देवालयात अनेक नक्षीदार मंडप आहेत. त्यात धर्मराज-मंडप, महिषासुरमर्दिनी-मंडप, वराह-मंडप आणि कृष्ण-मंडप विशेष प्रेक्षणीय आहेत. पंचपांडव मंडपात पांडवांची शयनगृहे आहेत. कृष्णमंडपात श्रीकृष्णाने पावसाच्या वेळी पर्वत उचलून गोपींना आसरा दिल्याचे दृश्य कोरले आहे. महाबलिपुरम्च्या कलाकृतीत देवादिकांबरोबरच हत्ती, माकड, गाई, सिंह, हरणे, सर्प व अनेक प्रकारचे पक्षी यांनाही मानाचे स्थान आहे. वराह-मंडपात बलिराजाच्या गर्वहरणाचे दृश्य कोरले असून विष्णूने वराहरूपात पृथ्वी आपल्या सुळ्यावर घेतलेले दृश्य आहे. त्रिमूर्ती गुंफेत ब्रह्मा–विष्णु–महेशांच्या मूर्ती आहेत. एक मोठे दगडी भांडे दाखवून गाईड सांगतो की गोपी त्यात ताक घुसळून लोणी काढत असत.

रथ-प्रकारच्या शिल्पकृतीमध्ये पांडवांचे रथ विशेष प्रेक्षणीय आहेत. अखंड दगडात कोरलेल्या या पाच रथांबरोबरच झोपडीच्या आकाराचा द्रौपदीचा रथही आहे. भीमाचा रथ स्तूपाच्या आकाराचा आहे. धर्मराजाचा रथ इतर रथांच्या मानाने उंच आहे. अर्जुनाच्या रथावर इंद्र, विष्णू, गरुड वगैरेंच्या मूर्ती कोरल्या आहेत.

आमच्याबरोबर मुंबईची काही प्रवासी मंडळी होती. त्यांनी रात्री मद्रासहून मदुराईला जाणाऱ्या आगगाडीची तिकिटे रिझर्व्ह केली होती. त्यामुळे महाबलिपुरम् पाहून कधी एकदा मद्रासच्या सेंट्रल स्टेशनवर पोचतो असे त्यांना होऊन गेले होते. अर्थातच इतर प्रवासी शांतपणे काही कलाकृती पाहू लागले, की मदुराईला जाणारे हे लोक त्यांना घाई करीत. शेवटी या संघर्षातून आमची बस जेव्हा गाडी सुटण्यापूर्वी पंचवीस मिनिटे मद्रास सेंट्रलवर पोचली, तेव्हा कुठे त्या प्रवाशांना हायसे वाटले. त्यांनी आपले सामानसुमान बरोबरच घेतले होते. ते उचलून ती मंडळी प्लॅटफॉर्मकडे धावली. बहुधा मदुराईसुद्धा अशीच एकदा उरकून टाकून पुढे कूच करण्याचा त्यांचा विचार असावा !

पाँडेचेरीला जाण्यापूर्वी, खुद्द मद्रासमध्येच असलेले एक आध्यात्मिक केन्द्र मला पाहायचे होते. ते म्हणजे अड्यारची थिऑसॉफिकल सोसायटी. अड्यार हा मद्रासचेच उपनगरासारखा भाग आहे. स्थानिक बस तेथे जाते. अड्यार नावाची नदी ओलांडून गेले की, थिऑसॉफिकल सोसायटीचे प्रशस्त, सुंदर वृक्षांनी सुशोभित असलेले प्रसन्न आवार लागते. प्रवेशद्वाराजवळच माहितीकेंन्द्र आहे. तिथे प्राथमिक चौकशी करून मी संस्थेचे सार्वजनिक संपर्क अधिकारी श्री. एफ्. एम्. जी. सयीद यांना भेटलो. ते बरेच तरुण म्हणजे तिशीच्या आसपासचे आहेत. त्यांना मी म्हटले, 'अध्यात्माकडे लोक वळतात ते बहुधा पन्नाशी–साठीनंतर. तुम्ही इतक्या तरुण वयात या संस्थेत कसे आलात ?' त्यावर किंचित् हसून श्री. सयीद म्हणाले, 'मी विद्यार्थी असल्यापासूनच अध्यात्माचे साहित्य वाचत होतो. मद्रासलाच असल्याने मी या संस्थेत वारंवार येऊ लागलो. शिक्षण झाल्यावर कुठेतरी नोकरी करायचीच, तर आपल्या आवडीच्या क्षेत्रात करावी, म्हणून इथं आलो.'

मग श्री. सयीद यांनी मला प्रथम थिऑसॉफिकल चळवळ म्हणजे काय आणि या केन्द्राची व्यवस्था कशी आहे ते सांगितले. ते म्हणाले, '१८७५ मध्ये न्यूयॉर्क येथे मॅडम ब्लॅव्हास्की या रशियन कार्यकर्तीने आणि कर्नल अवकॉट या अमेरिकनाने आपल्या स्नेह्यांच्या मदतीने थिऑसॉफिकल सोसायटी स्थापन केली. विश्वबंधुत्वाची भावना जगातील सर्व राष्ट्रांच्या नागरिकांत प्रभावित करणे हे संस्थेचे मुख्य कार्य आहे. धर्म, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांच्या अभ्यासास उत्तेजन देणे हेही संस्थेचे एक ध्येय आहे. निसर्ग आणि मानव यांतील गूढ शक्तींचा शोध घेऊन त्यांचा उपयोग मानवजातीच्या उन्नतीसाठी करावा यासाठी संस्था कार्य करते. भारत हा या कार्यासाठी आदर्श देश असल्याने १८७५ मध्ये संस्थेची जागतिक कचेरी मुंबई येथे आणली गेली. मद्रासमधील अड्यार येथे चिंतन व इतर कार्यासाठी असे शांत वातावरण असल्याने १८८२ मध्ये थिऑसॉफिकल सोसायटीची जागतिक कचेरी अड्यार येथे आणण्यात आली. डॉ. ॲनी बेजंट, डॉ. अरुंडेल, श्री. एन्. श्रीराम जॉन कोट्स या जागतिक कीर्तीच्या विचारवंतांनी संस्थेचे अध्यक्षपद भूषविले



चिंतनासाठी आदर्श ठिकाण : अड्यार येथील विशाल वटवृक्ष.

आहे. अर्जेंटिना, स्पेन, इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, श्रीलंका, भारत, व्हिएतनाम, झांबिया, जपान, इटाली इत्यादी साठ देशांत संस्थेच्या शाखा आहेत. आमचा प्रकाशन विभाग असून दरसाल अनेक पुस्तके, नियतकालिके आम्ही प्रसिद्ध करतो. ‘सत्यापेक्षा उच्च असा धर्म नाही’ हे आमचे ब्रीदवाक्य आहे.’

या सोसायटीची आध्यात्मिक पार्श्वभूमी सांगितल्यावर श्री. सयीद यांनी मला संस्थची कचेरी दाखविली. मुख्य सभागृहात काही तरी समारंभ होणार होता. त्यामुळे सभागृह शृंगारण्यासाठी फुलांच्या माळा लावण्याचे काम चालले होते. सभागृहाच्या पश्चिम भिंतीवर साठ देशांची एक यादी कोरली आहे. हे देश संस्थेचे सभासद केव्हा झाले त्याची तारीखही देण्यात आली आहे. याच सभागृहात सर्व प्रमुख धर्मांची प्रतीके आहेत. ख्रिश्चनांचा जीझस ख्राईस्ट, ध्यानस्थ बुद्ध, जैनांचे महावीर, हिंदू धर्माचे श्रीकृष्ण व विष्णू, शिखांचे गुरुनानक, पार्शी लोकांचे झोरोस्ट, मुस्लिमांच्या कुराणातील एक वचन, जपानचे शिंटो मंदिर इत्यादी अनेक धर्मांची प्रतीके ठेवली आहेत. आणि सर्व धर्मांची मूलतत्त्वे एकच आहेत हे सभासदांच्या व येथे येणाऱ्या प्रेक्षकांच्या मनावर बिंबवले आहे.

संस्थेचे आवार अत्यंत विस्तीर्ण, शांत आणि आध्यात्मिक वातावरणाला पोषक असेच आहे. प्रार्थनाकेंद्र, ग्रंथालय, राहण्यासाठी सुंदर जागा, वृक्ष, वेली, फुलझाडे यांचे वैपुल्य आणि इथे राहणाऱ्यांची सौजन्यपूर्ण वागणूक यामुळे अड्यारच्या केंद्राची भेट हा एक सुखद अनुभव ठरला. विशेषतः परिसरातला एक विशाल वटवृक्ष कायमचा लक्षात राहण्यासारखा आहे. श्री. सयीद यांनी मला सस्थेत राहण्यासाठी येण्याचे निमंत्रण दिले आणि पुढे कधी तरी जरूर येईन असे मी सांगितले. राहण्याच्या व्यवस्थेबद्दल ते म्हणाले, ‘सध्या या आवारात सुमारे शंभर लोक राहतात. त्यांपैकी बहुतेकजण पन्नाशीपुढचे निवृत्त भारतीय आहेत. काही परकीय नागरिकही इथे राहतात. राहण्याच्या खोलीचे आम्ही भारतीय पद्धतीच्या खोलीसाठी माणशी दहा रुपये रोज घेतो. पाश्चात्य पद्धतीच्या खोलीस चाळीस रुपये घेतो. संस्थेचा नोकरवर्ग २५० आहे दरसाल डिसेंबर २६ ते ३१ पर्यंत वार्षिक परिषद भरते. तेव्हा एक हजारावर सभासद येतात. आमचे वार्षिक अंदाजपत्रक एकवीस लक्ष रुपयांचे आहे. सभासदांची वर्गणी, पुस्तकविक्री, देणग्या आणि सार्वजनिक विश्वस्तनिधींची मदत यातून हा पैसा येतो.’ श्री. सयीद यांचे मनःपूर्वक आभार मानून मी त्या शांत, सुंदर परिसराचा निरोप घेतला.

तमिळनाडूत धार्मिक आणि कलात्मक कारणासाठी जी गावे ख्यातनाम आहेत, त्यात कांचीपुरम किंवा कांजीवरमचा समावेश होतो. दक्षिणेत न जाताही ‘कांजीवरम साडी’ हे शब्द महाराष्ट्रातही आपल्या कानी पडतात. साड्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या या शहराला मी भेट दिली, ती मात्र साड्यांच्या खरेदीसाठी नमून तेथील कीर्तिवंत देवालये व त्यांचे शिल्प पाहण्यासाठी. ‘कांचनपुरम’

पासून ' कांचीपुरम ' हे या गावाचे नाव आले. मोक्षप्राप्तीसाठी ज्या सात नगरांची नावे सांगितली जातात, त्यांपैकी हे एक आहे. इतर सहा म्हणजे अयोध्या, मथुरा, माया, काशी, अवंतिका आणि जगन्नाथपुरी ही होत.

देवीच्या ५१ शक्तिपीठांपैकी कांचीपुरम एक आहे. या गावाचे बडा कांची आणि छोटा कांची असे दोन भाग आहेत. मोठे कांचीपुरम शिवाचे. त्यात शिवाची १०८ मंदिरे आहेत. छोटे कांची विष्णूचे. तेथे त्याची १८ मंदिरे आहेत. या दोन देवांच्या नावावरून या भागांना शिवकांची आणि विष्णुकांची अशी नावे पडली आहेत.

दक्षिणेतही अनेक गावांप्रमाणे कांचीपुरमविषयीही अनेक दंतकथा आहेत. सतीदेवीचा अस्थिपंजा येथे सापडला असे येथील गाईड सांगतात. येथील शिव हे जागृत देवस्थान आहे असेही सांगण्यात येते. इतिहासातही कांचीपुरमचे महत्त्व प्रकर्षाने सांगितले आहे. सम्राट अशोक येथे आला होता. आणि त्याने येथे काही स्तूपही बांधले होते. गौतमबुद्धही येथे आले होते. कालिदासाने या नगरीचे वर्णन केले आहे. त्याअर्थी त्यानेही या गावाला भेट दिली असावी– निदान त्याच्या काळीही या गावाची कीर्ती उत्तरेपर्यंत गेली होती. शिव आणि विष्णू या दोन्ही देवतांची मंदिरे येथे आहेत. त्यावरून या दोन्हींचे अनुयायी, अभ्यासक यांचे शेकडो वर्षांचे वास्तव्य या भागात होते हे उघडच. ह्यूएनत्संगने भारताला भेट दिली होती. या चिनी प्रवाशाच्या लेखनात या गावाची नोंद आहे. रामानुजन, आद्य शंकराचार्य अशा धर्मश्रेष्ठींनी येथे धर्मप्रसार व विद्याप्रसार केला आहे. दक्षिणेची काशी असेही या गावाला म्हणतात. ( कोल्हापूरलाही दक्षिण काशी म्हटले जाते.)

एकांबरेश्वर हे कांचीचे सर्वांत मोठे आणि दक्षिण भारतातील एक महत्त्वाचे मंदिर आहे. त्याचे आवार वीस एकर असून गोपूर सुमारे दोनशे फूट उंच आहे. मीनाक्षी मंदिराच्या गोपुराची आठवण व्हावी एवढे हे भव्य आणि कलात्मक गोपूर विजयनगरच्या कृष्णदेवरायाने १५०९ मध्ये उभारले. पल्लव, चोल व विजयनगरच्या नंतरच्या राजांनीही त्यात पुढे भर घातली. या मंदिरात आंब्याचे एक मोठे झाड आहे. त्याखाली शंकर–पार्वतीचा विवाह झाला असे पुजारी सांगतात. या कथेला धरून या वृक्षाखाली शिवपार्वती विवाहाची मूर्तीही आहे. आंब्याच्या झाडावरूनच मंदिराचे एकांबरेश्वर नाव पडले.

या वृक्षाच्या फांद्या म्हणजे चार वेद आहेत. प्रत्येक फांदीला वेगवेगळ्या चवीचे फळ येते. या झाडाचा आंबा खाल्ला तर पुत्रप्राप्ती होते, असे येथील पुजारी सांगतात. हा तीन हजार वर्षांपूर्वीचा वृक्ष आहे असे सांगण्यात येते. भाविक या वृक्षाची पूजा करतात व भक्तिभावाने दर्शन घेतात. आम्ही हा वृक्ष पाहिला तेव्हा डिसेंबरचा महिना होता. त्यामुळे त्याला फळे नव्हती. त्यामुळे प्रत्येक


फांदीच्या आंब्याची वेगळी चव असते की काय हे पाहता आले नाही. मार्चमध्ये शिवपार्वती विवाहाचा भव्य उत्सव या मंदिरात होतो.

या भव्य मंदिराला पाच प्राकार आणि ६५० खांब असलेला विस्तीर्ण मंडप आहे. मंदिराचे आवार भव्य असूनही ते अतिशय स्वच्छ होते. आम्ही गेलो तेव्हा या आवारात एक हत्तीही झुलत होता. लोक त्याला प्रेमाने खाऊ घालीत होते. कोणी हत्तीच्या सोंडेत नाणे दिले तर ते तो पाठीवर बसलेल्या माहुताकडे देत होता.

शिवकांचीहून विष्णुकांचीकडे जाताना आमच्या गाईडने एका दुकानाजवळ आमची बस थांबवून ' कांजीवरम साड्या विकत घ्या, त्यासाठी अर्धा तास वेळ आहे. ' असे सांगितले. तसेच या दुकानातील मालावर फक्त या बसमधील लोकांनाच वीस टक्के कमिशन मिळेल, असे प्रलोभनही दाखवले त्याबरोबर बसमधील स्त्रिया उत्साहाने आणि पुरुष नाईलाजाने बाहेर पडले. मी फक्त प्रेक्षक म्हणून दुकानात गेलो. तीनचारशे रुपयांपासून सात आठशेपर्यंतच्या कांजीवरम साड्या फटाफट दाखविल्या जात होत्या. आमच्यापैकी काही जणांनी त्या दुकानापासून अर्धा फर्लांग दूर असलेल्या मोठ्या कापडबाजारातील साड्या खरेदी केल्या. कापडबाजारात खरेदी करून आलेल्यांनी सांगितले की, पहिल्या दुकानातील साड्यांच्या किंमती बाजारभावापेक्षा ३० ते ४० टक्के अधिक होत्या ! त्यामुळे वीस टक्के सवलत देणे त्याला सहज परवडत होते.

विष्णुकांचीमधील प्रमुख मंदिर म्हणजे वरदराज पेरुमल मंदिर. पुजारी सांगतात की ब्रह्मदेवाने कांचीमध्ये अश्वमेघ यज्ञ करण्याचे ठरवले. सरस्वतीचा समावेश न करता त्याने सावित्री व गायत्री यांच्याबरोबर यज्ञास सुरुवात केली. त्यामुळे संतप्त झालेल्या नदीने यज्ञभंग करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा विष्णूने नदीत जाऊन हा प्रयत्न अयशस्वी केला. यज्ञकुंडात वरदराज आले. या कथेच्या अनुरोधाने विष्णुमंदिरास वरदराज पेरुमल असे नाव पडले. शिवकांचीतील एकांबरेश्वर मंदिराप्रमाणेच हे मंदिरही भव्य आहे. सव्वाशे फूट उंच नक्षीदार गोपूर आहे. त्यास सात मजले आणि नऊ कळस आहेत. प्रत्येक मजल्यावर दिवे लावण्यासाठी नक्षीदार गवाक्ष आहे. पूर्वी दक्षिणेतील मंदिरांच्या या गवाक्षात तेलाचे दिवे लावीत. आता विजेच्या दिव्यांनी ती प्रकाशित केली जातात.

दक्षिणेतील इतर मंदिरांप्रमाणे या मंदिरालाही विस्तीर्ण जलाशय आहे. अनंततीर्थ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या कुंडात चार खांबांचा मंडप आणि आत विष्णूची मूर्ती आहे. ही मूर्ती चांदीच्या पेटीत बंदिस्त ठेवली आहे. ती चाळीस वर्षांतून एकदाच आतील मूर्तीच्या दर्शनासाठी काढली जाते असे सांगण्यात आले. वरदराज मंदिराच्या आवारात शंभर स्तंभांचा मंडप आहे. या दगडी स्तंभांवर उत्कृष्ट कोरीव काम केले आहे. घोड्याच्या बारीक साखळ्याही दगडी



कांचीपुरम् येथील वरदराज मंदिर.

आहेत. हे कसब विशेष लक्षणीय आहे. रामायण व महाभारतातील अनेक प्रसंग स्तंभावर कोरलेले आहेत. या मंडपातून गेल्यावर आपण गाभाऱ्याजवळ जातो. दरवाजावर तांब्याच्या द्वारपालांच्या उंच मूर्ती आहेत. वरदराजाची मूर्ती ही या मंदिरातील मुख्य देवता. या रत्नजडित मूर्तीवर माणके, हिरे, पाचू, सोने वगैरेंचे दहा लक्ष रुपयांवरील किंमतीचे अलंकार घातले आहेत.

या मंदिरात सोन्याची व चांदीची अशा दोन पाली आहेत. या पालींवरून हात फिरवला तर भविष्यकाळात सर्प, पाल इत्यादींची विषबाधा होत नाही, अशी समजूत आहे. त्यामुळे अनेक भक्त पैसे देऊन या पालींवरून हात फिरवतात. या दोन पाली म्हणजे प्राचीन कालातील शापभ्रष्ट ऋषिकुमार आहेत असे अर्वाचीन कालातील आपला गाईड सांगतो ! या दोन प्रमुख मंदिरांशिवाय कांचीपुरममध्ये कामाक्षी अम्मन मंदिर, कैलासनाथ मंदिर, अर्धनारीनटेश्वर मंदिर चित्रगुप्त मंदिर, वैकुंठ पेरुमल मंदिर अशी अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. कमलाक्षी अम्मन मंदिरात चक्राच्या रूपातील देवीची पूजा होते. येथील चित्रगुप्ताचे मंदिर हे दक्षिणेतील चित्रगुप्ताचे एकमेव मंदिर आहे. कुमार कोट्टम हे सुब्रह्मण्यमचे मंदिर आहे. कांचीपुरम हे अशा तऱ्हेने जागोजागी मंदिरे असलेले गाव आहे.

अनेक मंदिरे पाहिल्यानंतर दुसऱ्या दिवशी मी पाँडिचेरी व ऑरोव्हिलला जाण्यासाठी मद्रासला बस स्टेशनवर आलो. आमची बस सकाळी सातला सुटणार होती. पण सव्वासात वाजून गेले तरी बस अजून प्लॅटफॉर्मवर आली नव्हती. अस्वस्थपणे मी बसची वाट पाहात असताना एक शीख गृहस्थही माझ्याबरोबर पाँडिचेरीच्याच बसची वाट पाहताना दिसला. त्याने मला म्हटले, 'सातची बस रद्द झाली आहे. पुढची बस पावणेनऊला आहे. काय करायचं ?' मी म्हटले, 'वाट पाहण्यावाचून आणखी काय करणार ? कारण आगगाडीला त्यापेक्षा वेळ आहे.' त्यावर ते गृहस्थ आपली छोटी पत्र्याची बॅग घेऊन कुठे तरी निघून गेले.

माझ्या शेजारी एक महिला बसली होती. तिने मराठीतून मला विचारले, 'आपण महाराष्ट्रीय आहात का ?' मी होय म्हणताच तिने पुन: विचारले, 'तुम्ही रमेश मंत्री का ?' मी म्हटले, 'होय. पण तुम्ही कसे ओळखले ?' त्या म्हणाल्या, 'फोटोवरून आणि टी. व्ही. वर पाहिल्यावरून ओळखले.' आम्ही आपआपल्या बसेसची वाट पाहात होतो, इतक्यात मघाचे शीख गृहस्थ माझ्याजवळ आले आणि म्हणाले 'पाँडिचेरीला टॅक्सीतून येता का ? भाडं फक्त दहा रुपये' बसचे भाडे होते साडे दहा आणि टॅक्सीचे फक्त दहा ! टॅक्सी लगेच निघणार होती.

आम्हाला आणखी एकजण हवा होता. तोही मिळाला. तो कर्नाटकातला सरकारी नोकर होता. त्याची अडचण अशी होती की, त्याला या ट्रिपचा हिशोब देताना बसचे तिकीट दाखवावे लागणार होते. पण आमच्याबरोबरचे शीख गृहस्थ मोठे कल्पक होते ! ते म्हणाले, 'मी त्याची व्यवस्था करतो, चला. पाँडिचेरीच्या बस स्टँडवर जाऊ आणि बसमधून उतरलेल्या उतारूकडून साडेदहा रुपयांची वापरलेली तिकिटं घेऊ.'

आम्ही टॅक्सीकडे निघालो. टॅक्सी इतकी स्वस्तात कशी मिळाली असं मी शीख गृहस्थास विचारले, तेव्हा ते म्हणाले, 'बस स्टेशनवर दोन तास वाट पहाण्यापेक्षा इतर काही मार्ग निघतो का ते पाहावं म्हणून मी टॅक्सीस्टँडवर आलो. एक टॅक्सीवाला असा आढळला, की त्यानं कडलोरहून दोनशे रुपये परतीचं भाडं घेऊन एका गिऱ्हाईकाला तातडीच्या कामासाठी मद्रासला आज पहाटेच आणलं होतं. ते भाडं तो मालकाला देईल. परत पाँडेचरीवरून कडलोरला जाताना त्याला जे भाडं मिळेल ते ड्रायव्हरच्याच खिशात जाणार म्हणून मिळेल ते भाडं घेऊन परत जाण्याची त्याला घाई होती.'

टॅक्सी उत्तम होती. आम्ही तीन तासांत पाँडिचेरीला पोचलो. मात्र ड्रायव्हर शहरात यायला तयार नव्हता. तो म्हणाला, 'पाँडिचेरी गावात शिरण्याचे मला परमिट नाही. मी गावाच्या हद्दीवर तुम्हाला सोडतो.'

मी तेथून रिक्षा केली आणि अरविंदाश्रमाकडे निघालो. पाँडिचेरी हे गाव अड्यारसारखं स्वच्छ आणि शांत नाही. काहीसं गरीब व बकालच दाटलं. खुद्द



योगी अरविंद आणि माताजी यांची पाँडिचेरी येथील समाधी

अरविंदाश्रमाचं आवार आणि आश्रमाच्या इमारती मात्र स्वच्छ, सुंदर, शांत आहेत.

आश्रमातील माहितीविभागात गेलो. तेथील अधिकारी श्री. सुखदेव हे मराठी भाषिकच होते आणि लेखक म्हणून मला ओळखतही होते. त्यांनी माझं स्वागत करून म्हटलं, ' तुम्ही आल्याबद्दल मला फार आनंद झाला. आता आमचे पाहुणे म्हणून चार–सहा दिवस तरी इथंच रहा.' मी म्हटलं, ' या खेपेला तरी मला फार मोठा मुक्काम करता येणार नाही. मात्र आश्रमाचं कामकाज पाहायचं आहे.' सुखदेव म्हणाले, ' आता सव्वाअकरा वाजले आहेत. पावणेबारा ते बारा-पर्यंत पहिल्या मजल्यावरची श्री अरविंदांची खोली उघडी असते. दरम्यान तुम्ही श्री अरविंद आणि माताजी यांच्या समाधींचं दर्शन घ्या.' ते स्वतः माझ्याबरोबर समाधीपर्यंत आले. झाडांच्या छायेखाली सुंदर संगमरवरी दगडांची ही समाधी आहे. तिच्यावर अनेक अनुयायांनी फुले वाहिली होती. प्रसन्न, भरगच्च फुले हे सबंध आश्रमाचंच वैशिष्ट्य होतं. श्री अरविंद १९५० मध्ये निधन पावले आणि माताजींचे निधन १९७३ मध्ये झाले. या समाधीच्या ठिकाणी दोन वेगळ्या पेटिकांमध्ये त्यांचे देह ठेवण्यात आले.

समाधीचे दर्शन घेऊन आम्ही पुन्हा स्वागतकक्षात आलो. श्री. सुखदेव म्हणाले, ' मी मूळचा नागपूरचा. येथे तीस वर्षे आहे. माताजींनीच माझे नाव ' गजराज ' असे ठेवले. आता मी गजराज सुखदेव या नावानेच ओळखला जातो. दुपारी बारानंतर आश्रमाचे जेवण सुरू होईल. त्याचे कूपन मी तुम्हाला देतो. आश्रमाचे पाहुणे म्हणून तुम्ही सामुदायिक भोजनगृहात जेवण घेतलेत तर इथल्या राहणीची तुम्हाला कल्पना येईल. आता पावणेबारा वाजत आले आहेत. तुम्ही श्री अरविंदांची खोली पाहण्यासाठी माझ्याबरोबर या !' मी त्यांच्याबरोबर निघालो. खोली पहिल्या मजल्यावर होती. दहा–बारा लोक रांग लावून जिन्यात उभे होते. मीही त्या रांगेत उभा राहिलो.

❊ ❊

## ४ : ऑरोव्हिल – विश्वबंधुत्वासाठी वसाहत

मद्रासच्या मुक्कामात एकदा माझे स्नेही श्री. श्रीधर लिमये यांनी मला सांगितले, 'पाँडेचरीजवळील ऑरोव्हिल हे गाव सध्या बरेच वादग्रस्त झाले आहे. श्री अरविंद आश्रम चालविणारे व्यवस्थापक आणि ऑरोव्हिल येथे वास्तव्य करणारे काही परकीय यांच्यात मतभेद आणि संघर्ष सुरू आहेत. एक फ्रेंच तरुण माझ्या ओळखीचा आहे. तो आज मद्रासला आला आहे. तुम्हाला हवं असेल तर त्याला मी बोलावून घेतो !' मी म्हटलं, 'अवश्य. ऑरोव्हिल हे वादग्रस्त आहे. भारत सरकार त्याबद्दल काही उपाययोजना करणार आहे, अशा बातम्या वृत्तपत्रात सध्या येत आहेत. या वादाशी संबंधित असा कोणी प्रत्यक्ष भेटला तर मला आनंदच होईल.' लिमये यांनी लगेच फोन करून जीन नावाच्या फ्रेंच तरुणाला बोलावले. त्याच्याशी मी प्रदीर्घ चर्चा केली. हा तरुण मला मोठा बुद्धिमान, कल्पक, बंडखोर पण बेशिस्त वाटला. त्याच्या अयुष्यात अनेक विचित्र घडामोडी झाल्या होत्या. तो मूलत: भटक्या होता. फ्रान्समधील बर्गंडी भागात त्याचा जन्म झाला. शिक्षणाकडे त्याने विशेष लक्ष दिले नाही. साधारण आपल्याकडील मुले एस्. एस्. सी. परीक्षेला बसतात, त्याच सतराव्या अठराव्या वर्षी तो लाओसला गेला. तैवान, बोर्निओ, मलेशियात तो तीन वर्षे भटकत होता. मिळेल ते काम करायचे आणि जमेल तसे रहायचे. काहीसे हिप्पीसारखे, पण निरुद्योगी नव्हे असे त्याचे तत्त्व होते. १९६७ मध्ये तो सहजच भारताला आला. मद्रास, कलकत्ता, नेपाळ, दिल्लीला राहिला. मग कंटाळून पुन: फ्रान्सला वडिलांच्याकडे गेला. त्याच्या वडिलांचा बर्गंडीत लहानसा कारखाना होता. म्हणून जीन हा मेकॅनिक बनला. पण तिथे जीवन फार संथ म्हणून तो पुन्हा बाहेर पडला. इंग्लंडला गेला. लंडनला आठ महिने राहून आफ्रिकेला गेला. आफ्रिकेतून पुन्हा फ्रान्सला आला. कशासाठी ? याला काही उत्तर नाही. तीन महिने फ्रान्समध्ये राहून पुन्हा तो प्रवासाला निघाला.

टोगो, घाना, मोरक्को करून हा अस्वस्थ तरुण परत लाओसला पैसे मिळवण्यासाठी गेला. तिथे त्याला एक मित्र भेटला. तो भारतात पाँडेचरीला अरविंद आश्रमात राहिला होता. त्याने सांगितल्यावरून जीन परत भारतात आला आणि १९७१ मध्ये अरविंद आश्रमात दाखल झाला. या आश्रमाच्या... यांनी एक आदर्शनगर सुरू करण्याची योजना आखली होती. हे नगर पूर्ण अर्थाने 'स्वतंत्र' असेल. तिथे जगातील अनेक राष्ट्रांचे नागरिक 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्तीने एकोप्याने राहतील. ते शेती करतील, शिक्षण घेतील, देतील; सांस्कृतिक देवाण घेणाव होईल. उच्च अध्यात्मिक वातावरणात जगाचे नागरिक म्हणून जगातील कोणत्याही एका राष्ट्राचे म्हणून नव्हे. ते गाव म्हणजेच पाँडेचेरीपासून मैलावरील ऑरोव्हिल.

जीनला ही कल्पना आवडली. तो ऑरोव्हिलला गेला. तेथे त्याने पोलाद व लाकूड सामानाचे वर्कशॉप सुरू केले. पवनचक्क्या व यंत्रे बनवली. हळूहळू ऑरोव्हिलमध्ये दोनशेवर परकीय नागरिक राहू लागले. त्यात फ्रान्स, ब्रिटन, जर्मनी इत्यादी अनेक राष्ट्रांचे नागरिक होते. पण पुढे पुढे अरविंद आश्रमाचे संचालक आणि परकीय नागरिक यांच्यात संघर्ष होऊ लागला. या संघर्षाचे स्वरूप सांगताना जीन म्हणाला, 'आमच्या मोटारी आश्रमाने सक्तीने हिसकावून घेतल्या. मी तयार केलेल्या यंत्रांची डिझाइन्स चोरून स्वतःची यंत्रे बनवली. आमच्या शेतीच्या व यंत्रदुरुस्तीच्या कामात अडथळे आणले जाऊ लागले. माझ्यावर खोटे आरोप ठेवून मला अटक केली गेली आणि मी काही दिवस तुरुंगातही होतो. आम्हाला अनेकदा मारहाणही करण्यात आली. सध्या ऑरोव्हिलमध्ये अतिशय तंग वातावरण असून भारत सरकार या योजनेची व्यवस्था खास वटहुकूम काढून आपल्या हाती कोणत्याही क्षणी घेईल.'

मी विचारले, 'तुमच्या म्हणजे परकीय नागरिकांच्या मोटारी बळजबरीने काढून घेतल्या गेल्या, तेव्हा तुम्ही पोलिसकडे तक्रार का केली नाही ?' त्यावर तो म्हणाला, 'पोलिसांवर आमचा विश्वास नाही. कारण ते स्थानिक लोकांचेच साथीदार आहेत.' जीनच्या घरगुती जीवनाविषयी मला काहीच माहिती नव्हती. म्हणून मी त्याला विचारले, 'तुमचे लग्न झाले आहे काय ?' तो अगदी सहजपणे म्हणाला, 'नाही. पण मी माझ्या मैत्रिणीबरोबर रहात आहे व आम्हाला तीन मुले आहेत. मग यालाच तुम्ही लग्न म्हणत असाल तर झाले आहे. पण चर्चमध्ये जाऊन समारंभपूर्वक असे आमचे लग्न झाले नाही. माझी मैत्रीण ऑस्ट्रेलियन आहे. ऑरोव्हिलमध्येच आमची ओळख झाली. तुम्ही ऑरोव्हिलला भेट द्या. प्रत्यक्ष परिस्थिती पहा. केवळ आश्रमाच्या प्रचारावर विसंबून राहू नका. एकेकाळी म्हणजे श्री अरविंदांच्या हयातीत हा आश्रम आदर्श होता. पण आता स्वार्थी लोकांच्या हाती त्याची व्यवस्था गेली आहे. त्यामुळे ऑरोव्हिलसारख्या

उत्तम आंतरराष्ट्रीय वसाहतीचा चुथडा झाला आहे. पाँडिचेरीहून तुम्ही मटकाना रस्त्याने ऑरोव्हिलला जा. मी तेथे त्यावेळी असलो तर माझ्याकडेच या किंवा मी नसलो तर श्रीमती. जायमा किंवा श्री. क्लॉड यांना भेटा.'

मला हे ऑरोव्हिल प्रकरण बरेच कुतूहलजनक वाटले. मद्रासच्या माझ्या मुक्कामात एक दिवस पाँडेचेरीला येण्याचे मी आश्वासन दिले आणि जीनची मुलाखत संपवली. लगेच मी पाँडिचेरीच्या प्रवासाची चौकशी सुरू केली.

पाँडिचेरी हे गाव मद्रासपासून दीडशे किलोमीटर्स अंतरावर आहे. ही फ्रेंचांची भारतातील शेवटची वसाहत. या गावाला भेट देण्यापूर्वीचीच माझी त्याविषयीची एक जुनी आठवण आहे. नोव्हेंबर १९५४ मध्ये पाँडिचेरीचा कारभार फ्रेंचांनी स्वतंत्र भारत सरकारकडे सोपविला त्यावेळी मी ' सकाळ'चा कोल्हापूरचा बातमीदार होतो. पाँडिचेरीच्या स्वातंत्र्यसोहळ्याला हजर राहून त्याचे बातमीपत्र मी पाठवावे असे ' सकाळ 'ने मला त्यावेळी लिहिले होते, पण काही घरगुती कारणाने मी तेव्हा ती चांगली संधी घेऊ शकलो नव्हतो. पाँडिचेरी भेटीची ती हुकलेली संधी तब्बल सव्वीस वर्षांनी मी आता घेत होतो.

तीनशे वर्षांपूर्वी, १६७३ मध्ये फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीने पाँडिचेरीवर आपला अंमल स्थापन केला. त्यापूर्वी डच, पोर्तुगीज आणि ब्रिटिश यांनी भारताच्या निरनिराळ्या भागांत, प्रदेशात लहान मोठे भाग आपल्या ताब्यात ठेवले होतेच. पोर्तुगीज प्रथम आले, पण १६७३ पर्यन्त भारतातील त्यांचा अंमल ऱ्हासास लागला होता. डचांनी १६९३ मध्ये फ्रेंचांचा पराभव करून पाँडिचेरी घेतली. पण चारच वर्षांनी उभय पक्षांत रेजविकचा करार होऊन पाँडिचेरी पुन्हा फ्रेंचांच्या ताब्यात आली. अठराव्या शतकाच्या सुरवातीला पाँडिचेरी फारच भरभराटीला आली. १७०६ मध्ये पाँडिचेरीची लोकसंख्या चाळीस हजार होती, तर ब्रिटिशांच्या ताब्यातील कलकत्ता शहराची फक्त बावीस हजार होती. पुढे फ्रेंचांना आर्थिक तोटा आला म्हणून त्यांना मच्छलीपट्टम्, सुरत अशा अनेक वसाहती सोडून द्याव्या लागल्या, पण फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीचा कायापालट होऊन तिचे ' पर्पेच्युअल कंपनी ऑफ द इंडिया 'मध्ये रूपांतर झाले. या नव्या कंपनीने धडाका लावला. मॉरिशस, मलबार, माहे, कारिकेल असे अनेक नवे प्रदेश जिंकले. १७४२ मध्ये डुप्ले हा पाँडिचेरीचा गव्हर्नर झाला, तेव्हा तो संबंध भारत फ्रेंचांच्या अंमलाखाली आणण्याची स्वप्ने पाहात होता. १७४६ मध्ये त्याने मद्रास शहर ब्रिटिशांकडून जिंकून घेतले. पण ब्रिटन व फ्रान्स यांमध्ये झालेल्या करारान्वये फ्रेंचांनी मद्रास शहर ब्रिटिशांना परत केले. त्यानंतर ब्रिटन आणि फ्रान्स यांनी पाँडिचेरी दोनदा एकमेकांपासून जिंकून घेतले आणि १८१४ पासून फ्रेंचांचा ताबा या शहरावर

राहिला. तो १९५४ पर्यन्त. सध्या पाँडिचेरी हे केन्द्र सरकारच्या नियंत्रणाखाली गोव्याप्रमाणेच आहे.

फ्रेंच सत्तेच्या अनेक खुणा पाँडिचेरीत दिसतात. अनेक रस्त्यांची नावे फ्रेंच आहेत. सहा चौरस किलोमीटर्सपर्यन्त पसरलेल्या या शहराची लोकवस्ती एक लक्ष आहे. फ्रेंच नावाच्या रस्त्यात दूमा रस्ता, रुदल मरीन, (याच रस्त्यावर अरविंद आश्रम आहे.) रूसफ्रीन यांचा उल्लेख करता येईल. अलायेन्स फ्रांसेसारख्या फ्रेंच सांस्कृतिक संस्था आणि आँग्लो द नोत्रसारखी चर्चेस, तसेच अनेक जुन्या इमारतींची रचना फ्रेंच वातावरणाची छाप सहज दाखवतात.

पाँडिचेरीत ज्यांचा आश्रम आहे त्या योगी अरविंद यांचे जीवनकार्य अत्यंत स्फूर्तिप्रद असेच आहे. त्यांचा जन्म १५ ऑगस्ट १८७२ रोजी कलकत्ता येथे झाला. त्यांचे वडील डॉ. कृष्णघन घोष हे इंग्लंडला जाऊन आले होते. ज्या काळात समुद्रपार जाणे हे पाप असून त्याबद्दल प्रायश्चित घेतले पाहिजे असे सनातनी मानीत, त्या काळात डॉ. घोष इंग्लंडला जाऊन वैद्यकाची पदवी घेऊन आले होते. हे विशेष. त्यांची पत्नी स्वर्णलता अत्यंत सुंदर होती. त्यांना पाच मुले होती. त्यांपैकी अरविंद हे तिसरे, डॉ. घोष यांना पाश्चात्य समाज व संस्कृती यांविषयी अपरंपार प्रेम होते.

आपल्या मुलांनी भारतीय पद्धतीने शिक्षण न घेता पाश्चात्य पद्धतीचे आधुनिक शिक्षण घ्यावे असे डॉ. घोष यांना वाटे. म्हणून त्यांनी विनय, मनमोहन व अरविंद या आपल्या तीन मुलांना शिक्षणासाठी दार्जिलिंगला ब्रिटिशांच्या शाळेत पाठविले. तेथे दोन वर्षे शिक्षण झाल्यावर अरविंद व त्यांच्या भावांना लहानपणीच इंग्लंडला पाठवण्यात आले. वयाच्या सातव्या वर्षीच अरविंद हे मँचेस्टर येथे डुरुएट नावाच्या ब्रिटिश धर्मोपदेशकाच्या घरी राहून शिक्षण घेऊ लागले. त्यांनी मँचेस्टर, लंडन व केंब्रिजमध्ये चौदा वर्षे वास्तव्य करून शिक्षण घेतले. या काळात ते मातृभाषेला व मातृभूमीलाही पारखे झाले होते.

डॉ. घोष यांची कमाई चांगली असली तरी त्यांचा बहुतेक पैसा दानधर्मात खर्च होई. इंग्लंडमध्ये शिकणाऱ्या तीन मुलांना त्यामुळे अनंत आर्थिक आपत्तीत दोन वर्षे काढावी लागली. मोठा मुलगा विनय हा शिकत असतानाच काम करून थोडा पैसा मिळवी व तिघेही जवळजवळ अर्धपोटीच राहून शिक्षण घेत. असा काही काळ विपत्तीत गेला. कडक थंडीचे निवारण करण्यासाठी आवश्यक असलेले पुरेसे उबदार कपडेही त्यांच्याजवळ नव्हते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही अरविंदांनी प्रथम क्रमांक मिळवून ग्रीक व लॅटीनमधील सर्व पारितोषिके पटकावली.

अरविंदांना आय्. सी. एस्. साठी जी शिष्यवृत्ती मिळाली, ती ते आपल्या दोन भावांबरोबर विभागून निर्वाह करू लागले. त्यांनी फ्रेंच, इंग्रजी व लॅटिन या भाषांत काव्य लिहिण्यासाठी सुरुवात केली. मातृभूमीपासून अगदी दूर राहूनही

अरविंदांचे तिच्यावरील प्रेम यत्किंचितही कमी न होता उलट अधिकच वाढले. वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच त्यांना जाणवू लागले की ब्रिटिशांनी भारताच्या स्वातंत्र्याचा अपहार करून फार मोठा अन्याय केला आहे आणि भारताला पुन्हा स्वतंत्र करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. म्हणून केंब्रिजमध्ये असताना त्यांनी 'लोटस अॅन्ड डॅगर' (कमळ आणि कट्यार) या संघटनेचे सभासदत्व घेतले आणि या क्रांतिकारकांच्या संघटनेचे ते चिटणीसही झाले. 'माझे संपूर्ण जीवन मी भारताच्या बंधमुक्तीसाठी वाहीन' अशी शपथ त्यांनी इतर सभासदांप्रमाणे घेतली. आय्. सी. एस्. च्या परीक्षेत आपण यशस्वी झालो तर ब्रिटिशांची नोकरी करावी लागेल म्हणून त्यांनी या परीक्षेचा एक भाग जो अश्वारोहण, त्याच्या चाचणीस ते दोन वेळा मुद्दाम गैरहजर राहिले. या परीक्षेच्या पेपर्समध्ये ते उत्तीर्ण झाले होते. पण अश्वारोहणाच्या चाचणीत त्यांनी मुद्दामच 'गैरहजर म्हणून नापास' हा शेरा घेऊन ब्रिटिशांच्या गुलामगिरीचा कलंक लागू दिला नाही. केंब्रिजचा तीन वर्षांचा ट्रायपॉसचा अभ्यासक्रम त्यांनी वर्षातच पहिल्या वर्गात पूर्ण केला पण किमान तीन वर्षे झाल्याशिवाय पदवी द्यायची नाही या नियमामुळे त्यांना वर्षभर थांबावे लागले. ब्रिटिशांची नोकरी करावयाची नाही या निर्णयामुळे अरविंदांनी, लंडनला बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड आले होते, त्यांच्याकडे दोनशे रु. दरमहावर नोकरी पत्करली व ते भारताकडे येण्यासाठी कार्थेज बोटीने निघाले.

आयुष्य इतके विचित्र आहे की, अनवधानाने झालेल्या एखाद्या लहानशा चुकीचा परिणाम कधी कधी अत्यंत भयानक होतो. अरविंद परत भारतात येणार असल्याची बातमी ज्या शिपिंग एजंटांनी त्यांचे वडील डॉ. कृष्णघन यांना कळवली, त्यांनी नजरचुकीने कार्थेजऐवजी दुसऱ्याच बोटीचे नाव लिहिले. दुर्दैवाने ही बोट पोर्तुगालच्या किनाऱ्याजवळ बुडाली व एकही प्रवासी वाचला नाही! ही बातमी डॉ. कृष्णघन यांनी वर्तमानपत्रात वाचली आणि त्यांना एवढा धक्का बसला की, त्यातच त्यांचा अंत झाला! अरविंद भारताला सुखरूप पोचले, पण त्यांना आल्याबरोबर वडिलांच्या निधनाची व त्यामागील कारणाची बातमी समजली. तेव्हा त्यांना अपरंपार शोक झाला. पण गायकवाडांना दिलेला शब्द पाळण्यासाठी त्यांना शोक आवरून बडोद्यास नोकरीवर रुजू व्हावे लागले. इंग्लंडमधील अरविंदांचे एक जुने स्नेही श्री. के. जी. देशपांडे हे यावेळी 'इंदुप्रकाश'चे संपादक होते. त्यांच्या विनंतीवरून अरविंदांनी इंदुप्रकाशमध्ये जुन्याऐवजी नवे दीप या नावाची एक खळबळजनक राजकीय लेखमाला लिहिली. ती वाचून न्या. महादेव गोविंद रानडे यांनी नंतर अरविंदांच्याशी विचारविनिमयही केला होता. तेव्हा अरविंद फक्त एकवीस वर्षांचे होते. त्यांचे वाचन अफाट होते आणि पैशाविषयी ते निरीच्छ असत. बडोद्याच्या महाराजांच्या नोकरीत असता-

नाही त्यांनी क्रांतिकार्याकडे सतत लक्ष पुरविले होते. त्याकाळी ब्रिटिश सरकारचा बंगालवर राग असल्याने बंगाली तरुणांना सैन्यात प्रवेश नसे. पण अरविंदांनी आपल्या एका बंगाली क्रांतिकारक मित्राला तो उत्तर हिंदुस्थानी असल्याचे सांगून बडोद्यास सैनिकी शिक्षण देऊन बंगालला पाठवले होते. त्याशिवाय ते बंगालच्या क्रांतिकारकांना पैसा, साहित्य व मनुष्यबळ यांचाही पुरवठा करीत असत. याच सुमारास (१९०१) त्यांना आध्यात्मिक साक्षात्कार होण्यास सुरुवात झाली.

त्याच वर्षी अरविंदांचा विवाह मृणालिनी नावाच्या चौदा वर्षाच्या मुलीशी झाला. थोड्याच दिवसांनी ते सुटीवर म्हणून बंगालमध्ये गेले आणि त्यांनी तेथे अनेक क्रांतिकारक संघटना स्थापन केल्या. महाराष्ट्रातील अशा संघटनांशीही त्यांनी विचारविनिमय केला. मग बडोद्याच्या महाराजांच्याबरोबर ते काश्मीरला गेले असताना त्यांना आध्यात्मिक साक्षात्कार झाला. त्यांनी आपल्या पत्नीस लिहिलेली पत्रे खासगी होती. पण ती उघडकीस आली. त्यात त्यांनी अध्यात्माचे व स्वदेश स्वतंत्र करण्याचे वेड आहे असे म्हटले होते. त्याचा धागा घेऊन पोलिसांनी अरविंदांना अटक केली व त्यांच्या घराची झडती घेतली. ' मृणालिनीस पत्रे ' म्हणून ही पत्रे आता प्रसिद्ध आहेत. बंगालची फाळणी झाली तेव्हा अरविंदांनी राजकारणात स्वतःला संपूर्णपणे झोकून दिले. त्यांच्या बंधूंनी सुरू केलेल्या ' युगांतर ' या साप्ताहिकात त्यांनी अनेक लेख लिहिले. मग ' वंदेमातरम् 'चे संपादन करण्यात ते बिपिनचंद्र पाल यांचे सहकारी झाले. क्रांतिकारकांच्या संघटना, असहकाराची चळवळ, प्रत्यक्ष प्रतिकार यांनी सारा बंगाल तेव्हा पेटून निघाला.

एकीकडे राजकारण करीत असतानाच अरविंदांच्या आध्यात्मिक प्रवृत्तीही वाढत होत्या. तेव्हा विष्णू भास्कर लेले हे एक ज्येष्ठ अध्यात्मवादी होते. त्यांना अरविंदांनी बोलावून घेतले व सतत तीन दिवस ते दोघे एकत्र राहिले. लेले यांनी उपदेश केला ' तू राजकारण सोड आणि अध्यात्माला वाहून घे. ' अरविंदांनी राजकारण कायमचे सोडण्याचे नाकारले. पण तात्पुरते स्थगित करण्याचे मान्य केले आणि योगस्थ राहून कार्य करण्याचे ठरवले. २ मे १९०८ रोजी अरविंदांना व त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना अटक करून क्रांतिकार्य केल्याबद्दल खटला भरण्यात आला. त्यात ४२ आरोपी व दोनशेवर साक्षीदार होते. वर्षभर हा खटला चालू होता. या काळात अरविंदांनी तुरुंगात ध्यानसाधना केली. श्री. चित्तरंजन दास यांनी बचावाचे अपूर्व प्रभावी भाषण केले. आणि अरविंदांना सोडून देण्यात आले.

त्यानंतर अरविंद कधी उघड तर कधी भूमिगत राहून देशकार्य करीत होते. पण त्यांना पाँडिचेरीस जाण्याचा साक्षात्कार झाला म्हणून ते ४ एप्रिल १९१० रोजी डुप्ले बोटीने पाँडिचेरीस आले. त्यानंतर त्यांनी आश्रम स्थापून मुख्यतः



**बालवयातील माताजी**

आध्यात्मिक कामासच स्वतःला वाहून घेतले. फ्रान्सहून १९१४ मध्ये श्रीमती मीरा तेथे आल्या, त्यांनीही आपले जीवन अध्यात्मास वाहण्याचा निर्णय घेतला. त्याच पुढे श्रीमाताजी या नावाने ओळखल्या जाऊ लागल्या. १५ ऑगस्ट १९१४ रोजी अरविंदांनी 'आर्य' हे मासिक सुरू केले. माताजी फ्रान्सला जाऊन परत आल्या. १९२६ मध्ये अरविंदांनी आश्रमाची स्थापना पाँडिचेरीस केली. तोच आता अरविंदाश्रम या नावाने विख्यात आहे. याच आश्रमात अरविंदांनी आपले आध्यात्मिक लेखन व कार्य केले. सावित्री हे त्यांचे चोवीस हजार ओळींचे महाकाव्य विशेष प्रसिद्ध आहे.

अरविंदांना लहानपणी आरो म्हणत असत. ऑरो या शब्दाचा अर्थ पहाटेच्या वेळचा प्रकाश असाही आहे. ऑरोव्हिल या शब्दाचा अर्थ 'सिटी ऑफ डॉन' किंवा पहाटेचे गाव असा आहे. पाँडिचेरीपासून दहा किलोमीटर्सवर असलेल्या या अभिनव वस्तीचा प्रारंभ मोठ्या इतमामाने २८ फेब्रुवारी १९६८ रोजी करण्यात आला. यावेळी १२१ देशांतील लोकांनी आपापल्या देशांतील माती एका पात्रात ठेवली. हे मोठे पात्र कमळाच्या आकाराचे होते. भारतातील २३ राज्यांच्या प्रतिनिधींनीही आपापल्या राज्यातील माती त्यात ठेवली. माताजींनी या वसाहतीची स्थापना करताना जागतिक विश्वबंधुत्वाची कल्पना डोळ्यापुढे ठेवली होती. ऑरोव्हिल हे अखिल जगताचे गाव आहे. त्यावर कोणत्याही एका राष्ट्राची मालकी असणार नाही, सर्व राष्ट्रांच्या नागरिकांना येथे मुक्त प्रवेश असेल, येथे कोणीही शेती करावी, छोटे कारखाने चालवावेत, शिक्षण द्यावे–घ्यावे, अरविंदांच्या तत्त्वाप्रमाणे राहावे, उपासना करावी, सर्वांनी एकमेकांशी प्रेमभावाने राहावे आणि जगातील एक आदर्श वसाहत करावी, असे ध्येय माताजींनी ठेवले होते. या कल्पनेला जगातील अनेक राष्ट्रांनी उत्तम प्रतिसाद दिला. युनेस्को या यूनोच्या सांस्कृतिक विभागानेही त्यास मान्यता दिली आणि आर्थिक सहाय्य केले. भारत सरकाने खास कायदा करून या योजनेला मान्यता दिली.

आता ऑरोव्हिल केंद्र सरकारच्या अंमलाखाली आहे.

सुरुवातीची काही वर्षे छान गेली. देशोदेशीचे लोक गुण्या गोविंदाने नांदू लागले. पण माताजीच्या निधनानंतर (१९७३) अनपेक्षित प्रश्न निर्माण झाले. खरे तर माताजींच्या अखेरच्या काळातच हे प्रश्न निर्माण होऊ लागले होते. पण त्यानी फारसे उग्र स्वरूप धारण केले नव्हते. शिवाय, माताजींची जरबही होतीच. हे प्रश्न म्हणजे येथे परकीयांना मुक्त प्रवेश आहे आणि या गावावर कोणत्याही एका राष्ट्राची मालकी नाही या दोन उदात्त तत्त्वांचा गैरफायदा घेणारे परकीय लोक इथे येऊ लागले. 'ऑरोव्हिलमध्ये राहायचे आहे' असे लिहिले तर व्हिसा सहज मिळतो हे कळल्यावर अफू–चरस–गांजाचा व्यापार करणारे आणि स्त्री-पुरुष संबंधांबाबत स्वैर वर्तन करणारे परकीय, हिप्पी वगैरेंचा ऑरोव्हिलकडे लोंढा लागला. अरविंद आश्रमाच्या नियमात संपूर्ण दारुबंदी, इतर अंमली पदार्थांच्या सेवनावर बंदी आणि स्वैराचारावर बंदी यांचा समावेश होता. पण स्वातंत्र्याच्या नावाखाली हे सर्व काही करणारे लोक ऑरोव्हिलचा गुन्हेगारीचा अड्डा बनवू लागले.

या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या संघर्षाची माहिती घेण्याकरिता मी पाँडिचेरीहून ऑरोव्हिलला निघालो. बससेवा अगदी मोजकी आहे. रिक्षावालाही यायला नाखूष होता. कारण रस्ते चांगले नाहीत. शेवटी परतीचे भाडे आणि वेटिंग चार्जेस देण्याचे मान्य केल्यावर चाळीस रुपयाला एक रिक्षावाला यायला

तयार झाला. खडबडीत, एकाकी रस्त्यावरून पाऊण तासाने तेथे पोचलो. तेव्हा लक्षात आले की ऑरोव्हिलची वस्ती एकत्रित नाही. मुख्य केंद्रापासून दूरदूर पसरलेल्या झोपड्या, काही पक्क्या इमारती असे या वसाहतीचे स्वरूप आहे. मध्यवर्ती इमारतीच्या प्रचंड सभागृहाचे बांधकाम चालू होते. तेथे जाऊन कृष्ण-मूर्ती नावाच्या इंजिनियरला भेटलो. त्याने ऑरोव्हिलचा दिलेला वृत्तांत धक्का-दायक होता. तो म्हणाला, 'मी याच भागातला. माझा जन्म इथेच गेला. ऑरोव्हिलची स्थापना फार उच्च ध्येयाने प्रेरित होऊन माताजींनी केली. पण येथे आलेल्या परकीय नागरिकांनी त्याला अनीतीचा अड्डा केला आहे. इथे दोनशे परकीय नागरिक राहतात त्यांच्यापैकी तीस टक्के लोकांचा व्हिसा संपला आहे किंवा रद्द झाला आहे. आम्ही स्थानिक लोक किंवा तमिळनाडूचे पोलीसही त्यांना हाकलून देऊ शकत नाही. कारण ते म्हणतात की हा केन्द्र सरकारचा प्रश्न आहे. हे लोक अफू, दारू, गांजा, चरस, यांचा वापर आणि व्यापार करतात. त्यांच्यापैकी अनेक स्त्री–पुरुष संध्याकाळनंतर नागव्याने फिरतात. ते लैंगिक मुक्त जीवन मानतात. आश्रमाने रक्षक नेमले. त्यांना परकीयांनी झाडाला बांधून बेदम मारले. परकीयांच्या जवळ स्मगलिंगचा भरपूर पैसा आहे. ते आश्रमाच्या कार्यातही अडथळा आणतात. त्यांच्या दुर्वर्तनाला कंटाळून पूर्वी इथे राहणारे भारतीय ऑरोव्हिल सोडून गेले. माताजींची कन्यासुद्धा गेली. तिने आणि आश्रमाच्या व्यवस्थापकांनी केन्द्र सरकारकडे अनेक तक्रारी केल्या. पण केन्द्र सरकार इतक्या दूर आहे आणि त्याच्या पुढे देशाचे इतर इतके प्रश्न आहेत की ऑरोव्हिलकडे लक्ष पुरविले जात नाही. अंधार पडल्यावर इकडे परकीयांचेच गुंड राज्य असते. स्थानिक लोक भीतीच्या वातावरणात आहेत. आंतरराष्ट्रीय बंधुभावांच्या उच्च तत्त्वाने स्थापन झालेल्या या वसाहतीचा ताबा भारत सरकारने खास वटहुकूम काढून कालच घेतला आहे. भारत सरकारचे सशस्त्र पोलीस आले आहेत. आता सुधारणा होते की काय ते पहायचे. पण बेकायदा राहणाऱ्या परकीयांना देशाबाहेर काढून आश्रमाच्या नैतिक बंधनांचे सक्त पालन झाल्याशिवाय ऑरोव्हिल सुधारणार नाही.'

ऑरोव्हिलची योजना शंभर कोटी रुपयांची म्हणजे फार मोठ्या अवाक्याची आहे. भारत सरकार दरसाल पाऊण कोटी रुपयांची मदत देते. फ्रान्स, अमेरिका, जर्मनी, इंग्लंड अशा अनेक परदेशांतून मोटारी, वस्तू व रोख रकमा मोठ्या प्रमाणावर येतात. आश्रमाची व्यवस्था योगी अरविंद आणि माताजींच्या काळात आर्थिक भ्रष्टाचारापासून अलिप्त होती, तशी ती पुढे राहिली नाही, एका वर्षी सरकारी ऑडिटमध्ये १९ लक्ष रुपये कमी झाल्याचे आढळले. ही बाब अंगाशी येऊ नये म्हणून ऑडिट झाल्यानंतर आश्रमाच्या चालकांनी ती रक्कम घाईघाईने बँकेत भरली, असे आश्रमाविरुद्धचे काही आक्षेपही ऐकू आले. परकीयांची जी

बाजू मला मद्रासमध्ये जीन या फ्रेंच तरुणाने सांगितली होती, ती बरीच एकतर्फी होती. उदाहरणार्थ, आपल्या मोटारी आश्रमाने बळकावल्या असे विधान त्याने केले होते. ऑरोव्हिलमध्ये याबद्दल चौकशी केली तेव्हा समजले की फ्रेंच जनतेने आश्रमासाठी फ्रान्सहून दोन मोटारी भेट म्हणून पाठवल्या. ऑरोव्हिलमधील फ्रेंच तरुणांचे म्हणणे असे की फ्रेंचांनी पाठवल्या म्हणून त्या मोटारी त्यांच्याच मालकीच्या. त्यांनी ड्रायव्हरना मारहाण करून मोटारी ताब्यात घेतल्या. आश्रमाच्या चालकांनी पोलिसाकडे तक्रार करून, रीतसर मालकीचे कागदपत्र दाखवून मोटारी परत ताब्यात घेतल्या.

आश्रमाविरुद्ध परकीयांच्या संघर्षात अनेक इमारतींची बांधकामे अर्धवट राहिली आहेत. कित्येक योजना थांबल्या आहेत. ऑरोव्हिलमध्ये गावगुंडीचे वातावरण पसरले आहे. एका आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्यनगराची ही दुःखांतिका झाल्याने आता भारत सरकारच्या वटहुकुमाने ऑरोव्हिल केन्द्र सरकारच्या अंमलाखाली आले आहे.

❊ ❊

## ५ : तंजावर – बृहदीश्वर मंदिर आणि सरस्वती महाल

माझे दक्षिण भारतीय स्नेही श्री. चंद्रन मद्रासला आल्याचा मला फोन आला. त्यांच्याबरोबर त्याच दिवशी दुपारी अडीच वाजता वैगाई एक्स्प्रेसने त्रिचनापल्लीला जायचे होते. श्री. चंद्रन आणि त्यांचे दहा बारा नातेवाईक शबरी-मलाईच्या यात्रेला जाणार होते. प्रथम वैगाई एक्स्प्रेसने त्रिचनापल्लीला जायचे. मग त्रिचूरला आणि पुढे शबरीमलाईला असा कार्यक्रम होता. आपल्याकडच्या डेक्कन क्वीनसारखीच वैगाई एक्स्प्रेस ही मद्रास–मदुराई गाडी तमिळनाडूची ‘ प्रेस्टीज ट्रेन ’ आहे. आधी जागा राखून ठेवल्याशिवाय या गाडीने प्रवास करता येत नाही. आमच्या दहा जागा महिनाभर आधीच राखून ठेवल्या होत्या. त्यामुळे प्रवास फार चांगला झाला. वैगाई आणि कावेरी या तमिळनाडूच्या दोन्ही प्रमुख नद्या वाटेत लागल्या. आमची गाडी अनेकदा जंगलातून जात होती.

रात्री आठच्या सुमाराला गाडी त्रिचनापल्लीला पोचली. मी हॉटेल अजंठा या हॉटेलात राहिलो. चंद्रन व त्यांच्याबरोबरचे लोक नातेवाईकांकडे राहिले. त्रिचनापल्ली गावात चक्कर टाकली. जेवणाचा एक अनोखा प्रकार पाहिला. रस्त्याच्या कडेला बाकडी आणि छोटी लाकडी टेबले टाकली होती. जवळच स्टोव्ह आणि इडल्या उकडण्याची भांडी होती. गरम इडली, दोसा, भात, सार वगैरे रुपयापर्यन्त अगदी गरम वाफा निघणारे जेवण मिळत होते. पण मद्रासमध्ये रोज शाकाहारी जेवण घेतल्याने येथे मांसाहारी जेवण मिळते का पाहावे म्हणून शोध घेऊ लागलो. दक्षिणेत एक बरे आहे. शाकाहारी आणि मांसाहारी अशा जेवणाची हॉटेले सहज ओळखू येतात. बहुतेक नव्वद–पंचाण्णव टक्के हॉटेले शाकाहारी जेवणाची असतात. पण जेथे मांस–मच्छी मिळते त्यांना ‘ मिलिटरी हॉटेल ’ असे नाव असते.

तसे एखादे दिसते का पाहू लागलो, तो आठदहा लोकांचा एक घोळका


अत्यंत घाईघाईने जात असलेला दिसला. स्त्री–पुरुषांच्या त्या संमिश्र घोळक्यातील एक इसम मध्येच थांबून मला इंग्रजीतून विचारू लागला ‘ इथे हिंदी सिनेमाचे थिएटर कुठे आहे ?’ मी विचारले, ‘ मला इथं येऊन अर्धा तासही झाला नाही. पण समोर बस स्टँड आहे तिथे चित्रपटाचे फलक लागलेले दिसतात. तुम्हाला कोणता चित्रपट हवा आहे ?’ त्यावर ते गृहस्थ म्हणाले, ‘ कुठलाही. आम्ही महाराष्ट्रातून कुठलाही हिंदी चित्रपट पाहावा म्हणून बाहेर पडलो. मी म्हटले, ‘ मीही मराठीच आहे.’ त्यावर तो घोळका काहीसा हसतच पूर्वीपेक्षाही वेगाने चित्रपटगृहाच्या दिशेने जाऊ लागला.

अखेर मला एक मांसाहारी जेवणाचे हॉटेल सापडले. अशी हॉटेल्स रेल्वे स्टेशन आणि बसस्टँड यांच्याजवळ हमखास असतात. त्रिचनापल्ली शहर मोठे आहे. तेथे विमानतळ आणि नभोवाणी केन्द्रही आहे. पण वेळ रात्रीची होती. त्यामुळे शहर पाहण्याचा कार्यक्रम मला पुढे ढकलावा लागला. सकाळी लवकर उठून मी जवळच्याच बसस्टँडवर गेलो. तिथून फक्त तासाभराच्या रस्त्यावर तंजावर आहे. भारतातील सर्वश्रेष्ठ मंदिर (दि ग्रेटेस्ट टेंपल इन इंडिया) अशी ज्याची ख्याती आहे ते बृहदीश्वर मंदिर पाहायचे होतेच. पण तंजावरच्या सरफोजी भोसले घराण्यामुळे महाराष्ट्र आणि तंजावरचा शेकडो वर्षांचा सांस्कृतिक संबंध हेही माझ्या उत्सुकतेचे महत्त्वाचे कारण होते.

तंजावरच्या बस स्टेशनवर उतरलो तेव्हा सकाळचे साडेआठ वाजले असतील. गाव लहानसेच पण छान वाटले. बृहदीश्वर मंदिर कुठं आहे, असा मी प्रश्न करण्यापूर्वीच एका गाईडने मला गाठले. ‘ गाईड हवा का ? मी सर्व तंजावर दाखवतो. तुम्हाला एकट्याला फिरवून आणतो. सगळी माहिती सांगतो.’ असे त्याने आग्रहपूर्वक म्हटल्यावर मी त्याला विचारले, ‘ त्यासाठी किती पैसे घेशील?’ तो म्हणाला, ‘ सहा रुपये ’ सहा, हा अधलामधला आकडा त्याने मुद्दामच सांगितला होता. कारण त्याने ‘ सहा ’ म्हटले की प्रवासी घासाघीस करून चार म्हणेल व पाच रुपये अखेर ठरतील, अशी त्याची अटकळ होती. पण मी त्याला म्हटले, ‘ हे बघ, मी तुला दहा रुपये देईन, पण मला सर्वकाही शांतपणे आणि तपशीलवार सांग. तो भलताच खूष झाला. त्याला मी म्हटले, ‘ चल, प्रथम चहा घेऊ.’ आम्ही मसाला दोसा आणि चहा घेतला. त्याने मला रिक्षात बसविले.

आता तो खूप मोकळेपणाने बोलू लागला. तो म्हणाला, ‘ माझं नाव के. जी. राजाराम. हे माझं कार्ड ’ सिगरेटच्या पाकिटाच्या पातळ पुठ्ठ्यामागं त्यानं बॉलपेननं आपलं नाव आणि पत्ता लिहिला होता. तो म्हणाला. ‘ मी हातमाग चालवतो. मागावर काम नसलं तर गाईड म्हणून काम करतो.’

आमची रिक्षा बृहदीश्वर मंदिरासमोर उभी राहिली. त्या मंदिराच्या प्रशस्त प्रांगणाकडे जाताना गाईड सांगू लागला, ‘ या भूमीवर परशुरामांचे वास्तव्य झाले



बृहदीश्वर मंदिर – तंजावर.

आहे. ते तपश्चर्या करीत असताना तंजन नावाचा राक्षस त्यात विघ्न आणू लागला. म्हणून विष्णूने त्याला येथे ठार मारले. त्याच्या नावावरून या गावाला तंजापूर किंवा तंजावर असे नाव पडले. आपण महाराष्ट्रातून आला आहात. तुमच्या मराठी लोकांनी या भागावर दोनशे वर्षे राज्य केले. व्यंकोजी, सरफोजी अशा भोसले घराण्यातील राजांच्या राजवटीत तंजावर प्रांत समृद्ध व सुखी झाला. या भागात इतका तांदूळ पिकतो की याला ' राईस बाऊल ऑफ तमिळनाडू ' असे म्हणतात.'

मंदिराबाहेरूनच गाईड राजारामने मला गोपूर दाखवले. तो म्हणाला, ' दोन्ही बाजूंना शंकर आणि पार्वती नृत्य करतात असे दृश्य कोरले आहे. या नृत्यात शंकराचा एक पाय कानापर्यन्त उंच गेलेला दाखवला आहे. त्याची कथा अशी की एकदा शंकर आणि पार्वती यांची नृत्याची स्पर्धा चालली असताना शंकराच्या कानातील अलंकार खाली पडला. तेव्हा नृत्य थांबवून तो अलंकार शंकर उचलणार असे पार्वतीला वाटले, पण शंकराने नृत्यातच तो अलंकार पायाने उचलला आणि पायाच्या बोटांनीच आपल्या कानात पुन: बसविला. त्या दृश्याचे हे कोरीव काम आहे.'

तंजावरचे बृहदीश्वर मंदिर ९७० वर्षांपूर्वीचे आहे. सम्राट राजराजा चोला याने हे मंदिर बांधले. नंतर सरफोजींनी त्याचा जीर्णोद्धार केला. दक्षिणेतील इतर मंदिरांप्रमाणे या मंदिराभोवतीही उंच दगडी भिंत आहे. पहिले गोपूर शंभर फूट उंचीचे आहे. ९०० बाय ४०० फुटाचे भव्य प्रांगण आहे. मात्र दक्षिणेतील इतर सर्व मंदिरांची गोपुरे कळसापेक्षा खूप उंच असतात, पण बृहदीश्वर मंदिराचा कळस गोपुरापेक्षा उंच आहे. हे शिखर व कळस यांची उंची २०० फुटांहून अधिक आहे प्रांगणातला नंदी एकदम आपले लक्ष वेधून घेतो. त्याची उंची वीस फूट, रुंदी बारा फूट आणि वजन वीस टन आहे. माझा गाईड म्हणाला, ' इथे एवढे मोठे दगड सापडत नाहीत. पण हा नंदी एका विशाल शिळेपासून करून त्रिचनापल्लीहून इथे आणला आहे. हा भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा नंदी आहे. सर्वांत मोठा नंदी अनंतपूर (कर्नाटक) मध्ये आहे. नंदीचा मंडप नक्षीदार अशा सोळा स्तंभांवर आधारलेला आहे.

या मंदिराला दीडशे फुटांचा चबुतरा आहे. गाभाऱ्यापुढे अठरा फूट उंचीचे रेखीव द्वारपाल आहेत. मुख्य मंदिराचा गाभारा अंधारातच आहे. आम्ही गेल्यावर पुजाऱ्याने तेलाचे दिवे लावले आणि आरती पेटवली. त्यामुळे विशाल शिवलिंग स्पष्टपणे दिसले. सात फूट उंच असे हे शिवलिंग भारतातील सर्वांत मोठे आहे असे सांगितले जाते. त्याचा दगड नर्मदेतून आणला आहे. चैत्र पौर्णिमेला दोन टन दुधाचे शिवलिंगास स्नान घालतात. त्यावेळी १८ दिवस यात्रा चालते. मंदिराच्या पायऱ्यांवर जुन्या तमिळ भाषेत मंदिराचा इतिहास लिहिलेला आहे. दक्षिणेकडील भागातही सरफोजीराजे भोसले यांनी देवनागरीत खोदलेला शिलालेख माझ्या

गाईडने दाखवला. तंजावरच्या भोसले घराण्याचा इतिहास त्यात दिला आहे. आणि त्याचा इंग्रजी व तमिळ अनुवाद सरस्वती महालात पाहावयास मिळतो.

इतर मंदिरांची गोपुरे विशेष प्रेक्षणीय असतात तर या मंदिराचे शिखर अधिक महत्त्वाचे आहे. त्यावर बसविलेल्या भव्य कळसाच्या दगडाचे वजन ऐंशी टन आहे. विशेष म्हणजे हा एकच अखंड दगड असून त्या काळी तो दोनशे फूट उंचीवर नेला गेला ही अत्यंत आश्चर्याची आणि कौतुकाची गोष्ट आहे. शिखर तेरा मजली आहे. इतक्या उंचीवर ऐंशी टन वजनाची शिळा नेण्यासाठी दोन मैल लांबीचा उतार केला होता असे सांगितले जाते. शिखरावर अनेक उत्कृष्ट शिल्पे आहेत. मार्कंडेय, विष्णू, अर्धनारी नटेश्वर, महिषासुरमर्दिनी इत्यादींच्या बरोबरच एका युरोपियनाचीही मूर्ती आहे. या युरोपियनाबद्दल गाईड राजाराम म्हणाला, ' हे मंदिर बांधले जात असताना एक युरोपियन तंजावरला आला होता. त्याने मंदिराला मोठी देणगी दिली. त्याचेही इथे स्मारक असावे म्हणून हिंदू देवदेवतांच्या गर्दीत एक टोपीवाला युरोपियनही कोरण्यात आला आहे. अर्धनारी नटेश्वराची कथा अशी आहे की, सर्व देव शंकराकडे येत आणि पार्वतीकडे त्यांचे दुर्लक्ष होई तेव्हा पार्वती रुसली आणि शंकराला म्हणाली, ' सर्व काही महत्त्व आहे ते तुम्हालाच. मला काहीच महत्त्व नाही. ' शंकराने तिचा राग काढण्यासाठी विचारले, ' तू मागशील ते मी तुला देईन. ' त्यावर पार्वतीने शंकराचा अर्धा देह मागितला. म्हणून अर्धनारी नटेश्वर झाला.

मंदिराच्या आवारात करूरजी साधूचे लहानसे मंदिर आहे. तेथे शिवलिंग अर्पण केल्यास पुत्रप्राप्ती होते अशी समजूत आहे. काही भक्तांनी साधूस पाळणही अर्पण केलेले दिसले. कार्तिकस्वामीचे ३५० वर्षांपूर्वीचेही मंदिर आहे. हे मंदिर लहान असले तरी त्याची शिल्पकला अत्यंत सुंदर आहे. रथाच्या आकाराच्या या मंदिराला ओढणारे दगडी घोडे अत्यंत देखणे आहेत. मंदिराच्या आवारात १०८ शिवलिंगे आणि १००८ नंदी आहेत. तसेच पुरातत्व-विभागाचे लहानसे वस्तुसंग्रहालयही आहे.

मंदिर पाहिल्यावर आम्ही राजवाडा पाहायला रिक्षाने निघालो. वाटेत राजारामने आमची रिक्षा एका अरुंद बोळात नेली. तो म्हणाला, ' इथे नक्षीची उत्कृष्ट भांडी, पेले वगैरे मिळतात. दुकानात मिळणाऱ्या याच वस्तूंपेक्षा इथे ३०–३५ टक्के स्वस्त असतात. ' मी त्याला सांगितले की मला कसलीही खरेदी करावयाची नाही. तरीही त्याने फारच आग्रह केला. म्हणून मी रिक्षातून उतरून एका अंधाऱ्या घरात गेलो. तेथे काही कारागीर भांड्यावर नक्षीकाम करीत होते. भांडी चांगली होती व स्वस्तही होती. पण मला पुढे बराच प्रवास करायचा होता आणि नको असलेली ती भांडी घेऊन दीड दोन हजार मैलांचा प्रवास करण्यात

823
23490
भूप्रवास 23/7/02



एका हातात गंगा घेऊन दुसऱ्या हाताने पार्वतीला खूष करणाऱ्या
शंकराची मूर्ती (आर्ट गॅलरी : तंजावर.)

काहीच अर्थ नव्हता. म्हणून मी भांडी तयार करणाऱ्या कारागिरांचे कौतुक केले आणि आम्ही राजवाड्याकडे निघालो.

हा राजवाडा एकेकाळी वैभवशाली असावा. पण आता मात्र त्याचे मूळ सौंदर्य धुळीने माखले आहे. बरीच पडझड झाली आहे. योग्य ती दुरुस्ती आणि रंगरंगोटी न झाल्याने तो आता दीनवाणा दिसतो. राजवाड्याचा सर्वांत उंच भाग म्हणजे दर्शन मनोरा. त्यात उभा राहून राजा बृहदीश्वराचे दर्शन घेत असे आणि त्याचवेळी प्रजाही त्या राजाचे दर्शन घेई. भरतनाट्यम् सभागृहात नृत्याचे आणि संगीताचे कार्यक्रम होत असत. आम्ही गेलो तेव्हा त्या हॉलमध्ये सरकारी नोक-रांची कसली तरी सभा चालली होती.

राजवाड्याच्या एका भागात आर्ट गॅलरी आहे. ती मात्र प्रेक्षणीय आहे. अनेक भागांतील नटराजांच्या सुंदर लहान मोठ्या मूर्ती तेथे आहेत. अखिल नाट्य संस्थांत पूजिली जाणारी नटराजाची मूळ मूर्ती तंजावरचीच आहे, असे आमच्या गाईडने अभिमानाने सांगितले. मार्कंडेय (दोन पत्नींसह), शिव, राम–सीता, विष्णू, लक्ष्मी इत्यादी देवतांच्या अनेक सुबक मूर्ती या आर्ट गॅलरीत आहेत. इटलीत तयार केलेला सरफोजी भोसले यांचा संगमरवरी पुतळा छाप पडणारा आहे. सरफोजींचा काळ १७९८ ते १८३२ असा होता. तंजावरच्या विजय राघव नायक राजाचा (१५३३ ते १६७८) ब्राँझचा पुतळाही अतिशय सुबक आहे. एका शिल्पात शंकर व पार्वती असून शंकराने एका हातात गंगा धरली आहे. कल्याण-सुंदर या मूर्तिसमूहात शंकर–पार्वतीचा विवाह व त्या वेळी उपस्थित असलेले विष्णू व श्रीदेवी दाखवले आहेत.

ब्रह्मदेवाची एक अतिशय देखणी मूर्ती या आर्ट गॅलरीत आहे. या मूर्तीनेच तंजावरच्या या संग्रहाचा प्रारंभ झाला. ही मूर्ती तंजावर जवळच्या एका खेड्यात पडली होती. कलकत्त्याचे एक मूर्तिनज्ज्ञ श्री. शिवराममूर्ती यांनी ती पाहिली. ही मूर्ती कलकत्त्याला नेण्याची परवानगी त्यांनी कलेक्टरांच्याकडे मागितली, तेव्हा तंजावरच्या नागरिकांनी ती नेण्यास विरोध केला. ही आणि या भागातील अशा मूर्ती संग्रहालयात ठेवाव्यात अशी मोहीम निघाली आणि आज उत्कृष्ट शिल्पकलेचे नमुने असलेली ही आर्ट गॅलरी अस्तित्वात आली.

सर्वच प्रवाशांना, विशेषतः मराठी भाषिकांना तंजावरचा सरस्वती महाल हे फार मोठे आकर्षण आहे. या महालात पाहण्यासारखे, अभ्यासण्यासारखे खूपच आहे.

तंजावर हे चोला राजाच्या कारकीर्दीत विशेष भरभराट पावले. ख्रिस्तपूर्व २५० पासून तेराव्या शतकापर्यंत त्यांनी या भागावर सत्ता गाजवली. त्यांच्या काळात साहित्य, संगीत, चित्रकला आणि नृत्य यांत तंजावरने अत्युच्च कीर्ती मिळविली. त्यानंतर नायक राजे आले. १६७४ पासून मराठा राजांचा अंमल

आला. एकोजी, सरफोजी वगैरे भोसले राजांनी तमिळ, तेलगू, संस्कृत, मराठी अशा भाषांना व त्यांतील साहित्याला उत्तेजन दिले. सरस्वती महाल ही सरफोजी राजांची निर्मिती आहे. तुळाजी आणि सरफोजी यांनी देशी भाषांबरोबरच इंग्रजी आणि फ्रेंच यांचाही या भागात विकास व प्रसार करण्यास मदत केली. सरस्वती महालात ग्रंथालयाचे जे दालन आहे, त्याच्या प्रवेशद्वाराजवळच सरफोजींचा पुतळा आहे. ईस्ट इंडिया कंपनीने सरफोजींच्या हयातीतच हा पूर्णाकृती पुतळा उभारला होता. हातात तलवार घेतलेला पुतळा उभारण्याची ईस्ट इंडिया कंपनीची कल्पना होती, पण सरफोजींनी स्वतः त्याला विरोध केला. सांस्कृतिक जागेत तलवार हाती घेतलेल्या पुतळ्यापेक्षा हात जोडलेला पुतळाच असावा, असा आग्रह धरला.

सरस्वती महालात शिरल्यावर प्रथमच जी चित्रे दिसली ती पाहून धक्काच बसला. कारण 'शिक्षेचे प्रकार' या सदरात अनेक क्रूर प्रकारांनी शिक्षा कशा दिल्या जात या विषयावरची ती चित्रे आहेत. ती चित्रे सांस्कृतिक संग्रहात कशासाठी ते कळले नाही. कदाचित, या सरस्वती महालातील वस्तू चोरणाऱ्यांना जरब बसावी असाही या भीतीदायक चित्रांचा उद्देश असावा. मात्र पुढे दासबोध, गीता, वेद वगैरे विभाग फार चांगले आहेत. १६४० ते १८३२ या काळातील अनेक दुर्मिळ मराठी हस्तलिखिते इथे पाहायला मिळतात. तसेच सरफोजींच्या संग्रहातील इंग्रजी, ग्रीक, तमिळ, लॅटिन, इटालियन ग्रंथही येथील काचेच्या कपाटांत ठेवले आहेत. अर्धा इंच रुंद व नऊ इंच लांब अशा कागदावर अतिशय बारीक अक्षरात तमिळमध्ये लिहिलेले रामायण मी येथे पाहिले. अर्ध्या इंचात नऊ ओळी आहेत. तालपत्रावरील भगवद्गीता, दीड इंच उंचीच्या कागदावरील ऋग्वेद, दुर्गा सप्तशती इ. ग्रंथ पाहण्यासारखे आहेत.

सरफोजी राजे नाटककार व कवी होते. त्यांनी लिहिलेल्या मराठी पुस्तकांची हस्तलिखिते येथे आहेत. देवेन्द्र कोरावनजी नावाच्या भटक्या प्रवाशाने भूगोलाचे एक पुस्तक पद्यात लिहिले आहे, त्याचेही हस्तलिखित येथे आहे. मराठी महाभारत आणि भागवत यांची सुबक हस्तलिखिते व प्रत्येक विभागावर त्यातील प्रसंगावर आधारलेले चित्र आहे. एकनाथांचे शिष्य माधवस्वामी यांनी हे ग्रंथ लिहिले आहेत. अडीचशे वर्षांपूर्वीची ही चित्रे व हस्तलिखिते अद्यापही स्पष्ट दिसतात. शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांची चित्रे असलेला दासबोध इथे आहे. ईस्ट इंडिया कंपनी व टिपू सुलतान यांच्यातील लढाया, पेशव्यांच्या काळातील मराठी सत्तेच्या स्वाऱ्या, कर्नाटकचा नबाब आणि तंजावरचे राजे यांच्यातील लढाया अशा अनेक ऐतिहासिक विषयांवरील महत्त्वाचे कागदपत्र सरस्वती महालात आहेत. शिवाय वैद्यक, विज्ञान, कला, साहित्य अशा विविध क्षेत्रांतील तमिळ, तेलगू व अनेक युरोपियन भाषांतील हस्तलिखिते, ग्रंथ आणि चित्रे यांनी हा सरस्वती महाल समृद्ध आहे.


सरस्वती महालाचे ग्रंथालय आणि ग्रंथविक्री-केन्द्रही आहे. त्यातील 'लोक-गीत' व 'गजशास्त्रसार' अशी दोन पुस्तके मी घेतली. सरफोजींनी लिहिलेली नाटके मी चाळून पाहिली, पण आज 'नाटक' या शब्दाला जो अर्थ रूढ झाला आहे त्या अर्थाने ती नाटके नाहीत. ती प्रायः काव्याचीच पुस्तके आहेत. अधून मधून पात्रांच्या तोंडी ती काव्ये घातली आहेत म्हणून त्यांना नाटके म्हणायचे. पण त्या काळात अशीच नाटके होत असावीत हे उघड आहे. 'गजशास्त्रसार' या पुस्तकात हत्तीचे दात कसे कापावेत, चवताळलेल्या हत्तीला कोणत्या शिक्षा कराव्यात, उत्तम हत्ती कसा ओळखावा, हत्तीला कोणता आजार झाला तर कोणता उपाय करावा इत्यादी माहिती आहे. मात्र माणसालाच राहायला जागा नसलेल्या मुंबई शहरात राहणाऱ्या माझ्यासारख्याला हत्ती पाळण्याची सुतराम शक्यता नसल्याने ही माहिती फक्त करमणुकीसाठीच उपयोगी आहे. सरस्वती महालात शेकडो मराठी लोकगीतांची हस्तलिखिते आहेत. त्यांतील निवडक लोक-गीतांचा संग्रह मात्र मनोरंजक आहे. त्यांपैकी काही धार्मिक काही, क्रीडाविषयक, काही कौटुंबिक अशी आहेत. चोळी कशी शिवावी यावरही त्यात एक लोकगीत आहे. दळणावरील कवितेत—

विवेकाचे जाते परमार्थ हा खुंटा वोढिती वरवंटा शुद्धबुद्धी ॥
गीत गाऊ सये सावरी दळण घातले वैरण अहंकाराचे ॥

अशा शब्दांत म्हटले तर दळण आणि म्हटला तर परमार्थ असा दोन्हींचा समन्वय साधला आहे.

सरस्वती महालात अनेक दुर्मिळ चित्रेही आहेत. एकोजी (शिवाजी महा-राजांचे बंधू) शिवाजी आणि सरफोजी हे समकालीन नसतानाही त्यांना एका चित्रात एकत्र दाखविले आहे. फ्रेंच वैद्यकातील काही चित्रे विशेष उल्लेखनीय आहेत. सरफोजी व इतर राजांच्या संग्रहातील अनेक चित्रे प्रेक्षणीय आहेत. संशोधकांना आणि इतिहासलेखकांना सरस्वती महाल हे एक वरदानच आहे.

तंजावरहून मी त्रिचनापल्लीला परत आलो. त्या गावचे प्रमुख आकर्षण म्हणजे रॉक टेंपल या नावाने विख्यात असलेले उंच टेकडीवरचे गणेश मंदिर. माझे स्नेही चंद्रन आणि त्यांचे आप्त यांच्यासह मी या मंदिराच्या पायऱ्या चढू लागलो. पायथ्याशीही एक देवी आहे. त्या मंदिराजवळ हत्ती होता. वरच्या मंदिराकडे जाण्यासाठी पायऱ्या सुरू होतात. जवळजवळ चारशे पायऱ्या आहेत. त्या आम्ही गप्पा मारीत मारीत आणि एकदोनदा बसून पार केल्या. उंचावर मंदिरापूर्वी मोठा खडक आहे. त्यावरून त्रिचनापल्लीचा हिरवागार, सुंदर परिसर दिसतो. संध्या-काळची वेळ होती; त्यामुळे गर्दी होती. पण त्रास होण्याइतकी फार नव्हती. आम्ही देवदर्शन घेऊन धीमे धीमे उतरलो. दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम म्हणजे आणखी एक मंदिर पाहणे. एकदा तुम्ही दक्षिणेत गेलात की पावलापावलाला



टेकडीवर असलेले त्रिचनापल्ली येथील ' रॉक टेंपल '

मंदिर लागते. आम्ही गेलो ते हिरुवणी मंदिर. दक्षिणेतील इतर कोणत्याही मंदिरासारखेच नक्षीदार, गोपुरयुक्त, सुंदर आहे. या राज्याला तमिळनाडू म्हणण्याऐवजी मंदिरनाडू का म्हणत नाहीत, असाही विचार माझ्या मनात चमकून गेला.

तमिळनाडूत अनंत मंदिरे आहेत. मला जे मंदिर पाहण्याची अधिक ओढ होती ते एका महामानवाचे–कन्याकुमारी येथील स्वामी विवेकानंदांचे रॉक मेमोरियल. कन्याकुमारी हे भारताचे अखेरचे टोक. तिथे तीन समुद्रांचा संगम आहे. मावळता सूर्य आणि उगवता चंद्र असे एकाच वेळी विस्तीर्ण सागराच्या दोन कडांना दिसतात. हे अपूर्व दृश्य पाहावे, स्वामी विवेकानंदांचे भव्य स्मारक पाहावे, असे फार वर्षे मनात होते ती मनिषा आता पूर्ण होणार होती. म्हणून कन्याकुमारीचे रेल्वेचे तिकीट काढले. सकाळी नऊच्या सुमाराला नागरकोल गाव आले आणि माझ्या डब्यातील माझ्याशिवाय एकूण एक उतारू गाडीतून उतरले. माझ्या मनात शंका आली की गाडी इथेच थांबते काय ? म्हणून फलाटावरच्या एका इसमाला विचारले. तो म्हणाला, 'ही गाडी थेट कन्याकुमारीला जाते. पण नागरकोल हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. आता उतरलेले सगळे सरकारी नोकरीसाठी रोज इथे येतात आणि संध्याकाळच्या गाडीने परत जातात' असे म्हणून तोही घाईघाईने हातातला जेवणाचा डबा घेऊन निघाला.

इतक्यात गाडी सुरू झाली. त्या मोठ्या डब्यात मी एकुलता एक प्रवासी होतो. मला मुंबईच्या रेल्वेतील गुन्हेगारी आठवून भीती वाटू लागली. अचानक कोणी चाकू घेऊन डब्यात घुसला तर ? अशा प्रसंगी सामान गेले तरी हरकत नाही, पण आपण तरी उडी मारून जीव बचावावा म्हणून मी दरवाजाजवळ उभा राहिलो. वाकून पुढच्या डब्यात पाहिले. त्यात दोन स्त्रिया आणि दोन पुरुषांचे एक कुटुंब बसले होते. गाडी पुढच्या स्टेशनवर उभी राहिल्याबरोबर सामान घेऊन उतरायचे आणि पटकन डबा बदलायचा असे ठरवले. त्याप्रमाणे स्टेशन आल्याबरोबर सामानासह डबा बदलला आणि काहीसा निर्धास्त झालो. पण दहा–बारा मिनिटेच. पुढचे सुचिंद्रम नावाचे स्टेशन आले आणि ते चार जणांचे कुटुंबही उतरले. पुनः नव्या डब्यात मी एकटाच. दक्षिणेत एकंदरीत गुन्हेगारी कमी. मुंबईप्रमाणे गाडीतील उतारूंवर सुरामारी होण्याचे प्रसंग सहसा घडत नाहीत. पण धोका कशाला पत्करा म्हणून पुनः दाराजवळच उभा राहिलो.

कन्याकुमारी स्टेशन आले. स्टेशन लहानच, पण अत्यंत स्वच्छ आणि प्रसन्न वाटले. आमच्या गाडीतून फक्त नऊदहाच उतारू उतरले होते. स्टेशनचा विवेकानंद स्मारकाचा माहिती देणारा स्टॉल होता. तिथे जाऊन मी काही पुस्तिका घेतल्या. स्टेशनच्या बाहेर पडलो आणि चारपाच टॅक्सीवाल्यांनी घेरले. कन्याकुमारीतील काही हॉटेलांचे एजंट भोवती जमा झाले. स्टेशनपासून गावात जाण्यासाठी टॅक्सीवाल्याने तीन रुपये सांगितले. लगेच दुसऱ्या टॅक्सीवाल्याने

दोन रुपये सांगितले. त्या दिवशी फार कमी प्रवासी आले आणि टॅक्सी जास्त होत्या. त्याचा हा सहजच परिणाम होता. लॉजचे एजंट म्हणत होते, आठ रुपयांना जागा देतो, दहा रुपयांना सेल्फकंटेंड खोली देतो. एकूण कन्याकुमारीला खूपच स्वस्ताई होती. एक मराठी कुटुंब आणि मी टॅक्सीत बसून गावात गेलो. ते कुटुंब 'ट्रायसी' हॉटेलात उतरले. त्यावेळी साडेदहा वाजले होते. अकरा वाजता विवेकानंद स्मारकाला जाणाऱ्या नावा बंद होतात असे कळले. तेव्हा मी विचार केला की आधी स्मारक पाहावे आणि मग कुठे उतरायचे ते ठरवावे.



**तंजावरच्या आर्ट गॅलरीतील सरफोजी राजांचा पुतळा.**

पण सामानाचा प्रश्न होता. तोही सुटला. कारण फेरीचे तिकीट जेथे मिळत होते तेथेच क्लोक रूम होती. सामान ठेवण्याची सोय तिथे होती. मी माझ्या दोन बॅगा ठेवल्या आणि एक रुपयाचे फेरीचे तिकीट घेऊन नावेत बसलो.

मी कन्याकुमारीला गेलो, तेव्हा मासे पकडणारे कोळी आणि विवेकानंद स्मारकाचे व्यवस्थापक यांच्यातील संघर्ष शिगेला पोचला होता. कोळ्यांनी फेरी-कडे जाणारा मार्ग अडवण्याचे 'रस्ता रोको' आंदोलन चालवले होते. त्यांचे ह्मणजे असे की फेरीच्या वर्दळीने मासे दूर जातात आणि कोळ्यांना मासे पकडण्यासाठी समुद्रात खूप दूर जावे लागते. सहा डिसेंबरपासून स्मारकाकडे जाणारी फेरी सर्व्हिस बंद होईल, अशी नोटीस स्मारकाच्या व्यवस्थापकांनी लावली होती. ती नोटीस मी वाचत होतो. तोच फेरी आली, आम्ही साठसत्तर लोक नावेत बसलो, समुद्रातून पंधरा मिनिटांचा प्रवास करून विवेकानंद स्मारकाला पोचलो. शीतल वारा वाहात होता. सागराच्या लाटा नावेला थडकून त्यांचे तुषार अंगावर उडत होते, एका भव्य खडकावर उभारलेले विवेकानंदांचे स्मारक अतिशय स्फूर्तिदायक आहे. स्मारकाची जागा स्वामी विवेकानंदांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला साजेशीच आहे. त्यांनी महाराष्ट्रातील चाफेकर बंधूंविषयी असे उद्‌गार काढले होते. की, 'या दोन बंधूंचे सोन्याचे पुतळे करून भारताच्या प्रवेशद्वारावर उभे केले पाहिजेत.' त्यांची ती कल्पना प्रत्यक्षात आली नाही, पण स्वामी विवेकानंदांचे ओजस्वी स्मारक भारताच्या सीमेवर उभे असलेले पाहून अंगावर रोमांच आल्यावाचून राहात नाहीत.

# ६ : सागरकन्या

कन्याकुमारी हे भारतातील एक पवित्र आणि स्फूर्तिदायक असे ठिकाण आहे. १८९२ मध्ये स्वामी विवेकानंद हिमालयातून या ठिकाणी आले. त्यांनी देवी कन्याकुमारीचे दर्शन घेतले. त्यांना तीन सागरांच्या मीलनातून वर आलेला एक उंच खडक दिसला. त्या खडकावर जाऊन चिंतन करावे असे त्यांना वाटले. खडक साधारण दीड मैल अंतरावर होता आणि तेथे जाण्यासाठी त्यावेळी स्वामी विवेकानंदांच्याकडे पैसे नव्हते, कारण ते परिव्राजक होते. फक्त अन्न मागून उदर-निर्वाह करीत आणि प्रवचने देत. होडीवाला पैसे मिळाल्यावाचून खडकाकडे नेण्यास तयार नाही असे पाहून विवेकानंदांनी ते अंतर पोहून जाण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणे २५ डिसेंबर १८९२ रोजी ते खडकापर्यन्त पोहत गेले. तेथे त्यांनी अलिप्तपणे भरतखंडाकडे पाहिले या प्रसंगाविषयी स्वतः स्वामी विवेकानंदांनी लिहिले आहे, 'भारतातील लक्षावधी गरीब व अज्ञानी लोकांसाठी काही तरी करावे असे मला वाटले. रात्रभर मी त्या खडकावर बसलो आणि देशासाठी आपले जीवन अर्पण करण्याची प्रतिज्ञा केली. उर्वरित आयुष्य देशसेवेत घालवायचे आणि धनाढ्य पाश्चात्य राष्ट्रांत वेदांताचा प्रसार करायचा असे मी ठरविले.'

त्याच खडकावर आता सव्वा कोटी रुपये खर्चून विवेकानंदांचे भव्य स्मारक बांधले गेले आहे. कन्याकुमारीहून स्वामी मद्रासला गेले आणि १८९३ मध्ये अमेरिकेत जाऊन त्यांनी हिंदू धर्माचे निशाण शिकागोच्या जागतिक धर्मपरिषदेत उंच फडकावले. भारतात परत आल्यानंतर त्यांनी आपले गुरू रामकृष्ण परमहंस यांच्या नावाने रामकृष्ण मिशन नावाची संस्था स्थापन केली. तिच्या अनेक शाखा देशात आणि परदेशांत निघाल्या. या विशाल कार्याचे स्फूर्तिस्थान म्हणून या खडकावर विवेकानंदांचे स्मारक होणे हे उचितच होते. १९२५ मध्ये महात्मा

गांधी कन्याकुमारीला आले होते. त्यांनीही विवेकानंदांच्या त्या प्रतिज्ञेचा आणि त्यांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या खडकाचा गौरव केला होता.

१९६२ मध्ये विवेकानंद स्मारकसमिती स्थापन झाली. श्री. एकनाथजी रानडे यांनी या कामी पुढाकार घेतला. भारतातील विविध राज्यांनी एकंदर ८५ लक्ष रुपये दिले. त्यांपैकी सर्वांत अधिक (१४ लक्ष ९८ हजार) उत्तर प्रदेशाने आणि त्या खालोखाल महाराष्ट्राने (१४ लक्ष ७७ हजार) दिले आहेत. त्याशिवाय विविध राज्य सरकारांनी देणग्या दिल्या. केन्द्र सरकारने १० लक्ष रु. दिले. कन्याकुमारीला आलेल्या यात्रेकरूंनी एकूण साडेपाच लक्ष रु. दिले.

मी अनेक राष्ट्रांतील अनेक स्मारके पाहिली, पण इतके स्वच्छ, प्रसन्न आणि उदात्त स्मारक दुसरे पाहिले नाही. सभोवार सागर आणि मोकळ्या लाटा असलेली पार्श्वभूमीही अत्यंत सुंदर आहे. २ सप्टेंबर १९७० रोजी या स्मारकाचे उद्‌घाटन राष्ट्रपती गिरी यांच्या हस्ते झाले. रामकृष्ण मठाचे प्रमुख वीरेश्वरानंद यांनी आशीर्वाद दिले. तमिळनाडूचे मुख्यमंत्री श्री. करुणानिधी हे या अपूर्व स्मारकाचे अध्यक्ष होते. स्वामी विवेकानंद यांनी ज्या जागतिक धर्म परिषदेत शिकागो येथे विश्वविख्यात भाषण केले, त्या परिषदेच्या सत्याहत्तराव्या वाढदिवशीच या स्मारकाचे उद्‌घाटन ठेवण्यात संघटकांनी फार मोठे औचित्य साधले.

विवेकानंद स्मारकावर जाण्यापूर्वी पुस्तकालय आहे. येथे स्मारकाविषयी माहितीपत्रिका, छायाचित्रे, पुस्तके मिळतात. शिवाय स्वामी विवेकानंदांचे अनेक ग्रंथ तेथे विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. तेथील सार्वजनिक संबंध अधिकारी श्री. माधवन् यांना मी भेटलो. ते मराठी भाषिक नसूनही त्यांनी लेखक म्हणून माझे नाव ऐकले होते. ते म्हणाले, ‘तुम्ही आमच्या विवेकानंदपुरम्‌मधील खोल्यातच उतरा. तेथे तुम्हाला स्वतंत्र खोली मिळेल. जेवण, चहा वगैरे सोयी त्या ठिकाणी आहेत. निदान आठ दिवस तरी राहाच.’ त्यांचे आभार मानून आणि स्मारकाविषयीची माहितीपत्रके, छायाचित्रे वगैरे घेऊन मी स्मारक पाहण्यासाठी निघालो.

स्मारकाचे दोन विभाग आहेत. एक श्रीपाद मंडप आणि दुसरा विवेकानंद मंडप या दोन्हींमध्ये साठ फुटांचे अंतर आहे. श्रीपाद मंडपाचे शिखर द्राविडी पद्धतीचे आहे. मंडपाला तीन प्राकार आहेत. चोल घराण्यातील शिल्पाची आठवण करून देणारा हा मंडप आहे. ७१ चौरस फुटांचा हा मंडप अत्यंत स्वच्छ आणि मंदिराच्या वातावरणाला शोभेल असाच आहे. दुसऱ्या प्राकाराला २८ स्तंभ आहेत. सर्व बांधकाम सुंदर निळ्या ग्रानाईट दगडाचे आहे. आतील प्राकाराभोवती भिंत आहे. श्रीपाद मंडपामागे एक उंच भगवे निशाण आहे. त्यावर ओम हे चिन्ह आहे. पार्वतीने कन्याकुमारीच्या रूपात या ठिकाणी एका पायावर तपस्या केली, अशी कथा असून या ठिकाणी पावलाची खूण असलेली शिळा आहे. त्यावरून ‘श्रीपाद-




कन्याकुमारी येथील विवेकानंद स्मारकाचे दुरून दिसणारे दृश्य.

पैर ' असे या भागाचे नाव पडले आहे. या पाऊलखुणेवर ताजी फुले वाहिली होती. काचेच्या गवाक्षातून या पावलाचे सर्व बाजूंनी दर्शन घेण्याची सोय आहे. या पावलाचा विशेष म्हणजे दक्षिणेत जरी शिवाची शेकडो मंदिरे असली, तरी शिवाचे वास्तव्य हिमालयात असते असेच मानले जाते. भारताच्या एका टोकाला शिवाचे आणि दुसऱ्या टोकाला हे पार्वतीचे स्मारक आहे.

या श्रीपाद मंडपापासून साठ फूट अंतरावर, दोन्हीपैकी अधिक उंच अशा खडकावर विवेकानंद मंडप आहे. सुरुवातीला २८ पायऱ्या आणि दोन मोठे दगडी हत्ती आहेत. पायऱ्या चढून गेले की एक मंडप लागतो, त्याला मुखमंडप म्हणतात. हा मंडप म्हणजे पल्लव आणि अजंठा प्रकारांच्या बांधणीचा सुंदर संगम आहे. त्यात हिरव्या आणि लाल रंगाचे ग्रानाईट दगड वापरले आहेत. दरवाजावर गंज-पूर्ण कुंभ असून तो येणाऱ्यांच्या स्वागताचे दक्षिणेतील चिन्ह आहे. मुखमंडपाच्या जमिनीसाठी निळ्या व लाल रंगाचा दगड वापरला असून छत वीस फूट उंच आहे. त्यानंतर आपण अतिशय प्रशस्त अशा सभामंडपात जातो. त्याची लांबी १३० फूट आणि रुंदी ५६ फूट आहे. त्यावरचे शिखर ६५ फूट उंच आहे. या सभामंडपाचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे प्रतिमामंडप किंवा गाभारा. या ठिकाणी स्वामी विवेकानंदांचा भव्य पुतळा अत्यंत कलात्मक स्तंभांच्या प्राकारात उभा आहे. किनाऱ्यावरून पोहत येऊन याच ठिकाणी १८९२ मध्ये विवेकानंदांनी साधना केली. जीवन देशसेवेसाठी वाहण्याची प्रतिज्ञा केली. असे हे अतिशय पवित्र आणि उदात्त ठिकाण गंभीर व कलात्मक वातावरणात आहे. इथे मूर्तीसमोर उभे राहून चिंतन करणे आणि काही काल तरी निःस्वार्थ विचार करणे हे कन्याकुमारीस भेट देणाऱ्या प्रत्येक भारतीयाचे कर्तव्यच आहे. पुतळ्याभोवतीच्या स्तंभावर पल्लव काळातील शिल्प कोरण्यात आले असून हा पुष्पमंडपच आहे असा भास होतो.

सभामंडपाच्या एका दालनात स्वामी विवेकानंदांचे गुरू रामकृष्ण परमहंस आणि शारदा माताजी यांची तैलचित्रे आहेत. ही चित्रे सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय चित्रकार श्री. एस्. एम्. पंडित यांनी काढली आहेत. विशेष म्हणजे स्वामी विवेकानंद यांचा आठ फूट उंचीचा ब्राँझ पुतळाही महाराष्ट्रीय शिल्पकार श्री. सोनावडेकर यांनीच केला आहे. हा पुतळा परिव्राजक विवेकानंदांचे सात्त्विक पण करारी व्यक्तिमत्त्व दाखवितो.

मी मुंबईला आल्यावर श्री. एस्. एम्. पंडित या थोर चित्रकाराचा अक-ल्पितपणे परिचय झाला. एकदा अत्यंत अनपेक्षितपणे माझे स्नेही श्री. सी. रामचंद्र यांच्याबरोबर श्री. पंडित माझ्या घरी आले. कन्याकुमारी येथील स्मारकात त्यांनी केलेले विवेकानंदाचे तैलचित्र मला अतिशय आवडल्याचे मी त्यांना सांगितले. तेव्हा ते म्हणाले, ' हे चित्र काढताना मी व्रतस्थ होतो. प्रथम मी माझे गुरू आणि देवी यांची चित्रे काढून त्यांना वंदन केले. त्यांचे आशीर्वाद घेतले आणि मगच या



विवेकानंदांचा हा पुतळा मुंबईचे शिल्पकार श्री. सोनावडेकर यांनी श्री. एस्. एम्. पंडित यांनी केलेल्या तैलचित्रावरून केला आहे.

कार्याला सुरवात केली. अशा महान् योग्याचे चित्र काढणाऱ्याने स्वतः व्रतस्थ असल्याशिवाय त्यांचे तेज प्रतिबिंबित करता येणार नाही म्हणून हे चित्र काढण्याच्या काळात मी पूर्णपणे व्रतस्थ व एकाग्र राहिलो.' योगायोग असा की पुढे काही दिवसांनी मी श्री. पंडित यांच्याकडे गेलो असता श्री. सोनावडेकरही तेथे आले व त्यांचाही परिचय झाला. या दोन मराठी कलावंतांनी महाराष्ट्राचा झेंडा कन्याकुमारीपर्यंत नेला याचा मराठी लोकांना अभिमान वाटेल.

प्रतिमामंडपाच्या मागे ध्यानमंडप आहे. या ठिकाणी चिंतनाला अगदी योग्य असे शांत, प्रसन्न वातावरण आहे. समोर ॐ कोरलेली शिळा आहे. प्रकाश मंद आहे आणि येथे गालिचावर मांडी घालून कोणालाही ध्यान करीत बसता येते. ध्यानमंडपाबाहेर पुस्तकविक्रीचे केन्द्र आहे. स्वामी विवेकानंद व रामकृष्ण परमहंस यांच्याविषयी आणि त्यांनी लिहिलेले ग्रंथ येथे विक्रीसाठी ठेवलेले आहेत. त्या बाहेरील पटांगणात, सूर्य कोणत्या महिन्यात कोठे उगवतो हे अर्धगोलाकार काढून त्यावर बाणाच्या खुणेने दाखवले आहे. खडकावरील मोकळ्या जागेत सागरावरून येणारा थंड वारा एखाद्या शिडात भरावा तसा आपल्या अंगी उत्साह भरीत असतो. सकाळी येथून सूर्योदय पाहणे हा एक अत्यंत चित्तथरारक अनुभव आहे. त्याआधी त्याच संध्याकाळी येऊन सूर्यास्त पाहायचा असे मी ठरवले. जास्तीत जास्त वेळ या उदात्त, उत्कृष्ट स्मारकावर घालवून ' फेरी ' बंद होण्याची सूचना मिळाल्यानंतरच मी तेथून निघालो.

क्लोकरूममधून सामान घेऊन निघालो. विवेकानंदपुरमची स्वतंत्र व मोफत बस होती. ती सुटायला अर्धा तास वेळ होता. मला वाटले बसमधून अनेक प्रवासी विवेकानंदपुरमला पोचतील व त्यामुळे मला कदाचित जागा मिळणार नाही. म्हणून मी पाच रुपये देऊन टॅक्सी केली आणि विवेकानंदपुरम् या वसाहतीत आलो.

विवेकानंदपुरम्मधील आश्रमाच्या इमारती अतिशय स्वच्छ आणि रोज फक्त दहा रु. भाड्यात मिळतात. आजुबाजूला झाडे, हिरवळ असे छान वातावरण आहे. वारा मनमोकळा आहे. मी गेलो तेव्हा हवामान तर उत्तमच होते पहाटेपासून आश्रमाचे कॅन्टीन चालू होते, तेथे शाकाहारी खाद्यपदार्थ आणि जेवण माफक दरात, उत्तम मिळते. हे ठिकाण मला इतके आवडले की मी इथे दोन दिवस राहिलो. अशा उदात्त ठिकाणी एखाद्या नव्या पुस्तकाच्या लेखनाला प्रारंभ करावा असे वाटले आणि याच विवेकानंदपुरात मी आत्मचरित्र लिहायला सुरुवात केली. येत्या तीन वर्षात त्याचे लेखन करायचे आणि आत्मचरित्राची सांगताही तीन वर्षांनी याच ठिकाणी करायची असे मी ठरविले.

तेथील ग्रंथालयात गेलो. तेथे पेडसे नावाचे सत्तरीचे गृहस्थ ग्रंथपाल म्हणून काम करीत आहेत. त्यांनी मला ग्रंथालय दाखवले आणि केन्द्राविषयी माहितीही दिली. ते म्हणाले की, ' मानवतेची सेवा ' हे ब्रीद घेतलेल्या आजन्म सेवकांना

येथे धार्मिक शिक्षण देण्याची सोय आहे त्यांच्यासाठी वेगळे होस्टेलही आहे. सहा महिने ते तीन वर्षेपर्यंत हे धार्मिक शिक्षण दिले जाते. सर्व धर्मांच्या व सर्व पंथांच्या, सर्व देशांच्या लोकांची या सेवकांनी सेवा करावी अशी अपेक्षा असते गरिबांना मोफत वैद्यकीय साहाय्य देणे, शेतकऱ्यांना शेतीत मदत करणे, गरजू गावांना विहिरी खणून देणे, धार्मिक प्रवचने देणे, योगविद्या शिकविणे अशी कार्ये हे स्वयंसेवक करतात. विवेकानंदपुरम्‌मध्ये तात्पुरते राहण्यास जे प्रवासी येतात त्याच्यासाठीसुद्धा भजने, ध्यान, धार्मिक चित्रपट वगैरेंची सोय करण्यात आली आहे. स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील ठळक प्रसंगांवर आधारलेल्या चित्रांचे एक सुंदर प्रदर्शनही आश्रमाच्या प्रवेशद्वाराजवळ आहे. येथे मला काही मराठी भाषिक लोकही भेटले. पूर्वी मी मुंबईला मालाड येथे राहात असे. तेथील देशपांडे नावाचे शिक्षक आपल्या कुटुंबियांबरोबर आले होते तेही भेटले. मी दुपारी आश्रमात जेवलो, थोडी विश्रांती घेतली आणि साडे चारच्या सुमाराला कन्या-कुमारी देवालयाकडे आश्रमाच्या बसमधून निघालो.

जेथे तीन सागर मिळतात, त्या ठिकाणी भारताच्या अगदी दक्षिणेच्या टोकाला, कन्याकुमारीचे मनोहर देवालय आहे. त्याला भव्य आणि रम्य अशी पार्श्वभूमी आहे. भारताच्या या टोकाला केप कामोरिन असेही म्हणतात. कन्या-कुमारीच्या देवालयाकडे जाण्यापूर्वी इतर तीर्थस्थानाप्रमाणे येथेही देवीचे पूजेचे साहित्य, माळा, मणी, देवीचे फोटो, हस्तकला व्यवसायाच्या लहान वस्तूंची दुकाने आहेत. मंदिराभोवती तट असून तो बाहेरून लाल व पिवळसर उभ्या पट्ट्यांनी रंगविला आहे कन्याकुमारीच्या किनाऱ्यावरील वाळू विविध रंगांची असून त्यापैकी काही वाळू काचेच्या बाटल्यात भरून विक्रीसाठी ठेवलेलीही आढळली.

या मंदिराची कथाही हृदयंगम आहे. ज्या भरत राजावरून आपल्या देशाला भारत हे नाव पडले. त्या भरताला आठ मुलगे व एक मुलगी होती. तीच ही कन्याकुमारी. त्या काळच्या प्रथेप्रमाणे भरताने देशाची वाटणी प्रथम पुत्रांना करून दिली आणि उरलेले अखेरचे टोक कन्येच्या वाट्याला आले. ही कन्या महा पराक्रमी होती आणि ती पार्वतीचाच एक अवतार होती.

बाणासुर नावाचा एक राक्षस दक्षिण भारतात अनाचार माजवीत होता. त्याला पुरुषांपासून अभय असल्याने देव किंवा राजे त्याला मारू शकत नव्हते. म्हणून विष्णूने सुचविल्याप्रमाणे कन्याकुमारीच्या हस्ते त्याचा वध करण्याचे ठरले. तिला प्रसन्न करण्यासाठी यज्ञ केला, तेव्हा ती अत्यंत लावण्यवती देवी प्रगट झाली. तिने या दक्षिण टोकावर बसून तपश्चर्या करण्यास सुरवात केली. या तपाने मिळालेल्या पुण्याईवर ती बाणासुराचा वध करणार होती. पण मध्येच एक अडचण आली. कन्याकुमारीच्या लावण्यावर शंकर प्रसन्न झाले. तिच्याशी विवाह करण्याची त्यांची मनीषा होती, पण नारदादी देवांना भीती पडली की कन्याकुमारीने विवाह

केला तर तपश्चर्येने मिळालेले तेज जाईल व मग बाणासुराचा वध कोणीच करू शकणार नाही.

शंकर व पार्वतीचा विवाह मध्यरात्री ठरला होता. त्यासाठी शंकर कन्याकुमारीकडे आले. ते जवळच्या शुचिंद्रम् येथे विश्रांतीसाठी थांबले असता नारदांनी कोंबड्याचे रूप घेतले व आरवणे सुरू केले. तेव्हा शंकरांना वाटले की पहाट झाली आणि लग्नाचा मुहूर्त टळला. म्हणून ते स्थाणुलिंगाच्या रूपाने शुचिंद्रम् येथेच राहिले. इकडे कन्यांकुमारीच्या अद्वितीय सौंदर्याला भाळून बाणासुराने तिला मागणी घातली, पण तिने त्याला युद्धाचे आव्हान दिले व आपल्याला जिंकणाऱ्याशीच आपण लग्न करू, असे सांगितले. दोघांत घनघोर युद्ध होऊन बाणासुर मारला गेला. त्यानंतर कन्याकुमारी विवाहासाठी शंकर येतील, अशी प्रतीक्षा करीत राहिली. तीच या मंदिरातील कन्याकुमारी. तिच्या विवाहासाठी अक्षता विविध रंगांनी रंगवल्या होत्या, त्याच आता रंगीबेरंगी वाळूच्या रूपाने येथे सापडतात, अशी ही कथा आहे.

कन्याकुमारीचे मंदिर दक्षिणेकडील बृहदीश्वर किंवा मीनाक्षी मंदिरांच्या तुलनेने बरेच लहान आहे. फार तर दुमजली इमारतीइतकी त्याच्या शिखराची उंची असेल. या मंदिराचे पूर्वेकडील द्वार बहुतेक दिवस बंद असते. वर्षातून पाच वेळा ते उघडण्यात येते. सागरातून येणाऱ्या खलाशांचे डोळे देवीच्या अंगावरील दागिन्यांच्या तेजाने दिपून अपघात होऊ नये, म्हणून हे दार बंद असते, असे एका गाईडने सांगितले. देवीची मूर्ती अत्यंत मोहक आहे. तिच्या चेहऱ्यावर अनघतेची आणि प्रतिक्षेची भावना उत्तम प्रकारे प्रतीत झाली आहे. पश्चिमेकडील देवालयातील ही सर्वांत देखणी मूर्ती आहे. अलंकार आणि फुले यांनी सुशोभित केल्यावर तिचे सौंदर्य अधिकच खुलते.

या मंदिराजवळच आद्य शंकराचार्यांचे मंदिर आहे. तसेच गांधीमंडप नावाच्या प्रशस्त, कलात्मक इमारतीत म. गांधींची रक्षा ठेवण्यात आली आहे. १५ जानेवारी १९३७ रोजी म. गांधी या ठिकाणी आले होते. त्यांना ही जागा एवढी आवडली की, ' येथे नेहमी राहता आले असते तर किती बरे झाले असते, ' असे ते म्हणाले होते. त्याच ठिकाणी आता त्यांचा स्मृतिमंडप उभारण्यात आला आहे.

कन्याकुमारीच्या पायथ्याशी मी संध्याकाळपर्यंत थांबलो. तीन सागरांच्या मीलनावर झालेला अत्यंत सुंदर सूर्यास्त पाहिला. हे दृश्य अतिशय स्फूर्तिदायक होते. जीवनातील सर्वश्रेष्ठ गोष्टी निसर्ग आपल्यावर अगदी मोफत उधळतो. मात्र त्या पाहण्यासाठी निवांतपणा आणि कल्पकता हवी अशा आशयाचे एक वचन त्यावेळी मला आठवले. रात्री विवेकानंदपुरम्‌मध्ये परतलो. योगायोगाने मुंबईचे

काही परिचित भेटले. त्यांच्याबरोबर गप्पा मारून आश्रमाच्या उपाहारगृहातील उत्तम शाकाहारी भोजन घेतले.

वास्तविक मी एका दिवसात परत निघायचे ठरविले होते. पण कन्याकुमारी हे गाव आणि विवेकानंदपुरम् ही वसाहत मला इतकी आवडली की मी माझा मुक्काम वाढवला. अशा उदात्त आणि नितांत सुंदर जागेत आपण काही लेखन करावे असे वाटले. सहसा मी प्रवासात काही लिहीत नाही. अगदी आवश्यकच असेल तर काही नोंदी करतो. पण या जागेत नवे पुस्तक लिहिण्यास प्रारंभ करावा असे वाटले. मी थोडा विचार करून शेजारच्या दुकानातूनच कागद आणले आणि 'आत्मचरित्र' लिहायला सुरुवात केली. १९८३ मध्ये येथे परत येऊन त्या पुस्तकाची अखेरही येथेच करावी असेही ठरवले. दरम्यानच्या तीन वर्षांत सुमारे तीनशे पृष्ठांचे आत्मचरित्र पूर्ण करण्याचा संकल्प आहे.

कन्याकुमारीला तीन दिवस राहिलो. त्यांपैकी एक दिवस शुचिंद्रम् व नागरकोल येथे गेलो. रेल्वेने येतानाच शुचिंद्रम् हे स्टेशन लागले होते व त्याचे नाव मला गंमतीचे वाटले होते. असे नाव का पडले असेल हा विचारही मनात आला होता. त्या शंकेचे निरसन त्या गावी प्रत्यक्ष गेल्यावर झाले. बसस्टँडवरच एक गाईड उभा होता. गाव लहान होते. प्रवासीही फारसे येत नसावेत. शुचिंद्रम् या नावामागील इतिहास सांगताना आमचा गाईड म्हणाला, 'इंद्राने अहिल्येच्या बाबतीत जे दुर्वर्तन केले त्याबद्दल त्याला शाप मिळाला. त्या शापातून मुक्ती मिळावी म्हणून इंद्राने शिवाची आराधना केली. तेव्हा शिवाने या ठिकाणी इंद्राला शुद्ध केले म्हणून या जागेचे नाव शुचिंद्रम्. शंकराने अशीही अट घातली की इंद्राने दररोज मध्यरात्री शुचिंद्रम् येथील शिवमंदिरात येऊन शिवाची पूजा केली पाहिजे. ती अट इंद्र आजही पाळतो आणि अजून इंद्र गुप्तपणे येऊन येथे शिवाची पूजा करतो.'

गाईड पुढे म्हणाला, 'या देवाच्या पुजाऱ्याने रात्री जर इंद्राला पाहिले तर त्याने बाहेर त्याची वाच्यता करता कामा नये असा देवस्थानचा नियम आहे!'

शुचिंद्रम् हे लहानसे गाव कन्याकुमारीपासून दहा किलोमीटर्सवर आहे. नागरकोलला जाणाऱ्या बसेस इथे थांबतात. नागरकोल हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. शुचिंद्रम् येथील शिव हा त्रिमूर्तीच्या रूपात आहे. मंदिराजवळ सुंदर जलाशय आहे. स्थाणुमलय स्वामींचे मंदिर म्हणून हे प्रसिद्ध आहे. त्याचे बांधकाम बाराव्या शतकात सुरू झाले आणि पांड्य, चेद व चोल घराण्यांतील राजांनी त्यात भर घालून आज दिसणारे मंदिर पूर्ण केले.

मंदिराचे गोपूर १३५ फूट उंच आहे. पुराणातील प्रसंगांची शिल्पे गोपुरावर कोरली आहेत. नक्षीच्या चोवीस फूट उंचीच्या दरवाजातून प्रवेश केल्यावर प्रथमच नृत्यमंडप लागतो. पुढच्या वसंतमंडपात नवग्रह, १२ राशी व २७ नक्षत्रे आहेत.

शिवाय राम, सीता, सरस्वती, कृष्ण इत्यादी देवदेवतांच्याही सुबक मूर्ती आहेत, अलंकारमंडपात संगीत स्तंभ आहेत. त्यावर हाताने प्रहार केल्यास सा, रे, ग, म. प, ध, नी हे सात स्वर ऐकू येतात. या भागातील दगडी साखळ्यांचे शिल्प प्रेक्षणीय आहे. याच मंदिराच्या आवारातील रामाच्या मूर्तीसमोर १८ फूट उंचीची उभी हनुमानाची मूर्ती आहे. हा भारतातील सर्वांत उंच हनुमान आहे. पुढच्या मंडपात उत्कृष्ट नक्षीकाम केलेले बत्तीस स्तंभ आहेत. ब्रह्मा, विष्णू व महेश अहिल्येची सत्त्वपरीक्षा घेण्यासाठी येथे आले अशी कथा सांगण्यात येते.

या प्रशस्त देवालयात शैव आणि वैष्णव अशा दोन्ही पंथांच्या मूर्ती आहेत. द्राविडी शिल्पकलेचे काही उत्तम नमुने या मंदिरात दिसतात. मात्र गाव लहान असल्याने व जवळच कन्याकुमारीचे मोठे देवस्थान असल्याने इथे फार यात्रेकरू येत नाहीत. त्यामुळे देवालयाची निगा कन्याकुमारीच्या देवळासारखी उत्तम ठेवता येत नाही हे सहजच लक्षात येते. या देवालयाची जत्रा दरसाल भरते.

स्थाणुमलयचा विवाह दरवर्षी तमिळ मासी महिन्यात मोठ्या सोहळ्याने साजरा केला जातो. या देवालयात आठव्या व नवव्या शतकांतील अनेक शिलालेख आहेत. ते वेत्तेलिथू लिपीत असून त्यांत पंड्या, चोला वगैरे राजांची वचने कोरण्यात आली आहेत. शिवमूर्तीपुढे प्रचंड नंदी व एक प्राचीन वृक्ष आहे.

या देवालयात मारुतीला एवढे महत्त्वाचे स्थान का असावे असा कोणासही प्रश्न पडतो. कारण मारुती हा रामाचा सेवक. त्याची मूर्ती रामाच्या मूर्तीपेक्षा लहान असते. पण शुचिंद्रम्‌ला मारुती मोठा आहे. त्याबद्दल विचारता आमचा गाईड म्हणाला, ' राम–रावण युद्धात जेव्हा लक्ष्मण मूर्च्छित होऊन पडला तेव्हा मारुतीला संजीवनी आणण्यास पाठवले. पण त्याला त्या डोंगरावरील असंख्य वनस्पतींत संजीवनी कोणती हे कळेना. तेव्हा मारुतीने सबंध पर्वतच उचलून आणला, हिमालयाजवळून हा पर्वत लंकेला नेताना मारुती या ठिकाणी काही वेळ थांबला होता. म्हणून इथे मारुतीची एवढी मोठी मूर्ती आहे. ' याच देवळात मारुतीची एक अत्यंत लहान मूर्ती आहे. मारुतीला लहान मोठे कोणतेही रूप घेता येत होते, असा रामायणात उल्लेख आहे. शुचिंद्रम् जवळच्या महेंद्र डोंगरास मारुतीपर्वत असेही नाव आहे.

शुचिंद्रमहून मी बसने नागरकोला या गावी गेलो, हे गाव खूपच मोठे आहे. इथून अनेक दिशांनी बसेस जात असल्याने पुणे शहराच्या बसस्टँडसारखा इथला बस स्टँड मोठा आहे. गावात अनेक उद्योगधंद्यांच्या कचेऱ्या, बँका, हॉटेले, दुकाने आहेत. गोव्यातील पणजीची या शहराशी तुलना करता येईल. हे शहर नागमंदिराबद्दल प्रसिद्ध असून त्यावरूनच त्याला नागरकोल हे नाव पडले आहे. बस स्टँडपासून एक किलोमीटर अंतरावर हे नागमंदिर आहे. मंदिराभोवती मातीची भिंत आहे. मंदिर फारसे भव्य नाही, पण आवार खूप मोठे आहे आणि त्यात नाग-

चाफ्याची झाडे आहेत. मंदिरात नागाची मोठी प्रतिमा आहे. दर रविवारी येथे भक्तांची बरीच गर्दी होते. हे मंदिर पूर्वी जैन मंदिर होते. याचा पुरावा म्हणजे मंदिराच्या स्तंभावर महावीर आणि पार्श्वनाथ यांच्या मूर्ती आहेत. शहरात या मंदिराखेरीज पाहण्यासारखे विशेष काही नाही. मात्र जाळीवर सुंदर नक्षीकाम केलेले रुमाल व इतर कपडे इथे भरपूर मिळतात.

नागरकोलमध्ये दोन–तीन तास फिरून मी पुन्हा कन्याकुमारीला आलो. संध्याकाळी विवेकानंदपुरम्च्या नजीकच्या किनाऱ्यावरून नितांत रमणीय सूर्यास्त पाहिला. दुसऱ्या दिवशी पुन्हा विवेकानंद स्मारकाकडे गेलो. आता मला रामेश्वरला जायचे होते. बसची चौकशी केली. तिथून सोळा रुपये तिकीट होते. संध्याकाळी पाचची बस रामेश्वरजवळच्या मंडपम्ला रात्री दीड–दोन वाजता जात होती. तिथून चाळीस मिनिटांचा रेल्वेप्रवास होता. मी आश्रमात जाऊन जेवण केले आणि विश्रांती घेऊन चार वाजता निघालो. बस स्टँडवर एकाच्या हातात मराठी दैनिक दिसले. बरेच दिवस महाराष्ट्रातील वार्ता कळली नव्हती. मोठ्या उत्सुकतेने ते वाचले. चार जणांचा एक गट सांगलीजवळच्या पेठ गावाहून दक्षिण भारत पाहण्यास आला होता, त्यांच्याजवळ हे मराठी दैनिक मिळाले. ते लोकही रामेश्वरला जात होते. आम्ही पाचच्या बसने बरोबरच निघालो.

बसमध्ये गर्दी नव्हती. वाटेतही फारशी वाहने नव्हती. अनेकदा बस समुद्र-काठच्या मनोहर रस्त्यावरून जात असे. रात्री साडेअकरा वाजता कुठे तरी जेवणासाठी बस थांबविण्यात आली. त्या अवेळीही उपाहारगृहे उघडी होती. परोठा, पुलावा, आम्लेट, भाजीपुरी वगैरे पदार्थ गिऱ्हाईकाने मागितल्यावर त्याच्यासमोर अगदी गरम गरम लगेच तयार करून देण्यात येत होते. हे सर्वच पदार्थ अतिशय रुचकर आणि स्वस्तही होते. साधारण दीड रुपयांत पोटभर जेवण मिळत होते. रामेश्वर व कन्याकुमारी या मार्गावरून जा–ये करणाऱ्या बसेसचा हा नेहमीचा थांबा असावा. कारण त्या अपरात्रीही दहा–बारा बसेस उतारूंच्या जेवणासाठी थांबल्या होत्या.

पुढच्या प्रवासात थंडी चांगलीच वाढली. रात्री दीडच्या सुमारास मंडप-मला पोचलो, तेव्हा तर थंडीचा कडाकाच होता. दोन तास कुडकुडत बसावे लागले. गाडी नसल्याने उपाहारगृह सुरू झाले नव्हते. त्यामुळे चहा, कॉफी घेऊन थंडी कमी करण्याचा प्रश्नच नव्हता. मंडपम् ते रामेश्वर हे अंतर तसे फार नाही. पण ते समुद्रातून पार करावे लागते. समुद्रात सिमेंटचे प्रचंड खांब टाकून एक मोठा पूल बांधण्याचे काम चालू आहे मंडपम् ते रामेश्वर रेल्वेगाडी एका प्रचंड लोखंडी पुलावरून जाते. बराच वेळ थंडीला तोंड दिल्यावर तिकिटांची खिडकी उघडली आणि स्टेशनवर हालचाल, गडबड सुरू झाली. आडवे झालेले प्रवासी उठून सामानसुमान आवरून तिकिटांसाठी रांगा धरू लागले. आम्ही आधी

कँटीनकडे गेलो. ते नुकतेच उघडले होते आणि कॉफी उकळत होती. ती कधी एकदा तयार होते इकडे लक्ष ठेवून आठ–दहा प्रवासी स्टोव्हभोवती कोंडाळे करून उभे होते. कॉफीची वाट पाहताना स्टोव्हची ऊबही मिळावी हा त्यांचा रास्त हेतू होता. अखेर एकदा ती कॉफी तयार झाली आणि दोन–दोन कप गरम कॉफी घेतल्यावर जरा तरतरी आली. मग मी तिकिटांच्या खिडकीकडे गेलो आणि मंडपम्‌चे तिकीट घेतले. पंचाहत्तर पैसे तिकीट होते. त्यावरून अंतर खूपच कमी असले पाहिजे हे सहज लक्षात येत होते. थोड्याच वेळात गाडी आली. तिच्यात भरपूर जागा होती. बराच प्रवास समुद्रातून होता. त्यावेळी सुदैवाने आकाशात चंद्र होता आणि भोवतीचे दृश्य अत्यंत विलोभनीय दिसत होते. बाजूंनी फेसाळणारा समुद्र, अधून-मधून डोकावणारे खडक, क्षितिजापर्यंत पसरलेले पाणी, निरभ्र आकाशात चम-चमणारा जवळ जवळ पूर्णाकृती चंद्र, खाली पाण्यावर पसरलेले त्याचे चंदेरी प्रतिबिंब सारेच दृश्य अद्‌भुत होते. त्याची आठवण सतत होत राहील.

पहाटे चारच्या सुमारास रामेश्वर आले. ज्यांनी पूर्वी या मार्गावर प्रवास केलेला असतो, असे माहीतगार प्रवासी गाडीच्या पुढच्या डब्यात बसतात हे मला खूप नंतर कळले. कारण असे की रामेश्वर गाव तिथून दीडदोन मैल आत आहे. तिथं नेणारी एकुलती एक बस लगेच भरते. हजीर तो वजीर या न्यायाने पुढच्या डब्यातून आलेले प्रवासी बस लगेच पकडू शकतात आणि पन्नास पैशांत गावात जातात. उरलेल्यांना तीन–चार रुपये देऊन सायकल रिक्षा किंवा टांगा करावा लागतो. माझा या रस्त्यावरचा पहिलाच प्रवास असल्याने मी समोर दिसेल त्या डब्यात बसलो होतो. रामेश्वर स्टेशनबाहेर आलो तर बस सुटली होती आणि सर्व सायकलरिक्षाही गेल्या होत्या. शेवटी पाच रुपयांना टांगा ठरवला. त्यात मी, एक उतारू, पुढे टांगवाला आणि त्याच्या शेजारी त्याचा मित्र. टांगा चालू लागला आणि त्याचवेळी पाऊस सुरू झाला. मी मद्रासला छत्री घेतली होती. ती उघडली. पण वारा आणि चालणारा टांगा यामुळे ती बिचारी छत्री माझे संरक्षण करण्या-साठी पुरी पडली नाही.

टांगा अगदी हळू चालत होता पण एका गल्लीच्या वळणावर घोड्याचा पाय घसरला आणि तो पडला. टांगा कलंडला आणि मी उंच गेलो. टांगेवाला उतरला. त्याने मला न घाबरण्याची सूचना दिली आणि घोड्याला धरून उभे केले. शेवटी कसली ती धर्मशाळा आली. पण तिथे सर्व खोल्या भरल्या होत्या. रामेश्वरला आधी पोहचणं का महत्त्वाचं ते आता माझ्या चांगलंच लक्षात आलं. टांगेवाला म्हणाला, ' येथपर्यन्त पाच रुपये ठरले होते. आता लॉज शोधण्यासाठी परत जायचं तर दोन रुपये पडतील. ' मी ते कबूल केलं. पहाटेचा वारा, पाऊस आणि ते अपरिचित गाव सारं बंद. मी सामानसुमान घेऊन एकटा हॉटेलचा शोध

घ्यायला कुठे जाणार ? शेवटी त्यातल्या त्यात बरी अशी एक सेल्फ कंटेन्ड खोली (दररोज सहा रुपये दराने) मी एका लॉजमध्ये घेतली.

आता विश्रांती घ्यावी म्हणून मी झोपायला जाणार, तोच मघापासून टांगेवाल्याजवळ बसलेला त्याचा मित्र म्हणाला, ' मी सरकारमान्य गाईड आहे. हे माझे आयडेंटिटी कार्ड पाहा. मी तुम्हाला मंदिर दाखवतो. आमचा सरकारमान्य दर पंधरा रुपये आहे. ' मी म्हटले ' अरे बाबा, हे समोर तर देऊळ आहे. मला रात्रभर झोप नाही. मी आधी विश्रांती घेणार आणि मग मंदिर पहायला जाईन. ' त्यावर तो कुरकुरत म्हणाला, ' तुम्हाला गाईड हवा असेल म्हणून मी तुमच्या-बरोबर आलो. ' पण मी त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यायला साफ नकार दिला. आणि मला अगदी हवीहवीशी होती ती झोप घेण्याच्या उद्योगाला लागलो.

* *

## ७ : प्राचीन तीर्थक्षेत्र – रामेश्वर, मीनाक्षी मंदिर आणि बालाजी

मला रामेश्वरबद्दल फार पूर्वीपासून कुतूहल होते. कारण हे तीर्थक्षेत्र फार प्राचीन आहे. त्याची पार्श्वभूमीही वेधक आहे. रामायणाच्या कथेनुसार रावणाचा वध केल्यानंतर राम अयोध्येला परतत असताना काही ऋषींनी त्याला सांगितले, ‘ रावण हा दुष्ट असला तरी ब्राह्मण होता. त्याच्या हत्येचे म्हणजे ब्रह्महत्येचे पाप तुझ्या हातून घडले असल्याने त्याचे प्रायश्चित्त तुला घेतले पाहिजे. ’ हे प्रायश्चित्त म्हणजे रामेश्वरला शिवलिंगाची पूजा करून शंकराची प्रार्थना करणे. त्यासाठी रामाने कैलास पर्वतावरून शिवलिंग आणण्याची आज्ञा हनुमानाला केली. पण त्याला ते घेऊन यण्यास उशीर झाला म्हणून सीतेने समुद्र किनाऱ्यावरील वाळूचेच शिवलिंग केले आणि रामाने त्याची पूजा केली. इतक्यात मारुती शिवलिंग घेऊन आला. आपण येण्यापूर्वीच सीतेने वाळूचे शिवलिंग केल्याचे पाहून मारुतीला राग आला आणि त्याने आपल्या शेपटीने ते वाळूचे शिवलिंग उपटून काढण्याचा निकराचा प्रयत्न केला. पण सीतेच्या पुण्याईमुळे त्याला ते उपटता आले नाही. या दोन्ही शिवलिंगांची पूजा व्हावी व त्यांतही मारुतीने आणलेल्या शिवलिंगाची आधी पूजा व्हावी अशी रामाने आज्ञा दिली. या ठिकाणी रामाने शिवलिंगाची म्हणजे ईश्वराची पूजा केली म्हणून या जागेचे नाव रामेश्वर पडले. याच अर्थाने त्याला रामनाथपुरम् असेही म्हणतात.

हनुमानाने आणलेल्या शिवलिंगाला विश्वनाथ म्हणतात. रामेश्वरचा किनारा अतिशय मनोरम आहे. रामेश्वर हे एक लहानसे, शंखाच्या आकाराचे बेट आहे, अकरा मैल लांब आणि सात मैल रुंद असलेल्या या बेटावर पाणी आणि झाडे यांची विपुलता असल्याने तीर्थक्षेत्राबरोबरच निसर्गसौंदर्याच्या दृष्टीनेही त्याला



सागरातून घडणारे रामेश्वराचे दर्शन. याच ठिकाणी स्नान केल्यावर
भक्त वाळूचे शिवलिंग करतात.

महत्त्व आहे. मंडपम् ते रामेश्वर हा पूल बोटीसाठी दुभंगून वर उचलला जातो तेव्हा लंडनच्या पुलाची आठवण येते.

वीस वर्षांपूर्वी मी बद्रीनाथ या उत्तरेच्या तीर्थक्षेत्री गेलो होतो. आता कन्याकुमारी–रामेश्वर या अगदी दक्षिणेच्या टोकाला आलो. हॉटेलमध्ये दोन तास विश्रांती घेतली आणि दिवस उगवण्याच्या सुमाराला बाहेर पडलो. गाव तसे लहानच. घरे जुनी, धर्मक्षेत्रावर सर्वत्र दिसणारी गलिच्छपणाची झाक. कोपऱ्या-कोपऱ्यावर अधिकृत सरकारी गाईड्स् भेटत. कार्ड पुढे करून मंदिर दाखवतो म्हणत. पंधरा रुपयांपासून कमी करीत करीत पाच रुपयांपर्यंत येत होते. एक गाईड तर म्हणाला, 'मी सारे मंदिर दाखवतो. तुमच्या मर्जीला येईल ते द्या.' त्याला नाही म्हणणे कठीण गेले म्हणून 'बरं' म्हणालो.

गाईड म्हणाला, 'थांबा, मी आत्ता येतो.' त्यानं समोरच्या दुकानातून लांब दोरीला बांधलेली एक बादली आणली. ती कशासाठी असे मी विचारले तेव्हा त्याने सांगितले, 'तुम्हाला तीर्थक्षेत्रात स्नान करावे लागेल. त्या कुंडातील पाणी काढण्यासाठी ही बादली आहे. त्यापूर्वी आधी समुद्रस्नान करा.' जवळच किनारा होता. मी समुद्रावर गेलो. स्नान केले आणि ओल्या अंगाने गाईडबरोबर रामेश्वरच्या देवालयात आलो. प्रवेश करण्यापूर्वी स्नानाचे तिकीट घ्यावे लागले आधी मला वाटले, होते की एका कुंडात स्नान करायचे. प्रत्यक्षात पाहतो तो गाईडने सांगितले, 'एकवीस कुंडांच्या पाण्यात स्नान करायचे आहे.' त्यापूर्वी मी समुद्राच्या पाण्यात एकदा केलेच होते. म्हणजे एका ओळीने बावीस वेळा आंघोळ करायची हे फारच झाले. म्हणून इतर कुंडांतल्या पाण्याचा नुसता शिडकावा अंगावर घेऊन आम्ही देवदर्शनाला गेलो. पण गाईडला देवालयाची काहीही पार्श्वभूमी, इतिहास किंवा इतर माहिती नव्हती. तो एकेका मूर्तीजवळ जाऊन म्हणे, 'ये राम मंदिर है, इधर दर्शन करो,' 'ये शिवलिंग है, इधर दर्शन करो', 'ये सीतामाई है, इधर दर्शन करो' शेवटी सर्व दर्शने झाल्यावर पुन्हा देवालयात स्वत.च्या आनंदासाठी यायचे असे ठरवून मी दर्शनमात्रे मनःकामनापूर्ती केली. नंतर सवडीने हे विशाल मंदिर पाहायचे असे मी ठरवले.

दुपारच्या जरा निवांत वेळी मी पुन्हा या मंदिराला भेट दिली. उत्तरेला काशी आणि दक्षिणेला रामेश्वर अशी हिंदूंची दोन अत्यंत पवित्र अशी तीर्थक्षेत्रे आहेत. काशीचे गंगाजळ येथे रामेश्वरला आणून येथील विश्वेश्वराची पूजा करणे, रामेश्वरची वाळू काशीला गंगेत सोडणे ही भक्तांची एक मोठीच महत्त्वाकांक्षा असते.

रामेश्वरचे मंदिर हे दक्षिण भारतातील एक विशाल व भव्य मंदिर आहे. त्याचे गोपूर सव्वाशे फूट उंच आहे. मंदिराची पूर्व-पश्चिम लांबी ४६५ फूट असून दक्षिण-उत्तर लांबी ६५५ फूट आहे. पश्चिमेच्या बाजूचे गोपूर ८० फूट उंच आहे.

प्रथम लागतो तो सेतुपतीमंडप. रामनाथपुरमचे राजे सेतुपती यांनी हा मंडप बांधला आहे. तो मात्र आधुनिक काळातला असून त्यासाठी तीन लक्ष रुपये खर्च आला. मंदिरात एक हत्ती आहे. तो दगडी हत्ती नसून खरोखरीचा आहे. त्यानंतरच्या नंदीमंडपात सतरा फूट उंच व बावीस फूट लांबीचा प्रचंड नंदी आहे. तो वाळू व चुन्याचा आहे आणि इतर नंदींपेक्षा तो वेगळा आहे. त्याची जीभ बाहेर आली आहे. 'हा निर्जीव नंदी गवत खाईल काय ?' अशी कुचेष्टा एकदा एकाने केली, तेव्हा या नंदीने जीभ बाहेर काढून गवत खाल्ले म्हणून त्याची जीभ बाहेर आहे अशी आख्यायिका सांगतात. नंदीच्या एका बाजूला गणपतीची व दुसऱ्या बाजूला कार्तिकेयाची मूर्ती आहे दक्षिणेत कार्तिकेयाचा मान मोठा असल्याचा हा पुनःप्रत्यय आला.

कलेच्या दृष्टीने पाहायचे तर रामेश्वरच्या देवालयाचा प्रदक्षिणा मार्ग हा अत्यंत प्रेक्षणीय आणि बराच मोठा, चार हजार फुटांचा आहे. त्यातील स्तंभ अतिशय उत्तम कलेचे नमुने आहेत. १७४० नंतरच्या तीन तपांत हे खांब तयार केले गेले. त्यांची संख्या १२१२ आहे. प्रचंड एकसंध शिळा एवढ्या मोठ्या प्रमाणावर समुद्रकाठी आणून त्यावर उत्कृष्ट कलेचे नमुने खोदण्याचे हे काम त्या वेळच्या कलावंतांनी केले. ते अद्‌भुतच म्हटले पाहिजे. ही शिल्पकला द्राविडी पद्धतीची असून विश्वनाथ नायकपासून सेतुपतीपर्यंतच्या राजांनी दोन अडीच शतकात या मंदिराचे भव्य काम पूर्ण केले आहे. मंदिराच्या प्रचंड दरवाजासाठी चाळीस फूट लांब व बावीस फूट रुंद अशी अखंड शिळा श्रीलंकेहून आणण्यात आली. अनेक ठिकाणी छतासाठीही अशाच मोठ्या शिळा वापरण्यात आल्या आहेत. मंदिराच्या आवारात एकवीस आड आहेत. त्यांतील कोटीतीर्थ व सर्वतीर्थ यांना विशेष महत्त्व आहे. जेथे कोटीतीर्थ आहे, त्या ठिकाणी रामाने बाण मारून गंगा आणली असे सांगण्यात येते. मंदिराच्या गाभाऱ्याचा दरवाजा चांदीचा आहे. गाभाऱ्याच्या आत चांदीच्या चबुतऱ्यावर शिवलिंग आहे. तेच रामेश्वरचे मुख्य दैवत आणि ते रामाने स्थापन केल्याची आख्यायिका आहे. हनुमानाने आणलेले म्हणून सांगण्यात येते ते शिवलिंगही शेजारीच आहे. मंदिराचा गाभारा प्रसन्न असून त्यासमोर सुवर्णस्तंभ आहे.

स्वामी विवेकानंद यांनी १८९७ मध्ये या मंदिराला भेट दिली आणि भक्तांना उद्देशून मोठे स्फूर्तिदायक भाषण केले. त्या भाषणातील काही वचने मंदिरातील एका फलकावर लिहिली आहेत. २७ जानेवारी १८९७ रोजी केलेल्या या भाषणात विवेकानंदांनी म्हटले आहे, 'धर्माचे अधिष्ठान प्रेमात, शुद्धतेत आणि तळमळीत आहे. वरवरचे उपचार किंवा समारंभ म्हणजे धर्म नव्हे. मनाने आणि शरीराने जर माणूस शुद्ध नसेल तर मंदिरात येऊन शिवाची पूजा करणे व्यर्थ आहे. ज्याला ज्याला गरिबात, दुर्बलात आणि व्याधिग्रस्तात शिवाचे रूप दिसेल तोच खरी शिवपूजा करतो. खऱ्या भक्ताने जात, धर्म, पंथ याचा विचार न करता रंजलेल्या व गांजलेल्या लोकांची सेवा हीच परमेश्वराची पूजा मानावी. ज्यांना

फक्त मंदिरातच शिवाचे दर्शन घडते त्यांच्यापेक्षा दुःखी व पीडित लोकांत शिव पाहणारे भक्तच शिवाला अधिक प्रिय असतात.'

महाराष्ट्राचे आणि रामेश्वर–धनुष्कोटीचे फार पूर्वीपासून जिव्हाळ्याचे संबंध आहेत. रामदासस्वामी महाराष्ट्रातील अनेक मठांच्या स्थापनेनंतर तंजावरला आले. तिथे मठ स्थापून ते रामेश्वरला आले. इथून ते लंकेकडे गेले. अहिल्याबाईंनी या भागात धर्मशाळा बांधल्या. टेंबेस्वामी, चिदानंद स्वामीही इथे येऊन राहून गेले. आजही दोनशे मराठी भाषिक कुटुंबे रामेश्वरमध्ये आहेत. येथील बऱ्याच जुन्या वास्तू आता भग्नावस्थेत आहेत. १७०९ मध्ये या भागात एक प्रचंड वादळ झाले. त्याने बऱ्याच वास्तूंची हानी झाली. जुना सेतू आणि मंदिराचा बहुतेक भाग त्या वादळात पडून गेला. अलीकडे, दलाईलामा उत्तरेकडून, तिबेटहून परागंदा होऊन आले. तेही रामेश्वरला येऊन दर्शन घेऊन गेले होते. १९७८ मध्ये पुन्हा या भागात प्रचंड वादळ झाले. पंबनचा पूल या छोटया बेटाला भारताशी जोडणारा एकमेव आधार, तोच मोडून वाहून गेला. त्यामुळे हे बेट अलग पडले. अशा वेळी यात्रेकरू येत नाहीत, आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंची अतोनात टंचाई होऊन बेटावरच्या नागरिकांचे फार हाल होतात.

रामेश्वरच्या मंदिरात बराच वेळ थांबून व बारकाईने निरीक्षण करून मी पुन्हा समुद्रकिनाऱ्यावर गेलो. दक्षिणेतील मंदिरांच्या मानाने रामेश्वरच्या मंदिरात व रामेश्वर गावात स्वच्छता कमी प्रमाणावर आढळली. येथे मोठ्या प्रमाणावर यात्रेकरू येतात हे याचे महत्त्वाचे कारण आहे. गावात दोन-तीन ठिकाणी मांसाहाराची सोय असलेल्या खानावळी आहेत. उत्तरेत हृषिकेशसारख्या काही तीर्थक्षेत्रात मांसाहारास परवानगी नाही. पण इथे ती आहे, हे जरा खटकले. गाव जरी फारसे स्वच्छ नसले, तरी सागरकिनारा मात्र अत्यंत प्रसन्न आहे. यात्रेकरूंनी स्नान केल्यावर किनाऱ्यावर वाळूची केलेली अनेक शिवलिंगे दिसतात व थोड्या वेळाने लाटांच्या तडाख्याने विस्कटून पुनः त्यांची वाळू होते. उंच आणि गर्द नारळीची वने किनाऱ्याला छान शोभा देतात. समुद्रावरून येणारा वारा मन प्रसन्न करतो.

येताना एक पाटी दिसली. 'रामेश्वर महाराष्ट्र भवन' चालक होते. श्री. मधुकर व्ही. वर्वे. मला राहण्यासाठी जागा नको होती, पण इतक्या दूरच्या टोकाला महाराष्ट्र भवन जिद्दीने चालविणाऱ्यांना भेटावे म्हणून आत गेलो. एका बाकावर श्री. वर्वे पत्रे लिहीत बसले होते. त्यांना मी महाराष्ट्रातून आलो आहे. म्हणून सांगितले आणि त्यांना माहिती विचारली. ते म्हणाले, 'भारतात बारा ज्योतिर्लिंगे आहेत. त्यांपैकी आठ ज्योतिर्लिंगांचे पुजारी मराठी आहेत. आम्ही त्यांपैकीच एक आहोत, गुजरातेतील सोरटी सोमनाथचे पुजारी पूर्वी मराठी होते. पण आता गुजराती झाले आहेत. केदारनाथला जंगम (कर्नाटकी), बद्रिनाथला

नंबुद्री आणि बनारसला पंचगौड ब्राह्मण आहेत. रामेश्वरला सातशे वर्षे मराठी पुजारी आहेत. इथे पुजाऱ्यांची ६२ कुटुंबे आहेत. अकरा पुजारी प्रमुख असून, त्यांचे २८ मदतनीस आहेत. पूर्वी या पुजाऱ्यांचा तिकिटावर हक्क होता व दरमहा नाममात्र एक रुपाया पगार असे. तिकीट म्हणजे मंदिरात प्रवेश करण्याचे तिकीट, आता सरकारी देवस्थानकडे व्यवस्था असून, पुजाऱ्यांना ४००–१०-६५० रुपये अशी वेतनश्रेणी आहे. देवापुढे ठेवलेली दक्षिणा पुजारी समान वाटून घेतात.

'आमचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील पांडपडेल. तेथून आम्ही सांगलीस गेलो. गेली ३७ वर्षे रामेश्वरला पुजारी आहे. वर्षांतून ठराविक दिवस पूजेचे मिळतात. १९५४ पासून मी हे महाराष्ट्रभवन सुरू केले. येथे राहण्याची व्यवस्था होते. पण व्यापारी तत्त्वावर होत नाही. मी फार मोठा पसारा केलेला नाही. घरगुती पद्धतीने लोक राहतात. एका वेळी ३०-४० लोक राहू शकतात. पुण्या–मुंबईचे लोक प्रामुख्याने येतात. आतापर्यंत मुंबईचे अकरा हजार व पुण्याचे नऊ हजार लोक राहून गेले. त्यांच्यापैकी अनेकजण पुन्हा येतात. शेकडो लोकांशी माझा सतत पत्रव्यवहार होत असतो.'

रत्नागिरीसारख्या ठिकाणाहून इतक्या दूरवर जाऊन महाराष्ट्र भवन चालविणाऱ्या जिद्दी मराठी माणसाचे मला कौतुक वाटले. त्यांचा पत्ता : श्री. मधुकर वर्वे, रामेश्वर महाराष्ट्र भवन, सन्नाडी रस्ता, पो. रामेश्वर, रामनाड जिल्हा, तमिळनाडू असा आहे. त्यांच्याकडे टेलिफोनही आहे. (क्रमांक ३९).

रामेश्वरला मुक्काम करून दुसऱ्या दिवशीही मी संध्याकाळच्या गाडीने निघालो. आता मला मदुराईचे प्रसिद्ध मीनाक्षी मंदिर पाहायला जायचे होते. रामेश्वरला येताना मंडप रेल्वे स्टेशनच्या अगदी जवळ आमची बस थांबली होती. त्यावरून माझी समजूत झाली की मदुराईची बसही स्टेशनसमोरच मिळेल. पण मंडपमला गाडीतून बाहेर पाहू लागलो तर एकही बस दिसेना. मग चौकशी केल्यावर कळले की मंडपमला शेवटचा स्टॉप असलेल्या बसेसच स्टेशनपर्यंत येतात, इतर ठिकाणी जाणाऱ्या बसेसचे स्टेशन जवळ जवळ एक मीटर लांब आहे. मग दोन बॅगांसाठी हमाल केला आणि पायीच तो रस्ता कापला. कारण जवळपास कोणतेही वाहन नव्हते. मंडपमपासून मदुराईला थेट बस होती. संध्याकाळ असल्याने उन्हाचाही त्रास नव्हता. हा अडीच-तीन तासांचा प्रवास चांगला झाला.

मदुराईला कुठे राहायचे याची मलाही कल्पना नव्हती. एका गाईडवरून चार–पाच हॉटेलांची यादी तयार केली. पंडचन या हॉटेलच्या खोलीचा दर होता १३५ रु. ते २२५ रु. अशी हॉटेल्स माझ्या यादीतून वगळावी लागत होती. मदुराईच्या 'मीनाक्षी' मंदिराच्या ख्यातीमुळे अनेक परकीय प्रवासी तेथे येतात. त्यांच्यासाठी ही उंची, एअरकन्डिशन्ड हॉटेल्स असतात. मला रोज वीस ते पंचवीस रुपायांपर्यंत खोली हवी होती. न्यू कॉलेज हाऊस नावाचे हॉटेल या अपेक्षेच्या

आसपास होते. म्हणून रात्री दहा वाजता मदुराईच्या बस स्टेशनवर उतरल्यावर एक रिक्षा केली आणि न्यू कॉलेज हाऊसमध्ये गेलो. ते प्रचंड मोठे हॉटेल होते. म्हणजे सुमारे चारशे खोल्यांचे, मला देण्यात आलेली खोली हमरस्त्याला लागून होती. बस, रिक्षा, मोटारी यांची फार मोठी वर्दळ रस्त्यावर होती, इथे झोप लागणे कठीण म्हणून मी खोली बदलून मागच्या बाजूची दुसरी खोली घेतली. हॉटेलातच शाकाहारी जेवणाची चांगली सोय होती, हॉटेलच्या पुस्तकांच्या दुकानातून मी मदुराईचे गाईड घेतले आणि जेवण करून खोलीवर गेलो.

मदुराई येथे सकाळी स्नान करून लवकरच निघालो. भारतातील अत्यंत प्रसिद्ध असे मीनाक्षी मंदिर पाहायचे होते. हॉटेलच्या कौंटरवर चावी देताना सहजच जवळच्या माहिती फलकाकडे पाहिले. मीनाक्षी मंदिर हे हॉटेलपासून पाच किलोमीटर्स होते. म्हणजे रिक्षा, टॅक्सी काहीतरी करावी लागणार. हॉटेलसमोर अनेक रिक्षावाल्यांना गाठले. मीनाक्षी मंदिर, विष्णू मंदिर, तिरुमलनायक पॅलेस ही सर्व प्रेक्षणीय स्थळे फक्त दहा रुपयांत दाखवण्याला रिक्षावाले तयार होते. मी मनाशी हिशोब केला की मीनाक्षी मंदिरच येता–जाता दहा किलोमीटर्स होते. त्याशिवाय आणखी दोन–तीन प्रेक्षणीय स्थळे दहा रुपयात म्हणजे स्वस्त आहे. रिक्षा केली आणि आधी मीनाक्षी मंदिराकडे ने म्हणून सांगितले. त्यावर रिक्षा-वाला म्हणाला, ' नाही नाही- आधी विष्णू मंदिर पाहायचे अशी इथली पद्धत आहे. ' मी म्हटले, ' ठीक आहे.'

विष्णू मंदिराकडे गेलो. तिथे बारा–तेरा वर्षांचा एक मुलगाच गाईड होता. त्यांच्याबरोबर मंदिराच्या आवारात गेलो. तो म्हणाला, ' विष्णू मंदिर आणि मीनाक्षी मंदिर ही दोन अगदी उलट प्रकाराची मंदिरे आहेत. येथे मंदिर लहान पण देव मोठा आहे. मीनाक्षी मंदिरात मात्र देवालय मोठे आणि देव लहान आहेत. हा विष्णू जागृत आहे, मंदिराच्या कळसासाठी नऊ किलो सोने वापरले आहे. श्री गोविंदराज पेरूमल यांचे हे मंदिर आहे. या मंदिरात अशी एक जागा आहे की तेथून नटराज आणि गोविंदराज यांचे एकत्रित दर्शन घेता येते.' मंदिराचे आवार स्वच्छ होते. मीनाक्षी मंदिराइतके नसले तरी हे विष्णुमंदिरही मोठे आहे.

तिथून आम्ही तिरुमलनायक राजप्रासादाकडे गेलो. हा साडेतीनशे वर्षांपूर्वीचा आहे. त्याच्या आखणीसाठी इटालियन वास्तुशिल्पतज्ज्ञांची मदत घेण्यात आली होती. मात्र आता उरलेला राजवाडा मूळ वाड्याचा फक्त एक चतुर्थांश भाग आहे. स्वर्गविलास आणि रंगविलास हे सध्या अस्तित्वात असलेल्या प्रासादाचे दोन प्रमुख भाग आहेत. पूर्वीच्या बांधकामात लाकडाचा वापर असे पण या वाड्याचा विशेष असा की चुना व वाळू यांनीच त्याचे बांधकाम करण्यात आले आहे. ५० X ३५ मीटर्सचे भव्य पटांगणामध्ये आहे. अनेक सुंदर कमानी ओळीने उभ्या केल्या आहेत. स्वर्गविलास मंडप विशेष कलापूर्ण असून ७५ X ५० फुटांच्या या

मंडपावर सुंदर व मोठा घुमट आहे. नाटयासाठी एक सभागृह आहे. येथे नृत्याचे कार्यक्रम होत असत. याच सभागृहात साखळयांना अडकविलेल्या पलंगावर राजा वर्षातून काहीकाळ झोपत असे. रंगविलासाचे फार थोडे अवशेष आता उरले आहेत, या महालाविषयीची एक गंमतीची आख्यायिका आमच्या गाईडने सांगितली ती अशी, की स्वर्गविलासमध्ये एकदा चोरी झाली. राजाने दवंडी पिटली की जो कोणी चोराला आणून देईल किंवा त्याची माहिती देईल त्याला जहागीर देण्यात येईल. चोरीचा ऐवज जहागिरीच्या मानाने किरकोळ होता. म्हणून चोर आपण होऊन ऐवजासह हजर झाला आणि जहागीर मागू लागला. पण राजाने त्याचा शिरच्छेद केला आणि चोराच्या वंशजाला मात्र जहागीर दिली !

तिरुमल राजप्रासादाकडून आम्ही जगप्रसिद्ध मीनाक्षी मंदिराकडे आलो. तिथे मात्र मी रिक्षावाल्याला रजा दिली. कारण इतक्या लांववर एवढा पैसा व वेळ खर्चून आल्यावर मंदिर निवांतपणे पाहिले पाहिजे. केवळ रिक्षावाल्याला परत जाण्याची निकड आहे म्हणून आपण एवढे नामवंत प्रेक्षणीय स्थळ घाईघाईने 'उरकून' घेणे योग्य नव्हे.

हे मंदिर पाहण्यासाठी मी भरपूर वेळ दिला. तिथे मिळणारी पुस्तके घेऊन, गाईडच्या मदतीने जास्तीत जास्त वेळ ते विशाल व कलात्मक मंदिर पाहिले. त्यानंतर परत जाताना हॉटेलपर्यंतच्या पाच किलोमीटर्स मार्गापैकी एकदोन किलो-मीटर्स चालत जावे म्हणजे गाव तरी पाहून होईल या विचाराने चालत गेलो. पण कसचे काय ! चार पाच मिनिटे चालतो न चालतो तो समोरच मी राहात असलेले कॉलेज हॉटेल दिसले ! मी चकितच झालो. आत जाऊन कौंटरजवळचा माहिती-फलक पुन: वाचला. मग लक्षात आले की चूक त्यांची नव्हती, माझीच होती ! मीनाक्षी मंदिर हे हॉटेलपासून पाच मिनिटांच्या अंतरावर आहे, असे त्यावर लिहिले होते—पाच किलोमीटर्स नव्हे ! मी दहा रुपयांना रिक्षा ठरवल्यावर थेट मीनाक्षी मंदिराकडे न जाता आधी विष्णुमंदिराकडे व तिरुमल नायक प्रासादाकडे जाऊ या असे रिक्षावाला का म्हणाला हे आता माझ्या लक्षात आले. पण कोण-त्याही प्रवासात अक्कलखाती म्हणून टाकण्यासाठी काही पैसे असे बाजूस ठेवावे लागतातच. त्यानंतर मी दोनदा आणि सहजच चालत मीनाक्षी मंदिर पाहून आलो.

मीनाक्षी मंदिराप्रमाणेच मदुराई या शहराविषयीही मला फार पूर्वीपासून कुतूहल होते. तमिळनाडू राज्यात मद्रासच्या खालोखाल मदुराईला महत्त्व आहे, असे म्हटले जाते. परंतु अनेक बाबतीत मदुराईला मद्रासहूनही अधिक महत्त्व आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी, पण पुण्याची शान काही वेगळीच. त्रिवेंद्रम ही केरळची राजधानी, पण त्रिचूरचा सांस्कृतिक वहर त्रिवेंद्रमला नाही. तीच गोष्ट मद्रास आणि मदुराई यांच्याबाबत आहे. मदुराई ही तमिळनाडूची सांस्कृतिक राजधानी आहे ! जागतिक तमिळ परिषद मदुराईला भरली होती, मदुराईत

तमिळमधील ऋषितुल्य गाढे पंडित आहेत. या शहराचा इतिहास मद्रासच्या इतिहासापेक्षाही जुना आहे. ख्रिस्तजन्मापूर्वीपासून मदुराईने ग्रीस आणि इटलीशी व्यापार उदीम केला आहे. पांड्य घराण्यातील राजांचे उल्लेख रामायण आणि महाभारत यांतही आहेत. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात मेगॅस्थनिस हा ग्रीक राज-प्रतिनिधी चंद्रगुप्ताच्या दरबारात आला होता. या मेगॅस्थनिसने पांड्य राजांचा उल्लेख केला आहे. ख्रिस्तपूर्व पाचशे वर्षे सिलोनच्या एका राजाने पांड्य घराणा-तील राजकन्येशी विवाह केला होता. त्यावरून या भागातील संस्कृतीला अडीच ते तीन हजार वर्षांची परंपरा असल्याचे सिद्ध होते.

भारतातील जी सर्वांत महत्त्वाची अशी प्रेक्षणीय स्थळे आहेत, त्यात उत्तरेकडे ताजमहाल आणि दक्षिणेत मदुराई येथील मीनाक्षी मंदिर आहे. या मीनाक्षी मंदिराचा विस्तार, उंची, कलात्मक मूल्य आणि विविधता ही अद्भुतच म्हटली पाहिजेत. केवळ लांबी, रुंदी आणि उंची देऊन अशा स्थळांची नीट कल्पना कधीच येत नाही. त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाणे हा एकच मार्ग आहे. हे देवालय पूर्वीच सापडलेल्या मूर्तीभोवती उभारण्यात आले आहे. काही देवालये प्रथम बांधण्यात येतात आणि नंतर त्यात मूर्तीची प्रतिस्थापना होते. काही मूर्ती आधी सापडल्यावर मग त्याभोवती मंदिरे बांधण्यास सुरवात होते. मीनाक्षी मंदिर यांपैकी एक प्रकारचे आहे. घनदाट जंगलात कदंबाच्या झाडाखाली शिवलिंग सापडले. म्हणून प्राचीन कदंबाची एक फांदी मीनाक्षी मंदिरात ठेवण्यात आली आहे.

मदुराई ही पांड्य राजांची राजधानी होती. पहिल्या ते तिसऱ्या शतकापर्यंत मदुराई ही तमिळ पंडितांची व साहित्यिकांची पंढरीच होती. सांस्कृतिक क्षेत्रा-तील मदुराईच्या वर्चस्वाची माहिती मेगॅस्थनिस, टॉलोमी. प्लिनी, मार्कोपोलो अशा नामवंतांच्या लिखाणातून आली आहे.

भारतात प्राचीन काळापासून मंदिरे ही उपासनेची केन्द्रे आहेत. देवपूजा हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट असे. मात्र इ. स. ६०० नंतरच्या काळात पल्लव राजांच्या कारकीर्दीपासून मंदिरांना एक नवे परिमाण प्राप्त झाले. ते म्हणजे शिल्पकलेचे. कांजीवरम येथे पल्लव राजांनी बांधलेली प्रचंड गोपुरांची आणि अप्रतीम शिल्पे असलेली देवालये ही केवळ देवपूजेची ठिकाणे न राहता राज्यातील उत्कृष्ट शिल्प-कारांना आपली कला देवाच्या चरणी वाहण्याची संधी देणारी कलेचीही केन्द्रे झाली. पल्लव घराण्यातील महेंद्र राजाने दगडी गुहा कोरून त्यात मंदिरे तयार करण्यास सुरुवात केली. (इ. स. ६१० ते ६४०) अशा मंदिरांचे नमुने मद्रासजवळ महाबलिपुरम् येथे पाहावयास मिळतात. राजा महेंद्रचा मुलगा व त्याचे मुलगे (इ. स. ६४० ते ६९०) यांनी रथाच्या आकाराची देवालये बांधून कलात्मक

मंदिरांना आणखी एक शाखा दिली. मामलन नंतरच्या राजसिहन राजाने मात्र गुहेत मंदिरे उभारण्याऐवजी दगडी गुहेतून प्रचंड शिळा आणून इतरत्र अवाढव्य मंदिरे उभारण्यास सुरवात केली. पल्लवांच्या पूर्वीची दक्षिणेतील देवालये विटा व लाकूड यांची वनवलेली होती. इ. स. ७०० मध्ये राजसिहन याने कांजीवरम् येथे उभारलेले कैलासनाथाचे देवालय हे पुढील शिल्पकारांनी प्रमाण मानले. त्यात प्रथम उंच गोपूर, नंतर प्रशस्त चौक, मग सभागृह आत गाभारा व त्यावर विमानम् नावाचे शिखर आणि या सर्वाभोवती उंच भिंत अशी ही बांधणी होती. तमिळनाडूमधील नंतरची सर्व मंदिरे याच धर्तीवर बांधण्यात आली. मीनाक्षी मंदिर हे त्यापैकीच एक.

या मंदिराकडे लांबून पाहिल्यावरही त्याची भव्यता आणि प्रगल्भता यांची आपल्यावर छाप पडते. आपण जसे मंदिराच्या जवळ जवळ जातो, तशी गोपुराच्या शिखराकडे वळलेली आपली मान उंच होत होत अगदी दुखू लागण्याइतकी सरळ रेषेत करावी लागते, मग गोपुरांचे निरीक्षण करण्यासाठी पुन्हा जावे लागते ! इतके हे गोपूर उंच आहे. बारा ते चौदा मजली उंच इमारतीएवढे हे पहिले गोपूर आहे. मंदिराभोवती उंच भिंत असून चार दिशांना चार प्रवेशद्वारे व चार गोपुरे आहेत. त्यांपैकी दक्षिणेकडील गोपूर सर्वांत उंच म्हणजे १६० फूट आहे. हे गोपूर सोळाव्या शतकातील आहे.

मीनाक्षी मंदिर जवळ जवळ सहाशे वर्षे बांधले जातच होते. त्यामुळे त्याचे काही भाग तेराव्या शतकातील तर काही एकोणिसाव्या शतकातील आहेत. अगदी अलीकडे म्हणजे १९६० ते ६३ या तीन वर्षांतसुद्धा काही भागांचे नूतनीकरण करण्यात आले आहे.

नायक राजांच्या राजवटीत म्हणजे १५५९ ते १७८१ या काळात मीनाक्षी मंदिराला वैभव प्राप्त करून देणारे भाग बांधले गेले. त्यांपैकी तिरुमल नायक या कलाभिरुची संपन्न राजाने १५६० मध्ये मीनाक्षी मंदिराच्या फेररचनेची योजना आखली आणि लहानशा मंदिराला उत्तुंग स्वरूप दिले. आजचा या मंदिरातील एक हजार स्तंभाचा मंडप १६२३ नंतरच्या दोन तपांत बांधला गेला. मात्र अशा आकडेवारीने मंदिराची भव्यता लक्षात येणार नाही. प्रत्यक्ष त्या जागी जाऊन ती अनुभूती घेणे हाच त्यावर एकमेव उपाय आहे. ताजमहाल. नायगारा धबधबा, मीनाक्षी मंदिर अशा विख्यात स्थळांना भेटी देणे म्हणजे जीवनातील एक श्रेष्ठ अनुभव असतो.

मीनाक्षी म्हणजे माशासारखे लांबट व सुंदर नेत्र असलेली. या देवीची कथा अशी आहे की प्राचीनकाळी मलयराज पांड्य या राजाने अपत्यप्राप्तीसाठी यज्ञ केला. या यज्ञकुंडातून एक अत्यंत लावण्यवती अशी कन्या आली. ती अत्यंत पराक्रमी निघाली. आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर ती गादीवर आली आणि तिने



नटराज – मीनाक्षी मंदिर

आपल्या पराक्रमाने अनेक नवी राज्ये जिंकून घेतली. पण युद्धासाठी ती कैलास पर्वतावर गेली, तेव्हा शिवाने तिचा स्वीकार करण्याचे वचन दिले. त्याप्रमाणे आठ दिवसांनी शिव मदुराईला आले आणि त्यांनी सुंदरेश्वराचे रूप घेऊन मीनाक्षीशी विवाह केला. त्याची आठवण म्हणून दरवर्षी चैत्र पौर्णिमेला मीनाक्षी व सुंदरेश्वर यांच्या विवाहाचा सोहळा मदुराईला साजरा होतो. दक्षिणेकडील शेकडो मंदिरांत शिव विविध स्वरूपांत दिसतो. मीनाक्षी-मंदिरात त्याचे रसिक व सौंदर्यग्राही रूप दिसते.

मीनाक्षी-मंदिराच्या प्रचंड वास्तूची सुरवात अष्टशवती मंडपाने होते. १८ फूट रुंद आणि पंचवीस फूट उंच अशा या मंडपात अनेक उत्कृष्ट शिल्पकृती आहेत. पण त्या मंडपावर घुमट नाही. या मंडपातून आपण दुसऱ्या मोठ्या मंडपात जातो त्यात विनायक (गणेश) आणि सुब्रह्मण्यम् यांच्या सुंदर मूर्ती आहेत. नंतरच्या मीनाक्षी नायकर मंडपात यज्ञरुपिली, श्यामला, माहेश्वरी, मनमोहिनी, कुमारी, रौद्री अशी पार्वतीची विविध रूपे दगडात साकार केली आहेत. मीनाक्षीचा जन्म, तिचा राज्यारोहणसमारंभ, शिवाची व तिची प्रथम भेट अशा अनेक विषयांवरची शिल्पे व रंगचित्रे येथे आहेत. त्याशिवाय वल्लभ, गणपती, शण्मुख अशाही कित्येक सुबक मूर्ती आहेत.

त्या पुढचा मंडप म्हणजे मीनाक्षी नायकर मंडप १६० × ११० फुटांच्या या भव्य मंडपात २२ फूट उंचीचे ११० दगडी स्तंभ आहेत. त्यावर उत्कृष्ट कोरीव काम केले आहे. या मंडपातील काही मूर्ती अपूर्ण आहेत. अष्टमंडप आणि नायकर मंडप यांना जोडणाऱ्या लहान मंडपात सर्पदमन करणाऱ्या पार्वतीची सुंदर मूर्ती आहे. या लहान मंडपाच्या बळकट, स्तंभांना पूर्वी हत्ती व घोडे बांधले जात असत. नायकर सभागृहात एक तांब्याची प्रचंड दीपमाळ असून तीत १००८ दिवे आहेत. अलीकडेच झालेल्या नूतनीकरणात या मंडपात पौराणिक विषयावरची अनेक चित्रेही लावण्यात आली आहेत. नायकर मंडपाकडून अम्मन मंदिराकडे जाताना मोठे गोपूर लागते. ते नऊ मजले उंच आहे. हे अत्यंत प्रेक्षणीय आहे. ७४० शिल्पाकृतींनी समृद्ध असलेल्या या गोपुराच्या अगदी वरच्या भागातील शिल्पाकृती दुर्बिणीनेच पाहाव्या लागतात. गणपती, शिव, पार्वती, राम, सीता, नंदी, महिषासूरमर्दिनी, अशा शेकडो मूर्ती आहेत. पुराणांतील विविध प्रसंगांची ही शिल्पे अत्यंत प्रत्ययकारी असून मीनाक्षी मंदिरातील अशी सर्व शिल्पे बारकाईने पाहायची तर सतत तीन दिवस लागतील. ११७ फूट उंचीचे हे गोपूर १५६९ मध्ये कलाथिअपा मुदलियारने बांधले. त्याला चित्रगोपूर असे नाव आहे.

चित्रगोपुरानंतर २५ × ६० फुटांचा इरुत (अंधार) मंडप लागतो. त्याला मुदलाई पिलाई मंडप असेही नाव आहे. या मंडपात ऋषीपत्नींच्या मूर्ती आहेत. तंजावरच्या बृहदीश्वर मंदिरातही पुराणातील हा प्रसंग शिल्पात उभारलेला आहे.

विनायक, सुब्रह्मण्यम अशा इतरही अनेक मूर्ती या मंडपात पाहावयास मिळतात. १९६० च्या नूतनीकरणात या मंडपात भरपूर प्रकाश व वारा येण्याची सोय करण्यात आली आहे. त्यामुळे 'अंधार मंडप' हे त्याचे नाव आता मागे पडत आहे. दक्षिणेतील सर्वच मंदिरांच्या आवारात जलाशय असतो. मीनाक्षी मंदिराच्या आवारातील जलाशयाचे नाव 'सुवर्णकमल' तलाव असे आहे. या जलाशयाच्या पायऱ्यावर शेकडो भक्त स्नान करताना दिसतात.

मदुराईच्या मीनाक्षी मंदिरात देवादिकांच्याच मूर्ती आहेत असे नाही. त्या ठिकाणी तमिळ संत आणि कवी यांचाही सन्मान करण्यात आला आहे. मीनाक्षी मंदिरातील पोत्रमलाई कुलम या भव्य मंडपात (१६५ × १२० फूट) चोवीस संत कवींच्या मूर्ती आहेत. एक ब्रिटिश कलेक्टरही मीनाक्षी देवीचा भक्त होता. त्याची अशी कथा सांगतात की ब्रिटिश अमदानीत रूस पीटर नावाचा कलेक्टर लोकोपयोगी कामे करीत असे. त्याची लोकप्रियता एवढी मोठी होती की, मदुराईची जनता त्याला पीटर पंड्यन म्हणत असे. तो एका पावसाळ्या रात्री आपल्या बंगल्यात झोपला असताना एक कन्या त्याच्या स्वप्नात आली. तिने सांगितल्यावरून तो बंगल्याच्या बाहेर आला. तेवढ्यात त्या बंगल्यावर वीज पडली. पीटर आजूबाजूला मुलीचा शोध घेऊ लागला तो ती अदृश्य झाली होती. ती मुलगी म्हणजे मीनाक्षीदेवीच होय असे मानून त्या कलेक्टरने दुसऱ्या दिवशी मीनाक्षी-मंदिराच्या रथाच्या घोड्याला सुवर्णाचे अलंकार दिले. १८१२ मधील ही कथा आहे.

पोत्रमलाई कुलम या विभागात थिरुवलस या तमिळ संत कवीच्या ६४ सूत्रबद्ध कविता लाकडी फलकावर लिहिल्या आहेत. या मंडपाच्या उत्तरेकडील पायऱ्या पेरुमल यांनी १५७३ मध्ये बांधल्या आहेत. त्याचे काही भाग कुपियानंदी अप्पन पिले यांनी त्यानंतर पाच वर्षांनी बांधले. त्यापुढच्या मंडपाचे नाव उजल मंडप असे आहे. त्यात मध्यभागी काळ्या मार्बलचे व्यासपीठ असून त्यावर दर शुक्रवारी मीनाक्षी आणि चोक्कनादर यांच्या सुवर्णाच्या मूर्ती ठेवण्यात येतात. १९६० मध्ये मीनाक्षी मंदिराचे नूतनीकरण तीस लक्ष रुपये खर्चून करण्यात आले. तेव्हा या मंडपात मुरुमम व इतर देवतांची तैलचित्रे लावण्यात आली. मूळ मंडप चेरिअप्पा नायकर यांनी १५६३ मध्ये बांधला.

त्या पुढचा मंडप किलिकुट्टु (पोपट) मंडप आहे. तेथे प्रचंड पिंजऱ्यात अनेक पोपट ठेवण्यात आले आहेत. पोपट हा मीनाक्षी देवीचा आवडता पक्षी असल्याने त्यांचा मान या मंडपात करण्यात आला आहे. या मंडपातील अठ्ठावीस स्तंभांवर पांडव, द्रौपदी, वाली, सुग्रीव यांच्या सुबक मूर्ती कोरल्या आहेत. पोपट मंडपाकडून अम्मन मंदिराकडे जाताना चाळीस फूट उंचीचे गोपूर लागते. हे गोपूर वंभतर नंबी यांनी १२२७ मध्ये बांधले. हे भारतातील एक अत्यंत जुने गोपूर आहे.

त्यापुढील मंदिरात मीनाक्षीच्या विवाहाचे व तिच्या राज्यारोहणाचे अशी दोन उत्कृष्ट तैलचित्रे आहेत.

अम्मन मंदिरासमोर मीनाक्षीचा ध्वज आहे. त्या ध्वजाचे टोक सोन्याचे आहे. पुढील भागातील दक्षिणेकडे संगमरवरी गोल मंडप आहे, तर उत्तरेकडे थिरुमलाई नायकर आणि त्याच्या दोन पत्नी यांचे पुतळे आहेत. नवरात्रात येथे मीनाक्षीचा उत्सव साजरा होतो. पश्चिमेकडे ६४ फूट उंचीचे गोपूर असून त्यावर सव्वाशेहून अधिक मूर्ती कोरल्या आहेत. उत्तरेकडे संत अरुणागिर यांचे अभंग दगडावर कोरले आहेत. या मंडपाचा विशेष असा की नायकर राजांची राजधानी जरी तिरुचिरापल्ली असली, तरी त्या वंशातील राजांचे राज्यारोहण सभारंभ या मंडपात होत.

त्या पुढच्या भागास महामंडप असे नाव आहे. महामंडपातीन स्तंभांवर अत्यंत देखणे आणि बारीकसारीक तपशीलही उत्तम प्रकारे भरलेले असे कोरीव काम आहे. तक्तपोशीवर दगडी घंटा आहे. इथून भक्ताने आतील गाभाऱ्यात असलेल्या मीनाक्षी देवीचे दर्शन घ्यायचे. दक्षिणेकडील मंदिरांत भक्तांना मूर्तीला स्पर्श करता येत नाही. आपल्याकडे पंढरपूरला जाणारे वारकरी विठोबाच्या पावलावर माथे टेकतात, पण दक्षिणेकडे देवाचे दर्शन लांबूनच घ्यावे लागते. मीनाक्षीची मूर्ती अत्यंत लावण्यवती असून तिच्या हातावर पोपट आहे. डोक्यावर सोन्याचा मुकुट असून देवीचे दागिने लक्षावधी रुपयांचे आहेत. मंदिराच्या दोन बाजूंना विनायक आणि मुथुकुमार यांच्या मूर्ती आहेत. मंदिरात देवीचे पल्लई अटाई हे शयनागारही आहे.

बाहेरच्या आवारात स्वामीमंदिर आहे या मंदिरात जाण्यासाठी पुन्हा किलकूट मंडपात यावे लागते. याच्या प्रवेशद्वाराजवळ नाडू कट्ट नावाचे पाच मजली गोपूर आहे. त्यावर ११२ मूर्ती असून ते १५५९ मध्ये शिरमलई चेरियार यांनी बांधले. प्रवेशद्वारातून आत गेले की आठ फूट उंचीची मुकुटिनी विनयागारची मूर्ती आहे. स्वामीमंदिराच्या भोवतीची ४२० × ३१० फूट अशी प्रशस्त जागा एका उंच भिंतीने बंदिस्त केली आहे. ही भिंत चौदाव्या शतकातली आहे; पण अलीकडे हिची बरीच डागडुजी करण्यात आली आहे.

मंदिराचे एक गोपूर शिवाच्या पुढे नेहमी दिसणाऱ्या नंदीच्या प्रीत्यर्थ बांधण्यात आले आहे. उत्तरेकडील मंडपात नटराजांची उत्तम मूर्ती आहे. एका विभागात तमिळ साधूसंतांच्या मूर्ती आहेत. स्वामी कोयल यांचा ध्वजस्तंभ आहे त्या भागाला कंबथडी मंडप म्हणतात. याच विभागात भारतातील सर्वोत्कृष्ट शिल्पांपैकी एक आहे. ते शिल्प म्हणजे मीनाक्षी–विवाह दृश्य दाखविणारे शिल्प. शिवाच्या हातात मीनाक्षीचा हात देत असलेल्या विष्णूचे हे शिल्प अत्यंत देखणे आहे. विशेषतः लज्जित मीनाक्षीची त्यातील मूर्ती अतिशय सुंदर आहे. पुनः पुन्हा



मीनाक्षी-विवाहाचे शिल्प

पाहण्यासारखे हे शिल्प असूनही त्याची पूजा होत नसल्याने भक्तांची गर्दी नसते आणि शिल्पाच्या जवळ जाऊन रसिकांना त्याचा कलास्वाद घेता येतो. या शिल्पाच्या हजारो प्रतिकृती तमिळनाडू राज्यातील अनेक मंदिरांतून व कलावस्तू विकणाऱ्या दुकानांतून दिसतात. ही मूर्ती पंधराव्या शतकातील आहे.

स्वामी कोयल मंदिरात शिरताना बारा फूट उंचीचे दोन भव्य द्वारपाल दिसतात. प्रवेशद्वारापूर्वी तीन मजली उंच गोपूर आहे. या मंदिरात पतंजली आणि व्यागिर ऋषींच्या मूर्ती आहेत. दक्षिणेस शिव पंथाच्या ६३ साधूंच्या मूर्ती आहेत. एका मोकळ्या जागेत शेकडो वर्षांपूर्वीचा कदंब वृक्षाचा बुंधा आहे. त्याला स्थळ वृक्ष किंवा मूळ झाड असे नाव आहे, मुख्य देवावर शिखर किंवा 'विमान' असून त्यावर ८ हत्ती, ३२ सिंह आणि ६४ देवगण कोरले आहेत. गाभाऱ्यात शिव-लिंगाच्या रूपात चुक्कनाथरची मूर्ती आहे, स्वामी कोयल मंदिराजवळच वीर वसंत राय मंडप आहे. ह्या मंडपाचा बहुतांश भाग आता दुकानांनी व्यापला आहे. उत्तम शिल्पकला दर्शविणारे स्तंभ असलेल्या मंडपात प्लॅस्टिकची खेळणी आणि पूजेचे सामान विकणारी दुकाने विशोभित दिसतात. रामेश्वरलाही हाच प्रकार.

मीनाक्षी मंदिरातील कलेच्या दृष्टीने सर्वांत प्रेक्षणीय असे जे दोन विभाग आहेत, त्यांपैकी एक म्हणजे मीनाक्षी विवाहाचे शिल्प आणि दुसरा 'हजार स्तंभांचा मंडप.' वीर वसंतरायमंडपाजवळचा हा मंडप मुथुवीरच्या नायकर यांनी १६११ मध्ये बांधला. २५० × २४० फूट अशा भव्य आकाराच्या या मंडपात उत्कृष्ट शिल्पकला असलेले ९८५ स्तंभ आहेत. पूर्वी आणखी १५ स्तंभ होते. पण कालांतराने त्यांपैकी काही तुटले, तेव्हा ते काढून त्यांच्या जागी दोन लहान मंदिरे बांधण्यात आली आहेत. या मंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ तक्तपोशीवर एक मोठे दगडी चक्र आहे. त्यावर तमिळ पंचांगातील साठ वर्षांच्या आकृती आहेत. येथील ९८५ स्तंभांवर पुराणांतील अनेक प्रसंग कोरण्यात आले आहेत. त्यांपैकी शिवाकडून असुराचा वध, अर्जुन, द्रौपदी, भीम, अग्नी, मन्मथ, मोहिनी इत्यादींच्या मूर्ती विशेष प्रेक्षणीय आहेत. परकीय प्रवासी या मंडपात जास्तीत जास्त छायाचित्रे काढतात. मंडपाच्या मध्यभागी नृत्य करणाऱ्या नटराजाची भव्य मूर्ती असून मंडपाच्या एका भागात अलीकडेच वस्तुसंग्रहालय सुरू करण्यात आले आहे. या मंडपाच्या पश्चिमेचा मंडप अलीकडेच म्हणजे १९६३ मध्ये बांधण्यात आला. पंडयन् वंशातील राणी मंगयरकरसी यांनी दक्षिणेत शिवपंथाला आलेला धोका निपटून ठिकठिकाणी शिवमंदिरे स्थापन केली त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा मंगयकरसी मंडप बांधला आहे. या मंडपाचे सिमेंट व चुन्याचे बांधकाम मात्र मूळ मीनाक्षी मंदिराच्या दगडी बांधकामाशी विसंगत दिसते. या मंडपाजवळ जुन्या बांधणीचा सेरवाईकरार मंडप आहे, तेथेपेरिया मरुदूंचा पुतळा आहे.

मीनाक्षी मंदिरातील आणखी एक लक्षणीय विभाग म्हणजे कल्याण मंडप. तो विजयरंगा चोकनायर यांनी १७०६ ते ३२ च्या दरम्यान बांधला. दरसाल चैत्र महिन्यात मीनाक्षी-विवाहाचा समारंभ या कल्याण मंडपात होतो. मीनाक्षी मंदिराभोवती चार प्रदक्षिणा मार्ग असून त्यांना आदिवीथि म्हणतात. एकंदर आवार ८४७ X ७९२ फूट इतके विस्तृत आहे. या मार्गावरही अनेक लहान मोठी मंदिरे आणि देवादिकांच्या मूर्ती आहेत.

या सर्व भाविकतेच्या पार्श्वभूमीवर सर्वांत आधुनिक आणि काल-महिमा दाखविणारे काही असेल तर ते म्हणजे ' मंदिर कर्मचारी संघटना.' तमिळनाडूतील इतर देवालयांत अशा कामगार-संघटना क्वचितच दिसतात. त्याचे कारण असेही असू शकेल की इतर देवालयांत फार तर वीस–पंचवीस पुजारी कर्मचारी असल्याने त्याला संघटनेची आवश्यकता नसावी. उलट मीनाक्षी मंदिराचा आवका फार मोठा. निदान अडीचशे ते तीनशे लोक तेथे काम करीत असावेत. परकीय प्रवाशांचे ते आवडते ठिकाण. शिवाय भक्तांचीही मोठी ये–जा. अर्थात् उत्पन्न मोठे असले, की मग, कामगार-संघटना निघणे क्रमप्राप्तच होत असावे !

तिरुपतीचा बालाजी किंवा व्यंकटेश्वर हा भारतातील सर्वांत सधन आणि जगातील काही अत्यंत धनाढ्य अशा देवांपैकी एक आहे. व्यंकटाचल पर्वतावर हे देऊळ आहे. तिरुपतीचा बालाजी असे म्हणण्याची प्रथा आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की तिरुपती नावाच्या गावात जी मंदिरे आहेत ती गोविंदराज स्वामी आणि कोदंडस्वामी यांची. खुद्द बालाजीचे मंदिर व्यंकटाचल पर्वताच्या शिखरावर आहे. या क्षेत्राचे नाव तिरुपती नाही तर तिरुमल असे आहे. हे ठिकाण तिरुपती-पासून सुमारे पंधरा मैलांवर आहे. पण वाहनाची उत्तम व्यवस्था आणि उत्कृष्ट रस्ता यामुळे हा प्रवास आल्हादकारक होतो. सुमारे अडीच हजार फूट उंची-वरच्या या देवस्थानाकडे अनेक भक्त पायीही जातात. मी पूर्वी केदारनाथच्या यात्रेला गेलो होतो तेव्हाही मला आढळले की काही भक्त घोड्यावरून जाण्याची सोय नाकारून पायी डोंगर चढून देवाचे दर्शन घेत.

तिरुपती हे मद्रासपासून १५१ किलोमीटर लांब असून जवळचे स्टेशन रेणी-गुंठा हे आहे. वैष्णवांना पूज्य असलेल्या १०८ मंदिरांपैकी बालाजीचे हे मंदिर आहे. त्यातही विष्णूचा निवास तीन ठिकाणी आहे असे मानतात. ही तीन ठिकाणे म्हणजे कांची, श्रीरंगम आणि तिरुमल (तिरुपती). वैष्णवांच्या १२ 'अलवारां'पैकी हे एक तीर्थक्षेत्र आहे. (अलवार हे संतांना दिलेले नाव आहे.)

बालाजी देवस्थान सात निसर्गसुंदर टेकड्यांच्यामध्ये आहे. त्यावरून बालाजीला ' सात टेकड्यांचा स्वामी ' (एलुमलवंदर) असेही नाव पडले आहे. पौराणिक कथेनुसार व्यंकटाचल हा मेरूपर्वताचा भाग होता. वायू आणि मेरूपर्वत यांच्यात वितुष्ट आले आणि वायूने मेरूपर्वताची हजार शिखरे पाडण्याचा विडा

उचलला. पण त्यावेळी आदिशेषाने मेरूला संरक्षण दिले. तरीही वायूच्या तडाख्याने मेरूपर्वताची जी तीन शिखरे पडली त्यांपैकी व्यंकटाचल हे एक, असे तिरुपती-मधील भक्त सांगतात. हे तीर्थस्थान विष्णूचे की शिवाचे असा वाद निर्माण झाला होता. पण या दोन्हींपैकी विष्णूची शस्त्रे पसंत करून विष्णूच्या बाजूने कौल दिला गेला असे वैष्णव सांगतात. या देवस्थानच्या प्रतिष्ठेत रामानुजाचार्यांचा बराच मोठा वाटा आहे. गेली अकराशे वर्षे या देवावर राजे आणि इतर भक्त यांची निष्ठा आहे. पल्लव, चौल, पांड्य इत्यादी अनेक वंशांतील राजांनी तिरुमलेश्वराला आपले दैवत मानले. राजानुग्रह असल्याने साहजिकच गेली हजार वर्षे या देवालयाकडे संपत्तीचा प्रवाह चालू आहे.

बालाजी व्यंकटेश्वराला केस अर्पण करण्याची पूर्वापार रूढी आहे. त्यासाठी मुख्य मंदिराच्या आधी एक मंडप केला आहे. तेथे भाविक स्त्री–पुरुष स्वतःचे आणि मुलांचेही मुंडण करून घेतात व देवाला केस अर्पण करतात. डोक्यावर घालण्याचे केसांचे टोप आणि गंगावने तयार करण्यासाठी हे केस व्यापाऱ्यांना विकण्यात येतात. त्यांचा काही भाग परदेशात पाठविण्यात येतो. मुंडण झाल्यावर लोक कुंडात स्नान करतात. व देवदर्शनासाठी रांगेत उभे राहतात.

व्यंकटेश्वराच्या दर्शनासाठी फार मोठ्या रांगा लागतात. पंचवीस ते शंभर रुपये दिले तर वेगळ्या रांगांतून जाऊन दर्शन घेता येते. सर्वसाधारपणे रोज पाच हजार भक्त दर्शनासाठी थांबतात. यात्रेत ही संख्या तिप्पट–चौपट होते. मात्र रांगा लावणाऱ्यांना बसण्यासाठी सिमेंटचे बाक, पाणी, खाद्यपदार्थ यांची सोय करण्यात येते. देवदर्शनासाठी गर्दीच्या प्रमाणात दोन ते आठ तास लागतात.

अंदाजे दोन एकर क्षेत्रफळ या मंदिराच्या आवाराने व्यापले आहे. मंदिराचे गोपुर तेराव्या शतकातील आहे. प्रथम रंगनायकुल मंडप लागतो. पूर्वी मंदिरावर हल्ला झाला तेव्हा या मंडपात व्यंकटेश्वराची मूर्ती लपवून ठेवली होती. जवळच्याच प्रतिमा मंडपात व्यंकटपतिराय या राजाची तांब्याची मूर्ती आहे. विजयनगरचा राजा अच्युतराय व राणी यांचे पुतळे आहेत. प्रतिमामंडपाजवळच्या इतर पुतळ्यांत सम्राट कृष्णदेवराय, चित्रादेवी आणि तिरुमलादेवी यांच्या मूर्तींचा समावेश आहे. यानंतर लागतो तो तिरुमलराय मंडप. या मंडपाच्या खांबांवर पुराणांतील अनेक प्रसंगांवर आधारित शिल्पे आहेत. नरसिंह, श्रीकृष्ण, राम इत्यादींच्या मूर्तींचा यात समावेश आहे. 'आयने महाल' जवळच्या कुंडात निर्माल्य टाकण्याची सोय आहे. कल्याण मंडपात व्यंकटेश्वराचा विवाह झाला असे सांगण्यात येते. या ठिकाणी विवाह करण्यास मुहूर्ताची आवश्यकता नसल्याने इतरत्र जेव्हा मुहूर्ताची अडचण येते, त्यावेळी या मंडपात विवाह करतात.

मुख्य मंदिराच्या गाभाऱ्याबाहेर जयविजय या द्वारपालांच्या मूर्ती आहेत. गाभाऱ्यातील व्यंकटेश्वर बालाजीची मूर्ती कमळावर उभी असून काळ्या शाळि-

ग्रामाची आहे. मूर्तीवर अनेक दागिने घातलेले असतात. मूर्तीच्या कपाळापासून नाकापर्यंत पांढऱ्या कापडाची पट्टी असते. (हैदराबाद बिर्ला मंदिरातील मूर्तीवरही अशीच पट्टी आहे) या पट्टीबद्दल अशी कथा सांगतात की भृगू ऋषींनी श्रीविष्णूच्या छातीवर लत्ताप्रहार केला, तेव्हा हा अपमान सहन न होऊन लक्ष्मी पृथ्वीवर आली. तिच्या शोधार्थ विष्णूही आले आणि एका बिळात तप करीत बसले. ब्रह्मदेव गायीचे रूप घेऊन पृथ्वीवर आले व बिळात शिरून विष्णूला दूध देऊ लागले. हा प्रकार गायीच्या मालकाच्या लक्षात आल्यावर त्याने तलवार घेऊन गायीचा वध करण्यासाठी हात उगारला, तोच विष्णू बिळातून आले आणि त्यांनी तो वार आपल्या तोंडावर झेलला. त्यांना यावेळी कपाळावर झालेली जखम झाकण्यासाठी ही पट्टी लावण्यात येते.

तिरुपती बालाजीला अनेक भक्त रोकड, हिरे, पाचू, घड्याळे, इतर दागिने अर्पण करतात. या देवाला दान दिल्यास तो आपल्याला श्रीमंत करतो किंवा अधिक श्रीमंत करतो अशी कल्पना असल्याने दरवर्षी कोट्यवधी रुपये देवाकडे येत असतात. त्यातून काही प्रमाणात शैक्षणिक व सामाजिक कार्ये हाती घेतली गेली आहेत.

मंदिराभोवती लोळण घेत प्रदक्षिणा घातल्यास अधिक पुण्य लागते या भावनेने तशा प्रदक्षिणा घालणारे भक्तही येथे दिसतात. मंदिरात उत्सवश्रीनिवास उग्रश्रीनिवास, भोगश्रीनिवास, दरबारश्रीनिवास अशा मूर्ती आहेत. व्यंकटेश्वराच्या दोन्ही बाजूंनी पद्मावती व श्रीलक्ष्मी यांच्याही मूर्ती आहेत. मूर्तींच्या गाभाऱ्यावरचे विमान किंवा शिखर ३५ फूट उंच आहे. कळसाला सोन्याचा मुलामा दिलेला असून गोपुरावर सुंदर मूर्ती कोरलेल्या आहेत.

# ८ : तमिळ लेखक-प्रकाशकांशी बातचीत

मद्रास येथील माझ्या मुक्कामात मी अनेक लेखक, प्रकाशक व संपादक यांना भेटलो. मराठी साहित्याला सर्वांत जवळचे मद्रासचे नागरिक म्हणजे श्री· का. श्री. श्रीनिवासाचार्य. कारण त्यांनी वि. स. खांडेकरांची वीस पुस्तके तमिळ· मध्ये भाषांतर करून मराठी–तमिळच्या सहकार्याचा उच्चांकच केला आहे. का· श्री. श्री. या नावाने ते तमिळमध्ये विख्यात आहेत. ते मूळचे मुंबईचे, म्हणज कल्याणचेच. त्यामुळे त्यांना मराठी भाषा उत्तम अवगत आहे. त्यांचे वडील संस्कृतचे पंडित होते आणि व्यंकटेश्वर प्रेसमध्ये संपादक होते.

श्री. श्रीनिवासाचार्य लहान असतानाच त्यांच्या कुटुंबाने मद्रासला स्थलांतर केले आणि आता गेली जवळजवळ साठ वर्षे ते तेथेच स्थायिक झाले आहेत. ते म्हणाले, ' मी सात वर्षे हिंदी प्रचार सभेत काम केले. श्री. वि. स. खांडेकरांच्या दहा कादंबऱ्या व सुमारे १५० कथा मी तमिळमध्ये भाषांतरित केल्या. पण श्री· खांडेकरांची व माझी भेट कधीच झाली नाही. दोनदा मी त्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. पण प्रकृतिअस्वास्थ्यामुळे त्यांचा मुक्काम मी कोल्हापूरला जाण्यापूर्वीच इतरत्र पडला होता. तमिळमध्ये खांडेकर इतके रुजले आहेत की ते मूळ तमिळ लेखकच आहेत अशी इकडे वाचकांची समजूत आहे. याचे प्रमुख कारण असे, की मी त्यांच्या पात्रांची व गावांची नावे बदलून इकडील नावे देत असे, माधवचे माधवन् करून. कथाभाग मात्र मी तसाच ठेवला आहे. करुणानिधींसारख्या नेत्यांनी अनेक जाहीर भाषणांत वि. स. खांडेकरांची वचने उद्धृत केल्याने ते सर्व थरांत रुजण्यास बरीच मदत झाली.

तमिळमधील आजचे सर्वश्रेष्ठ साहित्यिक म्हणजे श्री. अकिलन्. ते नभो-वाणीवर अधिकारी असून त्यांना १९७७ चे ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले आहे. त्यांना फोन करून मी रेडिओच्या कचेरीत त्यांना भेटलो. ते अत्यंत साध्या राहणीचे

व नम्र आहेत. त्यांच्या वीस कांदबऱ्या, १५ कथासंग्रह, काही नाटके व इतर ललित साहित्य तमिळमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे. केरळमधील साहित्य प्रवर्तक संस्थेच्या धर्तीवर तमिळनाडूमध्येही लेखकांची सहकारी संस्था स्थापन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला व शंभरावर पुस्तके या संस्थेच्या वतीने प्रसिद्ध केली आहेत.

या प्रयोगाबद्दल बोलताना श्री. अकिलन् म्हणाले, 'आमची ही योजना केरळमधील संघटनेइतकी यशस्वी होऊ शकली नाही. तरीपण आम्ही आमच्या लेखकांना १५ ते २० टक्के रॉयल्टी देऊ शकलो. केरळमध्ये साहित्य प्रवर्तकला घवघवीत यश मिळाले, कारण त्या संस्थेने स्वतःच्या पुस्तकविक्रीच्या दुकानांची उत्तम व कार्यक्षम साखळीच निर्माण केली. आमचाही तसा प्रयत्न चालू आहे.'

तमिळमध्ये प्रस्थापित लेखकांच्या पुस्तकाच्या दोन ते तीन हजार प्रतींची पहिली आवृत्ती निघते व नवीन लेखकांच्या पुस्तकाची एक हजाराची आवृत्ती निघते, असे श्री. अकिलन् म्हणाले. कुमुदम्, आनंद विकटन्, कलकी इत्यादी प्रचंड खपांच्या साप्ताहिकांमुळे तमिळ पुस्तक प्रकाशनावर प्रतिकूल परिणाम झाला असून त्याबद्दल अधिक माहिती तमिळ पुस्तकालयमचे चालक श्री. मुथैया हे देतील, असेही त्यांनी सांगितले.

श्री. अकिलन हे मुख्यतः कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'चित्रपावै' या कादंबरीस १९७७ साली ज्ञानपीठ पारितोषक मिळाले आहे. ही कादंबरी प्रथम 'आनंद विकटन' या लोकप्रिय साप्ताहिकात (खप साडेपाच लक्ष) प्रसिद्ध झाली. 'चित्रपावै' ही कादंबरी एका कलावंताच्या जीवनावर लिहिली गेली आहे. नोबेल पारितोषिकाप्रमाणेच ज्ञानपीठ पारितोषिकही लेखकांच्या एकंदर कामगिरीबद्दल देण्यात येते व त्यांच्या एखाद्या ठळक कलाकृतीचा खास उल्लेख केला जातो. (उदा : वि. स. खांडेकर–ययाती)

विनोदी साहित्याबद्दल विचारता श्री. अलिकन म्हणाले, 'उत्तम विनोदाची आमच्यात वानवाच आहे. तरी पण सुब्रह्मण्यम् यांचे नाव दर्जेदार विनोदी लेखक म्हणून घेता येईल. नव्या पिढीत उत्तम दर्जाचा विनोदी लेखक मला तरी दिसत नाही. मात्र विनोदी नाटकात चो यांनी फार चांगली कामगिरी बजावली असून उपरोधिक व तिखट विनोदाने त्यांनी आजच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीवर बराच प्रकाश टाकला आहे.'

त्याच दिवशी चो यांचे एक नाटक राजा अन्नमलाई सभागृहात होते. म्हणून मी त्यांना फोन करून तेथे गेलो. त्यांची तासभर भेट घेतली 'जजमेंट रिझर्व्हड्' हे त्यांचे नाटकही पाहिले. श्री. चो हे केवळ लेखकच नाहीत, तर उत्तम नट, दिग्दर्शक व संघटकही आहेत. त्यांची स्वतःची नाट्यसंस्था आहे व एक राजकीय-विनोदी साप्ताहिक आहे. त्यांनी दीडशेवर चित्रपटांतूनही भूमिका केल्या आहेत. श्री. चो म्हणाले, 'आमच्या नाटकांचे प्रयोग भरपूर होत असले, तरी आम्हाला

मराठी नाटककाराप्रमाणे भरपूर पैसा मिळत नाही. कारण आमची नाटके मुख्यत: खाजगी क्लब्ज किंवा 'सभां' पुढे होतात.' 'महंमद बिन तुघलक' हे त्यांचे सर्वांत यशस्वी नाटक असून त्यात सध्याच्या राजकीय परिस्थितीचे विडंबनात्मक चित्रण आहे. त्यांची तेवीस नाटके रंगभूमीवर आली आहेत.

श्री. एन. ए. ए. पार्थसारथी हे तमिळमधील एक ज्येष्ठ लेखक आहेत. इंडियन एक्सप्रेसच्या 'दिनमणी' या दैनिकाच्या साप्ताहिकाचे ते संपादक आहेत. ते भारत सरकारच्या साहित्य अकॅडमीचेही सभासद आहेत, तमिळ लेखकांच्या सहकारी संस्थेचे ते एक संचालक आहेत. कादंबरीकार, कथाकार व ललित लेखक म्हणून पार्थसारथी यांचा मोठा बोलबाला आहे. ते म्हणाले, 'जानेवारीमध्ये मदुराई येथे जागतिक तमिळ साहित्य परिषद भरणार असून त्यासाठी तमिळनाडू सरकारने पाच कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यांपैकी नव्वद लाख रुपये प्रमुख साहित्यिकांचे पुतळे उभारण्यासाठी व पन्नास लाख रुपये परदेशांत स्थायिक झालेल्या तमिळ लेखकांना जाण्यायेण्याच्या खर्चासाठी राखून ठेवण्यात येतील. शिवाय मदुराई येथे कायमची हॉटेले, रस्ते, ग्रंथप्रकाशन, परिसंवाद, पारितोषिके, इत्यादींवर बाकीचा पैसा खर्च करण्यात येईल.'

तमिळमधील पुस्तक प्रकाशनाविषयीची वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी मग मी तमिळ पुस्तकालयमचे चालक श्री. मुथैया यांना भेटण्यासाठी टी. पी. कोयल रस्त्यावर गेलो. श्री. मुथैया म्हणाले, 'मी १९४६ पासून या व्यवसायात आहे. गेल्या पंधरावीस वर्षांत तमिळ पुस्तक प्रकाशन अगदी विस्कळित झाले आहे. याचे कारण असे, की कुमुदम् (खप आठ लक्ष पन्नास हजार), कलकी (खप साडेपाच लक्ष) आनंद विकटन् (खप पाच लक्ष) अशी साप्ताहिके दर अंकात तीनतीन कादंबऱ्यांची चालू प्रकरणे देतात. या साप्ताहिकांची किंमत फक्त ७५ पैसे व 'चांदोबा'च्यापेक्षा किंचित मोठ्या आकाराची ९६ ते १०० पाने असतात. शिवाय ही साप्ताहिके दिवाळी व ओनम या सणांच्या निमित्ताने आपल्या अंका-बरोबर सव्वाशे व दीडशे पानांची कादंबरी मोफत देतात. वाचनीय साहित्य इतके स्वस्त मिळत असताना आठ ते पंधरा रुपये देऊन पुस्तके कोण घेणार ? हल्ली तमिळमध्ये दरसाल ४५० ते ५०० पुस्तके निघतात. ९० टक्के पुस्तकांची आवृत्ती एक हजाराची असते. त्यांपैकी सहाशे प्रती ग्रंथालयात जातात म्हणूनच आमचा धंदा एवढा तरी टिकून आहे, उरलेल्या ४०० प्रती तीन वर्षांत विकून आम्ही हा व्यवसाय कसाबसा टिकवून धरीत आहोत, आम्ही ललित साहित्याला दहा, साडेबारा व पंधरा टक्के रॉयल्टी लेखकाच्या दर्जाला अनुसरून देतो.

मराठी पुस्तकांच्या तुलनेने मला तमिळ पुस्तकांच्या किंमती बऱ्याच कमी वाटल्या, पावैयविल्लकी पृष्ठे ७१०, किंमत २७ रुपये) राजा इदळहळ (पृष्ठे ३४०, किंमत रु. १०), ताजमहाल रुतितुंडम (पृष्ठे ११०, किंमत ४ रुपये)

अशी काही उदाहरणे देता येतील. मात्र कागद, मुखपृष्ठ, छपाई, बांधणी यात तमिळ पुस्तके मराठीच्या तुलनेने खूपच कमी प्रतीची वाटली. श्री. मुथैया यांनी सर्वत्र प्रमुख तमिळ साहित्यिकांची पुस्तके प्रसिद्ध केली असून त्यांच्या सात पुस्तकांना अकॅडमीची पारितोषिके मिळाली आहेत.

साप्ताहिकांनी पुस्तक प्रकाशनावर केलेल्या प्रतिकूल परिणामाबाबत मी कुमुदम्, कलकी आणि आनंद विकटन या तिन्ही प्रमुख साप्ताहिकांच्या संपादकांना भेटून त्यांच्याशी चर्चा केली. त्या सर्वांची उत्तरे एकच साच्याची होती. ते म्हणाले, ' आम्ही आमच्या वाचकांना जास्तीत जास्त मजकूर कमीत कमी किंमतीत देऊन त्यांची सेवाच करतो. न्यूज प्रिंट, जाहिरातीचे उत्पन्न व मोठा खप यामुळे आम्हाला हे परवडते. त्यांचा प्रतिकूल परिणाम पुस्तक–प्रकाशनावर होत असेल तर त्याला समर्थपणे तोंड कसे द्यावे व त्यातून मार्ग कसा काढावा हा त्या व्यवसायाचा प्रश्न आहे. केवळ आमच्या नावाने बोटे मोडून तो सुटणार नाही !'

तमिळ साप्ताहिके व मासिके यातून दर अंकात तीन–तीन कादंबऱ्या सुरू आहेत. याचाच अर्थ असा, की दरमहा निदान चाळीस ते पन्नास कादंबऱ्या या नियतकालिकांतून प्रसिद्ध होतात– प्रकरणवार किंवा संपूर्ण. मागणी इतकी वाढल्याने तिच्याप्रमाणे पुरवठा करणारेही बहुप्रसव लेखक झाले. याचा परिणाम म्हणून एकंदरीत तमिळ साहित्याचा दर्जा घसरला आहे अशी खंत कोमलस्वामी, राजसकृष्ण, विश्वनाथन, अकिलन वगैरे लेखकांनी व्यक्त केली. अलीकडेच मद्रास येथे अखिल भारतीय तमिळ लेखक परिषद भरली होती. या परिषदेत एका ज्येष्ठ लेखकाने तमिळ साहित्यात पसरणाऱ्या लैंगिकतेवर व अत्याचारी प्रवृत्तींना उत्तेजन देणाऱ्या साहित्यावर प्रखर टीका केली. पंतप्रधान इंदिरा गांधी या परिषदेच्या उद्घाटक होत्या. या ज्येष्ठ लेखकाने त्यांना असे सुचवले की अशा अनिष्ट प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी सरकारनेच आता लेखकांच्यावर काही नियंत्रणे घालण्याचा विचार करावा. पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपल्या भाषणात या सूचनेला विरोधच केला. त्या म्हणाल्या, ' वैचारिक क्षेत्रात सरकारने हस्तक्षेप करून नियंत्रणे घालावीत हे मला मान्य नाही. कारण एकदा नियंत्रण घालण्यास सुरुवात केली, की कशावर नियंत्रण ठेवावे व कशावर ठेवू नये याचे भान रहात नाही असा अनुभव आहे.' नियत्रणे घालून घेण्यास आपण तयार आहोत असे सुचविणाऱ्या तमिळ लेखकांच्या गटाला पंतप्रधानांनी असा अनपेक्षित धक्काच दिला आणि बहुसंख्य तमिळ लेखकांनी समाधान व्यक्त केले. आणीबाणीच्या काळात बसविलेल्या कडक निर्बंधामुळे सरकारला तोटाच अधिक झाल्याचा अनुभव आल्यानेही पंतप्रधान आता निर्बंध बसविण्यास उत्सुक नाहीत अशीही प्रतिक्रिया नंतर वृत्तपत्रांनी व्यक्त केली.

तमिळ भाषा सुमारे तीन कोटी लोक बोलतात. भारताचे साक्षरतेचे प्रमाण तीस टक्के आहे, तर तमिळनाडूचे चाळीस टक्के आहे. तमिळ लोकांना आपल्या

भाषेचा प्रखर अभिमान असून तेथील वृत्तपत्रांचे व साप्ताहिक–मासिकांचे खप प्रचंड आहेत. तमिळ साहित्यिकांना पुस्तकापासून फारशी प्राप्ती होत नाही, तरी त्यांपैकी बहुतेकजण साप्ताहिकांतून सातत्याने लिहितात. त्यामुळे प्रसिद्धी व पैसा यांची त्यांना चांगली प्राप्ती होते, असे माझ्या ह्या भेटीत मला दिसून आले.

नाट्यक्षेत्रात मला विशेष रस असल्याने मी ज्या ज्या राज्यात जातो, तेथे शक्य तेवढी नाटके पाहण्याकडे माझा कटाक्ष असतो. म्हणून मी अलीकडेच मद्रासला गेलो, तेव्हा तमिळमधील प्रमुख नाटककार कोण व उत्तम नाटके कोणती यांची साहजिकच चौकशी केली. सुदैवाने मला पहिल्याच दिवशी सर्वांत महत्त्वाचे विद्यमान नाटककार श्री. चो यांच्याशी फोनवर बोलता आले. ते म्हणाले, ‘ राजा अण्णमलाई सभागृहात उद्या संध्याकाळी माझे नाटक आहे. त्यापूर्वी तासभर मी तेथे येईन. आपण भरपूर गप्पा मारू व त्यानंतर तुम्ही माझे ‘ जजमेंट रिझर्व्हड ’ हे नाटकही पहा. ’

सभागृहावर मी गेलो. चो हे व्यवसायाने नाटककार, पत्रकार व नटही आहेत. विवेका फाईन आर्टव् क्लब ही त्यांची स्वतःची नाटक कंपनी किंवा संस्था आहे. तमिळनाडूमधील नाट्यव्यवसायाबद्दल बोलताना श्री. चो म्हणाले, ‘आमच्याकडे ऐंशी ते नव्वद टक्के नाटके ‘सभांतून’ होतात. सभा म्हणजे क्लब किंवा संस्था. प्रत्येक सभेचे पाचशे ते सातशेपर्यन्त सभासद असतात. त्यांना महिन्यातून एक कार्यक्रम दाखवावा लागतो. त्यांपैकी सुमारे तीन नाटके व एक संगीताचा किंवा नृत्याचा कार्यक्रम असतो. वर्गणी बहुतेक करून दरमहा दहा रुपये असते. या पद्धतीचे काही फायदे आहेत तसेच काही तोटेही आहेत. मुख्य फायदा असा, की प्रत्येक प्रयोगाला चार–पाचशे प्रेक्षक मिळण्याची हमी असते. म्हणून जवळ जवळ रिकाम्या नाट्यगृहात प्रयोग करण्याचे दुर्दैव येत नाही. पण या पद्धतीचा मुख्य तोटा असा, की नाटककार आणि कलाकार यांना आपली खरी कसोटी झाली असे वाटतच नाही. या बाबतीत मराठी व बंगाली नाटककार आणि कलावंत यांचा मला हेवा वाटतो. तिकीट काढून आलेल्या प्रेक्षकांनी ‘ हाऊसफुल्ल ’ केलेले नाटक ही खरी यशाची पावती. पण सभांचे वर्गणीदार आपोआपच येत असल्याने ही यशाची पावती आम्हाला मिळतच नाही ! दोन दोनशे प्रयोग होऊनही हे प्रेक्षक खरोखर नाटकाच्या प्रेमामुळे आले आहेत की एवी तेवी वर्गणी भरलीच आहे, ती फुकट जाऊ नये या व्यवहारिक विचाराने उपस्थित राहिले आहेत हे समजण्यास मार्ग नाही ! ’

तमिळनाडूमध्ये नॅशनल थिएटर्ससारख्या तीन–चार व्यावसायिक नाट्यसंस्था आहेत. त्यांची नाटके तिकिटे लावून होतात. पण मनोहर यांच्यासारखे या नाट्यव्यवसायांचे नेते अजूनही पौराणिक, ऐतिहासिक व धार्मिक नाटकेच लावतात. त्यात चमत्कृती, ट्रिकसीन्स, भाबडेपणा यांचाच भाग अधिक असतो.



' नारदन् केरतिल ' (केरळमध्ये नारद) या नाटकात नारद गोव्यात येतो आणि हिप्पींचे गाणे ऐकतो हे दृश्य

आजच्या सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब या जुन्या, पारंपरिक नाटकांतून नसते.

मद्रासमध्ये नाटकांसाठी नाटचगृहे व सभागृहे उपलब्ध आहेत. मद्रास शहरात सुमारे पस्तीस आणि तमिळनाडू राज्यात दोनशे 'सभा' किंवा फाईन आर्टस् क्लब्ज नाटके करतात. त्यांचे वर्षाला सात ते आठ हजारावर प्रयोग होतात. शंभरावर नवी नाटके दरसाल रंगमंचावर येतात. श्री. चो यांनी आत्तापर्यंत तेवीस नाटके लिहिली असून 'महंमद बिन तुघलक' हे त्यांचे सर्वांत यशस्वी नाटक आहे. त्याचे ३७० प्रयोग झाले आहेत. इतिहासातील विक्षिप्त महंमद तुघलक आजच्या भारताचा पंतप्रधान झाला तर कोणता अनवस्था प्रसंग ओढवेल हे या नाटकात विडंबनात्मकरीत्या दाखवले आहे. विवेका फाईन आर्टस् क्लब ही संस्था श्री. चो यांनी गेली चोवीस वर्षे चालविली आहे. उपहास आणि विडंबन ही श्री. चो यांची खास क्षेत्रे आहेत.

त्याचे पुरेपूर प्रत्यंतर मला मी तेथेच पाहिलेल्या 'जजमेंट रिझर्व्हड' या नाटकात आले. बलात्कार हा या नाटकाचा विषय आहे. मात्र हा विषय त्यात केवळ गंभीरपणे हाताळला नसून समाजदर्शन घडविण्यासाठी त्याला विडंबनाची धार देण्यात आली आहे. पहिल्याच दृश्यात पोलीस स्टेशन आहे. चाळीशीच्या सुमाराची एक बाई एका सामाजिक कार्यकर्त्यांबरोबर येते आणि पोलीस इन्स्पेक्टरला सांगते, 'माझ्या माहितीतल्या एका तरुणीवर बलात्कार झाला आहे. तुम्ही तक्रार नोंदवून घ्या. बलात्कार करणारा तरुण फार बड्या इसमाचा मुलगा आहे, त्यामुळे तुम्ही हे प्रकरण दडपून तर टाकणार नाही ना ?'

इन्स्पेक्टर मोठ्या फुशारकीने सांगतो, 'छे: छे: बाई, आम्ही अत्यंत नि:पक्षपाती आहोत, मद्रासचे पोलीस कुणाच्याही दडपणाला कधीही बळी पडत नाहीत,' इतक्यात इन्स्पेक्टरला फोन येतो, 'मी मद्रासचा आमदार मेनन बोलतो आहे, काल रात्री तुम्ही चेरियर नावाच्या इसमाला पकडले आहे काय ?'

'होय साहेब, त्यानं हातभट्टी लावली होती' इन्स्पेक्टर सांगतो.

'त्याला तावडतोब सोडून द्या, तो माझा माणूस आहे,' आमदार दम देतो.

'होय साहेब' असं म्हणून इन्स्पेक्टर फोन ठेवतो. हातभट्टी लावणाऱ्याला लॉकअपमधून आणण्यात येते. इन्स्पेक्टर त्याला सांगतो, 'तुझ्या आमदारसाहेबांनी फोन केला म्हणून तुला सोडले आहे.' हातभट्टीवाला सरळ इन्स्पेक्टरला सांगतो, 'ते मला माहीतच होतं, तुम्हाला बढती किंवा बदली पाहिजे असली तर मला येऊन भेटा.'

'यस सर' असं म्हणून पोलीस इन्स्पेक्टर गुन्हेगाराला सरळ सलाम ठोकतो ! या उपरोधिक हल्ल्याने नाटचगृहात तुफान हशा पिकतो. विशेष म्हणजे

मद्रासच्या सेन्सॉरने हे दृश्य कापले नाही किंवा आमदाराची बदनामी केली म्हणून तमिळनाडू विधिमंडळाने हक्कभंगाची नोटीसही बजावली नाही !

बलात्काराचे प्रकरण वृत्तपत्रांतून, विधिमंडळात भरपूर गाजते. एक संपादक ते बरेच रंगवतात. एक चित्रपट निर्माता त्या प्रकरणावर चित्रपटही जाहीर करतो. अशावेळी मद्रासचा सर्वांत नावाजलेला वकील पुढे येऊन सांगतो की, "त्या तरुणाने बलात्कार केलेला नाही. तो असं कृत्य करणं शक्य नाही. कारण माझ्या मुलीवर बलात्कार होत असताना त्यानेच स्वतःचा जीव धोक्यात घालून त्या गुंडाशी सामना दिला.' त्या तरुणाचे वकीलपत्र तो घेतो आणि त्याला निर्दोष सोडवण्याची हमी देतो.

कोर्टात प्रत्यक्ष खटला उभा राहतो, तेव्हा ' होय. मी बलात्कार केला.' अशी कबुली देऊन तो तरुण सर्वांनाच धक्का देतो ! त्याला दोन वर्षांची शिक्षा होते. वकील त्याला भेटायला जातो, तेव्हा तो तरुण सरळ सांगतो, ' मी खरोखरच बलात्कार केला नाही. पण संपादक, विरोधी पक्षाचे नेते आणि चित्रपटाचे निर्माते माझ्याकडे आले. ते म्हणाले, ' या खटण्यावर आमचे भवितव्य अवलंबून आहे. तू गुन्हा केला नसलास तरी केला अशी कबुली दे. आम्ही तुला पाच लक्ष रुपये देऊ.' त्यांनी पैसे दिले. अपिलात ते शिक्षा कमी करून घेणार आहेत. वर्षभर तुरुंगात राहून मी जन्मभर त्या पाच लाखांवर मजा मारीन. म्हणून मी निरपराध असतानाही गुन्हा कबूल केला !'

तमिळ रंगमंचाची सुरुवात इतर कोणत्याही रंगमंचाप्रमाणेच धर्मग्रंथातील प्रसंग नाट्यरूप करण्यापासून झाली. दक्षिणेचा विशेष म्हणून त्यात कथाकली नृत्यासारखा काही भाग असे. पुढे मात्र तमिळ रंगमंचावर विषय आणि तंत्र यांची विविधता आली. सुरवातीची नाटके मुख्यतः काव्यात लिहिलेली असत. पण शंकरदास स्वामी यांच्यापासून म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून संवादाला महत्त्व देणारी नाटके लिहिली जाऊ लागली. १९२५ ते ३२ या कालात कित्तय्या आणि सुबय्या भागवता यांचे तमिळ रंगमंचावर प्रभुत्व होते. भारती सुब्रमण्यम या कवीने ( १८८२ ते १९२१ ) पांचाली शपथ हे काव्य नाटक लिहिले. त्याचा आणि मराठीतील ' कीचक वध ' या नाटकाचा चेहरा अगदी मिळता जुळता आहे. ' पांचाली शपथ 'मध्ये दुःशासनाच्या दरबारातील विटंबित द्रौपदी हे भारतमातेचे रूपक म्हणून दाखविली आहे. नाटकांचा स्वातंत्र्य चळवळीसाठी उपयोग होण्याचे पर्व इथूनच सुरू झाले. आर्. एस्. मनोहर यांनी लंकेश्वर, शनीश्वर या नाटकांत पौराणिक कथांना वेगळी कलाटणी देऊन खलनायकांना नायकांच्या रूपात सादर केले.

कन्नैय्या कंपनी आणि नवाब राज मणिकम् ही तमिळ रंगमंचाला भरीव लेणे देणारी आणखी दोन नावे. कन्नैय्या कंपनीने उत्कृष्ट नेपथ्यांची देणगी दिली.

नवाब, राज मणिकम् यांच्या कंपनीत त्यांच्याशिवाय इतर कलावंत ही मुलेच होती, कृपणलीला, अध्यपन इत्यादी त्यांची नाटके अत्यंत लोकप्रिय झाली. श्री· मुदलियार यांना 'ग्रँड ओल्ड मॅन ऑफ तमिळ थिएटर' म्हणतात. ते नाटककार' दिग्दर्शक आणि नटही होते. (१९३५) वाय. जी. पार्थसारथी हे तर तमिळ रंग" मंचाचे भीष्माचार्य मानले जातात. सामाजिक जाणिवेचे युग सुरू करण्यात त्यांचा फार मोठा वाटा आहे. तसेच टी. के. शणमुखम् बंधूंनीही तमिळ रंगमंचावर सामाजिक जाणिवेची अनेक नाटके सादर केली. 'गुमास्ता विनियेन' (कारकुनाची मुलगी) या नाटकात श्रीमती अवय्या यांनी हुंडयाच्या रूढीला कडाडून विरोध केला, आपल्याकडे कर्णाच्या जीवनावर तीन नाटके आली. तमिळमध्ये 'तेरेही मखन' हे नाटक कर्णाच्या जीवनावरच आहे. हे नाटक बी. एम्. रामय्या यांनी लिहिले व सादर केले. एम्. आर्. राधा यांनी लिहिलेली पौराणिक कथानकांचे आधुनिक अर्थ लावणारी नाटके इतकी प्रक्षोभक होती की त्यावर काही ठिकाणी बंदी आणण्यात आली. श्री. श्रीप्रकाश हे महाराष्ट्राचे राज्यपाल असताना राधा यांच्या रामायणावरील नाटकाला मुंबईत बंदी होती.

आदि लक्ष्मण या नाटककार दिग्दर्शकांची मी भेट घेतली, तेव्हा ते म्हणाले, 'आधुनिक तमिळ रंगमंचाच्या इतिहासात एस्. व्ही सहस्रनाम यांनी सामाजिक नाटकाचे नेतृत्व केले. आजचे आघाडीचे तमिळ नाटककार कोमल स्वामीनाथन् हे त्यांचेच शिष्य आहेत' तमिळ रंगमंचाचा आणखी एक विशेष म्हणजे तमिळनाडूचे करुणानिधी, अण्णा दुराई आणि एम्. जी. रामचंद्रन् हे तिन्ही मुख्यमंत्री रंगभूमीशी निगडीत होते. अण्णा दुराई यांनी नाटके लिहिली. तसेच करुणानिधी यांनी तमिळ नाटकांचा राष्ट्रीय जागृतीसाठी उपयोग करून घेतला. एम्. जी. आर हे बॉईज कंपनीच्या नाटकांतून कामे करीत होते. श्री. गणेशन् यांना छ. शिवाजीची उत्कृष्ट भूमिका केल्याबद्दल शिवाजी गणेशन् हे नाव पडले अलीकडच्या काळात मौली आणि विसू यांनीही भरीव कामगिरी केली आहे, असे मला बालू या नव्या पिढीच्या नाटककारांनी सांगितले. श्री. बालू यांची आतापर्यंत बारा नाटके रंगमंचावर आली आहेत. ते म्हणाले की, 'पद्मव्यूहम्' हे मौली यांचे गूढ कथात्मक नाटक विशेष लक्षणीय आहे. १९७१ साली तमिळ रंगभूमंचावर आलेल्या 'फ्लाईट १७२' या नाटकात असे दाखवले आहे, की तातडीच्या कामासाठी सहा व्यक्ती मुंबईला जाण्यासाठी मद्रास विमानतळावर येतात, पण विमानाचे उड्डाण वारंवार रद्द होते. दरम्यान हे सहाजण आपसात बोलत राहतात. ते ज्या कामासाठी मुंबईस जाणार असतात, ती कामे आपसात बोलून विमानतळावरच होतात, शेवटी विमान जेव्हा खरोखरच निघण्यास तयार होते तेव्हा हे सहाजण आपली मुंबईची भेट रद्द करतात !'

के. कन्नन या तरुण नटालाही मी भेटलो, त्यांनी आतापर्यंत ९०० प्रयोगांतून

प्रमुख भूमिका केल्या आहेत. त्यांचे 'पास मार्क' हे नाटकही मी पाहिले. कॉलेजच्या परीक्षेत निदान पास मार्क मिळावेत म्हणून एका तत्त्वनिष्ठ प्राध्यापकाकडे अनेक धनिक वशिला लावण्याचा प्रयत्न करतात. पण प्राध्यापक त्यांना नकार देतात. मात्र दारिद्र्यामुळे स्वतः प्राध्यापक जीवनाच्या परीक्षेत पास मार्कही मिळवू शकत नाहीत, असे या नाटकाचे कथानक आहे. हौशी रंगमंचाचे हे नाटक श्री. बालू यांनी लिहिले आहे.

कोमल स्वामिनाथन् हे आधुनिक तमिळनाडूचे एक अत्यंत प्रभावी नाटककार आहेत. ते राजकीय कार्यकर्ते होते. डाव्या पक्षाचे कार्य करीत असतानाच त्यांच्यावर एका खुनाचा बनावट आरोप पोलिसांनी ठेवला आणि ते भूमिगत झाले. त्याला आता वीस वर्षे झाली पण त्या विलक्षण अनुभवातून नंतर 'फ्रेंडस्' या नावाची त्यांनी नाट्यसंस्था चालविली आहे. तिचे नाटककार, दिग्दर्शक व सूत्रधार तेच आहेत. प्रखर सामाजिक जाणीवेची नाटके ते लिहितात आणि सादर करतात. मद्रासमध्ये मी त्यांना भेटलो. त्यांनी मला आपल्या 'तन्नीर, तन्नीर' (पाणी पाणी) या नव्या नाटकाचे निमंत्रण दिले. एक महिन्यात त्यांनी या नाटकाचे सव्वीस प्रयोग केले. हे नाटक काहीसे आत्मचरित्रात्मक असल्याने अस्सल अनुभवातून आले आहे.

पडदा उघडण्यापूर्वीच हे नाटक सुरू होते. पडद्याबाहेरच एक तरुण भटक्या गावकऱ्याला रस्त्यावर विचारतो, 'इथं जवळपास गाव आहे का ? मला पाणी हवंय. अन्न हवंय.' तो खेडूत एका दिशेने बोट दाखवून सांगतो, 'या बाजूनं गेलास तर गाव लागेल.' मग पडदा उघडतो. तो त्या दिशेने जातो. त्याला गाव लागते. रंगमंचावर झोपड्यांचा उत्तम सेट आहे. तीन झोपड्यांच्या मध्ये चव्हाटा. तो तरुण तेथे बसतो. गावकरी त्याला पाणी देतात. नाव विचारतात. तो आपलं नाव रंगनाथन् असं सांगतो. बोलता बोलता त्याला कळतं गावात पाण्याचं दुर्भिक्ष्य आहे. तो उत्साहानं म्हणतो, 'मी तुमच्या गावाला पाणी आणून देईन.' बरेच परिश्रम करून तो गावापासून सात मैलांवर खोदून पाणी काढतो. आता तिथून गावापर्यंत कालवा खणण्याचं काम गावकरी हाती घेतात.

इतक्यात निवडणूक येते. पण आलेल्या राजकीय दादांना गावकरी सांगतात, 'आमच्या पाण्याचा प्रश्न तुम्ही कित्येक वर्षे सोडवला नाही. म्हणून निवडणुकीवर आमचा बहिष्कार.' याच सुमारास वृत्तपत्रात बातमी येते, की खुनाचा आरोप असलेला एक राजकीय कैदी भूमिगत आहे. त्याचे वर्णन रंगनाथनशी बरोबर जुळते. गावकरी त्याला विचारतात. तोही कबूल करतो की, 'पोलिसांना हवा असलेला तरुण तो मीच. पण मी खून केलेला नाही.' गावकरी एकमतानं ठरवतात की तो खुनी असो वा नसो, पण ज्यानं आपल्या गावाला पाणी दिलं, त्याला पोलिसांच्या ताब्यात द्यायचं नाही.

गावानं निवडणुकीवर बहिष्कार घातल्यानं राजकीय दादा चिडतात आणि , सरकारी परवानगी न घेता कालवा खणायला सुरुवात केली.' या सबबीवर कालव्याचं काम सक्तीनं बंद करतात. याच सुमाराला गावातल्या एका तरुणीचा विवाह एका पोसलिबरोबर होतो. वास्तविक ती नायक तरुणावर आसक्त असते; पण तो नोकरीविना असल्यानं घरच्या लोकांचा विरोध होतो. लग्नानंतर ती आपल्या नवऱ्याला त्या तरुणाची राजकीय पार्श्वभूमी सांगते पण त्याला अटक करू नका म्हणून नवऱ्याची विनवणी करते. 'कालवा खणून गावात पाणी आलं; की मगच मी त्याला अटक करीन' असं आश्वासन पोलीस आपल्या बायकोला देतो. कालवा पूर्ण होण्यापूर्वी एकच रात्र ती रंगनाथनला पोलिसांच्या या बेताची कल्पना देते. तो पळून जातो. ओसाड भागातून धावता धावता त्याला अतिशय तहान लागते. तो 'तन्नीर, तन्नीर' (पाणी, पाणी) म्हणून ओरडतो. पण त्याला पाणी मिळत नाही. ज्याने सबंध गावाला पाणी दिले, तो अखेर पाण्यावाचून तडफडून मरण पावतो.

कोमल स्वामिनाथन् यांनी २६ नाटके लिहिली असून ती सर्व सामाजिक संदर्भ असलेली नाटके आहेत. 'चुदिया पार्दै' (नवा रस्ता) या त्यांच्या नाटकात त्यांनी एका खेड्याजवळून जाणाऱ्या नव्या रस्त्याची कहाणी सांगितली आहे. नवा रस्ता येणार असल्याने ग्रामीण भागात होणारी क्रांती, तिला विरोध करणारे सनातनी, त्या रस्त्यांची कामे मिळवून स्वतःची तुंबडी भरणारे कंत्राटदार आणि अपुऱ्या वेतनातूनही कंत्राटदाराला कमिशन देऊन अर्धपोटी राहणारे कामगार यांचे विदारक चित्र त्यांनी या नाटकात रेखाटले आहे. या नाटकात तीस कलाकार काम करतात. 'स्वर्गभूमी' या नाटकात त्यांनी नक्षलवाद्यांचे जीवन रंगविले आहे. त्यांच्या दोन नाटकांना सेन्सॉरने परवानगी नाकारली होती. तन्नीर आणि स्वर्गभूमी ही ती दोन नाटके होत. पण त्यावेळी तमिळ लेखक व पत्रकार स्वामिनाथन् यांच्यामागे खंबीरपणे उभे राहिले आणि त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे सरकारला ही बंदी उठवावी लागली. स्टेज फ्रेंडस या आपल्या नाट्य-संस्थेमार्फत स्वामिनाथन् यांनी आतापर्यंत सोळा नाटके सादर केली असून त्यांनी बाकीची नाटके इतर संस्थांना दिली आहेत. तीन महिन्यांचा नाट्यविषयक अभ्यासक्रमही त्यांनी नव्या कलाकारांसाठी चालू केला आहे.

'चेक मॉडिगल' (तेल्याचा बैल) या नाटकात स्वामिनाथन् यांनी तंजावर जिल्ह्यातील शेतमजुरांचा प्रश्न हाताळला आहे. शेतीत कितीही सुधारणा झाल्या, तरी अगदी तळचा मजूर अद्यापही तेल्याच्या घाण्याप्रमाणे डोळे बांधून एकाच रिंगणात फिरत आहे हे त्यांनी या नाटकात प्रभावीपणे दाखविले आहे. एक हरिजन जमीनदार झाल्यावर आपल्या हरिजन बांधवांच्या बाजूने उभा न राहता जमीन-

दारांची बाजू घेतो. जाती-व्यवस्थेपेक्षा अर्थव्यवस्था अधिक क्रूर आणि अधिक घट्ट पाय रोखून बसलेली आहे याचा साक्षात्कारही या नाटकात होतो.

तमिळमध्ये मनोहर, पूर्णम्, विश्वनाथन्, सुंदर राजन् अशी काही नाट्य-पथके पारंपरिक नाटके २५ ते ५ रु. दराची तिकिटे लावून सादर करतात. खुद्द मद्रासमध्ये ' म्युझिक अ‍ॅकॅडमी 'चे प्रेक्षागृह सर्वांत मोठे व सुसज्ज असून त्यात दीड हजार प्रेक्षक बसण्याची सोय आहे. मात्र हे नाट्यगृह मुख्यतः संगीतासाठी असून ते मिळविण्यात नाटक व नृत्य यांच्या कार्यक्रमांना दुसऱ्या क्रमांकाची पसंती असते.

❊ ❊

# ९ : महाराष्ट्र-तमिळनाडूचे जिव्हाळ्याचे संबंध

तमिळनाडू आणि महाराष्ट्र यांचे फार पूर्वीपासून जिव्हाळ्याचे संबंध आहेत. हे दोन्ही प्रांत परंपरा मानणारे, धार्मिक आणि देशाविषयी जाज्वल्य अभिमान बाळगणारे. तीनशे वर्षांपूर्वी तंजावर येथे व्यंकोजीराव आले आणि त्यानंतर सरफोजी आणि इतर मराठी राजांची राजवट आली. त्या भरभराटीच्या काळात तंजावर भागात शेकडो मराठी कुटुंबे आली. ब्रिटिश अमदानीत तंजावरचा पडता काळ सुरू झाला व मद्रासची झपाट्याने प्रगती झाली. मग कोकणचे लोक मुंबईकडे उदरनिर्वाहासाठी आणि नशीव काढण्यासाठी खेचले जाऊ लागले, तसेच तंजावर भागातले मराठी लोक मद्रासकडे जाऊ लागले.

तमिळनाडूत सध्या सुमारे अडीच लाख मराठी लोक कायम वस्ती करून राहिले आहेत. मात्र त्यांनी तमिळ ही आपली भाषा केली आहे. घरात अजूनही यातील बहुतेक लोक मराठी आणि तमिळ भाषा बोलतात. पण बाहेर शाळेत, कॉलेजात, दुकानात, कचेरीत अन्यत्र तमिळ भाषाच बोलावी लागते. अनेक पिढ्या या भागात गेल्याने या लोकांची नाव लिहिण्याची पद्धतीही बदलली. एम्. जी. रामचंद्रन् या धर्तीवर. आता मद्रासला अनेक तपे स्थायिक झालेले रघुनाथ आपटे आता ए. रघुनंदन आणि अनंतराव भोसले बी. अनंतराव असे नाव लावतात

खुद्द मद्रास शहरात सुमारे चारशे मराठी कुटुंबे आहेत. त्यांचे मराठीपण जोपासण्याचे काम महाराष्ट्र मंडळ करते. महाराष्ट्रातून येणाऱ्या मराठी भाषिकांची राहण्या–जेवण्याची सोय आणि कोणी वक्ता अगर गायक–वादक आला तर त्याचे कार्यक्रम या महाराष्ट्र मंडळातर्फे होतात. गणेशोत्सव, दिवाळी असे आपले सण समारंभही महाराष्ट्र मंडळात होतात. मद्रास महापालिकेच्या मदतीने एक मराठी शाळा चालविली जाते. पण व्यवहारात तमिळ भाषेचाच मान आणि उपयोग असल्याने या शाळेला फारसा प्रतिसाद मिळत नाही.

श्री. का. श्री. श्रीनिवासाचार्य, दादा मिरासी, श्रीधर लिमये अशी अनेक मराठी मंडळी समाजात मानाचे स्थान मिळवून आहेत. श्री. दादा मिरासी यांनी तमिळ व तेलगू भाषेत चाळीसवर चित्रपट निर्माण करून मद्रासला मराठी निशाण उंच फडकावले आहे. उद्योगधंद्यातही मराठी मंडळी चांगली स्थिरावली आहेत. स्थानिक लोकांचे सहकार्य मिळवण्याबाबत यशस्वी झाली आहेत. मराठी माणूस महाराष्ट्राबाहेर पडल्यावर अधिक कर्तृत्ववान होतो, असे मला दक्षिणेच्या दौऱ्यात आढळले.

मद्रासच्या महाराष्ट्र मंडळाच्या तुलनेने मुंबईच्या तमिळ संघाचे कार्य अधिक व्यापक आहे. तमिळ संघाला मी दोन वेळा भेट दिली आहे. त्यांची नाटके, त्यांची इमारत आणि कामे खूपच छाप पाडणारी आहेत. तमिळ संघाचा नाट्य-महोत्सव षण्मुखानंद हॉलमध्ये होतो आणि संस्थेला दीड–दोन लाख रुपये फायदा होतो. तमिळ संघाची एक वर्षाची स्मरणिका मी पाहिली. ती दोनशे पृष्ठांची होती आणि तिचे जाहिरातीचे उत्पन्न दीड लाखांवर होते. तसिळ भाषिक लोक मुंबईतील मोठमोठ्या उद्योगधंद्यांत मोक्याच्या जागी असल्याने संस्था संपन्न आहे. अलीकडेच संघाने प्रसिद्ध देशभक्त आणि तमिळ कवी भारती सुब्रह्मण्यम् यांच्या स्मरणार्थ मुंबईत बांधलेल्या इमारतीचे उद्‌घाटन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हस्ते झाले. मुंबईत जेवढी तमिळ नाटके होतात त्याच्या दहा टक्केही मराठी नाटके मद्रासमध्ये होत नाहीत.

बंगालप्रमाणेच तमिळनाडूतही स्वभाषेचा जाज्ज्वल्य अभिमान आहे.दक्षिणेत हिंदी रुजविण्यात खुद्द पं. नेहरूंचे प्रयत्नही कमी पडले. तमिळ, तेलगू, मल्याळी भाषिकांनी हिंदीचा स्वीकार तर केला नाहीच, पण हिंदीशी फटकून वागण्यात यश मिळविले. त्यात स्वभाषाभिमानाप्रमाणेच एक फार मोठा व्यावहारिक स्वार्थही होता आणि अद्याप आहे, तो असा, की दाक्षिणात्यांचे इंग्रजी उत्तरेच्या मानाने चांगले असते, त्यामुळे दाक्षिणात्यांना कारकुनापासून आय. ए. एस. सारख्या वरिष्ठ परीक्षा व नोकऱ्यांत प्राधान्य मिळते. एकदा का इंग्रजी ऐवजी हिंदी स्वीकारली, की उत्तरेचा सासुरवास येईल या आंतरिक भीतीनेही दक्षिणेने हिंदीला दूरच ठेवले. जागतिक तमिळ परिषदेत तमिळ भाषेचे पोवाडे गायिले जातातच पण ती जगातील आद्य भाषा आहे असाही आग्रह धरला जातो. तमिळ परिषदेची काही अधिवेशने इंग्लंड-अमेरिकेसारख्या परदेशांतही झाली आहेत. मद्रासमध्ये काही चौकशी केली तर ती हिंदीतून करून उत्तर मिळत नाही, इंग्रजीतून करावी लागते. मुंबईत मात्र हिंदी ही आता एक प्रमुख भाषा झाली आहे. तीत गुजराती, मराठी, इंग्रजी शब्द घुसडले जातात. अनेक मराठी भाषिकही चमत्कारिक मिश्रणांची हिंदी–मराठी भाषा मुंबईतील अमराठी लोकांशी बोलतात, मद्रासमध्ये हे

चालत नाही, तिथे आणि सबंध तमिळनाडूत, एवढेच नव्हे तर जगात जेथे तमिळ भाषिक असतील तेथे शुद्ध तमिळचाच वापर होतो.'

राजकीय क्षेत्रात तमिळनाडू (पूर्वीचे मद्रास राज्य) आणि महाराष्ट्र यांचा अनेक तपांचा जिव्हाळयाचा संबंध आहे. लोकमान्य टिळकांचा फार मोठा प्रभाव मद्रासवर होता आणि आता जागतिक कीर्ती मिळवलेले 'हिंदू' हे 'केसरी'च्या धर्तीवरचे जाज्वल्य देशाभिमानी दैनिक होते, ब्रिटिशांवर अत्यंत कडक टीका केल्यामुळे ब्रिटिश सरकारने हिंदूवर बंदी आणली, तेव्हा लोकमान्यांनी हिंदूचे संपादक श्री. कस्तुरी रंगा यांना संदेश दिला की त्यांनी व्याख्याने देऊन 'हिंदू'चे कार्य पुढे चालू ठेवावे. त्याप्रमाणे कस्तुरी रंगा यांनी भाषणांच्याद्वारे जनजागृती केली. डॉ. राधाकृष्णन्, राजगोपालाचारी, माजी राष्ट्रपती गिरी, अशा तमिळ-नाडूच्या कित्येक नेत्यांनी महाराष्ट्राशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध ठेवले होते.

अच्युत बळवंत कोल्हटकर (संदेशकार) यांच्यावर ब्रिटिश सरकारची वक्र नजर फिरली, तेव्हा ते मद्रासला गेले. तेथे त्यांनी अज्ञातवासात दोन वर्षे काढली. पण त्यांचे देशकार्य चालूच होते. मद्रासला ते बी. विश्वनाथ या नावाने एका पेढीवर काम करीत आणि तिथून मराठी वृत्तपत्रांना जळजळीत देशभक्तीपर लेख पुरवीत. या अज्ञातवासानंतर त्यांनी महाराष्ट्रात येऊन विख्यात 'संदेश' हे स्वतःचे वृत्तपत्र सुरू केले.

मद्रास शहराला 'क्वीन ऑफ साऊथ' म्हणतात तर मुंबईला 'अर्ब प्रायमा इन्द' म्हणजे 'भारतातील पहिल्या क्रमांकाचे शहर' हा मान मिळाला आहे. वि. स. खांडेकर, मामा वरेरकर इत्यादी मराठी लेखकांच्या पुस्तकांचे अनुवाद तमिळमध्ये झाले आहेत व थिरुचलसारख्या तमिळ कवींच्या कवितांचे मराठीत अनुवाद झाले आहेत.

भाषा आणि संस्कृती याबाबत महाराष्ट्राची आणि तमिळनाडूची विशेष जवळीक आहे. मुंबईच्या तमिळ संघात मुंबई मराठी साहित्य संघातर्फे मराठी भाषेचे वर्ग घेण्यात येतात. तमिळनाडूत स्थायिक झालेले सर्व मराठी भाषिक उत्तम तमिळ बोलतात व लिहितात. काकासाहेब खाडिलकरांनी 'कीचकवध' नाटक लिहून क्रूर ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून भारतरूपी द्रौपदीची होणारी विटंबना प्रखर-पणे मांडली. तसेच सुप्रसिद्ध तमिळ कवी भारती सुब्रह्मण्यम यांनी 'पांचाली शपथम्' हे त्याच विषयावरचे नाटक तमिळमध्ये लिहून लोकजागृती केली. तंजा-वरच्या 'सरस्वती महाला'त मराठी संस्कृतीच्या दक्षिणेवरील प्रभावाच्या काही खुणा पाहायला मिळतात. मद्रासचे चित्रपट महाराष्ट्रात लोकप्रिय झाले आहेत आणि हेमामालिनीसारख्या कित्येक वर्षे प्रथम क्रमांकावर राहिलेल्या अभिनेत्रीने मुंबई हीच आपली कर्मभूमी केली आहे. विख्यात गायिका सुब्बलक्ष्मी मद्रासच्याच.

भरत नाटयम्सारख्या दाक्षिणात्य नृत्यांचे अनेक कार्यक्रम मुंबईत सतत होत राहतात.

महाराष्ट्र आणि तमिळनाडूमध्ये मुलांच्यावर जवळ जवळ सारखेच संस्कार होतात. पण तमिळनाडूची काही खास वैशिष्टये आहेत. गृहिणी पहिल्या वेळी गरोदर राहिल्यानंतर तमिळनाडूत तिसऱ्या किंवा चौथ्या महिन्यात एक धार्मिक विधी करतात. त्याला पुंसवन म्हणतात. पहिला पुत्र व्हावा म्हणून हा विधी करण्यात येतो. त्या दिवशी गरोदर स्त्री उपास करते आणि तिची आई किंवा इतर ज्येष्ठ सुवासिनी तिच्या उजव्या नाकपुडीत केळीच्या बुंध्याचा रस घालते. सीमंतनयन हा समारंभ आपल्याकडे वाडी भरतात तसाच काहीसा असतो. मात्र दक्षिणेतील सीमंतनयनांच्यावेळी पती स्वत: गर्भवती पत्नीचे केस विंचरून भांग पाडतो, मुलाच्या जन्मानंतर बारशाचा समारंभ आपल्यासारखाच असतो. मूल जेव्हा दुधासारख्या पातळ पेयाकडून भातासारख्या अन्नाचे भक्षण करण्यास समर्थ होते, तेव्हा त्याला अन्नप्रसान नावाच्या समारंभाने पहिला भात भरवला जातो. नंतर 'निष्क्रमण' नावाचा समारंभ होतो. यावेळी मुलाला प्रथमच घराबाहेर नेण्यात येते. कुडकटम नावाच्या विधीत मुलाचे प्रथमच केस कापले जातात. आपल्याकडे जावळ काढतात. तमिळनाडूत मात्र मुलाला शेंडीजवळ थोडा घेरा ठेवून बाकीचा गोटा करतात. विद्यारंभ नावाचा विधी विशेष महत्त्वाचा आणि भविष्यात उपयोगी पडणारा असतो. मुलाला पाचवे वर्ष लागले की केळीच्या पानावर तांदूळ पसरले जातात आणि मुलाच्या बोटाला धरून पिता त्याला तांद-ळात अक्षर काढायला शिकवतो. मुंज विधी आपल्याकडे असतो, तसाच असतो.

अध्यात्माच्या क्षेत्रात बंगाल आणि महाराष्ट्र यांची जवळीक आहे तशीच तमिळनाडू आणि महाराष्ट्र यांचीही आहे अरविंद आश्रमात तसेच अड्यार येथील थिऑसॉफी आश्रमात अनेक मराठी भाषिक साधक आहेत. इतकेच नव्हे, तर मुंबईला ब्लॅव्हस्की लॉज आणि थिऑसॉफी लॉज ही मोठी केंद्रे आहेत, योगी अरविंद हे राजकारणातून निवृत्त होऊन अध्यात्माकडे वळले ते श्री. विष्णू भास्कर लेले या मराठी साधूच्या मार्गदर्शनामुळे. पाँडेचरी येथील आश्रमात सार्वजनिक संबंध अधिकारी आहेत ते नागपूरचे मराठी भाषिक.

तमिळनाडूत महाराष्ट्रीयांचे परम पवित्र तीर्थक्षेत्र रामेश्वर आहे. दरसाल हजारो मराठी भाषिक रामेश्वरला यात्रेला जातात. शिवाय तिरुपती, शबरी मलाई या देवस्थानांनाही हजारो मराठी भाषिक जातात. त्या राज्यातील मीनाक्षी मंदिरासारखी अनेक इतर, प्रेक्षणीय मंदिरेही पाहतात. सारांश महाराष्ट्र आणि तमिळनाडू या राज्यांतील जनतेत अनेक सांस्कृतिक, आध्यात्मिक स्नेहसंबंध आहेत आणि परस्परांच्या भेटीगाठींनी ते अधिक दृढ होतील.

❋ ❋

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
६२३
२३५९०
भूप्रवास २३।७।८२

# १० : परस्पर विरोधांचे केरळ राज्य

केरळविषयी मला फार पूर्वीपासून कुतूहल होते. निसर्गरम्य, सुशिक्षित, उद्योगी आणि नृत्यासारख्या कलांत अग्रेसर असलेल्या या राज्याला भेट द्यावी असे अनेकवार मनात येऊनही काही ना काही कारणाने आतापर्यंत ते जमले नव्हते. पण भारतातील निरनिराळ्या राज्यांतील प्रेक्षणीय स्थळे पाहून त्या भागातील लेखक, संपादक व प्रकाशक यांना भेटण्याची योजना माझी मीच गेल्या वर्षी आखली. त्या योजनेनुसार गेल्या वर्षी कलकत्त्याला जाऊन आलो. ती सफर अत्यंत फलदायी झाली. म्हणून या वर्षी केरळला जाण्याचे प्रस्थान ठेवले. त्यातही चांगला योग म्हणजे 'युसिस्' मधील माझे सहकारी श्री. चंद्रन हेही शबरीमलाईच्या यात्रेसाठी केरळमध्ये जाणारच होते. तेव्हा त्यांच्या तेथील वास्तव्यातच मीही यावे अशी सूचना त्यांनी केली. त्या भागातील माहितगार असला तर स्थानिक लेखक– प्रकाशकांना भेटणे सुलभ होईल म्हणून मी त्यांच्यावरोबरच केरळमध्ये जायचे ठरवले. त्याप्रमाणे मी मद्रासला गेल्यावर ते मला तेथे भेटले आणि एका दुपारी वैगाई एक्सप्रेसने आम्ही निघालो.

ही गाडी तमिळनाडूची खास गाडी आहे. ती मदुराईला जाते. आपल्याकडे डेक्कन क्वीन या गाडीची जशी खासियत असते तशी या वैगाई एक्स्प्रेसची तमिळ-नाडूत आहे. वैगाई आणि कावेरी या त्या भागातील दोन प्रमुख नद्या. वैगाईने आम्ही त्रिचनापल्लीला उतरलो आणि तिथं एक दिवस मुक्काम करून दुसऱ्या रात्री केरळमधील त्रिचूर या गावी जाण्यासाठी निघालो.

दिवस उजाडताच कोईमतूर हे कापडाबद्दल प्रसिद्ध असलेले गाव लागले. स्टेशनवर सकाळीच इडली, मेदूवडा, सांबार आणि कॉफी हे अगदी गरम जिन्नस मिळाले. अर्थात केवळ यावरूनच आपण दक्षिणेत आलो असे मानण्याचे कारण

नाही. आता हे खाद्यपदार्थ भारतात तर सर्वत्र मिळतातच, पण परदेशातही अनेक ठिकाणी मिळतात.

कोईमतूरहून आमची गाडी निघाल्यावर साधारण तासाभराने एका जंगलातून ती चालली होती. श्री. चंद्रन यांनी सांगितले, हे जंगल इतके दाट आहे की अजूनही तिथे रानटी हत्तींचे कळप आढळतात. गेल्या वर्षी पहाटे एक आगगाडी या भागातून जात असता रुळावर झोपलेल्या दोन हत्तींना तिची ठोकर लागून ते मरण पावले. त्यांचे अवजड देह बाजूला करण्यासाठी गार्ड–ड्रायव्हर व त्यांचे मदतनीस यांना बरेच कष्ट पडले. ते मृत हत्ती बाजूला केले जात असतानाच जंगलातील रानटी हत्तींच्या कळपाला आपले दोन हत्ती मेल्याची कशी तरी चाहूल लागली. त्याबरोबर खवळलेल्या तीस–चाळीस हत्तींचा तांडा गाडीवर हल्ला करण्यासाठी धावत आला. तोच ड्रायव्हरचे त्यांच्याकडे लक्ष गेले. त्याने शिट्टया वाजवून बघ्या उतारूंना गाडीत चढण्याची खूण केली आणि गाडी जास्तीत जास्त वेगाने चालवून धावत येणाऱ्या हत्तींना शिताफीने मागे टाकले. रुळावर हत्ती पडून गाडी थांबली होती तेव्हा जर हा तांडा आला असता तर गाडीची आणि प्रवाशांची काही धडगत नव्हती !

केरळमधील अनेक गावांत धार्मिक कार्यात अजूनही हत्ती दिसतात. वीस–पंचवीस मैल कोणत्याही दिशेने कुठेही प्रवास केला तरी एक–दोन हत्ती आढळतातच बहुतेक देवळांच्या आसपास हत्ती आहेत. जंगलात तर लाकडे वाहून नेणे, अर्धी कापलेली मोठी झाडे ओढून पाडणे यासाठी मुख्यतः हत्तींचाच उपयोग केला जातो. महत्त्वाच्या धर्मगुरूंचे किंवा मंदिरांचे हत्ती दागिन्यांनी आणि कधी चांदीच्या तर कधी सोन्याचे पाणी दिलेल्या चांदीच्या दागिन्यांनी शृंगारलेले असतात.

सकाळी दहाच्या सुमाराला आम्ही त्रिचूरला पोचलो. स्टेशनवरून चालतच मी आणि चंद्रन गावात निघालो. कारण चँडीज् टूरिस्ट होममध्ये मला उतरायचे होते आणि ते हॉटेल स्टेशनपासून फक्त पाच मिनिटांच्या रस्त्यावर होते. केरळ आणि गोवा यांत विलक्षण साम्य आहे. त्रिचूर हे गाव तर मला थेट मडगावासारखे वाटले. केळी, नारळ आणि भाताची पिके यांनी हिरवागार झालेला आसमंत, भरपूर नद्या, ओढे, तळी हिरव्या पानांतून डोकावणारी छोटी घरे, अरुंद रस्ते अधून मधून नारळीच्या टोकाच्या मागे दिसणारी चर्चच्या मनोऱ्यांची शिखरे हे सारे गोव्यासारखे होते. मात्र केरळकर आणि गोवेकर यांच्या पोषाखांत फार फरक आहे. गोव्यावर पाश्चात्यांची छाप तर केरळमध्ये अगदी गणवेषासारखे कपडे. पांढरा शर्ट, पांढरी अर्धी लुंगी. अगदी 'फॉर्मल' व्हायचे तर अर्धी लुंगी खाली सोडून पायाच्या घोटयापर्यंत घ्यायची. पण असा प्रसंग क्वचित. स्त्रिया खास केरळीय पद्धतीच्या साडयांत. खेडयापाडयांतील स्त्रिया अजून काचोळ्या वापरीत

नाहीत. साडीचा पदर छातीवरून ओढून घेतात तेवढाच. स्त्रियांमध्ये फॅशन हा प्रकार जवळ जवळ नाहीच. राहणी अगदी साधी. बहुतेकींच्या पायांत पादत्राणे नसतात. त्याला एक दीर्घ इतिहास आहे, सांस्कृतिक परंपरा आहे. केरळ ही परशुरामांची भूमी असल्याने या पवित्र भूमीवर वहाणा घालून फिरणे योग्य नाही अशी रूढी आहे.

खरे तर केरळला समजून घ्यायचे, तर या लोकांचा इतिहास आणि राज्याचा भूगोल लक्षात घेतला पाहिजे. या दोन्हींच्या पार्श्वभूमीवर हे भारतातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि मनोरंजक राज्य आहे हे पटते. वास्तविक, केरळ हे एक छोटे राज्य आहे. फक्त अडतीस हजार चौरस मैलांचे आणि दोन कोटी तेरा लक्ष वस्तीचे. लक्षद्विप (अरबी) समुद्र एकीकडे असल्याने विकासाच्या दृष्टीने ती बाजू बंदच. त्या किनाऱ्याने अडचणीत उभी असलेली एक पट्टी म्हणजे केरळ. लोकवस्ती भारतात सर्वांत अधिक. देशाची एक टक्का जमीन असलेल्या या राज्यात देशातील चार टक्के लोक राहतात. देशाचे सरासरी प्रमाण दर चौरस मैलास १७८ लोकांचे आहे, पण केरळात ते ५४९ म्हणजे चौपट आहे ! भौगोलिक दृष्टचा बराचसा भाग डोंगराळ. पण पाण्याने या राज्याला चांगला हात दिला आहे. त्यामुळे भात, रबर, नारळ, केळी यांनी तो समृद्ध आहे. ३६० मैलांचा किनारा आहे म्हणून मासेही भरपूर सापडतात. पण लोकांच्या मनावर हजारो वर्षांचा धार्मिक पगडा, त्यामुळे शाकाहार हाच प्रमाण.

धार्मिकतेत केरळचा क्रम भारतात पहिला लागेल. साक्षरतेतही हे राज्य अग्रभागी आहे. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सवलती इथे मिळतात. दक्षिण भारतीय नृत्यांची प्राचीन परंपरा या राज्याने केवळ जिवंतच ठेवली नाही, तर विकसित केली. भारतात आणि परदेशांतही तिचा ध्वज फडफडत ठेवला. अगस्तीसारखे ऋषी, परशुरामासारखे पराक्रमी योद्धे आणि आद्य शंकराचार्यांच्यासारख्या संस्कृति–कौस्तुभांची ही भूमी. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात या भागात मोती सापडतात असे म्हटले आहे. कौटिल्याचा काल ख्रिस्तपूर्व चार शतके आहे. युरोप व अशियातील देशांना या भागातून प्राचीन काळापासून वेलदोडे, मिरी, दालचिनी, खोबरे, सुपारी वगैरेंचा पुरवठा होत होता. ट्रॅफलगारच्या लढाईत जी जहाजे वापरली गेली, त्यांपैकी कित्येकांच्या बांधणीसाठी केरळमधले लाकूड वापरले गेले होते. रोमन साम्राज्यातही केरळहून आणलेले मोती आणि हिरे सम्राटांना नजर केल्याचे उल्लेख आहेत. केरा (नारळ) या शब्दावरून राज्याचे नाव केराळा असे पडले.

ही परशुरामांची भूमी आहे असे मानण्यात येते. परशुराम हा विष्णूच्या दहा अवतारांपैकी एक. त्याला जेव्हा हा भाग दान म्हणून मिळाला, तेव्हा इथे पाणीच पाणी होते. परशुरामाने गोकर्णापासून कन्याकुमारीपर्यंत आपला परशू

टाकला आणि सागराचे पाणी हटले. त्या हटलेल्या पाण्यापासून आजचा केराळा निर्माण झाला अशी दंतकथा या भागात प्रचलित आहे. परशुरामक्षेत्र किंवा भार्गवक्षेत्र हेच या भागाचे प्राचीन नावही आहे. महाभारतात आणि रामायणात या प्रदेशाचे उल्लेख आहेत. सीतेच्या शोधार्थ सुग्रीवाने आपले दूत केराळात पाठविले होते. केराळा हा भाग लंकेच्या वाटेवरच आहे. महाभारतातही असा उल्लेख आहे, की चेरा देशाच्या राजाने कुरुक्षेत्राच्या युद्धासाठी बराच मालाचा साठा आणि सैन्य पाठवले होते. कालिदासानेही ' रघुवंशा 'त केराळाचे सुंदर वर्णन केले आहे. त्याशिवाय पद्मपुराण, मार्कंडेय, स्कंदपुराण अशा प्राचीन ग्रंथांतही केरळचे अनेक उल्लेख आहेत.

केरळसारखे परस्परविरोधांनी भरलेले राज्य भारतात दुसरे नाही. हे राज्य अत्यंत धार्मिक ! असे म्हणतात की कम्युनिझम हा धर्माचा शत्रू आहे. असे असूनही या अतिधार्मिक राज्यात कम्युनिस्टांचा प्रभाव असलेले डाव्या आघाडीचे सरकार आहे.

भरपूर भात पिकत असतानाही या राज्यात अपरंपार दारिद्र्य आहे. रबराचे जातीत जास्त उत्पादन (भारतातील रबर उत्पादनापैकी ९७ टक्के) या राज्यात होते तरीही इथले बहुसंख्य लोक अनवाणी चालतात. भारतात सर्वांत अधिक मासळी केरळच्या किनाऱ्यावर पकडली जाते. भारतात एकंदर जेवढी मासळी सापडते, त्यापैकी ३५ टक्के केरळच्या किनाऱ्यावरची असते. आणि भारत मासे परदेशी पाठवून जे परकीय चलन मिळवतो त्यापैकी ५८ टक्के केरळने मिळवलेले असते. इतक्या प्रचंड प्रमाणावर मासे सापडत असतानाही केरळचे बहुसंख्य लोक मासे खात नाहीत. ते शुद्ध शाकाहारी आहेत. भारतातील वेलदोडयांचे साठ टक्के उत्पादन केरळमध्ये होते, पण केरळी अन्नात वेलदोडयांचा वापर जवळजवळ शून्य आहे. या छोटयाशा राज्यात साडेसात हजार मोठे कारखाने आहेत. पण बहुतेक कारखाने संपाने ग्रासले आहेत. एकीकडे केरळीय लोक राज्यातील बेकारीला कंटाळून आखाती देशात मोठ्या प्रमाणावर जात असतानाच खुद्द राज्यातले कारखाने ओस पाडून ते घरी बेकार राहणे पसंत करतात ! ज्या तीन पक्षांचे मिळून आघाडीचे सरकार केरळमध्ये सत्तेवर आहे, त्या तिन्ही पक्षांना याची जाणीव आहे की आपण एकत्र राहिलो नाही तर सत्ता गमवावी लागेल. असे असूनही या तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांत जवळजवळ रोज मारामाऱ्या आणि दगडफेक चालूच असते !

केरळमध्ये काजूचे उत्पादन एवढे मोठे आहे की काजूची झाडे आणि कारखाने यांत दोन लाख कामगार काम करतात. त्यांपैकी नव्वद टक्के कामगार स्त्रिया आहेत. पण त्याही वारंवार संपावर जाऊन काजूधंद्याला खीळ घालतात. बसवाहतुकीचे राष्ट्रीयीकरण झालेले असूनही केरळातील रस्त्यावर धावणाऱ्या

पंच्याऐंशी टक्के बसेस् खाजगी मालकीच्या आहेत ! शिक्षणात अग्रेसर असलेल्या या राज्यात शबरीमलईच्या यात्रेत लोक आठ दिवस उपास करून अनवाणी डोंगर चढून जातात आणि आयप्पाचं दर्शन घेतात. या यात्रेसाठी दहा लक्ष लोक येतात. त्यात आय्. सी. एस्. अधिकारीच नव्हे तर इंग्लंड अमेरिकेत वास्तव्य करणारे शेकडो केरळीय खास यात्रेसाठी विमानाने येतात. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत मुलींचे प्रमाण ४२ टक्के आहे. ते भारतातील इतर कोणत्याही राज्यापेक्षा अधिक आहे. तरीही उत्तरेतील स्त्रियांच्या तुलनेने केरळमधील स्त्री ही बरीच घरगुती, केवळ गृहिणी म्हणून राहणारी आणि पुरुषांत कमी मिसळणारी आहे. अशा अनेक परस्परविरोधी प्रवाहांनी आणि घटनांनी हे चिमुकले राज्य भरून गेले आहे.

अशा या चमत्कृतीपूर्ण राज्यात काही दिवस राहून तेथील लेखक–संपादकांना भेटावे, शक्य तर काही नाटके पाहावी या उद्देशाने मी गेलो होतो. केरळमध्ये ज्या पहिल्याच गावी गेलो होतो ते त्रिचूर म्हणजे सांस्कृतिक दृष्टचा केरळमधील सर्वात महत्त्वाचे गाव. त्याची वस्ती फार मोठी नाही. फक्त दीड लाख आहे. पण त्यांचे सांस्कृतिक महत्त्व राजधानी त्रिवेंद्रमपेक्षाही अधिक आहे. भारत सरकारच्या साहित्य, नाटच, संगीत अकॅदमीच्या धर्तीवर केरळ राज्याने स्वतःच्या ॲकॅडमीज सुरू केल्या आहेत आणि त्या त्रिचूर येथेच आहेत. कथकली नृत्याचे भारतातील सर्वांत मोठे शिक्षणकेंद्र इथेच आहे. त्यात कथकलीचा दहा वर्षांचा प्रदीर्घ अभ्यासक्रम आहे.

या गावी शिव आणि पार्वती यांची दोन देवालये आहेत. त्यांच्यामध्ये मोठे मैदान आहे. दरसाल या दोन देवालयांच्या भक्तांत एक प्रचंड स्पर्धा चालते. ही स्पर्धा म्हणजे शोभेच्या दारूकामाची ! त्या रात्री त्रिचूरमध्ये जेवढचा विविध प्रकारचे आणि जेवढचा मोठचा प्रमाणावर शोभेचे दारूसामान उडते तेवढे भारतातच काय पण जगात इतरत्र कोठेही उडत नाही असे केरळातील लोक सांगतात. शिवकाशी येथे फटाक्यांचे मोठे कारखाने आहेत. पण त्रिचूर येथील शिकलगार बाण, चक्रे, निरनिराळचा मूर्ती, फटाके यांचे जेवढे कलात्मक काम करतात तेवढे शिवकाशीत काय पण इतरत्र कोठही होत नाही. त्रिचूरच्या शिकलगारांची कला शिकण्यासाठी अमेरिकेत दारूसामान तयार करणारे काही लोक आले होते. रात्रभर या भव्य मैदानावर दोन्ही देवालयांच्या भक्तांकडून चढाओढ सुरू होते. एकमेकातून अधिकाधिक दैदिप्यमान व शोभादायक दारूसामान उडणारे सात ते दहा टप्प्यांचे बाण या रात्री उडवतात. एका रात्रीत सहा ते सात लाख रुपयांचे दारूसामान त्रिचूरला या मैदानात उडते व पाच–पाच लाख लोक ते रात्रभर पाहतात.

मी या मैदानावर गेलो तेव्हा वर्षातून एकच वेळ वापरण्यासाठी पण वर्षभर तेथे कायम पुरलेले दीड–दोनशे लोखंडी खांब पाहिले त्या खांबांना बांधून शोभेचे बाण वर सोडले जातात. तसा हा धोक्याचाच खेळ ! कारण एका वर्षी लांब टप्प्यांच्या बाणांच्या जुडग्याचा कोन चुकला आणि ते बाण प्रेक्षकांत घुसले, तेव्हा आगीत तेरा लोक ठार व शंभरवर जखमी झाले होते. या उत्सवाच्या वेळी दोन देवालयांच्या हत्तींना शृंगारून त्यांची मिरवणूक निघते, ती अतिशय प्रेक्षणीय असते. अर्थात केरळमध्ये जाण्याचा माझा प्रमुख उद्देश प्रेक्षणीय ठिकाणे पाहण्यापेक्षा तेथील साहित्य, नाटक, लेखक पाहण्याचा असल्याने त्रिचूरला मी त्या दृष्टीने भेटीगाठी घेऊ लागलो.

सर्वसाधारण सुशिक्षित भारतीयाला इंग्रजी साहित्याची जेवढी माहिती असते, तेवढी भारतातील इतर भाषांतील साहित्याची नसते. इंग्रजी भाषा व साहित्य हा अभ्यासाचाच भाग शाळा व कॉलेजांतून असतो हे त्याचे प्रमुख कारण आहे. परप्रांतियांशी आपण फारसे मिसळत नाही व त्यांच्या भाषेचा अथवा साहित्याचा परिचय करून घेण्यावद्दल आपण उदासीन असतो हे दुसरे कारण. अलीकडेच मी केरळचा दौरा केला, त्या वेळी मला हे विशेष जाणवले. मल्याळी भाषा ही भारतातील एक प्रमुख भाषा. ती केरळची राज्यभाषा. नवव्या शतका-पर्यंत तमिळनाडू राज्याप्रमाणेच केरळची भाषाही तमिळ ही होती. पण नवव्या शतकात मल्याळी ही तमिळपासून अलग होऊन तिचे स्वतंत्र भाषेत रूपांतर झाले. दोन्ही भाषा द्राविडीच. हळूहळू मल्याळीने स्वतःची लिपीही विकसित केली.

तमिळ आणि संस्कृतच्या मिश्रणाने निर्माण झालेल्या या भाषेचे नाव नवव्या ते बाराव्या शतकापर्यन्त मणिप्रवलम् असे होते. कालांतराने याच भाषेला मल्याळम् असे नाव पडले. आज जगातील सर्व मल्याळी–भाषिकांची संख्या दोन कोटी वीस लक्ष आहे. त्यांपैकी पाच लाख मल्याळी भाषिक मुंबईत राहतात. भारतातील देशी भाषांतील पहिले प्रवासवर्णन मल्याळीमध्ये लिहिले गेले.

भारतातील सर्वात प्रदीर्घ कादंबरी मल्याळी भाषेत आहे. ती चार हजार पृष्ठांची असून ‘ विलासिनी ’ या नावाने श्री. व्ही. पी. मेनन यांनी ही कादंबरी लिहिली आहे. श्री. कोझीकोड यांचे तीन हजार पृष्ठांचे प्रवासवर्णन हे भारतीय भाषांतील सर्वांत दीर्घ प्रवासवर्णन आहे. साहित्य प्रवर्तक ही मल्याळी भाषेतील लेखकांची प्रकाशनसंस्था जगात अद्वितीय आहे, कारण ही संस्था दररोज एक पुस्तक प्रकाशित करते आणि ललित लेखकांना तीस टक्के व श्रमिक पुस्तकांच्या लेखकांना चाळीस टक्के रॉयल्टी देते. एवढी रॉयल्टी इतरत्र कोठेही देण्यात येत नाही.

अशा या वैशिष्ट्यपूर्ण भाषेतील प्रमुख लेखकांना व प्रकाशकांना भेटून गप्पा-गोष्टी कराव्यात म्हणून मी केरळमध्ये गेलो. प्रथम त्रिचूरला गेलो. कारण तेथे

राज्य सरकारची साहित्य अकॅडमी आहे. केंद्र सरकारच्या साहित्य अकॅडमीच्याच धर्तीवर ही राज्य सरकारची अकॅडमी काम करते. तिचा सुवर्णमहोत्सव नुकताच पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. गेल्या पंचवीस वर्षांत अकॅडमीने मल्याळी भाषा व साहित्य यांच्या विकासासाठी फार मोठे कार्य केले आहे. त्रिचूरच्या अकॅडमीच्या कचेरीत जाऊन मी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना भेटलो आणि संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. अकॅडमीची स्वतःची प्रशस्त इमारत, सभागृह आणि ग्रंथालय आहे. अकॅडमीचे व्यवस्थापक श्री. सुकुमारन नायर यांनी संस्थेच्या विविध कार्याची माहिती दिली. या इमारतीत ज्येष्ठ मल्याळी साहित्यिकांची भव्य तैलचित्रे लावण्यात आली आहे.

श्री. नायर म्हणाले, 'साहित्य अकॅडमीचे अंदाजपत्रक दहा लक्ष रुपयांचे आहे. अकॅडमीने आतापर्यंत दीडशे मल्याळी व पंधरा इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. त्याशिवाय अडीचशे ग्रंथांना प्रकाशनासाठी आर्थिक साहाय्य दिले आहे. आम्ही प्रकाशित केलेल्या ग्रंथांच्या एक ते पाच हजार प्रती काढल्या आहेत. तीन खंडांत प्रसिद्ध झालेली मल्याळी ग्रंथसूची हे आमचे एक महत्त्वाचे कार्य आहे.'

हे तीन खंड मी पाहिले आणि अकॅडमीच्या परिश्रमाचे मला कौतुक वाटले. प्रत्येक खंड 'एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिका'च्या आकाराचा असून पृष्ठसंख्या १२०० ते १४०० आहे. या ग्रंथात मल्याळी भाषेतील सर्व प्रमुख ग्रंथांचे लेखक, प्रकाशनकाल, गोषवारा वगैरे माहिती तर दिली आहेच, पण विशेष म्हणजे त्या ग्रंथावर कोठे कोठे समीक्षणे आली आहेत, त्यांचाही तपशील देण्यात आला आहे. त्यामुळे ज्यांना संशोधन करायचे आहे त्यांची फार मोठी सोय झाली आहे. या खंडांची किंमतही प्रत्येकी तीस रुपयांइतकी माफक ठेवण्यात आली आहे. वीस हजार मल्याळी पुस्तकांची माहिती या तीन खंडांत देण्यात आली आहे.

अकॅडमीतर्फे तीन नियतकालिके चालविण्यात येतात. 'साहित्य चक्रवाल' हे मल्याळी मासिक आहे. त्यात मल्याळी साहित्य, जागतिक साहित्य, नव्या ग्रंथांची समीक्षणे, परिसंवाद व व्याख्याने यांचे अहवाल वगैरे मजकूर असतो. 'साहित्य लोक' या मल्याळी त्रैमासिकात कथा, कविता व चर्चात्मक लेख असतात. 'मल्याळम् लिटरेचर' या इंग्रजी त्रैमासिकात अलीकडील मल्याळी साहित्याचा आढावा, मल्याळी नाटक–काव्य–कादंबरी वगैरे शाखांचा इतिहास, अकॅडमीच्या कार्याची माहिती व साहित्यविषयक इतर लेख असतात. मल्याळी भाषा न जाणणाऱ्यांना या मल्याळी साहित्याची कल्पना देणे हा या इंग्रजी त्रैमासिकाचा उद्देश आहे.

भारतीय विदग्ध साहित्याचे प्रकाशन हे अकॅडमीचे एक कार्य आहे. रामायणाचे व भरताच्या नाट्यशास्त्राचे मल्याळी भाषांतर ही या क्षेत्रातील उत्तम उदाहरणे आहेत. 'पोर्ट्रेट गॅलरी' नावाची एक इंग्रजी पुस्तिका अकॅडमीने प्रसिद्ध केली आहे. अठराव्या शतकापासून आतापर्यंतच्या सर्व प्रमुख मल्याळी साहित्यिकांची

छायाचित्रे, त्यांचा काल, त्यांच्या प्रमुख साहित्यकृती व लेखकांचा त्रोटक परिचय या पुस्तिकेत इंग्रजीतून देण्यात आला आहे. त्यामुळे इतर भाषिकांना मल्याळी साहित्यिकांचा सुलभपणे परिचय होतो. अकॅडमीच्या ग्रंथालयात पंचवीस हजार निवडक ग्रंथ असून त्यात कित्येक दुर्मिळ व काही हस्तलिखित स्वरूपातही आहेत. केन्द्र सरकारच्या साहित्य अकॅडमीप्रमाणे या राज्य साहित्य अकॅडमीतर्फेही उत्कृष्ट मल्याळी ग्रंथांना दरसाल पारितोषिके देण्यात येतात. त्यांची निवड साहित्यिकांच्या समितीतर्फे होते. साहित्य अकॅडमीचे अध्यक्ष सरकारतर्फे नेमले जातात, पण प्रत्यक्ष कारभार तेहत्तीस साहित्यिकांच्या मंडळातर्फे चालविला जातो.

त्रिचूरमध्ये मी ज्या साहित्यिकांना भेटावे असे माझ्या मल्याळी स्नेह्याने सुचविले होते, त्यात प्रा. एन्. के. शेषन् हे एक नाव होते. मी त्यांना फोन केला व माझी माहिती सांगितली. ते म्हणाले की, 'मातृभूमी दैनिकाने आपण येणार असल्याची बातमी छायाचित्रासह प्रसिद्ध केली आहे. तसेच त्रिचूरच्या 'एक्सप्रेस' या इंग्रजी दैनिकानेही ही बातमी दिली आहे.' प्रा. शेषन् संध्याकाळी माझ्या हॉटेलवर मला भेटण्यास आले. त्यांनी पांढरी लुंगी–अर्धी वर केलेली–व पांढरा शर्ट घातला होता. ते अनवाणीच आले होते व त्यांचे वागणे–बोलणे अत्यंत नम्रतेचे होते.

ते आल्यावर मी त्यांना विचारले, 'आपण काय घ्याल ?' ते म्हणाले, 'मी व्हिस्की घेत नाही. पण बियर घेऊ.' माझी जरा पंचाईतच झाली. कारण केरळमध्ये दारुबंदी नाही, पण आमच्या हॉटेलात पाटीच लावली होती, 'नो लिकर अलाऊड.' मी प्रा. शेषन् यांच्या नजरेला ती पाटी आणली तेव्हा ते म्हणाले, 'काही हरकत नाही. मालकाला बोलवा, मी सांगतो.' मी नोकराकरवी हॉटेलच्या मालकाला बोलावले, तेव्हा प्रा. शेषन् यांना पाहून तो थक्कच झाला. प्रा. शेषन् यांनी बिअर आणण्यास सांगितले तेव्हा मालकाने चक्क हात जोडून 'होय साहेब' म्हटले आणि स्वतः समोरच्या दुकानातून बियर व त्याबरोबर खाण्यासाठी शेवचिवडा वगैरे आणून दिले. हा चमत्कार कसा घडला असे मी विचारले, तेव्हाच प्रा. शेषन् यांनी सांगितले की, 'मी केरळचा अर्थमंत्री होतो, म्हणून लोक मला ओळखतात.' केरळच्या सरकारमध्ये लेखकांचा प्रभाव आहे असे मी ऐकले होते. त्याला दुजोरा मिळाला. नंबुद्रिपादसारखे मुख्यमंत्रीही स्वतः लेखन करीत असत. प्रा. शेषन् यांनी श्री. अच्युत मेनन यांच्या मंत्रिमंडळात प्रभावी अर्थमंत्री म्हणून काम केले होते. मग आमच्या गप्पांत तोच विषय प्रथम निघाला.

प्रा. शेषन् म्हणाले, 'भारतातील अनेक राज्यांत भ्रष्टाचार केल्याबद्दल मंत्र्यांना आपली खुर्ची गमवावी लागली, पण मला मात्र भ्रष्टाचार करण्यास नकार दिल्याबद्दल राजीनामा द्यावा लागला ! आमच्या पक्षप्रमुखाने काही कंत्राटदारांना आधीच काही कंत्राटे देण्याचे आश्वासन दिले होते. ती कामे अर्थमंत्री

म्हणून माझ्याकडे संमतीसाठी आली तेव्हा ती बेसनदशीर असल्याने मी संमत करण्यास साफ नकार दिला. याबाबत पक्षप्रमुखाचा आदेश राज्याच्या हितासाठी मी साफ धुडकावून दिला. मला त्यांनी राजीनामा देण्यास सांगितले. ते मी मान्य केले आणि पुन्हा प्राध्यापक म्हणून काम करू लागलो. मी अधिकारावर असेपर्यंत मी कोणताही भ्रष्टाचार चालू दिला नाही. केरळमधील जमीनदारी पद्धत मी नष्ट केली. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात मी प्रत्यक्ष भाग घेतला होता व कारावासही भोगला होता. शुद्ध कारभाराचे व्रत मी तेव्हापासून तत्त्व म्हणून स्वीकारले होते.'

त्रिचनापल्ली ते त्रिचूर या मार्गावर आगगाडीत मला एक केरळी इसम भेटला होता. तो पूर्वी कुवेतमध्ये होता आणि बराच पैसा घेऊन केरळमध्ये आला होता. तो मला म्हणाला होता, ' माझ्याजवळ भरपूर भांडवल आहे. पण केरळमध्ये कामगारचळवळ इतकी बलिष्ठ आहे की संपामुळे उद्योगधंद्यात फायदा होण्याची शक्यता नाही. म्हणून माझ्यासारख्या अनेकांचे भांडवल केरळात न राहता इतर राज्यांत जाते. सरकारही ही परिस्थिती सुधारण्यास असमर्थ आहे. कारण सरकारचे बहुतेक उत्पन्न नोकरांच्या पगारावरच खर्च होते.'

यात कितपत तथ्य आहे असे मी प्रा. शेषन् यांना विचारले, तेव्हा ते म्हणाले, ' हे पूर्णपणे सत्य आहे. अर्थमंत्री म्हणून मी अधिकाराने सांगू शकतो की केरळचे ९७ टक्के करांचे उत्पन्न सरकारी नोकरांच्या पगारावर खर्च होते. विकासासाठी खर्च करायचा तर राज्य सरकारला केंद्र सरकारच्या अनुदानावर अवलंबून राहावे लागते. कम्युनिस्ट पक्ष विरोधात होता तेव्हा त्याने सरकारमधील व उद्योगधंद्यातील कर्मचारीवर्गाला भरमसाट आश्वासने देऊन लाडावून ठेवले. खुद्द सरकारमध्ये कर्मचारी संघटना एवढी बलशाली आहे की ती करांचे सर्व उत्पन्न स्वतःच गिळंकृत करते. पूर्वी ज्यांनी या संघटना बांधल्या तेच कम्युनिस्ट पुढारी मंत्रिमंडळात असल्याने या संघटनांना शरण जातात.'

मल्याळी साहित्याबद्दल बोलताना प्रा. शेषन् म्हणाले, ' केरळमधील साक्षरतेचे प्रमाण भारतात सर्वांत अधिक आहे आणि पुस्तके, वृत्तपत्रे वगैरे विकत घेऊन वाचण्याची प्रथाही चांगली आहे. त्यामुळे पुस्तकांचा खप समाधानकारक आहे. लोकांचे उत्पन्न कमी असले तरी अलीकडे अरब देशात गेलेल्या केरळी लोकांनी कोट्यावधी रुपये इकडे पाठवले आहेत. सरकारमध्ये साहित्याबद्दल प्रेम असलेले अनेक मंत्री असतात. कम्युनिस्टांचे इतर राजकारण काहीही असले, तरी त्यांनी केरळमधील साहित्य–प्रसाराला नेहमीच उत्तेजन दिले आहे.'

त्यानंतर प्रा. शेषन् यांनी, मी केरळमध्ये कोणत्या ज्येष्ठ साहित्यिकांना भेटावे याची यादी दिली.

दुसऱ्या दिवशी मी श्री. सी. एल्. जोस या नाटककारांना फोन केला. तेही संध्याकाळी मला भेटण्यासाठी चांडीज् टूरिस्ट होमवर आले. त्यांनी आतापर्यंत

सव्वीस नाटके व एकांकिकांचे सहा संग्रह लिहिले आहेत. त्याशिवाय त्यांचे कथा-संग्रहही प्रसिद्ध झाले आहेत. ' मळकाल ' हे त्यांचे नाटक विशेष गाजले. मळकाल म्हणजे वाळवंट. (अक्षरशः वाळूचे जंगल.) या नाटकाचे ठिकठिकाणच्या हौशी नाट्यसंस्थांनी एकंदर तीन हजार प्रयोग केले आहेत. समाजात शांतता व सह-जीवन राहावे म्हणून प्रयत्न करणारे एक न्यायाधीश स्वतःच्या कौटुंबिक जीवनात मात्र शांतता व सहजीवन प्रस्थापित करू शकत नाहीत असे या नाटकाचे सूत्र आहे. श्री. जोस यांची अनेक नाटके क्रमिक पुस्तके म्हणून महाविद्यालयात नेमली गेली आहेत. ते म्हणाले, ' केरळमध्ये सुमारे तीन हजार फाईन आर्ट क्लब्ज आहेत. त्यांतून माझी नाटके होतात. पण रॉयल्टीबाबत माझा अनुभव निराशाजनक आहे. सुरुवातीला या संस्थांकडून परवानगीसाठी पत्रे येत. तेव्हा मी वीस ते पंचवीस नाममात्र मानधन पाठवा असे लिहीत असे. पण फारच थोड्यांनी मानधन पाठवले. उलट, या संस्था नंतर माझी नाटके नांव बदलून व नाटककाराचा उल्लेख न करता करू लागल्या. म्हणून मी आता रॉयल्टी न घेताच परवानगी देतो. पैसाही नाही आणि नावही नाही असे होऊ नये म्हणून निदान आपले नाव होते एवढ्या-वर मी आता समाधान मानून घेऊ लागलो आहे.'

श्री. जोस यांचे नाटक पाहण्याची संधी मला मिळाली नाही, पण त्रिचूरच्या पुढच्या भेटीत कदाचित मी ते पाहू शकेन अशी आशा करून मी त्यांचा निरोप घेतला.

त्रिचूरपासून आठ मैलांवर असलेल्या चेरुपारुथी येथील केरळ कलामंडलम् या संस्थेला मी दुसऱ्या दिवशी भेट दिली. भारतातील ही अतिशय आदरणीय संस्था असून नोव्हेंबर १९८० मध्ये या संस्थेने आपला सुवर्णमहोत्सव साजरा केला. त्याचा विशेष म्हणजे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी १९५५ साली संस्थेच्या रजतमहोत्सवाचे अध्यक्षपद भूषविले होते. पंचवीस वर्षांनंतर इतिहासाची पुनरावृत्ती होऊन पंतप्रधान इंदिरा गांधी या सुवर्णमहोत्सवाच्या अध्यक्ष होत्या. कथकली, भरतनाट्यम्, मोहिनी अट्टम्, कुटियतम्, थुक्लाल, पंचवाद्यम् इत्यादी पारंपरिक दक्षिण भारतीय नृत्यप्रकारांचे शिक्षण देणारी ही जगातील सर्वांत मोठी संस्था आहे. केरळमधील सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे श्रेय कवी वेलथोल यांच्याकडे आहे. त्यांनीच १९२७ साली ही संस्था रजिस्टर केली आणि १९३० पासून संस्थेचे अधिकृत कार्य सुरू झाले.

त्रिचनापल्लीहून त्रिचूरला आगगाडीने येतानाच श्री. चंद्रन यांनी मला कलामंडलची वैशिष्ट्यपूर्ण वास्तू दाखविली होती. या वास्तूची उभारणी सिमेंट काँक्रीटच्या भव्य, उंच इमारतीसारखी नसून एक मजली, लाकडी बांधणीची आणि केरळमधील मंदिराच्या आकाराची ही इमारत आहे. तिथे जाण्यासाठी मला त्रिचूरहून बस मिळाली. वीस-पंचवीस मिनिटांतच मी तिथे पोचलो. व्यवस्थापक

श्री. वासुदेवन् नंबुद्रिपाद आणि त्यांचे सहकारी प्रा. शंकरन् यांनी माझे स्वागत केले. संस्थेचा परिसर फार रमणीय आहे. उंच वृक्ष, फुलझाडे, हिरवळ यांनी आसमंत प्रसन्न ठेवला आहे. श्री. नंबुद्रिपाद यांनी मला संस्थेचे सभागृह, वर्ग, रंगमंच वगैरे फिरून दाखवले. सभागृहात दक्षिण भारतीय नृत्याच्या क्षेत्रातील महर्षींची सुंदर तैलचित्रे आहेत. कूथांबलम् नावाचे नाटयगृह आहे. ते जुन्या मंदिराच्या आकाराचे असून या नाटयगृहासाठी केरळ सरकारने अकरा लक्ष रुपये दिले आहेत. पंतप्रधान पंडित नेहरूंनी कवी वेलथोल यांना दिलेल्या एक लक्ष रुपयांच्या अनुदानात भर घालून संस्थेने बत्तीस एकर जागा विकत घेऊन संस्थेच्या विविध इमारती उभारल्या. ज्या कवी वेलथोल यांनी संस्थेची स्थापना आणि विकास केला त्यांची समाधीही संस्थेच्या आवारात आहे.

कवी वेलथोल यांनी दक्षिण भारतीय नृत्याच्या कार्यक्रमांसाठी संस्थेच्या कलावंतांना भारतातील अनेक प्रमुख ठिकाणी नेले. इतकेच नव्हे तर चीन, ब्रह्मदेश आणि मलाया या देशांतही त्यांनी संस्थेतर्फे कार्यक्रम केले. त्यानंतर युरोप व अमेरिका या भागातही केरळ कलामंडलम्च्या नर्तकांचे अनेक कार्यक्रम झाले. या संस्थेचे कार्य पाहण्यासाठी श्री. पु. ल. देशपांडे महिनाभर येथे राहिले होते. ते मला म्हणाले, ' या लोकांची कलेवरील निष्ठा आणि त्यासाठी अपरंपार श्रम करण्याची तयारी हे पाहून मन थक्क होते. ' आमच्याकडील मराठी नाटय परिषदेला गेल्या पाऊणशे वर्षांत स्वत:चे एक खोपटही उभारता येऊ नये याची मला त्यावेळी अधिकच खंत वाटली. केरळमधील सांस्कृतिक कार्यात सरकार, कलावंत, साहित्यिक आणि जनता यांचे जे अतूट सहकार्य मला जागोजागी दिसले ते खरोखर कौतुकास्पद आणि अनुकरणीय वाटले. केरळमधील सरकारातील अनेक मंत्री केवळ रसिक वाचकच नाहीत तर स्वत: साहित्यिक व कलावंत आहेत हे याचे एक प्रमुख कारण आहे.

व्यवस्थापक श्री. नंबुद्रिपाद यांनी मला सांगितले, ' कथकली आणि इतर नृत्यप्रकारांवर पुस्तके तयार करून ती प्रसिद्ध करणे ही एक अवघड बाब होती. पण त्रिवेंद्रममधील केरळ लँग्वेज् इन्स्टिटयूटने ती जबाबदारी स्वीकारून आमच्या संस्थेसाठी क्रमिक पुस्तके तयार केली. त्याशिवाय शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या पार्श्वसंगीताच्या लाँग प्लेईंग रेकॉर्डस् आणि टेप्स् संस्थेने तयार केल्या. त्यासाठी आकाशवाणीच्या त्रिचूर केन्द्राने आम्हाला भरपूर सहकार्य दिले. नृत्यकलेवर आम्ही परिसंवाद घेतो आणि त्यात वाचण्यात आलेले प्रबंध ग्रंथरूपाने प्रसिद्ध करतो. आमचे वार्षिक अंदाजपत्रक अठ्ठेचाळीस लाख रुपयांचे आहे. आमच्या कार्यक्रमांचे आणि वर्गात दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे रंगीत चित्रपटही काढण्यात आले आहेत. त्यांतील एका अनुबोधपटाने भारत सरकारचे प्रथम पारितोषिकही मिळवले आहे. अमेरिकेच्या ' नॅशनल जॉग्रॅफिक ' या मासिकाचे प्रतिनिधी

व फोटोग्राफर्स यांनी इथे येऊन संस्थेच्या कार्याची माहिती व छायाचित्रे घेतली आहेत. भारतातील तज्ज्ञ नर्तक आणि नर्तिका यांचे कार्यक्रम आम्ही आमच्या नाट्यगृहात करतो व विद्यार्थ्यांना त्या त्या क्षेत्रांतील उत्कृष्ट व्यावसायिकांच्या कलेचे दर्शन घडवतो.'

अमेरिका, घाना, इंग्लंड, फ्रान्स अशा अनेक देशांच्या नृत्यतज्ज्ञांनी केरळ कलामंडलम् या संस्थेला भेट देऊन येथील शिक्षणपद्धतीचा अभ्यास केला आहे. सध्या संस्थेत एकशेसाठ विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. भारतातील विविध राज्यांतील तज्ज्ञांनीही संस्थेचे कार्य पाहून प्रशंसा केली आहे. त्यांपैकी आठजण इटाली, फ्रान्स व अमेरिकेतील आहेत. संस्थेचे दहा वर्षांचे दीर्घ मुदतीचे अभ्यासक्रम आहेत, तसेच उन्हाळ्याच्या सुट्टीत चालणारे पस्तीस दिवसांचे लहान अभ्यासक्रमही आहेत. कथकली, मोहिनी अट्टम्, संगीत, कुडियाट्टम्, मृदंगम्, थुल्लाल वगैरेंचे शिक्षण देणारे चव्वेचाळीस प्राध्यापक आहेत. अलीकडेच जर्मनीतले कलोन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्यमहोत्सवात केरळ कला मंडळाच्या पथकाने उत्कृष्ट नृत्याबद्दल पारितोषिक मिळवले आहे.

या संस्थेचे कार्य कुणावरही छाप पडावी असेच आहे. संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिल आणि प्राध्यापक वर्ग यांची यादी मी बारकाईने वाचली. एकूण एक सभासद हे मेनन, नायर, पिले, नंबुद्री असे दक्षिण भारतीय. हाच प्रकार मला मद्रास, मदुराई, त्रिवेन्द्रम इत्यादी ठिकाणीही आढळला. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे ॲक्टिंग व्हाईस चॅन्सेलर हे भोगीशयन, पुणे विद्यापीठाचे रजिस्ट्रार बानर्जी, मुंबई विद्यापीठाचे चिदंबरम् ! तेव्हा हेच लोक म्हणतात, सबंध भारत हा एकच आहे, तुम्ही प्रांतभेद मनात आणू नका. ठीक आहे बाबा, नाही आणत ! मग केरळातल्या एखाद्या संस्थेत जबाबदारीच्या जागेवर आमचा कोणीच भोसले, बापट, मोरे, कुलकर्णी का हो नाही ? की भारत हा सगळा एकच आहे हे तत्त्व फक्त आम्हीच पाळायचे आहे ?

## ११ : कोचीनचा डच पॅलेस

अलीकडेच मी केरळला गेलो होतो. त्या सफरीत त्रिचूरचा माझा मुक्काम फारच फलदायी झाला. काही लेखक भेटले, दैनिक ' एक्स्प्रेस'चे संपादक श्री. बालकृष्णन् यांची भेट झाली. त्यांनी मी तेथे येणार असल्याची बातमी छायाचित्रासह आधीच प्रसिद्ध केली होती. मी पुढे कोचीनला जाणार आहे असे म्हटले, तेव्हा श्री. बालकृष्णन् म्हणाले, ' पूर्वी त्रावणकोर हे संस्थान होते, तेव्हा कोचीन व त्रावणकोरचे वितुष्ट असे. त्रावणकोरचे लोक बव्हंशी चोरटे, गुंड, छंदीफंदी असत. कोचीन हे बंदर होते व बड्या व्यापाऱ्यांची तेथे सतत ये–जा असे. म्हणून त्रावणकोरचे चोरटे कोचीनला येत आणि चोरी करून त्रावणकोरमध्ये पळून जात. ते वेगळे संस्थान असल्याने अशा चोरट्यांना पकडणे कोचीनच्या पोलिसांना कठीण जात असे. याचा परिणाम असा झाला, की त्रावणकोरहून आलेल्या कोणाला कोचीनच्या पोलिसांनी पकडून न्यायाधिशासमोर उभा केला, तर न्यायाधीश लगेच त्याला शिक्षा करीत असे. आरोपी म्हणत असे, ' पण माझा गुन्हा तरी काय ? ' न्यायाधीश त्याला सांगत असे, ' तू त्रावणकोरचा आहेस एवढा पुरावा पुरेसा आहे. याचा अर्थच तू गुन्हेगार आहेस ! '

त्रिचूरपासून वीस मैलांवर सुप्रसिद्ध गुरुवायिओ मंदिर आहे. तमिळनाडूतील मंदिरांप्रमाणे हे भव्य नाही. हे साधेसुधेच आहे. पण त्याचे धार्मिक महत्त्व फार मोठे आहे. या मंदिराची कथा अशी आहे की, द्वारकेला कृष्णाने ज्या महाविष्णूची पूजा केली, ती मूर्ती देवांचा गुरु आणि वायू यांच्या स्वाधीन केली. ही मूर्ती त्यांनी या ठिकाणी स्थापन केली. गुरु आणि वायू यांनी स्थापन केलेली मूर्ती म्हणून मंदिराचे नाव गुरुवायिओ मंदिर असे पडले. नारायणाच्या रूपातील ही मूर्ती शंख, चक्र, गदाधारी आहे. कृष्णावतारात तिचे या स्वरूपातील दर्शन फक्त दोन वेळा घडले. कृष्ण जन्मल्याबरोबर एकदा आणि नंतर भारतीय महायुद्धात कृष्णाने

अर्जुनाला गीता सांगितली तेव्हा ! त्यामुळेही या देवालयाचे महत्त्व फार मानले जाते. डिसेंबरमध्ये एकादशीला मोठा उत्सव होतो आणि लाख–दीड लाख यात्रा जमते.

सांस्कृतिक संस्था आणि लेखक–संपादकांच्या त्रिचूरमधील माझ्या गाठीभेटी संपवून मी पुढील मुक्कामासाठी तयार झालो. तिथून मला कोट्टायमूला, अर्नाकुलम्ला जायचे होते. तिथे भारत टूरिस्ट होममध्ये माझे रिझर्व्हेशन करण्यात आले होते. तेथील तीन–चार मित्रांचे फोन नंबर्सही श्री. चंद्रन यांनी मला दिले होते. त्रिचूरला ज्या हॉटेलमध्ये मी राहात होतो, तिथून पाच मिनिटांच्या रस्त्यावर मोटार स्टॅंड होता आणि दर अर्ध्या तासाला कोचीन–अर्नाकुलम्ला मोटारी जातात असे मला कळले होते. मी पहाटे साडेपाचला उठलो, तेव्हा मला जवळच्या देवालयातून कोणीतरी मोठ्याने श्लोक म्हणत असल्याचे ऐकू आले. मात्र ते मल्याळी भाषेत असल्याने मला कळले नाहीत. पुढे केरळात असताना जवळजवळ सर्वच देवालयांतून असे आवाज येत असल्याचे आढळले. पण नंतर एका मित्राने सांगितले की आता बहुतेक टेपरेकॉर्डवर प्रार्थना व भजने लावली जातात !

एस्. टी. स्टॅंडवर गेल्याबरोबर आधी गरम चहा घेतला. कारण गावातली दुकाने अजून उघडली नव्हती. अर्नाकुलम्ची गाडी पाच मिनिटांतच मिळाली. प्रवास छान झाला. गर्दी नव्हती. रस्ते उत्तम होते. आजूबाजूला प्रसन्न सकाळ होती. नारळी, भातशेती, जलाशय, नद्या यांनी डोळे तृप्त होत होते. कोचीन आणि अर्नाकुलम् ही जोड शहरे आहेत. आपल्याकडच्या हैद्राबाद–सिकंदराबादसारखी. साडेआठच्या सुमारास अर्नाकुलम्ला पोचलो. गाव छान आणि स्वच्छ होते. ज्या हॉटेलमध्ये उतरण्याची व्यवस्था केली होती, ते तर सागरकिनारी, एका सुंदर उद्यानाजवळ होते. फक्त वीस रुपये रोज म्हणजे अगदीच अल्प भाडे होते. मुंबईला त्या दर्जाच्या हॉटेलला रोज निदान सव्वाशे रुपये पडतात. मी तेथे रजिस्टरवर सही केली. मी येण्यापूर्वीच माझ्या नावावर आलेली दोन पत्रे व्यवस्थापकाने मला दिली. त्यांपैकी एक पत्र कोट्टायमच्या साहित्य प्रवर्तक संस्थेचे चिटणीस श्री. माधवन् यांचे होते. 'कोट्टायमची ही लेखन-संघटना आपले स्वागत करते. आपण आमच्याकडेच राहा.' असे त्यात म्हटले होते. दुसरे पत्र तेथील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांचे होते. त्यांनी म्हटले होते की, 'आपण इथे येणार याबद्दलचे पत्र मिळाले होते. पण ऑफिसच्या तातडीच्या कामासाठी मला दिल्लीला जावे लागत आहे. क्षमस्व !'

मी खोलीत सामान ठेवले, चहा घेतला आणि माझ्याकडे आलेल्या दोन-तीन फोन क्रमांकांवर त्या व्यक्तींना भेटण्याचा प्रयत्न केला. के. एन्. जी. नायर म्हणून पत्रकार होते, त्यांना फोन केला तेव्हा कळले की ते मुंबईला गेले आहेत. कलानिलयम या नाटक कंपनीचे मालक श्री. जीवनकुमार यांना फोन केल्यावर

कळले की रात्रीच्या प्रयोगामुळे ते उशीरा झोपले आहेत, दुपारी अडीचनतर फोन करा.' मुंबईचे माझे स्नेही श्री. उमाकांत ठोंवरे यांनी अर्नाकुलम्च्या महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षा सौ. धनश्री हळवे यांचा फोन नंबर आणि पत्ता दिला होता. तो शोधताना लक्षात आले की त्रिचूरला मी श्री. चंद्रन यांच्याकडे मुंबईला नेण्यासाठी काही सामान दिले होते, त्यात तो पत्ता नजरचुकीने गेला ! म्हणजे अर्नाकुलम् येथे दोन दिवस भरगच्च कार्यक्रम होईल अशा योजनेने मी आलो, पण प्रत्यक्ष पाहतो तर कुणाचीही तूर्त भेट होण्याचा रंग दिसेना ! अखेर गाव भटकण्यावाचून काहीच गत्यंतर नव्हते. कोचीनमध्ये डच पॅलेस पाहण्यासारखा आहे असे वाचले म्हणून बसने कोचीनला निघालो.

वाटेत एकदा बस बदलावी लागली. एका तिठ्यावर उतरून डच पॅलेसकडे जायचे होते. पण मला नीट माहिती नसल्यामुळे मी चुकून आधीच्या स्टॉपवर उतरलो. पण त्यामुळे मला अनपेक्षित पाहुणे भेटले. त्याचे असे झाले की, डच पॅलेसपर्यंत एक स्टॉप चालत जावे म्हणून मी निघालो. सहज लक्ष गेले, तर 'पै नावाच्या कुणाचे तरी लोखंडी सामानाचे दुकान दिसले. मला वाटले, पै म्हणजे मराठीभाषिक असणार आणि त्यांना सौ. हळवे यांचा फोन नंबर माहीत असेल. मी दुकानात गेलो व चौकशी केली. तेव्हा ते इंग्रजीत म्हणाले, 'मी मराठी नसून कॅनरीज आहे. मला हळवे माहीत नाहीत. पण गोरे नावाचे माझे मित्र आहेत. त्यांना फोन केला तर हळवेंचा पत्ता मिळेल.' त्यांनी श्री. गोरे यांना फोन केला. तेव्हा श्रीयुत गोरे नव्हते पण सौ. गोरे मला म्हणाल्या, 'आपण रमेश मंत्री म्हणजे लेखक का ?' मी 'होय' म्हटले. त्यावर त्यांनी अगदी अनपेक्षित प्रश्न केला, 'तुम्ही मालाडला लिबर्टी गार्डनमध्ये राहात होता ना ?'

'होय. पण तुम्हाला कशी ही माहिती ?' मी विचारलं.

'कारण मी मालाडचीच आहे. तुमचा मुलगा माझ्या वर्गात होता. माझे माहेरचं नाव जोशी. लग्न होऊन मी इथं राहायला आले. तुम्ही आत्ता आमच्याकडेच जेवायला या. तुम्ही पै यांच्या दुकानातून फोन करता आहात, तिथून आमचं घर अगदी पाच मिनिटांच्या रस्त्यावर आहे.'

ज्यांना मी पूर्वी कधी पाहिलंही नाही, त्यांच्याकडे एकदम जेवायला जाणं मला प्रशस्त वाटलं नाही. म्हणून मी थाप मारली, 'पण आधीच मी दुसरीकडे जेवणाचं निमंत्रण घेतलं आहे. आपल्याला धनश्री हळवे माहीत आहेत का ?'

'हो ! चांगल्या माहीत आहेत. पण त्यांच्या घरी फोन नाही. त्यांचे पती नेव्हीमध्ये आहेत. त्यांचा ऑफिसचा फोन नंबर त्यांनी तुम्हाला दिला असावा. त्या इथून खूप लांब राहतात. तुमचा कार्यक्रम काय ?'

मी म्हटले, 'डच पॅलेस पाहण्यासाठी मी जात आहे.' त्या म्हणाल्या, 'तुम्ही पॅलेसच्या गेटजवळ थांबा. मी तिथं येऊन तुम्हाला पॅलेस दाखवते नि मग थोडा


वेळ तरी तुम्हाला आमच्या घरी घेऊन येते.' डच पॅलेस जवळच होता. पण आता साडेअकरा वाजायला आले होते आणि ऊन चांगलेच तापत होते. मी दरवाजा-जवळ गेलो, तेवढ्यात सौ. गोरे आल्या. त्यांच्याबरोबर मी डच पॅलेस पाहिला.

या डच पॅलेसची आठवण मला एका अगदी वेगळ्या संदर्भात आली. ती अशी की, तीनश वर्षांपूर्वी या भागावर डचांची सत्ता होती, तेव्हा हेंडरिक व्हॅन ऱ्हीड नावाचा एक गव्हर्नर या वाड्यात राहात होता. त्यानं मलबार विभागातील वनस्पतींचा अभ्यास करून 'हार्टस् मलबारिकस' नावाचा एक हजार पृष्ठांचा ग्रंथ लिहिला. तो १६७८ साली ॲमस्टरडॅममध्ये प्रसिद्ध झाला. याच ग्रंथात मल्याळी भाषा प्रथम छापील स्वरूपात दिसली.



कोचीनच्या मातन्चेरी भागातील इतिहासप्रसिद्ध यहुदी मंदिर

मातन्चेरी वाड्याची पार्श्वभूमी नयनमनोहर आहे. समुद्राचे पाणी वाड्याच्या तटापर्यंत येते. दक्षिणेला ज्यूंचे सिनेगॉग हे प्रार्थनास्थळ आहे. समोर मोठे पटांगण आहे. हा वाडा दुमजली आहे. पोर्तुगीजांनी १५५७ साली तो बांधला. कोचीनच्या राजासाठी त्यांनी या वाड्याची खास उभारणी केली होती. पटांगणात छोटेसे भगवती मंदिर आहे. १६३० च्या सुमारास डचांनी या वाड्याचा आतला बराच भाग बदलून त्याला नवे स्वरूप दिले. वाड्याच्या पटांगणात विष्णू आणि शिव



तमिळनाडूतील भव्य मंदिराच्या तुलनेने केरळमधील अशी मंदिरे साधीसुधी दिसतात. (शिवमंदिर पेरुचनम्)

यांचीही मंदिरे आहेत. जास्तीत जास्त पंथांच्या लोकांना खूष करावे हा त्यावेळच्या राज्यकर्त्यांचा यातला उद्देश असावा. वाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ पोर्च आहे. गोव्यातील पोर्तुगीज इमारतींची आठवण हे पोर्च पाहून येते. आजूबाजूला उंच नारळीची झाडे, समुद्र आणि गोव्यातील बांधणीसारखी वाड्याची रचना यामुळे कोचीनचा हा भाग थेट गोव्यासारखा दिसतो. वाड्याच्या प्रवेशद्वारातून गेल्यावर

प्रथमच भव्य असा 'कोरोनेशन हॉल' लागतो. कोचीनच्या राजांचे राज्याभिषेक इथे होत. या हॉलमधील तक्तपोशीवर सुंदर लाकडी नक्षीकाम आहे. हॉलमध्ये आता कोचीनचे राजे व डच गव्हर्नर यांचे कपडे, तलवारी, शिरस्त्राणे, पालख्या वगैरे वस्तू ठेवल्या आहेत. वाड्याचा विशेष प्रेक्षणीय भाग म्हणजे राजांचा आणि राणीचा महाल, या महालातील भिंतीवर भारतीय पारंपरिक पद्धतीची देखणी चित्रे आहेत. तीनशे वर्षांनंतरही त्यांचा सुमारे ऐंशी टक्के भाग शाबूत राहिला आहे. काही रंग फिकट झाले असले, तरी मूळ चित्रांच्या अप्रतिम सौंदर्याची अजूनही चांगली कल्पना येते. राम, कृष्ण, विष्णू वगैरे देवतांची ही चित्रे (म्युरल्स) आहेत, जिन्याजवळच्या दुसऱ्या महालात वैकुंठनाथाचे भव्य म्युरल आहे, तळमजल्यावरच्या दोन खोल्यांतील भित्तीचित्रांत कालिदासाच्या 'कुमारसंभवा'वर आधारलेले चित्र विशेष प्रेक्षणीय आहे,

केरळमध्ये फार पूर्वीपासून ज्यू लोकांची वसाहत आहे, राजा भास्कर रवि वर्मा याने इ. स. १००० मध्ये ज्यू लोकांना अनेक सवलती देऊन क्रँगनूर येथे वसाहत करण्यास उत्तेजन दिले. हे ज्यू लोक युरोपमधून जहाजांतून भारतात आले आणि केरळच्या किनाऱ्याजवळ कोचीनजवळ लागले. जोसेफ रॅबन हा त्यांचा नेता होता. मातंचेरी वाड्याच्या आवारात ज्यूंचे जे सिनेगॉग (प्रार्थनास्थळ) आहे, त्यात हिब्रू भाषेत लिहिलेला, ज्यूंना खास अधिकार देणारा ताम्रपट अजूनही पाहावयास मिळतो. ज्यूंचे हे सिनेगॉग भारतातील सर्वांत जुने आणि ज्यूंचे जगातील एक अत्यंत महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. त्याच्या फरशा चीनमधील कॅन्टन येथून आणण्यात आल्या आहेत. हे सिनेगॉग १५६५ साली बांधण्यात आले. सेंट फ्रँसिस चर्चमध्ये वास्को दि गामा यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.

कोचीनचा डच पॅलेस आणि आसमंतातील जुन्या इमारती पाहून आम्ही सौ. गोरे यांच्या घरी आलो. त्यांचे वडील व मातोश्रीही मुंबईहून आले होते. तिथे चहा घेताना सौ. गोरे म्हणाल्या, 'मुंबईपेक्षा इथे खूप निवांत आणि चांगले वाटते. मुंबईची दगदग, टंचाई, गुन्हेगारी इथे कोचीनला अजिबात दिसत नाही. रेशनवर साखर भरपूर मिळते. रॉकेल, गोडेतेल वगैरे वस्तूही मुबलक आणि मुंबईपेक्षा खूप स्वस्त मिळतात. एकंदरीत इकडचे लोक शांतताप्रिय आणि सुखी आहेत. धान्याची मुबलकता आहे. गुंडगिरी, झोपडपट्टीसारख्या गलिच्छ वस्त्या दिसत नाही.' त्यावर मी म्हटले, 'कशा दिसणार ? अहो, केरळमधल्या सगळ्या झोपडपट्ट्यला मुंबईत एकवटल्या आहेत. इकडचे बरेच बेकार लोक कामधंद्याच्या आशेने मुंबईला येतात. झोपडपट्ट्यांत राहतात. निर्वाहाचे साधन नसल्यामुळे त्यांपैकी बरेच जण गुन्ह्यांकडे वळतात. असे समाजविरोधी लोक केरळमधून मुंबईस रवाना झाल्यामुळेच इथले जीवन शांत व सुखी आहे. उलट त्यामुळेच मुंबईत गर्दी, गलिच्छपणा आणि गुन्हेगारी बोकाळली आहे.' मात्र मला एक कोडे पडले ते असे की भारत हा सारा



**कोचीनच्या किल्ल्यातील सेंट फ्रॅन्सिस चर्च**

एक देश आहे म्हणायचे तर मद्रास–कोचीनला स्वस्ताई आणि मुबलकता का आणि मुंबईला टंचाई आणि महागाई का ? अंतरांच्या मानाने थोडाफार फरक पडणे साहजिक आहे. पण मुंबईला रेशनवर सव्वा ते दीड किलो साखर आणि कोचीनला आठ किलो इतकी विषमता कशी असते ?

कोचीनहून दुपारी दीड वाजता मी अर्नाकुलम्‌ला हॉटेलवर आलो. पहाटे लवकर उठलो होतो म्हणून जेवण करून चांगला झोपलो. दक्षिणी अन्नात नुसता भात आणि सारम्, नावापुरती भाजी असते, म्हणून आठ रुपयांची ' बाँबे थाळी ' मागवली, पण तिनेही निराशाच केली. बाँबे थाळी म्हणजे करपलेल्या चार पोळ्या आकार पापडाएवढा, दही आणि बाकी सारे साडेतीन रुपयांच्या दक्षिणी थाळी-सारखेच होते ! नंतर लक्षात आले की बाँबे हे नाव दिले तरी भाज्यांचा मसाला सपक व दक्षिण भारतीय असल्याने अशा जेवणाने पोट भरते, पण रुचकर जेवण केल्याचे समाधान मिळत नाही. मी उतरलो होतो ते हॉटेल कडक शाकाहारी होते आणि केरळमध्ये मांसाहारी जेवण देणारे हॉटेल शोधणे हे भरपूर वेळ आणि श्रम मागणारे काम होते म्हणून ' आलीया थाळीसी ' सादर व्हावे लागले.

दुपारी चार वाजता झोपून उठल्यावर कलानिलयम कंपनीला फोन केला.

तेव्हा मालक श्री. जीवनकुमार म्हणाले, ' आज तुम्हाला नाटकाला बोलावण्याची आमची योजना होती. पण कंपनीत अचानक संप सुरू झाल्यानं आज प्रयोग होणार नाही.' अशा परिस्थितीत त्यांना भेटूनही काही उपयोग नव्हता, म्हणून फोनवरच मी त्यांचा निरोप घेतला. आता अर्नाकुलम्‌मध्ये राहण्याचे खास काही कारण नव्हते. मी दुसऱ्याच दिवशी सकाळी पुढे कोट्टायमला जायचे ठरवले. संध्याकाळी गावातून एक चक्कर टाकावी आणि जमल्यास एक-दोन लेखकांना भेटावे म्हणून मी बाहेर पडलो.

आणखी एक महत्त्वाचे काम करायचे होते. अकोला येथे भरणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी मतदान करायचे होते. त्याची मतपत्रिका टपालाने माझ्याकडे आली होती. प्रथम पोस्ट ऑफिसात जावे म्हणून रिक्षा पाहू लागलो. तर रिक्षा दिसेना. बराच चाललो तरी रस्त्यात एकही रिकामी अथवा चालू रिक्षा दिसली नाही. शेवटी पोलिसाला विचारले. तो म्हणाला, ' रिक्षावाल्यांनी अचानक संप केला आहे, ' तेव्हा चालतच टपालकचेरीपर्यंत गेलो. मतपत्रिकेचे वजन करून तिकिटे लावली आणि ती पेटीत टाकली.

साहित्य प्रवर्तक या संस्थेची ' नॅशनल बुक स्टॉल ' या नावाची पुस्तकविक्रीची अनेक दुकाने केरळात आहेत. तसे अर्नाकुलम् येथेही असले पाहिजे या विचाराने चौकशी केली. त्याप्रमाणे ते दुकान जवळच दिसले. तेथे जाऊन व्यवस्थापकाची भेट घेतली. तो म्हणाला, ' आमच्या दुकानाची वर्षाला सात लाख रुपयांची पुस्तकविक्री होते. अर्नाकुलमची लोकसंख्या सात लाख आहे. म्हणजे दरसाल दरडोई एक रुपयांची पुस्तके आमच्या दुकानातच खपतात. इतर दुकानांतही अर्थात मोठी विक्री होत असली पाहिजे. ' त्यांनी अर्नाकुलममधील काही लेखकांची यादी दिली. सी. राधाकृष्णन् यांना त्यांनी फोन केला व माझी माहिती सांगून मी त्यांना भेटण्यासाठी लगेच येत आहे असे सांगितले, कारण श्री. राधाकृष्णन् हे ' विशम् ' या दैनिकात काम करीत होते आणि त्यांची कचेरी नॅशनल बुक स्टॉलपासून जवळच होती. त्या दिवशी रिक्षांचा संप असल्याने इतर लेखकांकडे जाणे शक्य नव्हते.

मी राधाकृष्णन् यांच्या ' विशम् ' या दैनिकाचा पत्ता शोधत गेलो. सुमारे पंचेचाळिशीच्या वयाचे ते लेखक मोठे आनंदी आणि उत्साही होते. माझे स्वागत करून ते चक्क मराठीत म्हणाले, ' या ! तुम्हाला भेटून आनंद झाला. मी तुमचं नाव खूप ऐकलं होतं, कारण मी महाराष्ट्रात, पुण्यातच तीन वर्षं होतो. ' मग त्यांनी आपली साहित्यविषयक माहिती सांगितली. ते म्हणाले, ' १९६० पासून मी लेखनाला प्रारंभ केला, प्रथम मी कविता लिहीत असे. ' मातृभूमी ' या मल्याळी दैनिकानं कादंबरी स्पर्धा लावली. त्या स्पर्धेत माझ्या ' नीलेल पाडुगळ '(सावल्या)

या कादंबरीला पहिले बक्षिस मिळाले, याच कादंबरीला नंतर केरळ साहित्य अकॅडमीचे पारितोषिकही मिळाले. मी नोकरीच्या निमित्ताने कोडाई कॅनाल, पुणे (१९६१ ते ६३), मुंबईत 'टाईम्स ऑफ इंडिया' (१९६४ ते ६८), आणि दिल्ली (१९६८ ते १९७८) असा राहिलो आहे. मी दोन चित्रपटांचं दिग्दर्शनही केलं आहे. माझ्या 'अग्निनृत्यम्' या कादंबरीवरील चित्रपट मी दिग्दर्शित केला आहे. माझे मित्र श्री. ए. के. अन्थनी यांनी 'विशम्' हे दैनिक सुरू केले व मी आता संपादक म्हणून इथे काम करीत आहे. गेल्या वीस वर्षांत माझी तेहत्तीस पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत. त्यांपैकी सात कादंबऱ्या, सहा नाटकं, पाच कथासंग्रह आहेत, माझ्या दोन पुस्तकांचे इंग्रजी अनुवाद झाले आहेत.'

माझा अर्नाकुलमचा मुक्काम एक दिवस आधीच संपवून मी परवाच्या ऐवजी उद्याच कोट्टायमला जाणार आहे' असे मी श्री. सी. राधाकृष्णन् यांना सांगितले, तेव्हा त्यांनी लगेच कोट्टायमच्या साहित्य प्रवर्तक संस्थेचे चिटणीस श्री. माधवन् नायर यांना फोन करून मी दुसऱ्या दिवशी सकाळी साडेदहा – अकराला तिथे येत असल्याचे कळवले.

सहज बोलताना मी म्हटले, 'आज रिक्षावाल्यांनी अचानक संप केला. त्यामुळे मला कुठं लांब जाणं शक्य झालं नाही. बसला तुफान गर्दी असते. शिवाय परक्या गावातल्या बसेस् कुठून कुठे जातात, आपल्याला हवे ते ठिकाण बसच्या टप्प्यात आहे की नाही याची कल्पना नसते.'

त्यावर श्री. राधाकृष्णन् म्हणाले, 'केरळमध्ये रिक्षा, टॅक्सी, बसेस्, कारखाने यांचा कधी अचानक संप होईल हे सांगता यायचं नाही. अचानक संप हा आमचा सर्वांत मोठा शत्रू आहे. संप किंवा बंद अपेक्षित असला, आधी जाहीर केलेला असला, तर माणसाला आपले कार्यक्रम त्यानुसार आखता येतात. पण आमच्याकडे एकदम कुणीही उठतो आणि हातातलं काम टाकून संपावर जातो. त्याला सामाजिक जबाबदारीची जाणीव यत्किंचितही नसते. कम्युनिस्टांनी कामगारांचे अति लाड केले, त्याचे हे दुष्परिणाम आता अधिकाधिक प्रकर्षानं दिसत आहेत.'

श्री. राधाकृष्णन् यांचा निरोप घेऊन मी चालतच हॉटेलपर्यंत आलो. वाटेत एका लिकर शॉपमध्ये व्हिस्कीची बाटली घेतली. केरळमध्ये मद्याच्या किंमती आपल्याकडील किंमतीच्या तुलनेने तीस ते पस्तीस टक्के अधिक आहेत. जेवणासाठी वाटेत एकही चांगले हॉटेल दिसले नाही. अखेर आमच्याच हॉटेलची बेचव पण भरपूर बाँवे थाळी मागवली. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून निघालो. बॅग घेऊन रस्त्याने रिक्षा शोधीत चालू लागलो. आजही रिक्षाचा संप असेल तर पंचाईत होती. कारण हॉटेलपासून एस्. टी. स्टॅन्ड जवळ जवळ दीड मैल होता. नाक्यावर जाऊन दहा मिनिटे थांबलो, तेव्हा एक पिवळी रिक्षा दिसली. हा

तमिळनाडू व केरळमधील रिक्षांचा गणवेषासारखा एकच एक पिवळा रंग. ती रिक्षा भरलेली होती. पण निदान संप मिटल्याचे ते सुचिन्ह होते. थोड्या वेळाने आणखी एक रिक्षा आली आणि मी सुटकेचा निश्वास टाकून एस्. टी. स्टँडवर आलो. गरम उपमा आणि चहा घेतला.

कोट्टायमची बस दहा मिनिटांत येणार होती. कुणीतरी सांगितले की रेल्वे-स्टेशन जवळच आहे. रेल्वेने गेलात तर लवकर पोचाल. गाडी येण्याची वेळ झाली असल्याचे त्याने सांगितले. पण कधी कधी तास–तास उशीरा येते हा पूर्वीचा अनुभव असल्याने आता ऐन वेळी हातची एस्. टी. सोडून पळत्या रेल्वेच्या मागे लागण्यात अर्थ नव्हता. मी 'हिंदू' वाचीत थांबलो. अर्नाकुलमची बातमी होती की एक रिक्षावाला आणि वाहतूक पोलीस यांच्यात झगडा झाला. त्यांच्या निषेधार्थ रिक्षावाल्यांनी अचानक संप पुकारला होता. पण अटक केलेल्या रिक्षा-चालकाला सोडल्यावर रात्री संप मागे घेण्यात आला.

कोट्टायमची एस्. टी. आली. बसमध्ये भरपूर जागा होती. अर्धी बसही भर-लेली नव्हती. मी आठ वाजता निघालो. दहाच्या सुमाराला कोट्टायमला पोचलो. कुठे उतरायचे ते ठरले नव्हते. एका गाईड बुकात सरकारी गेस्ट हाऊस चांगले आणि स्वस्त आहे असे लिहिले होते. रिक्षा करून एका सुंदर टेकडीवर वृक्षांच्या छायेत असलेल्या सरकारी टूरिस्ट बंगलीकडे गेलो. तिथल्या माणसाला हिंदी–इंग्रजी अजिबात येत नव्हते. रिक्षावाल्याच्या मदतीने बोललो. त्याचे म्हणणे 'रिझर्वेशन आहे काय ?' मी म्हटले, 'नाही, पण जागा असेल तर द्या.' त्याने सांगितले, 'कलेक्टरकडे अर्ज करा.' मी म्हटले, 'आता कुठे अर्जबिर्ज करू ? तुझा अर्ज गेला खड्ड्यात !' मी परतलो.

रिक्षावाला म्हणाला, 'चांगले हॉटेल दाखवतो, हॉटेल आयडा.' तेथे गेलो. आणि मन प्रसन्न झाले. हॉटेल इतके उत्तम आणि स्वस्त होते की प्रथम माझा त्या दरावर विश्वासच बसेना. दररोज पंचवीस रुपये असे व्यवस्थापकाने सांगितले. तरी मी पुन्हा विचारले. कारण एकशेपंचवीस रुपये आनंदाने द्यावे इतके ते हॉटेल सुंदर होते. मात्र एक अडचण होती. व्यवस्थापक म्हणाले,

'फक्त आजचा दिवस जागा मिळेल. उद्यापासून सर्व हॉटेल आंतरराष्ट्रीय रबर परिषदेनं राखून ठेवलं आहे.' मी म्हटलं, 'ठीक आहे. उद्या मी दुसऱ्या हॉटेलमध्ये जाईन.' त्यावर व्यवस्थापकांनी सांगितले, 'उद्या तुम्हाला कोट्टायम-मध्ये कोणत्याही हॉटेलात जागा मिळणार नाही. कारण सर्व हॉटेलांच्या मिळतील त्या सर्व खोल्या रबर परिषदेनं उद्यापासून तीन दिवस रिझर्व्ह केल्या आहेत.'

मी विचार केला, आजचे काम तर झाले. उद्याची बात आताच कशाला ? हॉटेलच्या सुंदर खोलीत सामान ठेवले, स्नान केले आणि माधवन् नायर यांना फोन केला. त्यांनी लगेच मला साहित्य प्रवर्तकमध्ये नेण्यासाठी गाडी पाठवली.

'मल्याळम् मनोरमा' या विख्यात दैनिकाच्या कचेरीशेजारीच या संस्थेची दुमजली इमारत आहे. माझी हॉटेलसंबंधीची अडचण मी सांगितल्यावर श्री. नायर म्हणाले, 'आमच्या कचेरीत पाहुण्यांना राहण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे. आपण उद्या इथेच राहायला या.' त्यामुळे माझा एक प्रश्न सहजच सुटला. श्री. नायर यांनी श्री. चंद्रन व प्रा. नंवियार या दोन लेखकांना मला भेटण्यासाठी बोलावून घेतले होते. श्री. चंद्रन हे उत्तम नाटककार असून प्रा. नंबियार हे कथालेखक आहेत. प्रा. नंवियार हे हिंदीचे प्राध्यापक आहेत. त्यांनी अनेक मराठी कथांची मल्याळीत भाषांतरे केली आहेत.

'मल्याळम् मनोरमा' या सुप्रसिद्ध दैनिकाच्या कचेरीजवळच साहित्य प्रवर्तक संस्थेची दुमजली इमारत आहे. श्री. माधवन् नायर यांनी माझे स्वागत करून संस्था दाखवली. तळमजल्यावर मुख्य कचेरी व गेस्ट हाऊस आहे. वरच्या मजल्यावर कागद, छपाई वगैरेंची व्यवस्था पाहणाऱ्या कचेऱ्या आहेत. बाहेर मुख्य रस्त्यावर संस्थेचाच 'नॅशनल बुक स्टॉल' आहे. तेथे संस्थेची सर्व प्रकाशने विक्रीसाठी ठेवण्यात आली आहेत. मी संस्थेच्या सुमारे चार हजार पुस्तकांपैकी काही निवडक पुस्तके पाहिली. त्यांची मुखपृष्ठे साधी होती, पण निर्मिती चांगली होती. मराठी पुस्तकांच्या मानाने या मल्याळी पुस्तकांच्या किमती बऱ्याच कमी होत्या. मराठीत अडीचशे पृष्ठांच्या पुस्तकाची किमत पंचवीस ते अठ्ठावीस रुपये असते. मल्याळीतील अडीचशे पृष्ठांच्या पुस्तकाची किमत पंधरा ते सतरा रुपयांपर्यंत होती. मल्याळीमधील सर्व प्रमुख साहित्यिकांची पुस्तके साहित्य प्रवर्तकने काढली आहेत.

संस्थेची माहिती सांगताना श्री. नायर म्हणाले, '१९४५ साली केरळमधील बारा लेखकांनी प्रत्येकी दहा रुपये घालून फक्त १२० रुपयांच्या भांडवलावर ही संस्था सुरू केली. ही सहकारी संस्था आहे. सुरुवातीच्या सभासदांत श्री. काजोर नीलकंठ पिले, प्रा. एम्. पी. पॉल, श्री. डी. सी. किरेन्केमोरी वगैरे साहित्यिक होते. संस्थेचे पहिले पुस्तक म्हणजे टी. एस्. शंकर पिले यांचा कथासंग्रह. त्याच्या एक हजार प्रती काढण्यात आल्या. या पुस्तकाची विक्री करताना संस्थेच्या असे लक्षात आले की प्रकाशनाची उभारणी भक्कम पायावर करावयाची असेल तर विक्रीव्यवस्थाही स्वतःची पाहिजे. कारण पुस्तकविक्रेता प्रकाशकांची पुस्तके विकून वेळच्या वेळी हिशोब देत नाही. तो खपलेल्या प्रतींचा आकडा कमी दाखवून प्रकाशकाचे भांडवल वापरतो अनेकदा तो पैसा बुडवतो, त्यावर उपाय म्हणजे स्वतःची पुस्तकविक्रीची दुकाने सुरू करायची !

त्याप्रमाणे साहित्य प्रवर्तकने पहिला 'नॅशनल बुक स्टॉल' कोट्टायममध्ये सुरू केला आणि हळूहळू इतर प्रमुख शहरांत शाखा काढल्या, आता केरळमधील दहा प्रमुख शहरांत संस्थेची स्वतःची पुस्तक- विक्रीची दुकाने आहेत. दुकाने

काढल्यामुळे संस्थेची एकदम भरभराट झाली, कारण दुकानदाराला द्यावे लागणारे पंचवीस ते तीस टक्के कमिशन संस्थेकडेच राहिले, रोख पैसा दररोज हाती खेळू लागला आणि कोणती पुस्तके अधिक खपतात याची निश्चित कल्पना आली. संस्थेने सर्व प्रमुख लेखकांचे सहकार्य मिळवले. इतर प्रकाशक दहा ते पंधरा टक्के रॉयल्टी लेखकाला देत असताना ही संस्था वीस ते पंचवीस टक्के रॉयल्टी देऊ लागली. कालांतराने संस्थेने स्वत:चा छापखाना सुरू केला. त्यामुळे छपाई-वरील खर्चात बचत झाली. आता गेली अनेक वर्षे संस्था आपल्या लेखकांना ललित वाङ्मयावर तीस टक्के आणि क्रमिक पुस्तकांवर चाळीस टक्के रॉयल्टी देते. एवढी रॉयल्टी भारतातच नव्हे, तर जगातील कोणतीही प्रकाशन-संस्था देऊ शकत नाही.

एकशेवीस रुपयांच्या भांडवलावर सुरू झालेल्या या संस्थेच्या प्रकाशनांची आता दरसाल साठ लक्ष रुपयांची विक्री होते. संस्थेतर्फे सध्या दररोज एक पुस्तक प्रसिद्ध होते. आतापर्यंत कथा, कादंबरी, कविता, समीक्षा, इतिहास, प्रवासवर्णन इत्यादी सर्व क्षेत्रांत मिळून साहित्य प्रवर्तक संस्थेने चार हजार ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. ' चेमीन ' या पुस्तकाच्या बारा हजार प्रती संस्थेने काढल्या. क्रमिक पुस्त-कांच्या तीस ते चाळीस हजार प्रती काढण्यात येतात. संस्थेच्या इतर कार्याबद्दल बोलताना चिटणीस श्री. नायर म्हणाले, ' आम्ही दहा हजार पृष्ठांचा मल्याळी विश्वकोश सहा वर्षांत तयार करून फक्त सहाशे रुपयांना विकला. संस्थेतर्फे वर्षातून चार–पाच परिसंवाद भरतात. आमचे स्वत.चे साहित्यविषयक मासिक आहे. उत्कृष्ट पुस्तकांना संस्थेतर्फे पारितोषिके देण्यात येतात. आतापर्यंत दीड लक्ष रुपयांची पारितोषिके संस्थेने दिली आहेत. इतर भाषांतील निवडक ग्रंथ आम्ही मल्याळीतून प्रसिद्ध केले आहे. श्री. वि. स. खांडेकर यांच्या ' ययाती ' कादंबरीचे भाषांतर प्रा. माधवन् पिल्ले यांनी केले असून ते संस्थेने प्रसिद्ध केले आहे. आमच्या मासिकाच्या वार्षिकात त्या–त्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या सर्व मल्याळी पुस्तकांची यादी देण्यात येते. ' (मी केरळहून आल्यावर महिन्या-भराने श्री. नायर यांनी आपले मल्याळी मासिक माझ्याकडे पाठवले होते. त्यात माझ्या छायाचित्रासह ' सुप्रसिद्ध मराठी साहित्यिकाची संस्थेस भेट, अशी एक बातमी होती.) केरळचे तीन मुख्यमंत्री आमच्या संस्थेही वर्गणी भरून साधे सभा-सद झाले आहेत. केरळच्या मंत्रिमंडळातच अनेक लेखक असल्याने आम्हाला सरकारचे सहकार्य नेहमीच मिळत गेले आहे. '

साहित्य प्रवर्तकचे कार्य पाहून मला अतिशय आनंद वाटला. नंतर केरळमध्ये इतरत्रही अनेक साहित्यिकांना मी भेटलो. त्या सर्वांना साहित्य प्रवर्तकविषयी नितांत आदर असल्याचे मला आढळले. मराठी साहित्यिकांत असा एकोपा कधी दिसेल का, असा विचारही मनात आल्यावाचून राहिला नाही. कोट्टायम हे

साहित्यात अग्रेसर असावे हा एक चमत्कारच मानावा लागेल. कारण हे शहर भारतात जर कशाबद्दल प्रसिद्ध असेल, तर ते रबराबद्दल ! भारतातील सत्त्याण्णव टक्के रबराचे उत्पादन केरळमध्ये होते आणि या रबराचे मुख्य व्यापारीं केंद्र म्हणजे कोट्टायम. इथल्या प्रमुख रस्त्यावरील दुकानांत जास्तीत जास्त फलक दिसतात ते ' रबर प्रॉडक्ट्स 'चे. कदाचित या रबराचाच चिकाटी हा गुण तेथील साहित्यिकांत उतरला असल्याने साहित्य प्रवर्तकसारखी विशाल संख्या उभारण्यात त्यांना यश आले असावे. श्री. माधवन् नायर यांनी कोविलन, सी. पी. श्रीधरन्, पद्मनाभन् इत्यादी दहा–बारा प्रमुख मल्याळी लेखकांना बोलावून त्यांच्याशी माझी भेट घडवून आणली. इतकेच नव्हे, तर या मल्याळी लेखकांच्याबरोबर मला जेवणही दिले. ' मल्याळम् मनोरमा 'च्या साप्ताहिक आवृत्तीचे संपादक प्रा. थरकन यांना श्री. माधवन् नायर यांनी फोन केला आणि माझ्याबरोबर संस्थेचा माणूस देऊन त्यांची व माझी भेटही घडविली.

प्रा. थरकन हे पन्नाशीच्या सुमाराचे, शांत स्वभावाचे, आपल्या क्षेत्रात निपुण असे वाटले. त्यांनी अमेरिकेतील पेन्सिल्वेनिया विद्यापीठात शिक्षण घेतले असून इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून अनेक वर्षे एम्. ए. कॉलेजमध्ये कोट्टायमला काम केले आहे. सध्या ते ' मल्याळम् मनोरमा ' या दैनिकाच्या साप्ताहिक आवृत्तीचे संपादक आहेत. याच संस्थेचे ' भाषा भूषणी ' नावाचे द्वैमासिक आहे. त्याचेही ते संपादक आहेत. साहित्य व संस्कृती या विषयांना वाहिलेले हे एक भारदस्त व अभ्यासू लोकांसाठी चालविण्यात येणारे नियतकालिक आहे. त्याशिवाय ' वनिता ' हे स्त्रियांसाठी आणि ' बलराम ' हे मुलांसाठी अशी दोन मासिके ही संस्था चालविते. ' मल्याळम् मनोरमा 'तर्फे निघणारे वार्षिक अत्यंत स्वस्त, माहितीपूर्ण व उपयोगी आहे. एक हजार पृष्ठांच्या या ग्रंथाला फक्त वीस रुपये पडतात. संदर्भ ग्रंथ म्हणून त्याचे महत्त्व अपूर्व आहे. प्रा. थरकन यांनी आपल्या सहकाऱ्यांना बोलावून माझी त्यांच्याशी ओळख करून दिली. तसेच त्यांनी दैनिकाच्या छायाचित्रकाराला बोलावून माझी अनेक छायाचित्रेही घेतली. मराठी व मल्याळी साहित्य, नाटके, सांस्कृतिक घडामोडी यांच्याविषयी आमची भरपूर चर्चा झाली. आधुनिक मराठी रंगमंचाविषयी मी ' भाषा भूषणी 'साठी लेख लिहावा असे प्रा. थरकन यांनी सुचवले व मीही ती कामगिरी आनंदाने स्वीकारली. मी इंग्रजीत लेख लिहावा व त्याचे त्यांनी मल्याळीत भाषांतर करून द्यावे असे ठरले.

' मल्याळम् मनोरमाची 'ची भेट आटोपून मी पुन्हा साहित्य प्रवर्तकच्या कचेरीत आलो. श्री. चंद्रन यांना मी म्हटले, ' इथे आल्यासारखे एखादं मल्याळी नाटक पाहायला मिळेल तर बरं होईल.' त्यावर ते म्हणाले, ' आजच संध्याकाळी एक नाटक होणार आहे. ते सर्वत्र गाजलेलं लोकप्रिय नाटक आहे. त्याचे आतापर्यंत तीन हजारांवर प्रयोग झाले आहेत. पण आता ऐन वेळी त्याचं तिकीट मिळणं

अतिशय अवघड, जवळजवळ अशक्यच आहे. तरी पण मी प्रयत्न करतो आणि तिकीट मिळाले तर आयडा हॉटेलवर पाच वाजेपर्यंत फोन करतो.'

मी ते नाटक कुठे होणार आहे याची चौकशी केली. सुदैवाने नाटकाचा हॉल 'मल्याळम् मनोरमा' कचेरीपासून फक्त दोन मिनिटांच्याच अंतरावर होता. मी विचार केला, की आपणच हॉटेलवर जाता-जाता नाटकाच्या हॉलवर जाऊन दोन तिकिटे मिळाली तर खरेदी करावी आणि चंद्रन् यांना आपणच नाटकाला न्यावे.

मी साहित्य प्रवर्तकच्या साहित्यिकांचा निरोप घेऊन निघालो. नाटकाच्या हॉलवर गेलो. तिकिटाचा दर फार तर पंधरा किंवा वीस रुपये असेल असे मला वाटले होते. पण प्रत्यक्ष गेल्यावर कळले की पहिल्या रांगेतील तिकिटाचा दर एक हजार होता ! सर्व वस्तू जिथे अतिशय स्वस्त आहेत, अशा केरळमध्ये नाटकाच्या तिकिटाला एक हजार रुपये पडतात म्हटल्यावर मीच चाट पडलो. दोन तिकीटे घ्यायची तर माझे केरळच्या दौऱ्याचे सर्व पैसे खर्चून वर हजारभर रुपयांची उसनवारी करावी लागली असती ! म्हणून तिकीटवाल्याला 'मग येईन' असे गुळमुळीत उत्तर देऊन तेथून सटकलो. हॉटेलवर जाऊन आराम झोपलो. माणशी हजार रुपयांचं नाटक पाहणं आपल्या नशिबी नाही हे मनाशी पक्कं केलं. कारण नाटकाचा तो प्रयोग लायन्स क्लबच्या मदतीसाठी होता आणि त्याचं शेवटचं तिकीट होतं दोनशे रुपये ! म्हटलं, जंगलातल्या खऱ्या सिंहांनासुद्धा हे दर परवडणार नाहीत. संध्याकाळी एक-दोन साहित्यिकांना हॉटेलवर बोलावून व्हिस्की घेत गप्पा माराव्यात असे ठरवले. पण इतक्यात चंद्रन यांचा फोन आला, 'गुड न्यूज ! आज संध्याकाळच्या नाटकाचे दोन पासेस मिळाले आहेत. तुम्ही सहा वाजता साहित्य प्रवर्तकमध्ये या.'

मला अतिशय आनंद झाला. मी ठरल्या वेळी तिथं गेलो. चंद्रन यांना ज्यांनी हे पासेस दिले, ते मेनन नावाचे त्यांचे मित्रही आले होते. ते स्थानिक लायन्स क्लबचे उपाध्यक्ष होते. मग आम्ही तिघेही हॉटेल अंजलीच्या आलीशान हॉटेलच्या बारमध्ये गेलो. बियर घेतली आणि साडेसातच्या नाटकाला आम्ही हॉलमध्ये गेलो. ते तसे नाट्यगृह नव्हते. सभेचा हॉलच होता, पण तो तुडुंब भरला होता. आमच्या खुर्च्या अगदी पहिल्या रांगेत होत्या. श्री. मेनन म्हणाले, 'मराठी नाटककार व साहित्यिक आमच्या गावी येऊन आमचं नाटक पाहात आहेत हा आम्ही आमचा बहुमानच समजतो.' मग त्यांनी मला या नाटकाची मध्यवर्ती कल्पना आणि कथानकाचे काही भाग सांगितले नाटकाचे नाव होते, 'कय्युम् तलयुम् पुरत्त इडरद' आणि त्याचा अर्थ होता, 'हात किंवा डोके बाहेर काढू नका.' हे नाटक एका बसच्या प्रवासाबद्दल होते.

❁ ❁

# १२ : दहा लाख भक्तांची शबरी मलाई

केरळमध्ये अनेकदा रिक्षावाले, टॅक्सीवाले, बसवाले अचानक संप करतात. अशा अचानक संपामुळे लोकांचे केवढे मोठे नुकसान होते, हे दाखविण्यासाठी श्री. तापिल भासी यांनी ' कय्युम् तलयुम् पुरत्त इडरद ' (हात किंवा डोके बाहेर काढू नका) हे नाटक लिहिले. त्यातला गंमतीचा विरोधाभास असा, की हे स्वतः कम्युनिस्ट ! हा पक्ष विरोधात होता, तेव्हा त्यानेच केरळमध्ये संपाचे रान उठवले. तेव्हा त्या पक्षाला संपामुळे जनतेचे नुकसान होते याची जाणीव झाली नाही ! पण जेव्हा हा पक्ष इतर पक्षांबरोबर आघाडी स्थापून सत्तेवर आला, तेव्हा मात्र या पक्षाला साक्षात्कार झाला की संप हे फार वाईट हत्यार आहे ! कारण संपामुळे सरकारी गाडे जिथे-तिथे अडू लागले. म्हणून पूर्वी संपाचा जोरदार पुरस्कार करणाऱ्या श्री. तापिल भासी यांनी हे नाटक लिहून संप हा कसा समाजविघातक आहे याचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्या मागची राजकीय भूमिका काही काळ विसरूनच मी हे नाटक पाहिले. संहिता, अभिनय, दिग्दर्शन, नेपथ्य इत्यादी सर्वच अंगांनी कलाकृती म्हणून हे नाटक उत्कृष्ट होते हे मात्र खरे !

नाटकाची सुरुवात अगदी हलक्याफुलक्या वातावरणात होते. तिठ्यावर असलेल्या एका लहानशा गावी नवीन बस सर्व्हिस सुरू होणार असते. पहिल्या प्रवेशात या बसच्या कंडक्टर-ड्रायव्हरचा सत्कार, त्या गावच्या सरपंचाचा सत्कार, त्यातल्या गंमती दाखवल्या आहेत. हळूहळू नव्या बसने प्रवास करण्यासाठी प्रवासी जमू लागतात. नोकरीसाठी मुलाखत द्यावी म्हणून एक तरुणी आपल्या पित्याबरोबर त्रिवेंद्रमला जाण्यासाठी येते. आजारी असलेल्या आपल्या मुलाला भेटण्यासाठी जाणारी एक वृद्धा येते. चोरीच्या आरोपावरून अटक केलेल्या एका आरोपीला कोर्टातून परत नेणारा एक पोलीस येतो. एक प्रोफेसर, एक राजकीय पुढारी असे बरेचजण जमतात. एका बाईचे मूल अत्यवस्थ असते. त्याला भेटण्या-

साठी ती बसने जाऊ इच्छिते. असे विविध प्रकारचे बरेच उतारू येतात. शेवटी बस चालू होते. इथे पहिला अंक संपतो.

संबंध दुसरा अंक बसच्या आतच घडतो. या अंकाचे नेपथ्य विशेष लक्षात राहण्यासारखे आहे. बसमध्ये उतारू बसले आहेत. बस चालू होते तेव्हा खिडक्या-तून झाडे, घरे, डोंगर मागे सरकताना दिसतात. हा परिणाम विलक्षण वास्तवतेने साधला आहे. कंडक्टर तिकिटे दिल्यानंतर हिशोब करतो तेव्हा त्याच्या लक्षात येते की कुणीतरी एकाने तिकीट घेतलेले नाही. तो बस थांबवतो. प्रत्येक उतारूला तिकीट दाखवायला सांगतो, शेवटी असे आढळते की गावच्या सरपंचानेच तिकीट घेतलेले नाही ! तो म्हणतो, 'ही बस या मार्गावर मीच सुरू केली, मग मला फुकट प्रवास करायचा अधिकारच आहे.' पण कंडक्टर ते मान्य करीत नाही. सरपंच कुरकुरत तिकीट काढतो आणि बस चालू होते. सगळेचजण डुलक्या घेऊ लागतात. इतक्यात एक उतारू उठतो आणि कंडक्टरला ओरडून सांगतो, 'माझं गाव आलं, बस थांबवा.' पण कंडक्टर झोपलेला ! उतारू पुन्हा हाका मारतो. मग तो स्वतःच घंटा वाजवून बस थांबवतो, कारण तेवढ्यात त्याच्या स्टॉपपासून बस चांगली दीड मैल पुढे आलेली असते. कंडक्टर जागा होऊन विचारतो, 'घंटा कुणी वाजवली ? कंडक्टरशिवाय कुणीही घंटेला हात लावायचा नाही असा नियम आहे.' उतारू संतापून म्हणतो. 'नियम गेला खड्डयात ! तू झोपा काढतोस ना, आम्ही उतरणार कसे ?' कंडक्टरही त्याला कायदा सुनावतो. त्यांचे कडाक्याचे भांडण होते. बसमधून उतरताना कंडक्टरच्या श्रीमुखात भडकावून उतारू पळून जातो. सर्वांच्या समोर झालेला अपमान कंडक्टरला सहन होत नाही. तो लगेच जाहीर करतो, 'बस आता पुढे जाणार नाही, मी संपावर गेलो आहे.'

सर्वच उतारूंची त्रिवेंद्रमला तातडीची कामे असतात. ते बस चालू करण्याची विनंती करतात. ड्रायव्हरही कंडक्टरला सांगतो, 'जाऊ दे ना रे ! या लोकांची फार अडचण होईल. आपण बस सुरू करू या.' पण कंडक्टर दम देतो, 'तू बस सुरू केलीस तर मी कामगारसंघटनेकडे तक्रार करीन आणि तुला युनियनमधूनच नव्हे तर कामावरूनही काढून टाकायला लावीन.' त्यावर ड्रायव्हर गप्प राहतो. बस-मधील उतारू खाली उतरतात. मन रमवायचा प्रयत्न करतात. दुसरे वाहन मिळते काय ते पाहतात. पोलीस जरासा झोपला आहे हे पाहून गुन्हेगार त्याच्या खिशा-तील चावी काढून घेऊन पळून जातो. झोपेतून जागा झाल्यावर पोलीस किंचाळतो, 'आता मी बडतर्फ होईन. माझं आयुष्य संपलं !' एक टॅक्सी येते आणि ती सुंदर तरुणी व तिचा पिता यांना 'लिफ्ट' देते. पण पुढे कळते की टॅक्सीतील गुंडांनी वडिलांचा खून करून त्यांना रस्त्यावर फेकून दिले आणि मुलीवर बलात्कार केला. या धक्क्याने त्या तरुणीला वेड लागते. आपल्या आजारी मुलाला पाहायला निघा-लेल्या आईला समजते की आपले मूल आपली भेट होण्यापूर्वीच निधन पावले.

अशी प्रत्येकाची काही ना काही दुःखांतिका होते. आणि हे सगळे घडते वृथा अहंकार बाळगून अचानक संपावर जाणाऱ्या कंडक्टरच्या दुराग्रहामुळे !

नाटक रात्री साडेबाराच्या सुमाराला सुटले. त्यावेळी सारी उपहारगृहे बंद झाली होती. माझी जेवणाची अडचण होईल अशी चुटपुट माझे स्नेही चंद्रन हे व्यक्त करीत होते त्यांना वाईट वाटू नये म्हणून मी थाप मारली, 'माझं जेवण खोलीवर ठेवून द्यायला मी सांगितलं आहे.' त्यांनी मला आयेडा हॉटेलच्या प्रवेशद्वारात सोडले. आमचे किचन तेव्हा बंद झाले होते. मला सोडून श्री. चंद्रन यांची मोटार दूर गेलेली पाहून मी रस्त्यावर आलो. समोरून येणाऱ्या एका इसमाला विचारले, 'जवळपास सिनेमाचं थिएटर कुठे आहे?' तो माझ्याकडे आश्चर्याने पाहात म्हणाला, 'अहो पण आता सिनेमा सपला असेल' खरे तर मला सिनेमा पाहायचाच नव्हता. काहीतरी खायचे होते आणि अशा अवेळी फक्त सिनेमांच्या थिएटरजवळपासचीच उपहारगृहे उघडी असतात. मी त्याला म्हटले, 'सिनेमा संपला असला तरी चालेल.' त्याने एका दिशेने बोट दाखवले, तिकडे मी गेलो. चित्रपट नुकताच संपला होता. उपहारगृह उघडे होते. मी तिथे मसाला दोसा, इडली सांभार–मिळेल ते घेतले आणि भूक शमवून हॉटेलवर आलो.

दुसऱ्या दिवशी मला एक अपूर्व यात्रा पाहायची होती, ही यात्रा म्हणजे शबरी मलाईची, दक्षिणेतील ही सर्वांत प्रसिद्ध आणि सर्वांत महत्त्वाची यात्रा. उत्तरेत जे कुंभमेळ्याला महत्त्व तेच दक्षिणेत शबरी मलाईला. माझे दक्षिण भारतीय स्नेही के. डी. चंद्रन, सुंदरम् वगैरे सहकुटुंब त्रिचूरहून शबरी मलाई पर्वताकडे जाताना त्या दिवशी कोट्टायमला थांबणार होते. त्यांपैकी सुंदरम् हे बँकॉकला स्थायिक झाले आहेत. बँकॉक क्लबचे ते चिटणीस आहेत. शबरी मलाईच्या यात्रेसाठी ते मुद्दाम बँकॉकहून सहकुटुंब केरळमध्ये आले होते.

या यात्रेत सामील होणाऱ्यांना व्रतस्थ राहावे लागते. महिनाभर मांसाहार, मद्यपान, स्त्रीपुरुष संबंध टाळावे लागतात. ऋतुमती स्त्रीला सामील होता येत नाही. पुरुषांनी दाढी करू नये असे शास्त्र सांगते, उपास करावे लागतात आणि अतिशय साधे, ठराविक कपडे घालावे लागतात.

अतिशय सुशिक्षित असलेले दक्षिण भारतीय किती धार्मिक आणि कर्मठ आहेत हे या शबरी मलाईच्या यात्रेत दिसते. या यात्रेच्या अखेरच्या पर्वात लक्षावधी लोक दुर्गम डोंगर अनवाणी चालत जातात.

शबरी मलाईला कोट्टायम हे सर्वांत जवळचे असे मोठे शहर आहे. कोट्टायमपासून नऊ मैलांवर इरूमली नावाचे यात्रेकरूंचे केंद्र आहे. तिथून पाच मैलांवर पंपानीलिनाला व तिथून तीन मैलांवर शबरी मलाई देवालय आहे. देवापुढे ठेवायचा प्रसाद, नारळ व देवाला वाहायचे लोणी–तूप वगैरेंचे ओझे हे यात्रेकरू स्वतःच्या डोकीवर व पाठीवरून वाहून नेतात, त्यासाठी हमाल करणे हे निषिद्ध


मानले जाते. हे सामान यात्रेकरूंच्या डोक्यांवर देण्याचा समारंभ असतो. त्या धार्मिक विधीस केटुनिरा म्हणतात, पडशीसारखी दोन विभागांतील ही पिशवी असते. हिचा एक भाग डोक्याच्या पुढे व एक भाग मागे असतो. शबरी मलाईच्या पायऱ्या चढताना एक नारळ फोडला जातो व या पायऱ्या उतरताना म्हणजे व्रताची सांगता करताना दुसरा नारळ याच पायऱ्यांवर फोडला जातो. देवालयाच्या या पायऱ्या चढणे ही केरळीय भाविकांची जीवनातील फार मोठी महत्त्वाकांक्षा असते. लॉर्ड आयप्पाची मूर्ती या मंदिरात आहे.

या देवालयाचा इतिहास असा आहे, की शेकडो वर्षांपूर्वी पंडालम् वंशातील राजाच्या काळात उदयन नावाच्या दरोडेखोराने या भागात अनन्वित क्रूर कर्मे करून धुमाकूळ घातला. सारी प्रजा त्याच्या अत्याचारांनी हैराण झाली. उदयन आणि त्याच्या टोळीने शबरी मलाईच्या देवालयावरही हल्ला केला आणि पुजाऱ्यास ठार मारले. पुजाऱ्याचा एकुलता एक मुलगा बारा वर्षांचा होता. त्याने पित्याच्या खुनाचा सूड घ्यायची व उदयनला ठार मारण्याची प्रतिज्ञा केली. त्याने मंत्र-तंत्र-सिद्धी करून घेण्याचा प्रयत्न केला. पण उदयनच्या भीतीने त्याला शिक्षण देण्यास कोणीही गुरू धजेना. तेव्हा तो तरुण पर्वतावर जाऊन तप करू लागला.

याच वेळी उदयन याने राजघराण्यातील एक तरुणी पळवून नेली. तेव्हा देवाने त्या तरुणाच्या स्वप्नात येऊन त्याला सांगितले की, 'तू त्या मुलीशी विवाह कर. मग मी तुझ्या पत्नीच्या पोटी येईन.' त्याप्रमाणे तो तपस्वी तरुण उदयनकडे गेला आणि त्याने त्याला आपले मंत्रतंत्र सामर्थ्य दाखवले. दरोडे घालण्याच्या कामी त्याचा उपयोग होईल म्हणून उदयनने त्याला आपल्याकडे ठेवून घेतले. एका रात्री सर्वजण झोपले आहेत असे पाहून त्या तरुणाने त्या मुलीसह आपली सुटका करून घेतली आणि उदयनचा पाडाव केला. राजकन्या व तो तरुण यांचा विवाह झाले आणि कालांतराने देव त्यांच्या पोटी जन्माला आला.

तो लहान असताना राणीने आजाराचे सोंग घेतले व मुलाला सांगितले की या आजारावर एकच औषध आहे. ते म्हणजे वाघिणीचे दूध. राणीला वाटले की हा मुलगा जंगलात गेला की वाघ त्याला खाऊन टाकील व आपल्या राज्याचा धोका जाईल. मुलगा जंगलात गेला आणि एकच नव्हे तर वाघ-वाघिणींचा तांडाच घेऊन आला. वाघावर बसून तो राणीला म्हणाला, 'यांपैकी कोणत्या वाघिणीचं दूध हवं ते मला माहीत नव्हतं म्हणून जंगलातल्या सर्वच वाघवाघिणींना मी घेऊन आलो.' एका लहान मुलाने वाघांचा तांडा आणलेला पाहून लोक आश्चर्याने 'आयप्पा ! आयप्पा !' म्हणाले व तो देवाचा अवतार आहे हे लोकांना पटले.

त्या वेळेपासून तो आयप्पा याच नावाने ओळखला जाऊ लागला. आयप्पाने



**आयप्पाची मूर्ती**

केलेल्या अनेक चमत्कारांच्या कथा केरळात रूढ आहेत. त्याची पायी यात्रा केली असता आजार व रोगराई जाऊन समृद्धी व आरोग्य यांचा लाभ होतो अशी भक्तांची भावना आहे. दरसाल दहा लाख लोक महिन्याभराच्या काळात शबरी मलाईच्या यात्रेला येतात. या यात्रेकरूंत शेकडो मराठी लोकही असतात. आणि खास रेल्वे राखून ठेवून मुंबईहून लोक या यात्रेसाठी केरळमध्ये जातात. येसूदास हा गायक जन्माने ख्रिश्चन असला तरी आयप्पाचा भक्त आहे. आयप्पाच्या विषयावर मल्याळीत अनेक नाटके आहेत. या विषयावर आणखी एक नाटक लिहिण्याचे काम एका मराठी नाटककाराला अलीकडेच देण्यात आले आहे.

शबरी मलाईच्या यात्रेची ही झलक पाहून मी दुसऱ्या दिवशी त्रिवेंद्रमकडे जायचे ठरवले. त्यापूर्वी ' साहित्य प्रवर्तक 'च्या कचेरीत गेलो. तेथे आणखी काही लेखक भेटले. कोट्टायम ते त्रिवेंद्रम हा साधारण साडेसहा–सात तासांचा एस्. टी.चा

रस्ता होता. मी सकाळी अकराच्या सुमाराला निघालो. म्हणजे संध्याकाळी साडे-पाच–सहाच्या सुमाराला त्रिवेंद्रमला पोहोचेन अशी अपेक्षा होती.

एस्. टी. खच्चून भरली होती. पण मला बसायला जागा होती, त्यामुळे त्या गर्दीचा मला प्रत्यक्ष असा विशेष त्रास नव्हता. साडेबारा–एक वाजला तसा उन्हाचा मात्र ताप होऊ लागला. आम्ही साधारण शंभर एक मैलांचा प्रवास केला असेल–नसेल, तेवढ्यात मोटारीचा टायर मोठा आवाज करून फुटला आणि आमची बस थांबली. पस्तीस लोकांच्या बसमध्ये सत्तरहून अधिक लोक कोंबलेले आणि उन्हाचा तडाखा. हवा प्रसरण पावून आणि वाजवीपेक्षा वजन पडून टायर फुटला नसता तरच नवल! एका खेड्यात असतानाच तो फुटला हे त्यातल्या त्यात बरे! कारण त्यामुळे चहा, पाणी, काही खायला तरी मिळाले. कंडक्टर म्हणाला, 'आमच्याकडे दुसरा टायर नाही. इतर बसमध्ये जागा मिळेल तसे लोक पाठवतो.' त्यातही त्याने सांगितले की जवळच्या अंतरावर प्रवास करणाऱ्यांना आधी पाठव-णार आणि त्रिवेंद्रमला थेट जाणाऱ्यांना शेवटी. आम्ही थेट प्रवासी! काय कर-णार? बसची वाट पाहात बसण्याखेरीज गत्यंतर नव्हते.

एका उपहारगृहाच्या कट्ट्यावर सावलीत मी बसलो. सोडा मागवला. इत-क्यात आमच्या बसमधली एक हिप्पी तरुणी आली आणि मला विचारू लागली, 'कोकाकोला मिळेल का इथं?' मी म्हटले, 'सबंध भारतात कोकाकोला कुठंही मिळणार नाही. सोडा हवा तर घे.' तिने सोडा घेतला आणि तीही कट्ट्यावरच बसली. कारण पंखा नसल्याने आत भयंकर उकडत होते. तिच्याबरोबर एक दणकट हिप्पी होता तो कुठे दिसेना. मी विचारले तेव्हा ती हसून म्हणाली, 'कुठं गांजा–चरस मिळतो का ते पाहात असेल.'

मी अर्धा तास तिच्याबरोबर गप्पा मारीत होतो. तिने सांगितले की, ती मूळची स्वित्झर्लंडची. प्रवास करावा, देश पाहावे म्हणून भटकत वर्षापूर्वी निघाली. इटलीत रोममध्ये तिला हा मित्र भेटला. मग दोघांनीही प्रवास सुरू केला. दिल्ली-हून बस, रेल्वे पायी प्रवास करीत ती दोघे कोट्टायमला आली. आता त्रिवेंद्रमहून रामेश्वर करून सिलोनला जाण्याचा त्यांचा इरादा होता. 'सिलोनला कशासाठी जाणार?'– असे मी विचारले, तेव्हा ती म्हणाली, 'आमचं कुठल्याच देशात काहीच काम नाही. भटकणं आणि एकमेकांच्या सहवासाचं सुख घेणं एवढाच आमचा उद्देश आहे.'

मी म्हटले, 'तुमचा स्वित्झर्लंड देश अत्यंत सुंदर आहे. त्याहून अधिक असं तुम्हाला सिलोनमध्ये काय दिसणार आहे?'

'त्याहून वेगळं तरी काही दिसेल की नाही? आणि आमच्या देशातल्या गुळगुळीत, त्याच त्या एकाच साच्यातील सृष्टीसौंदर्याला कंटाळून तर मी बाहेर

पडले.' तिने उत्तर दिले. मी तिला विचारले, 'भारतात काय-काय पाहिलं ?' तिने सांगितले, 'दिल्ली, ताजमहाल, जयपूर, मुंबई सगळं पाहिलं.'

'तुमचं लग्न झालंय का ?'– तिचा हा प्रश्न अत्यंत अनपेक्षित होता. मी 'होय' म्हणून सांगितल्यावर ती म्हणाली,

'आमचा दोघांचा लग्नसंस्थेवर मुळीच विश्वास नाही. पशुपक्षी कुठं लग्न करतात ? ते माणसांच्यापेक्षा अधिक सुखी असतात.'

इतक्यात एक बस आल्याची चाहूल लागली आणि आम्ही हॉटेलची सावली सोडून तिच्याकडे गेलो. पण ती बस दुसरीकडे जाणारी होती. त्या उन्हात आणखी तासभर रखडल्यावर त्रिवेंद्रमची बस आली. कसेतरी दाटीवाटीत उभे राहून आम्ही त्रिवेंद्रमकडे निघालो. तिथे पोचलो तेव्हा रात्रीचे साडेआठ–नऊ झाले होते. मला 'भारत टूरिस्ट होम' नावाच्या हॉटेलचा पत्ता एका मित्राने दिला होता. त्रिवेंद्रमचा एस्. टी. स्टँड, रेल्वे स्टेशनसमोरच आहे. ही दोन्ही एकत्र आल्याने जवळपास निवासी हॉटेलांचे पेवच फुटले होते. पण तो भाग अत्यंत गजबलेला होता आणि रेल्वे, रिक्षा, बसेस् यांचे कर्कश आवाज सारखे ऐकू येत होते. तशातच जवळच्या महादेवाच्या देवालयात लावलेल्या रेकॉर्डस् उंच आणि अखंड आवाज करीत होत्या. मला तर शांत निवांत हॉटेल हवे होते. म्हणून 'स्टॅच्यू' जवळच्या स्वप्ना टूरिस्ट होममध्ये घे,' असे रिक्षावाल्याला सांगितले. हा भाग त्रिवेंद्रमचा सर्वांत मध्यवर्ती भाग होता हे तिथे जाताच माझ्या लक्षात आले. कारण पुतळ्याच्या समोरच केरळचे सचिवालय होते. मात्र आमचे हॉटेल आतल्या बाजूस एका लहानशा गल्लीत होते म्हणून निवांत होते. सोय आणि स्वच्छता याबाबत ते यथातथाच होते. पण आता रात्री नऊ–सव्वानऊला दुसरे हॉटेल शोधण्यात अर्थ नव्हता. शिवाय, दिवसभराच्या प्रवासाने मी दमूनही गेलो होतो. खोलीत सामान टाकले आणि प्रवासातला शीण घालविण्यासाठी वॉश घेऊन बाहेर पडलो. गल्लीच्या टोकाला आलो तर हमरस्त्यावर पहिलेच दुकान लागले, ते 'नॅशनल बुक स्टॉल'चे ! साहित्य प्रवर्तक संस्थेच्या या दुकानच्या व्यवस्थापकांना श्री. माधवन् नायर यांनी आधीच फोन करून मी येणार असल्याचे कळवले होते. म्हणून त्या दुकानात गेलो.

नॅशनल बुक स्टॉलच्या व्यवस्थापकांनी माझे स्वागत करून म्हटले, 'तुम्ही त्रिवेन्द्रमला येणार ही बातमी 'मातृभूमी' आणि 'मल्याळम् मनोरमा'मधून आधीच प्रसिद्ध झाली आहे. इथल्या 'तनी नरम' दैनिकाच्या संपादकांकडूनही आपली चौकशी करणारा फोन माझ्याकडे आला होता.'

मी त्या दैनिकाच्या संपादकांना फोन केला तेव्हा ते म्हणाले, 'तुम्ही लगेच इकडे टॅक्सी करून या. आम्ही तुमची वाट पाहात आहोत.'

वास्तविक दिवसभराच्या प्रवासाने आणि दगदगीने मी अगदी थकून गेलो

होतो. पण संपादकांचा फार आग्रह पडला म्हणून त्यांनी दिलेल्या पत्त्यावर टॅक्सी करून गेलो. त्यांचे घर मोठे होते व घराच्या एका भागात छापखाना व दैनिकाची कचेरी होती. हे दैनिक सुप्रसिद्ध मल्याळी नाट्य निर्माते श्री. श्रीधर नायर यांच्या मालकीचे होते. श्री. नायर यांना मी मुंबईस अनेकदा भेटलो होतो. त्यांच्या कला-निलयमची नाटके मुंबईस होत, तेव्हा ती पाहून मी त्या नाटकांवर एक लेखही लिहिला होता. श्री. नायर हे सहा-सात महिन्यांपूर्वी निधन पावले होते व त्यांचे जावई आता दैनिकाच्या संपादनाचे काम पाहात होते. प्रत्यक्ष भेटीत माझ्या लक्षात आले की संपादकमहाशयांनी बरेच मद्यप्राशन केले होते. कारण नेहमीपेक्षा फार अधिक उत्साहाने आणि कृत्रिमपणे ते बोलत असावेत असे मला वाटले. त्यांनी मला छापखाना दाखवला फोटोग्राफरला बोलावून त्यांच्याबरोबर माझी छाया-चित्रेही घेतली. तो शनिवार होता आणि रविवारच्या पुरवणीची छपाई चालू होती. मी ती पुरवणी पाहिली तेव्हा त्यातील मजकूर मला समजला नाही तरी अर्धनग्न आणि नग्न बायकांची छायाचित्रे पाहून मला त्या दैनिकाच्या दर्जाची कल्पना आली. माझे विचार साहाय्यक संपादक जैन यांनी हेरले असावेत. कारण ते काहीशा क्षमायाचनेच्या सुरात म्हणाले, ' लोकांची मागणी आहे म्हणून आम्हाला हे साहित्य पुरवावे लागते. '

संपादकांनी मला ' तुमचा त्रिवेंद्रममधील कार्यक्रम काय ?'— असे विचारले. मला ही भेट लवकर आटोपून हॉटेलवर जाऊन विश्रांती घ्यायची होती. म्हणून मी म्हटले, ' उद्या लवकर उठून मी येथील लेखकांच्या गाठीभेटी घेणार आहे. '

पण संपादकांना रात्री साडेनऊ–दहा वाजताही अमाप उत्साह होता. या उत्साहाचे कारण त्यांच्या समोर रिकामी होऊन पडलेली व्हिस्कीची बाटली हेच होते. ते म्हणाले, ' कुणाकुणाला भेटायचं आहे सांगा! मी फोन करून अपॉइंटमेंट्स घेतो. त्रिवेंद्रममध्ये मला सगळे ओळखतात. '

मी ' विलासिनी ' या टोपण नावाने लिहिणाऱ्या श्री. मेनन यांचे नाव सांगितले. माझी समजूत होती की संपादक दुसऱ्या दिवशी श्री. मेनन यांना फोन करून वेळ ठरवतील. पण त्यांनी लगेच फोन फिरवला आणि श्री. मेनन यांना ते म्हणाले, ' महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक रमेश मंत्री आपल्याला भेटायला येणार आहेत. मी त्यांना घेऊन आत्ताच तुमच्याकडे येतो. आम्ही आल्यावर तुम्ही आम्हाला व्हिस्की द्या किंवा नाईट क्लबला घेऊन जा. ते तुमच्यावर सोपवतो. ' असे म्हणून त्यांनी फोन खाली ठेवला. मला त्यांचे हे वागणे चमत्कारिक वाटले. एखाद्या अपरिचिताकडे प्रथमच जायचे तर रात्री दहा ही काही योग्य वेळ नव्हे. त्यातून श्री. मेनन हे फारच मोठे लेखक होते. भारतातील सर्वांत प्रदीर्घ (चार हजार पृष्ठे) कादंबरीचे ते विख्यात लेखक होते. त्यांना ' व्हिस्की द्या आणि नाईट क्लबला न्या ' अशा भाषेत काही सुचविणे अतिशय आक्षेपार्ह होते. पण त्या परि-

स्थितीत मी काहीच करू शकत नव्हतो. संपादक टाईट होते आणि त्यांनी टॅक्सीही मागवली होती.

श्री. मेनन यांच्या घरी आम्ही गेलो. त्यांचा बंगला फारच मोठा आणि सुंदर आहे. बंगल्यासमोर प्रशस्त हिरवळ आणि विस्तृत बाग आहे. मेनन एकंदरीत चांगले धनवान आणि खानदानी असावेत हे उघडच होते. त्यांनी आमचे हार्दिक स्वागत केले. माझ्याविषयी त्यांनी मल्याळी वृत्तपत्रांतून आधीच वाचले होते. मला सर्वांत आश्चर्याची गोष्ट वाटली ती अशी की, तनी नरम (अर्थ : ट्रू कलर किंवा खरा रंग) या दैनिकाच्या संपादकांची आणि त्यांची ओळखही नव्हती ! आता तर संपादकांचा आगाऊपणा मला अधिकच आक्षेपार्ह वाटला. मेनन यांच्या घरी जाता-नाही संपादक काहीतरी अप्रस्तुत बोलत होते. ते म्हणाले ' माझी एक मैत्रिण आहे. माझ्या बायकोचं आणि तिचं वैमनस्य आहे. ' खरे तर ओळख झाल्यापासून अर्ध्या तासातच अशा खाजगी गोष्टी बोलणे शिष्टसंमत नाही. पण संपादक इतक्या तारेत होते की त्यांच्याशी बौद्धिक पातळीवरून काही बोलणेच कठीण होते.

संपादकांची ही अवस्था श्री. मेनन यांच्या चटकन लक्षात आली. त्यांनी संपादकांकडे दुर्लक्ष करून माझ्याशीच बोलणे चालू ठेवले. श्री. एम्. के. मेनन हे पंचवीस वर्षे सिंगापूरमध्ये पत्रकार म्हणून काम करीत होते. ए. एफ्. पी. या फ्रेंच वृत्तसंस्थेचे ते प्रतिनिधी होते. या दोन तपांत त्यांनी अतिपूर्वेकडील अनेक देशांत प्रवास करून प्रदीर्घ अनुभव घेतला. १९४९ ते ५० या काळात ते मुंबईत ' फ्री प्रेस 'मध्ये काम करीत होते. ' निझकल ' या कादंबरीबद्दल त्यांना साहित्य अकाद-मीचे पारितोषिकही मिळाले आहे. सिंगापूरमध्ये पाहिलेल्या जीवनाच्या पार्श्व-भूमीवर त्यांनी ' अवकाशिकल ' ही आपली चार हजार पृष्ठांची कादंबरी बारा वर्षे श्रम करून लिहिली. मलाया, सिंगापूर, मलेशिया या भागातील लोकजीवनांचे त्यांनी सूक्ष्म निरीक्षण केले आहे. त्यांच्या लेखनपद्धतीबद्दल मी विचारले तेव्हा श्री. मेनन म्हणाले, ' मी तीन ते चार वेळा लिहितो. ' अवकाशिकल ' या कादंब-रीची प्रसिद्ध झालेली पाने चार हजार असली, तरी प्रत्यक्षात रफ–फेअर अशी मी पंधरा ते सोळा हजार पाने लिहिली. मलायात जाऊन लक्षावधी रुपये मिळवि-णाऱ्या एका निपुत्रिक भारतीयाची कथा या कादंबरीत मी सांगितली आहे. परदे-शात आपले भारतीय व्यक्तिमत्व टिकविण्याची धडपड करणाऱ्या, कर्तृत्ववान माणसाच्या भावना या कादंबरीत मी रंगविण्याचा प्रयत्न केला आहे. '

श्री. मेनन यांनी मराठी नाटक, मराठी साहित्य, महाराष्ट्र–केरळ संबंध यावर बराच वेळ चर्चा केली. नंतर मला काही मल्याळी लेखकांनी सांगितले की श्री. मेनन यांना कधी ना कधी ज्ञानपीठ पारितोषिक मिळण्याची शक्यता आहे. इतक्या थोर साहित्यिकाची भेट एका दारूड्या संपादकाच्या आगाऊपणामुळे अवेळी घ्यावी लागली याचे मला वाईट वाटले. अकराच्या सुमाराला आम्ही श्री. मेनन


यांच्या बंगल्यावरून निघालो. संपादकमहाशय जरा घुश्श्यातच होते. कारण मेनन यांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केलेच आणि व्हिस्की न देता कॉफी आणली. नाईट क्लबचा तर त्यांनी विषयही काढला नाही. त्रिवेन्द्रममध्ये आपल्याला सगळे मानतात हा त्यांचा दावाही खोटा ठरला. संपादकांनी मला हॉटेलवर सोडले, तेव्हा सव्वाअकरा वाजले होते. मला जेवण मिळाले नव्हते. आता सगळी उपहारगृहेही बंद झाली होती. केरळमध्ये दारूबंदी नसल्याने बार मात्र उघडे होते. मी जवळच्याच बारमध्ये गेलो. एक थंड बियर घेतली. तिथे चणे–शेंगदाण्यांखेरीज खायला काहीच नव्हते. मग रस्त्यावरच्या खाद्यपदार्थांच्या गाड्या शोधू लागलो. सांबार–इडली-वडावाला एकजण दिसला, त्याच्याकडून इडली–सांबार घेऊन जेवणाची गरज भागवली. योगायोग असा की, माझी लागोपाठ तीनही जेवणे अशी काहीशी किरकोळ खाऊन झाली होती. आधल्या रात्री कोट्टायमला नाटक उशीरा सुटले म्हणून जेवण नाही, दुपारी प्रवासात अडकून पडल्यामुळे जेवण नाही आणि आता लेखकाच्या भेटीत उशीर झाल्यामुळे जेवण नाही. पण प्रवास म्हटला की असे चालायचेच या विचाराने मी हॉटेलवर आलो आणि शांत झोपी गेलो.

❊ ❊

# १३ : त्रिवेंद्रमचा कलात्मक ठेवा

त्रिवेंद्रम ही केरळची राजधानी. पण मद्रासची शान या शहराला नाही. ही गरीबांची राजधानी आहे. इथले सचिवालयही साधेच आहे. गावात झाडी मात्र भरपूर. त्यामुळे त्रिवेन्द्रम प्रसन्न वाटते. लोकांची राहणी साधी. गुन्ह्यांचे प्रमाण अत्यंत कमी. शहरात केव्हाही, कुठेही बिनधास्त फिरावे. दुबई आणि इतर आखाती देशांतून पैसा कमावून आलेल्या केरळीयांमुळे गेल्या आठ–दहा वर्षांत अत्याधुनिक बार्स आणि नाईट क्लब्ज झाले आहेत. समुद्रकिनाऱ्यावर शहर वसल्यामुळे कोवालम हा किनारा थेट गोव्यातील कोळवा-कळंगुटसारखा वाटतो. उंची हॉटेलसचीही चलती आहे. कोवालम बीच रिझॉर्ट, मॅस्कॉट, बेलएअर अशी एअरकन्डिशन्ड शाही हॉटेल्स त्रिवेंद्रममध्ये आहेत. पण मुंबईच्या ऑबेरॉय–ताजमहालच्या तुलनेने इथले दर कमी आहेत. उदाहरणार्थ, ताजमहालमध्ये ज्या खोलीला रोज साडेचारशे रुपये पडतात, त्याच सुविधा असलेल्या मॅस्कॉटमध्ये रोज एकशेपंधरा रुपये पडतात. सरकारी पुस्तिकेत दिलेल्या काही हॉटेलांचे दर अविश्वसनीयरीत्या कमी आहेत. ‘इंटरनॅशनल’ हे बडे नाव धारण करणाऱ्या हॉटेलच्या खोलीला दररोज फक्त सहा ते सात रुपये द्यावे लागतात, यावरून त्रिवेंद्रममधील स्वस्ताईची कल्पना यावी.

त्रिवेंद्रम हे नाव थिरु–अनंतपुरम्‌वरून आले आहे. विष्णू ज्या नागावर विश्रांती घेतात त्याचे नाव अनंत. त्या अनंताचा निवास (थिरु) जेथे आहे ते थिरु अनंतपुरम्. त्याचा अपभ्रंश होऊन त्रिवेंद्रम् हे नाव पडले. या शहरातल्या मुक्कामात मला दोन महत्त्वाच्या गोष्टी करायच्या होत्या. प्रेक्षणीय स्थळे पाहणे आणि प्रमुख मल्याळी साहित्यिकांना भेटणे. सुदैवाने खुद्द त्रिवेंद्रममध्ये एक पद्मनाभस्वामीचे मंदिर सोडल्यास फार महत्त्वाची मंदिरे नव्हती. कारण आतापर्यंत तमिळनाडू आणि केरळमध्ये मी अगणित मंदिरे पाहिली होती. प्रेक्षणीय स्थळे काय केव्हाही पाहता येतील म्हणून सकाळी मी निरनिराळ्या लेखकांना फोन केले



**त्रिवेंद्रमचे सचिवालय**

आणि त्यांच्याशी वेळा ठरवून घेतल्या. कोट्टायमच्या साहित्य प्रवर्तक संस्थेने मला या लेखकांचे फोन क्रमांक व पत्ते दिले होते. सुप्रसिद्ध मल्याळी कवी ओ. एन्. व्ही. कुरूप यांनी मला लगेच आपल्या घरी बोलावले. त्यांनी मला कसे यायचे त्याबद्दलही सूचना दिल्या. त्याप्रमाणे मी रिक्षा केली. एका मिशनरी कॉलेज-जवळच्या ख्रिस्ताच्या पुतळ्याजवळ उतरलो आणि दोन–तीन मिनिटे चालल्यावर श्री. कुरूप यांचा बंगला लागला. केरळमध्ये मी एक पाहिले. बहुतेक लेखक स्वतःच्या छानशा टुमदार बंगल्यात राहतात. सुंदर बाग आणि नारळाची–आंब्यांची झाडे बहुतेकांच्या बंगल्यासमोर असतात.

श्री. कुरूप हे पन्नाशीच्या वयाचे, सौम्य प्रकृतीचे लेखक आहेत. ज्यांना आधुनिक रोमॅन्टिक कवी म्हणता येईल अशा पिढीतील ते एक प्रमुख कवी आहेत. त्यांच्या चार काव्यसंग्रहांना केरळ साहित्य अकॅडमीची पारितोषिके मिळाली आहेत. भारत सरकारच्या अकॅडमीवर ते मल्याळी भाषेचे प्रतिनिधी आहेत. त्यांची आतापर्यंत कवितांची सतरा पुस्तके प्रसिद्ध झाली असून चित्रपटगीते लिहिणाऱ्यांत श्री. कुरूप हे अग्रगण्य आहेत. आतापर्यंत त्यांनी पाचशे चित्रपटगीते लिहिली आहेत. मी त्यांना श्री. ग. दि. माडगूळकर यांचे या क्षेत्रातील कार्य सांगितले. त्यावर श्री. कुरूप म्हणाले, 'आपल्या देशात इतक्या विविध भाषा आहेत की एकाच क्षेत्रात कार्य करणारेही भाषेच्या अडचणीमुळे एकत्र येऊ शकत नाहीत. तुम्ही आपण होऊन महाराष्ट्रासारख्या दूरच्या भागातून मल्याळी लेखकांना भेटण्यासाठी आलात ही विशेष कौतुकाची गोष्ट आहे.' श्री. कुरूप यांच्या 'अक्षरम्' या काव्यसंग्रहाच्या चार आवृत्त्या निघाल्या आहेत. त्यांनी या संग्रहाची


एक प्रत मला भेट म्हणून दिली. केरळ साहित्य अकॅडमी, मराठी साहित्यातील नवे प्रवाह, दोन्ही भाषांतील चित्रपट व नाटके अशा विविध विषयांवर आम्ही भरपूर चर्चा केली. श्री. कुरूप हे व्यवसायाने प्राध्यापक असून त्रिवेंद्रम् विद्यापीठात ते मल्याळी साहित्य हा विषय शिकवितात.

आमच्या मुलाखतीच्या शेवटी श्री. कुरूप म्हणाले, 'माझे स्नेही व श्रेष्ठ मल्याळी लेखक श्री. ए.न् कृष्ण पिल्ले यांना आपण भेटू इच्छित असाल तर मी त्यांना आताच फोन करतो.' त्यांचे नाव माझ्या यादीत होतेच. त्यांना भेटण्यास मी उत्सुक आहे असे मी म्हटले तेव्हा श्री. कुरूप यांनी फोन करून श्री. पिल्ले यांना मी येत असल्याचे कळविले. श्री. कुरूप म्हणाले, 'त्यांचे घर माझ्या घरापासून पाच मिनिटांच्या अंतरावर आहे, म्हणून मी आताच मुलाखत ठरवली.' माझ्याही दृष्टीने ते बरेच झाले, कारण माझी एक फेरी वाचली. मी दिलेल्या पत्त्यावर श्री. पिल्ले यांनाही भेटलो. त्यांचाही सुंदरसा बंगला वृक्षांच्या राईत आहे. या मल्याळी लेखकांचा कुणालाही हेवा वाटावा अशीच त्यांची राहणी कलात्मक आहे.

श्री. ए.न् कृष्ण पिल्ले हे साठी उलटलेले ज्येष्ठ नाटककार व साहित्यिक आहेत. त्यांना मल्याळीचे इब्सेन म्हणतात. सामाजिक जाणीवेची नाटके त्यांनी लिहिली. विशेषतः कुटुंबसंस्था आणि कुटुंबातील मतभेद हा त्यांच्या नाटकांचा विशेष महत्त्वाचा विषय आहे. १९४२ ते १९६६ या काळात त्यांनी सात प्रागतिक नाटके लिहिली. भग्न भवनम्, कन्यका, बलाबलम् ही त्यांची खास गाजलेली नाटके आहेत. आचार्य अत्रे यांच्या नाटचलेखनात एक दीर्घ खंड पडला होता. तसेच श्री. पिल्ले यांच्या बाबतीतही झाले. १९५६ ते १९७२ पर्यंत त्यांनी नाटक लिहिले नाही. १९७२ नंतर त्यांनी दोन नवीन, प्रभावी नाटके लिहिली. 'मरियचा' (वाळवंटातील हिरवळ) आणि 'कुडतिलवलाक' (खडकावरचा दिवा) ही ती नाटके होत. 'बलाबलाम्' या नाटकात त्यांनी सासू व सून यांच्यातील संघर्ष दाखवला आहे. तडजोड केल्याशिवाय संसार सुखाचा होत नाही हे त्यांच्या अनेक नाटकांचे मुख्य सूत्र आहे. आधुनिक मल्याळी स्त्रियांच्यात झालेली जागृती त्यांनी प्रभावीपणे मांडली आहे. म्हणून श्री. एन्. कृष्ण पिल्ले यांना मल्याळीचे इब्सेन म्हणतात. मिळवत्या मुलीचा बिकट प्रश्न एका नाटकात आपण कसा मांडला आहे हे सांगताना ते म्हणाले, 'मुलगी मिळवती झाली की घरातील सारेजण तिच्याकडे उत्पन्नाचे साधन म्हणून पाहतात. आपल्या स्वार्थामुळे मुलीच्या सुखाचा विचार प्रत्यक्ष बापही गौण मानतो. दुभती गाय घरात पाळावी आणि तिने आपले पोषण करावे अशी प्रत्येकाने अपेक्षा ठेवावी तसा प्रकार मिळवत्या मुलीच्या बाबतीत होतो. शेवटी ही प्रौढ कुमारिका कचेरीतील प्यूनबरोबर पळून जाते आणि त्याच्याशी लग्न करून सुखी होते असे मी दाखवले आहे.'

'अडिमुखैतेक' (बांध) या नाटकात श्री. पिल्ले यांनी एका सामान्य

गृहिणीची असामान्य कथा दाखवली आहे. त्यांच्या या नाटकाला केंद्र सरकारचे अकॅडमी पारितोषिक मिळाले असून इतर दोन नाटकांना राज्य सरकारच्या अकॅडेमीची पारितोषिके मिळाली आहेत. ' इब्सेनच्या नाटकांचा माझ्यावर खूपच प्रभाव झाला. मात्र मी स्वतःला मल्याळीचा इब्सेन समजत नाही. तो फार थोर नाटककार आहे.' असे शेवटी श्री. पिल्ले म्हणाले. त्यांची मुलाखत संपेतोपर्यंत दुपारचा एक वाजला. मी रिक्षाने स्वप्ना टूरीस्ट होमवर आलो. हॉटेल बदलण्याचा विचार काल रात्री केला होता. जवळची दोन हॉटेले पाहिली. पण ती स्वप्ना हॉटेलपेक्षाही बेकार होती. शेवटी तिथेच राहायचे ठरवले. सुदैवाने पुतळ्याजवळ चांगले मांसाहारी जेवण मिळाले. तीन जेवणे इडलीसांभारवरच करावी लागल्याने ते अधिक रुचकर लागले असावे. शिवाय समोर परमिटरूम होती. त्यामुळेही थकवा जायला चांगली मदत झाली.



**त्रिवेंद्रमच्या वस्तुसंग्रहालयातील शिवपार्वतीच्या सुबक मूर्ती.**

दुपारी विश्रांती घेऊन त्रिवेंद्रमची काही प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी बाहेर पडलो. या राजधानीत एक बरे आहे. चार प्रेक्षणीय स्थळे एकाच आवारात आहेत. बोटॅनिकल गार्डन्स, प्राणीसंग्रहालय, म्युझियम आणि आर्ट गॅलरी ! बोटॅनिकल गार्डन्स हे उद्यान खास असे काही नाही. विशेषतः मी लंडनची क्यु गार्डन,

कलकत्त्याची ईडन गार्डन्स अशी नामांकित उद्याने पाहिली असल्याने मला या बागेत विशेष असे काही आढळले नाही. तरी केरळीय बागेत मिळणारा तजेला आणि उत्साह मला इथे आढळला. काहीही काम नसताना नुसते झाडांच्या आणि फुलांच्या सहवासात हिंडणे हाही एक मोठाच विरंगुळा आहे.


प्राणीसंग्रहालय त्या मानाने चांगले आहे. केरळमध्ये विपुल झाडी आणि डोंगर असल्यामुळे की काय, या प्राणीसंग्रहालयात वानरांचे प्रकार आणि संख्या लक्षात भरण्यासारखी आहे. यांच्याच पूर्वजांनी रामाला सेतू बांधण्याच्या कामी मदत केली असेल असा गंमतीदार विचार ही वानरे पाहताना माझ्या मनात आला. पण पूर्वजांच्या पराक्रमावर भाव मारण्याची माणसांची परंपरा या वानरांना अवगत नसल्याने ती सामान्य माकडांचे बंदिस्त जिणे जगत होती !

त्रिवेन्द्रमच्या म्युझियममध्ये दक्षिण भारतातील मूर्ती, रथाची प्रचंड प्रतिकृती, केरळीय वेष, हस्तिदंतावर कोरलेल्या कलाकृती, पुष्पक विमानाची प्रतिकृती, शेषशायी विष्णू, कालियामर्दन करणारा कृष्ण अशा उत्तम वस्तू आहेत. दगडात आणि लाकडात कोरलेल्या काही मूर्ती अत्यंत सुबक आहेत. काही इंडोनेशियन वस्तू इथे आहेत. त्रावणकोरच्या महाराजांनी इंडोनेशियाला भेट दिली, त्यावेळी त्यांनी या आणल्या होत्या. त्रावणकोर संस्थानच्या विलीनीकरणानंतर त्या वस्तू केरळ राज्याकडे आल्या. पण राज्याच्या राजधानीच्या मानाने म्युझियमचा आवाका लहान वाटला. त्या मानाने मद्रासचे म्युझियम अधिक भव्य तर आहेच, पण त्यातील वस्तूंत अधिक विविधताही आढळली.

त्रिवेन्द्रम्च्या म्युझियमची इमारत मात्र देखणी आहे. विशेषत: तिचा कौलारू भाग झाडांच्या गर्दीत विशेष शोभून दिसतो. या म्युझियमजवळ असलेली आर्ट गॅलरी मात्र खास प्रेक्षणीय आहे. राजा रविवर्मा यांची काही उत्कृष्ट चित्रे इथे पाहायला मिळतात. त्याशिवाय रविंद्रनाथ टागोर, कनु देसाई, हालदार, असित-कुमार, मुझुमदार इ. नामवंत भारतीय चित्रकारांच्या नेत्रसुखद कलाकृती या आर्ट गॅलरीत आहेत. राजा रविवर्मा यांचे ' शकुंतला ' हे विलक्षण भावस्पर्शी चित्र येथे आहे. त्याशिवाय ' पॉव्हर्टी ' आणि ' लेडी इन्-प्रिझन ' ही त्यांची गाजलेली चित्रेही येथे आहेत. शिकागो येथील प्रदर्शनात या चित्रांना पारितोषिके मिळालेली आहेत. नल–दमयंती, विराटाच्या दरबारातील द्रौपदी अशी भारतीय पुराणांची पार्श्वभूमी असलेली चित्रेही लक्षात राहतात. शोकमग्न सीता, रावणाकडून होणारा जटायूच्या पंखाचा छेद ही चित्रेही त्याच प्रकारातली !

राजा रविवर्म्यांचा काळ १८४८ ते १९०६ चा ! ते मूळ राजघराण्यातील नव्हते. पण त्रावणकोरच्या राजाने त्यांच्या चित्रकलेवर लुब्ध होऊन त्यांना आपले राजचित्रकार केले. पुढे राजघराण्यातील एका कन्येचे व त्यांचे प्रेम जमले आणि त्या उभयतांचा विवाहही झाला. राजा रविवर्मा यांची जर्मनीत छापलेली चित्रे

६२३
२३५९०



**राजा रविवर्मा यांची एक कलाकृती (आर्ट गॅलरी : त्रिवेंद्रम्).**

भारतातील घरोघरी पूर्वी आढळत. पन्नास वर्षांपूर्वी महाराष्ट्रात रंगभूमीवर बालगंधर्व आणि घरच्या दालनात रविवर्मा असे दृश्य लहानमोठ्या गावीही दिसत असे.


राजा रविवर्मा यांनी पौराणिक प्रसंग चितारलेच, पण राजघराण्याशी संबंध आल्यानंतर त्रावणकोर, बडोदा, म्हैसूर अशा इतर राजघराण्यांतील प्रमुख व्यक्तींची तैलचित्रेही त्यांनी तयार केली. ही आर्ट गॅलरी म्हणजे त्रावणकोरचे एक

वैभव आहे. कारण इथे राजा रविवर्मा यांच्याप्रमाणेच इतर अनेक भारतीय चित्रकारांच्या श्रेष्ठ कलाकृती आहेत. परकीय चित्रकारांनीही आपल्या उत्कृष्ट कलाकृती येथे ठेवल्या आहेत. फ्रँकब्रुक यांची 'लेडी वुईथ ए फॅन' ही कलाकृती विशेष उल्लेखनीय आहे. अजंठा पद्धतीची काही भित्तीचित्रेही दुसऱ्या मजल्यावर आहेत.

त्रिवेंद्रममधील लेखकांच्यापैकी डॉ. के. एम्. जॉर्ज यांना मला भेटायचे होते. केरळ साहित्य अकॅडमीने 'कम्पॅरेटिव्ह इंडियन लिटरेचर' हा भारतीय भाषांतील साहित्याच्या तौलनिक अभ्यासाचा कोश तयार करण्याचे काम डॉ. जॉर्ज यांच्याकडे सोपविले आहे. त्यांना मराठी साहित्याची पार्श्वभूमी माहीत असल्याचे मला प्रत्यक्ष आढळले. त्रिवेंद्रमच्या कौडियार या शांत–निवांत भागात ते राहतात. सभोवती बाग, नारळीची–आंब्याची झाडे आणि मध्येच त्यांचा टुमदार बंगला आहे. मी त्यांच्या घरातून दोन–तीनशे फूट अंतरावर गेलो आणि अचानक जोरदार पाऊस आला. एका दुकानाच्या वळचणीला मी उभा राहिलो. पाऊस अर्धाएक तास फारच मोठा होता. तो थोडा कमी झाल्यावर मी डॉ. जॉर्ज यांच्याकडे गेलो. त्यांनीही वृत्तपत्रांतून माझ्या केरळ–भेटीविषयी वाचले होते. ते म्हणाले, 'तौलनिक साहित्याचा कोश दोन भागांत प्रसिद्ध होईल. प्रत्येक भागाची पृष्ठसंख्या एक हजार तरी असेल. मॅक्मिलन ही जगप्रसिद्ध प्रकाशन संस्था हे दोन ग्रंथ प्रकाशित करणार आहे. या ग्रंथात भारतातील प्रमुख भाषांतील लोकवाङ्मय काव्य, कादंबरी, नाटक, कथा, ललित साहित्य बालवाङ्मय इत्यादीविषयीची तौलनिक माहिती येईल. मराठीतील या वाङ्मयप्रकारांचे लेखन प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, वसंत शिरवाडकर, के. ज. पुरोहित, सौ. सरोजिनी वैद्य इत्यादी लेखक करीत आहेत.'

डॉ. जॉर्ज यांची सात इंग्रजी आणि पंचवीस मल्याळी पुस्तके प्रसिद्ध आहेत. ते प्रामुख्याने समीक्षा करतात. 'सर्व्हे ऑफ मल्याळी लिटरेचर' हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ एशिया पब्लिकेशन या संस्थेने प्रसिद्ध केलेला आहे. केंद्र सरकारची साहित्य अकादमी आणि राज्य सरकारची साहित्य अकादमी यांत डॉ. जॉर्ज यांनी महत्त्वाची पदे भूषविली आहेत. ते अमेरिकेला व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून तीन वेळा जाऊन आले आहेत. शिकागो विद्यापीठात त्यांनी द्रविड साहित्य हा विषय शिकविला आहे आणि कॅलिफॉर्निया विद्यापीठात मल्याळी साहित्य या विषयाचे अध्यापन केले आहे. हवाई विद्यापीठातही त्यांनी मल्याळी साहित्य शिकविले आहे. त्यांच्याशी बोलताना माझ्या लक्षात आले की त्यांना मराठी साहित्य आणि साहित्यिक यांच्याविषयी खूपचमाहिती आहे.

त्रिवेंद्रमच्या मुक्कामात एक दिवस सुप्रसिद्ध पद्मनाभ मंदिर पाहिले. याला



**त्रिवेंद्रमच्या सुप्रसिद्ध पद्मनाभ मंदिरातील मूर्ती.**

अनंतशयन मंदिर असेही म्हणतात. त्रिवेंद्रमच्या राजांचे हे कुलदैवत. संस्थान खालसा झाले, त्यावेळी भारत सरकारबरोबर केलेल्या करारावर सही करताना राजाने 'फॉर अनंतशयनम्' अशी आपली सही केली होती. म्हणजे 'भगवान अनंतशयनम्च्या वतीने आपण संस्थान खालसा करण्यास संमती देतो.' मंदिराला तीन दरवाजे आहेत. एका बाजूने स्त्रियांनी जायचे, दुसऱ्या बाजूने पुरुषांनी जायचे. मात्र मधला दरवाजा फक्त त्रिवेंद्रमच्या राजघराण्यासाठीच आहे. इतर कोणालाही त्या दरवाजातून प्रवेश करावयास बंदी आहे. केरळमधील इतर मंदिरांप्रमाणेच या मंदिरात प्रवेश करण्यासाठी पुरुषांना धोतर नेसावे लागते, शर्ट काढावा लागतो. धोतर पन्नास पैशांना प्रवेशद्वाराजवळ भाड्याने मिळते. भारतात जी एकशे आठ वैष्णवतीर्थे आहेत, त्यांपैकी त्रिवेंद्रमचे हे पद्मनाभमंदिर एक आहे. तमीळनाडूमधील गोपुरे भरपूर उंच असतात. केरळमधील मंदिरे त्या मानाने साधी आहेत. पण हे भव्य मंदिर तमिळनाडूतील मंदिरांच्या धर्तीवर आहे, कारण त्याला प्रथमपासून राजाश्रय मिळाला. या मंदिराचे गोपूर शंभर फुटांहून उंच आहे, आणि वेगळेपणा लक्षात यावा इतके रुंदही आहे.

आज जेथे हे भव्य मंदिर उभे आहे, तेथे पूर्वी घनदाट जंगल होते. या जंगलातून एकदा एक नवरा-बायको जात असता भाताच्या पिकातून त्यांना एका अर्भकाच्या रडण्याचा आवाज आला. हे बालक कोणीतरी टाकून दिले आहे आणि अत्यंत भुकेले आहे हे त्या स्त्रीच्या लक्षात आले, तेव्हा तिने बालकाला पदराखाली घेतले आणि ते तृप्त झाल्यावर त्याला एका झाडाखाली ठेवले. इतक्यात पाच फण्यांचा एक प्रचंड नाग आला आणि त्याने त्या बालकाला झाडाच्या खोडाच्या

खोबणीत ठेवले. हा चमत्कार पाहून त्या स्त्रीने ते बालक म्हणजे शेषशाई भगवानाचा अवतार मानून त्याला तांदळाच्या कांजीचा नैवेद्य दिला. ही घटना त्रिवेंद्रमच्या राजाला समजली तेव्हा त्याने अनंतशयनमचा हा साक्षात्कार मानून हे भव्य मंदिर उभारले. या गोष्टीला तीनशे वर्षे झाली, पण अजून देवाला तांदळाच्या कांजीचा नैवेद्य देतात. या मंदिराच्या बांधणीला बावीस वर्षे लागली आणि त्यासाठी चार हजार कामगार खपत होते. मोठमोठे दगड आणि लाकूड आणण्यासाठी पाचशेवर हत्ती लावले होते. या मंदिराच्या शिल्पकाराचा पुतळा प्रवेशद्वारातून आत गेल्यावर दिसतो. या मंदिरात डाव्या बाजूला जो मंडप आहे, तो पाहण्यासाठी फी द्यावी लागते हे मात्र खटकते. या ठिकाणी पूर्वी नव्या राजाचा राज्यारोहण समारंभ होत असे. मंडपाच्या चार कोपऱ्यात सप्तसुरांचे स्तंभ आहेत. असे स्तंभ केरळ आणि तमिळनाडूत अनेक मंदिरांत आहेत. पूजास्थान आणि संगीत यांच्या साहचर्याच्या या खुणा आहेत. अनेक संस्थानांत दरबार–गायक मंदिरात गायन करीत आणि त्याचा खर्च संस्थानाधिपती करीत असत. पद्मनाभ मंदिरातील या मंडपात शंकर, लक्ष्मी, गायत्री, राम, कृष्ण वगैरेंच्या सुबक मूर्ती आहेत. छताला उत्तम नक्षी असून तीत मोठी घंटा कोरली आहे. प्रवेशद्वाराजवळ हनुमान, गरुडाच्या मूर्ती आहेत. विष्णूचे वाहन म्हणून गरुडाची मूर्ती आहे.

गाभाऱ्यात अनंतशयन विष्णूची पंधरा फूट लांब मूर्ती आहे. नाभीतील कमलात ब्रह्मदेव असून पायाजवळ ऋषींच्या मूर्ती आहेत. मूर्ती आडवी आणि बरीच लांब असल्याने मस्तक, नाभी व चरण अशा तीन दर्शनांसाठी तीन वेगळे दरवाजे आहेत. देवाचे असे हप्त्याहप्त्याने दर्शन इतरत्र माझ्या तरी पाहण्यात नाही. वाळू व चुना यांची ही मूर्ती बनवली आहे त्यामुळे मूळ मूर्तीला अभिषेक न करता उत्सवमूर्तीला करतात. गाभाऱ्यामागे पद्मनाभ सिंहमूर्ती आहे. मंदिराभोवती विस्तीर्ण प्रदक्षिणामार्ग असून त्यावर ३६६ स्तंभ आहेत. केरळात अशी भव्य मंदिरे क्वचित दिसतात. वास्तविक तमिळनाडू आणि केरळ ही एकमेकांना अगदी भिडलेली राज्ये, पण तमिळनाडूतील मंदिरांची भव्यता, कलाकुसर केरळमधील मंदिरांत नाही. केरळमधील बहुतेक मंदिरे एकमजली, उतरत्या साध्या छपराची आहेत. पद्मनाभसारखे अपवादात्मकच !

केरळ राज्याचा माझा दौरा आता संपत आला होता. परस्पर विरोधाभासांनी भरलेल्या या भागातील अनुभव खूपच सुखद आणि उद्बोधक होते. मला वाटते केरळ हे भारतातील सर्वांत अधिक धार्मिक राज्य आहे. प्राचीन काळी या भागात परशुरामाने आणि रामाने वास्तव्य केले होते, म्हणून आपण आता हजारो वर्षांनंतरही पादत्राण घालून त्या भूमीवर चालू नये असा विचार अत्यंत श्रद्धा असलेल्या केरळीयांतच सापडेल. या राज्यावर धर्माची खोल छाप असण्याचे दुसरे कारण म्हणजे आद्य शंकराचार्यांची ही जन्मभूमी. कालडी या गावी त्यांचे साधे,

लहानसे मंदिर आहे. ते नंबुद्री ब्राह्मण होते. त्यांचा जन्म कालडी येथे नवव्या शतकात झाला. आद्य शंकराचार्य म्हणजे जगाच्या इतिहासातील एक अद्भुत चमत्कार आहे. त्यांचे वडील विद्याधिराज शिवगुरू हे वेदविद्यापारंगत होते. शिवगुरू पाच वर्षांचा झाला, तेव्हा त्याचे उपनयन करून त्याला गुरुगृही पाठविण्यात आले. तो अत्यंत प्रखर बुद्धीचा होता. त्याने वेद, उपनिषदे, व्याकरण, छंद यांचे पठण केले. तो उपवर झाला, तेव्हा त्याला श्रीमंत बापांच्या मुली सांगून आल्या. पण त्याने जवळच्या गावातील आद्य पंडिताची रूपगुणसंपन्न कन्या आर्याम्बा हिच्याशी विवाह केला. पण अनेक वर्षे झाली तरी त्यांना अपत्य झाले नाही. पुत्रप्राप्तीसाठी शिवगुरूने शंकरांची तपश्चर्या केली, तेव्हा त्याच्या स्वप्नात एक तेजस्वी ब्राह्मण आला आणि त्याने विचारले, 'तुला मूर्ख आणि दुराचारी अशी अनेक अपत्ये हवीत की बृहस्पतीसारखा एकच पुत्र हवा ?' त्यावर शिवगुरूने सांगितले, 'मला एकच पुत्र असला तरी चालेल, पण तो अपूर्व बुद्धिमान असावा.' त्यावर ब्राह्मणाने सांगितले, 'तुला असामान्य पुत्र होईल, पण तो अल्पायुषी होईल.'

त्यानंतर काही दिवसांनी आर्याम्बा गरोदर राहिली आणि तिला अत्यंत तेजस्वी असा मुलगा झाला. शंकराचे तप केल्याने मुलगा झाला म्हणून त्याचे नाव शंकर असे ठेवले. पाचव्या वर्षी त्याचीही मुंज करून त्याला त्या भागातील सर्वांत तज्ज्ञ पंडिताकडे विद्यार्जनासाठी ठेवले. शंकर एकपाठी होता आणि त्याची ग्रहणशक्ती अपूर्व होती. त्याने बारा वर्षांचा विद्याभ्यास तीन वर्षांत पूर्ण केला. तेव्हा त्याचे गुरु म्हणाले, 'आता तुला देता येईल अशी विद्याच माझ्याजवळ नाही.'

शंकर आठ वर्षांचा असतानाच त्याची अपूर्व विद्वत्ता व कीर्ती केरळच्या राजापर्यंत पसरली. राजाने त्याच्याकडे येऊन आपली तीन नाटके वाचून दाखवली. पुढे काही महिन्यांनी ही नाटके आगीच्या भक्ष्यस्थानी पडून नष्ट झाली, तेव्हा शंकरने ती सर्व नाटके अक्षर न् अक्षर म्हणून दाखवली आणि राजाच्या लेखनिकांनी ती उतरून घेतली.

विद्याभ्यास संपल्यावर शंकरने संन्यास घेण्याचे ठरवले. गुरूंच्या शोधार्थ तो नर्मदातीरी आला. मुनी गोविंदरावांनी त्याला संन्यासदीक्षा दिली आणि अद्वैत तत्त्वज्ञानाचे विद्यादान केले. या तत्त्वज्ञानाचा भारतभर प्रचार कर असा गुरूंनी संदेश दिला. तेव्हापासून ते शंकराचार्य म्हणून ओळखले जाऊ लागले.

त्यावेळी हिंदुधर्मावर अनेक बाजूंनी संकटे आली होती. सम्राट अशोक, कनिष्क, हर्षवर्धन या राजांनी उघडपणे बौद्ध धर्माचा प्रसार केला. शिवाय जैन धर्म, निरीश्वरवाद, शाक्तपंथ असे अनेक पंथ हिंदू धर्माला ग्रासून टाकीत होते. पण शंकराचार्यांनी अखिल भारतात हिंदु धर्माचा प्रसार केला. आपल्या अलौकिक पांडित्याने वादात इतरधर्मीय पंडितांचा पराभव केला आणि हिंदु धर्माचे पुन-

रुज्जीवन केले. देशाच्या चार दिशांना त्यांनी मठ स्थापन केले. अनेक धर्मांच्या पंडितांनी पराभव पत्करून हिंदुधर्म स्वीकारला. आद्य शंकराचार्यांच्या बरोबर वादात हरल्यावर मंडनमिश्राने संन्यास घेतला आणि त्याची पत्नी सरस्वती हिने वादात हरल्यावर जलसमाधी घेतली. हिंदु धर्माचे पुनरुज्जीवन झालेले पाहून आपल्या कार्याची पूर्तता झाली हे ओळखून शंकराचार्य हिमालयात गेले आणि वयाच्या बाविसाव्या वर्षी त्यांनी केदारनाथ येथे समाधी घेतली. त्यांच्या या समाधीच्या पवित्र क्षेत्राचे दर्शन मी केदारनाथ येथे जाऊन १९७० साली घेतले आहे.

प्रस्थानत्रयी, शांकरभाष्य अशा ग्रंथांच्या द्वारे आद्य शंकराचार्य आजही कोटयावधी हिंदूंचे स्फूर्तिस्थान आहेत. केरळात माझा पहिला मुक्काम ज्या त्रिचूर गावी होता, तेथे आद्य शंकराचार्यांनी प्रदीर्घ काल कार्य केले आहे. त्यांना संन्यास देणारे गुरु हे महाराष्ट्रातील होते हा एक अपूर्व योग आहे.

मराठीप्रमाणेच केरळचे मल्याळी साहित्यही काव्य, कादंबरी, नाटक, कोश-वाङ्मय अशा अनेक विभागांत समृद्ध आहे. मात्र मराठीतील कोशवाङ्मय हे मल्याळीच नव्हे तर इतर कोणत्याही भारतीय भाषांत सर्वश्रेष्ठ आहे. उलट मराठीतील प्रवासवर्णनाचा विभाग मल्याळीइतका समृद्ध नाही. भारतीय चित्र-पटांचा जन्म महाराष्ट्रात झाला असला तरी मल्याळी चित्रपट मराठी चित्रपटांच्या तुलनेने फारच प्रगत आहेत. उलट, मराठी नाटक मल्याळी नाटकापेक्षा अग्रेसर आहे. केरळने नृत्याच्या क्षेत्रात जागतिक कीर्ती मिळवली आहे. उलट मराठीचे तमाशा–नृत्य अवकळेला आले आहे. राजा रविवर्मासारखा दिगंत कीर्तीचा चित्र-कार मराठीला मिळाला नाही, तरी अनेक श्रेष्ठ चित्रकारांनी महाराष्ट्राचे नाव उजळ केले आहे.

गेली शंभरहून अधिक वर्षे समृद्ध मुंबईकडे गरीब केरळीय लोकांचा लोंढा लागला आहे. अलीकडे मात्र आखाती देशांकडे हा लोंढा वळला आहे. त्या मानाने केरळात स्थायिक झालेल्या मराठी कुटुंबांची संख्या मोठी नाही. शिक्षणाच्या बाबतीत केरळ आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांनी खूपच प्रगती केली असली तरी तेथेही केरळ आघाडीवर आहे. निसर्गसौंदर्यातही केरळ पहिल्या प्रतीच्या राज्यांपैकी एक आहे. अशा निवांत, सुंदर, संस्कृतीसंपन्न केरळमधील प्रवास आणि वास्तव्य निश्चितच स्फूर्तिस्पद आहे.

# १४ : आधुनिक केरळमधील रंगमंच

केरळ हे भाग्तातील अत्यंत वैशिष्टयपूर्ण राज्य आहे. आपल्या देशातील दुसऱ्या क्रमांकाचे हे लहान राज्य. वस्ती फक्त दोन कोटी. सर्वांत लहान राज्य हिमाचल प्रदेश. पण भारतात सर्वांत अधिक साक्षर लोक कुठे असतील तर ते केरळमध्ये. सत्तर टक्के साक्षरता असलेल्या या राज्याने अनेक क्षेत्रांत आघाडी मारली आहे. नुकताच मी केरळला जाऊन आलो. नाटक हा माझ्या खास आवडीचा विषय असल्याने तेथे मी नाटके पाहिली. प्रमुख नाटककार आणि समीक्षकांना भेटलो. त्यावरून आजच्या मल्याळी रंगमंचाची काहीशी कल्पना आली.

मी कोट्टायमला गेलो. सुदैवाने त्याच दिवशी तेथे एक नाटक होते. केरळमधील हे सर्वांत लोकप्रिय नाटक. त्याचे तीन हजार प्रयोग झाले आहेत. नाटकाचे नाव 'कम्म्युम तलयुम पुरत्त इडरद' असे होते आणि त्याचा अर्थ 'हात किंवा डोके बाहेर काढू नका' असा आहे. इतके लोकप्रिय नाटक पहायचेच असे मी ठरवले. कोट्टायमचे एक नाटककार श्री. चंद्रन म्हणाले, 'तिकीट मिळणे फार कठीण आहे. पण मी प्रयत्न करतो.' मला वाटले, आपण स्वतंत्रपणे प्रयत्न करून दोन तिकिटे घ्यावी. मनोरमा कचेरीजवळच्या हॉलवर गेलो. तिकिटांचा प्लॅन पाहिला आणि थक्कच झालो. कारण पहिले तिकीट होते एक हजार रुपयांचे आणि शेवटचे होते दोनशे रुपयांचे! कोट्टायम जे. सी. च्या मदतीसाठी तो प्रयोग होता. वाटले आता काही नाटक पहाणे जमत नाही. 'केरळा पीपल्स आर्ट क्लब' (के. पी. ए. सी.) या संस्थेने सादर केलेल्या या नाटकाचे तीन हजारांवर प्रयोग झाल्याचे ऐकून तर ते पाहण्याची अधिकच उत्सुकता होती. पण ते पाहायला मिळण्याची शक्यता कमी होती.

पण संध्याकाळी श्री. चंद्रन यांचा फोन आला, की ' दोन निमंत्रणे मिळाली आहेत. ' मी हॉलवर गेलो. हॉल भरगच्च होता. केरळा पीपल्स आर्ट क्लबने हे नाटक सादर केले होते. विषय होता एका बसच्या प्रवासाचा. केरळमध्ये कामगार-संघटना इतक्या बळकट आहेत की अनेकदा जनतेच्या हिताची पर्वा न करता कामगार अचानक संपावर जातात. या बेजबाबदार प्रवृत्तीवर नाटकात उपरोधिक आणि कडक टीका आहे. नाटकाची सुरुवात अगदी हलकीफुलकी, विनोदी पद्धतीची आहे. एका गावाचा सरपंच आणि त्यांचे सहकारी बरेच प्रयत्न करून आपल्या गावावरून त्रिवेन्द्रमची बस जावी अशी व्यवस्था करतात. आजच या नव्या मार्गाचे उद्‌घाटन असते. ग्रामपंचायतीचा विदुषकी चिटणीस बसच्या स्वागतासाठी धूप जाळतो. माळा, हार, तुरे घेऊन सज्ज असतो. एक वृद्ध गृहस्थ आणि त्याची तरुण नात वनिता येतात. वनिताला नोकरीच्या मुलाखतीसाठी त्रिवेन्द्रमला जायचे असते. तिच्या सबंध कुटुंबाचे भवितव्य त्या नोकरीवर अवलंबून असते.

एक वृद्ध बाई येते. तिच्या डोकीवर भले मोठे पोते आहे. तिचा मुलगा त्रिवेन्द्रममधल्या हॉस्पिटलात आहे. त्याला भेटायला ती नव्या बस मार्गाने निघालेली आहे. वनिताचा प्रियकर तिला निरोप द्यायला येतो. इतक्यात बसचा आवाज येतो. सर्वजण हार तुरे घेऊन उभे राहतात. धावत विंगमध्ये जातात. पण निराशेने परत येतात. कारण ती नवी बस नसून एक ट्रक असतो ! इतक्यात एक म्युझिकल पार्टी येते. थोड्याच वेळात नवी बस येते. तिला हार तुरे घालून, ड्रायव्हर कंडक्टरला जेवण देऊन सरपंच भाषण करतात. बस सुरू होण्यापूर्वी कंडक्टर त्या वृद्ध बाईवर डाफरतो. तो बजावतो, ' तुझे हे पोते बसमध्ये मी घेणार नाही. ' बाई विनवण्या करते. ' अरे बाबा, माझा एकुलता एक मुलगा राष्ट्रीय चळवळीत शिरला. गोळीबारात त्याच्या पायावर गोळी लागली. त्रिवेन्द्रमला त्याच्या पायावर ऑपरेशन व्हायचे आहे. त्याचा धंदा नारळ काढण्याचा. तो नारळीवर चढला नाही तर आम्ही जगावं कसं ? डॉक्टरला द्यायला पैसे नाहीत. म्हणून मी हे नारळ आणि केळयानी भरलेले पोते घेऊन जाते आहे. ' कंडक्टर कठोरपणे सांगतो, ' नियम म्हणजे नियम. तुला पोतं घेऊन बसमधून प्रवास करता येणार नाही. ' ती विचारी मागे रहाते.

एक पोलिस येतो. त्याच्याबरोबर बेडी घातलेला एक गुन्हेगार आहे. पोलिस सांगतो, ' मला सूर्यास्तापूर्वी त्रिवेन्द्रमला पोचलेच पाहिजे. ' तीसपस्तीशीची एक बाई येते. तिचा मुलगा अत्यवस्थ आहे तिलाहीं तातडीने त्रिवेन्द्रमला जायचे

असते. बस सुरू होण्याची वेळ झाली म्हणून कंडक्टर इशारा देतो आणि पहिला अंक संपतो.

सबंध दुसरा अंक बसच्या आतच घडतो. त्यासाठी रंगमंचावर बसच्या आतल्या भागाचा सेट उभारलेला असतो. बस चालू झाल्याबरोबर खिडकीतून झाडे, घरे, मागे पळत असल्याचे दाखवले आहे. उतारू डुलक्या घेत असतात. एक उतारू कंडक्टरला गाडी थांबवण्यास सांगतो. पण कंडक्टर झोपेत असतो. स्टॉप मागे टाकून बस बरीच पुढे जाते तेव्हा उतारू स्वत: घंटी वाजवून बस थांबवतो. कंडक्टर जागा होऊन भांडतो. तो म्हणतो, 'नियमाप्रमाणे कंडक्टरशिवाय कुणीही घंटा वाजवता कामा नये.' उतारू आपली योग्य बाजू मांडतो. कंडक्टर पुन्हा बस सुरू करतो. मग स्वत: घंटा वाजवून थांबवतो आणि उतारूला जायला सांगतो. बसमधून उतरताना उतारू कंडक्टरच्या जोरात थोबाडीत मारतो आणि पळून जातो. कंडक्टर भयंकर संतापतो. तो सर्वांना सांगतो, 'बस पुढे जाणार नाही. माझा अपमान झाला आहे, मी या क्षणापासून संपावर आहे.'

बसमध्ये भयंकर खळबळ माजते. प्रत्येकाचे काहीना काही तातडीचे काम आहे त्यांना त्रिवेन्द्रमला लगेच पोचलेच पाहिजे. पण कंडक्टर काहीही ऐकायला तयार नाही. उतारू ड्रायव्हरकडे याचना करतात. ड्रायव्हरला त्याची दया येते. ड्रायव्हर रदबदली करतो तेव्हा कंडक्टर त्यालाच दम देतो, 'बस माझ्या ताब्यात आहे. माझ्या हुकुमाशिवाय तू ती चालवू शकत नाहीस. मी कामगारसंघटनेकडे तक्रार करून तुला युनियनमधून हाकलून देईन.' त्यामुळे ड्रायव्हरचाही नाइलाज होतो.

तिसऱ्या अंकात उतारू रस्त्यावर, मैदानात, बसले आहेत. रात्र झाली आहे. म्युझिकल कंपनीचे लोक गाणं म्हणून जीव रमवीत आहेत, असे दाखवले आहे. पोलिस डुलक्या घेत असताना गुन्हेगार त्याच्या खिशातली चावी काढतो. बेडीतून हात सोडवून घेतो आणि पळून जातो. ते लक्षात येताच पोलीस धाय मोकलून रडतो, 'मी बडतर्फ होईन. माझं कुटुंब उघडे पडेल.' एक टॅक्सी येते. तिच्यातील एक तरुण वनिताला आणि तिच्या आजोबाला त्रिवेन्द्रमपर्यंत मोफत नेण्याचं कबूल करतो. मागच्या बसमधून वनिताचा प्रियकर येतो. वाटेत त्याला आढळतं की वनिताचे आजोबा रस्त्यावर मरून पडले आहेत. तो इतर उतारूंच्या मदतीने त्यांना उचलतो. इतक्यात वेडीपिशी झालेली, कपडे फाटलेली वनिता येते. ती सांगते, आजोबांना टॅक्सीतल्या लोकांनी मारून रस्त्यावर फेकले आणि तिच्यावर अनेकांनी बलात्कार केला. तरीही प्रियकर तिच्याशी लग्न करायला तयार असतो.

पण ती सांगते, ' हे अपवित्र शरीर मी तुला देणार नाही.' ती धावत जाते आणि आत्महत्त्या करते. इथे नाटक संपते. अचानक संप करण्याच्या बेजबाबदार प्रवृत्तीचे केवढे घोर परिणाम होतात ते कोणतीही व्याख्यानबाजी न करता या नाटकात अत्यंत समर्थपणे दाखवले आहे.

कलाकृती म्हणून हे नाटक उत्तम आहेच, पण ज्या परिस्थितीत ते केरळमध्ये रुजले, ती लक्षात घेतली तर त्याचा अधिक खोल अर्थ लक्षात येईल आणि सामाजिक जाणीवेची पार्श्वभूमी समजेल. केरळमध्ये जेव्हा कम्युनिस्ट पक्ष विरोधात होता, तेव्हा त्या पक्षाने कामगारांची बळकट संघटना उभी केली. त्यासाठी उठल्या–सुटल्या संपाचे हत्यार त्याच पक्षाने परजले. पण पुढे संमिश्र मंत्रिमंडळात जेव्हा कम्युनिस्ट पक्ष हा अधिकारावर आला, तेव्हा मात्र संप हा त्याच पक्षाला प्रगतीच्या मार्गातील अडसर वाटू लागला ! म्हणून कम्युनिस्ट आमदार तोपिल भासी यांनी हे नाटक लिहिले आणि कम्युनिस्ट पक्षाच्या पथकाने त्याचे तीन हजार प्रयोग केले. आपल्याकडे जॉर्ज फर्नांडिसने कामगार नेता म्हणून रेल्वे कामगारांच्या करवी केलेल्या भरमसाठ मागण्या आणि तेच जॉर्ज मंत्री झाल्यावर त्यांनी घेतलेला गुळमुळीत पवित्रा याची तुलना केरळातील या परिस्थितीशी करता येईल.

केरळमधील एक प्रभावी नाटककार एन्. कृष्णा पिले यांना मी त्रिवेन्द्रम येथे भेटलो. त्यांना केरळचे इब्सेन म्हणतात. त्यांच्या सर्व नाटकांचे विषय ' कुटुंब व्यवस्था आणि ती कोलमडविणाऱ्या परिस्थितीची अंतर्गत आणि बाह्य कारणे ' हा आहे.

१९४२ साली त्यांचे भग्नभवन हे नाटक रंगभूमीवर आले आणि मल्याळी रंगमंचाला त्याने नवे परिमाण दिले. एकाच कुटुंबातील परस्पर विरोधी स्वभावाच्या घटकांनी एकमेकांना समजून घेतले नाही तर ते घर भंग पावते आणि समाज कसा खिळखिळा होतो, हे त्यांनी या नाटकात समर्थपणे दाखवले आहे. त्यानंतर श्री. पिले यांनी १९७३ पर्यंत आणखी सात नाटके लिहिली. त्यापैकी कन्यका, वलाबलम्, कुडतिलवलक ( खडकावरचा दिवा) आणि अडिमुखैतक ( बांध) या नाटकांनी केरळमधील रंगमंचाला सामाजिक जाणिवेच्या नव्या पातळ्यांचे दर्शन घडविले. श्री. पिले यांना केंद्र सरकारच्या साहित्य अॅकॅडमीचे पारितोपिकही मिळाले आहे.

' मराठी किंवा बंगाली नाटककाराला नाटकापासून जे पूर्ण समाधान मिळते ते मात्र मल्याळी नाटककाराला मिळत नाही.' असे श्री. एन् कृष्णा पिले यांनी

सांगितले. ते म्हणाले, ' याचे कारण असे, की आमची नव्वद टक्के नाटके क्लब्जच्या प्रेक्षक वर्गापुढे होतात. केरळमध्ये सुमारे अडीच हजार फाईन आर्ट क्लब्ज आहेत. त्यांची दरमहा पाच किंवा दहा रुपये वर्गणी असते आणि सभासदांना सर्वसाधारण पणे दरमहा एक नाटक दाखवले जाते. प्रत्येक क्लबचे सातशे ते एक हजार सभासद असतात. काही तिकिटे वीन सभासदांसाठी विक्रीस ठेवलेली असतात. पण आमचा प्रेक्षक वर्ग आयता तयार (रेडीमेड) असल्याने आम्हा नाटककारांना किंवा कलाकारांना आपल्या कलेची कसोटीच कळत नाही. मराठी नाटकाचा प्रेक्षक तिकीट काढून येतो. त्यामुळे नाटक हाऊस फुल झाले की नाटककार व कलावंत आपण कसोटीला उतरलो या आनंदात असतात. पण केरळमध्ये कोणत्याही नाटकाला चार–पाचशे प्रेक्षक असतातच कारण त्यांनी आधीच वर्गणी भरलेली असते ! त्यामुळे हे प्रेक्षक नाटककारावरील प्रेमाने आले आहेत, कलाकारांवरील प्रेमामुळे आले आहेत की केवळ वर्गणी फुकट जाऊ नये म्हणून आले आहेत हे समजण्याला मार्ग नाही ! कलानिलयमसारख्या व्यापारी कंपनीची नाटके तिकीट लावून चालतात. पण ही नाटके विषयाच्या दृष्टीने शंभर वर्षांपूर्वीची असतात. पौराणिक, ऐतिहासिक किंवा ट्रिक सीन्सनी भरलेली जादूटोण्याची भपकेबाज अशी ही नाटके असतात. त्यात समाजपरिस्थितीचे कसलेही दर्शन घडत नाही.'

असे एक मल्याळी नाटक मी पाहिले. त्या नाटकातच चित्रपटाचाही भरपूर उपयोग केलेला होता. ' रक्तराक्षस ' असे नाटकाचे नाव होते. जादूटोणा करून एक कुरूप बाई सुंदर होते. पण ती माणसे खाणारी हडळ असते असा हा विषय होता. त्यातील चित्रपडात नायिकेला संपूर्ण नग्न दाखविली होती. केरळमधील सेन्सॉरने हे दृश्य कसे संमत केले याचे आश्चर्यच आहे. हे नग्न दृश्य दाखविता यावे म्हणून ' सौंदर्यवती व्हायचे तर नग्न होऊन सर्वांगाला हा लेप लाव' असे जादूगार नायिकेला सांगतो असे दाखविले आहे.

' नारदन केरतिल ' (केरळमध्ये नारद) या नाटकात फॅन्टसी, सामाजिक जाणीव आणि उपहास यांचे सुंदर मिश्रण होते. हे नाटक चित्रपटाने सुरू होते. समुद्रात शेषावर विष्णू विराजमान झाल्याचे दृश्य दिसते. नारद येऊन म्हणतो, ' भगवान स्वर्गात युगानुयुगे इंद्राचीच एकाधिकारशाही आहे. आता नव्या जगातील नव्या पद्धतीप्रमाणे स्वर्गात लोकशाही आणली पाहिजे.' विष्णू म्हणतात, ' तुम्हाला लोकशाहीचा प्रत्यक्ष अनुभव नाही. केरळमध्ये महिनाभर जाऊन या म्हणजे लोकशाहीचे खरे स्वरूप कळेल. त्यानंतर मला भेटा. मग आपण स्वर्गात लोकशाही आणायची की काय ते ठरवू.' त्याप्रमाणे नारदमुनी वेष पालटून केरळमध्ये येतात. एक प्रवासी तरुण म्हणून केरळमध्ये फिरत असताना नारदमुनींना आढळते की

सर्वत्र भ्रष्टाचार माजला आहे, पोलिसापासून उच्चपदस्थापर्यंत लोक पैसे खातात, कॅबरे, नाईट क्लब्स, भांग, गांजा, दारू इत्यादी व्यसनांना ऊत आला आहे आणि राजकारणात कोणीही तत्त्वनिष्ठ नसून सर्व नेते जनतेची दिशाभूल करीत आहेत. या कटू अनुभवानंतर नारद स्वतःच विष्णूला जाऊन सांगतात की, ' असली लोकशाही स्वर्गात मुळीच नको. त्यापेक्षा सध्याची इंद्राची राजवटच बरी.' या नाटकात कॅबरेचे, गोव्यातील हिप्पींचे असे बरेच प्रवेश चित्रपटाच्या साहाय्याने दाखविले आहेत.

' जबर जानकी ' (तारेवरची कसरत करणारी जानकी) हे नाटक सर्कसच्या पार्श्वभूमीवर आहे. या नाटकातही तारेवरचे व प्राण्यांचे खेळ वगैरे दृश्ये चित्रपटाच्या साहाय्याने दाखविली आहेत. जानकी नावाच्या सर्कससुंदरीवर मालकांचे प्रेम असते. पण तिचे प्रेम मात्र उंच झोपाळ्यावरचे खेळ करणाऱ्या कसरतपटूवर असते. त्याचा काटा काढण्यासाठी मालक झोपाळ्याचा अपघात मुद्दाम घडवून आणतो. त्यात जानकीचा तरुण प्रियकर मरण पावतो. तरीही जानकी मालकाला नकार देते. मग मालकाला कळते की लहानपणी पळवून नेलेली आपली मुलगी ती हीच. त्याला आपल्या कृत्याचा पश्चाताप होतो असे या नाटकाचे कथानक आहे. भव्य सेट्स, चित्रपट आणि ट्रिक सिन्स यामुळे अशी नाटके केरळमध्ये लोकप्रिय होतात. पण संहिता, अभिनय इत्यादीच्या दृष्टीने ती खूपच मागासलेली असतात.

श्री. सी. एल्. जोस हे केरळमधील एक प्रमुख नाटककार आहेत. त्यांना मी त्रिचूर येथे भेटलो. त्यांनी आतापर्यंत सव्वीस नाटके लिहिली असून त्या नाटकांचे तीन हजारांवर प्रयोग झाले आहेत. सामाजिक समस्या आणि कुटुंबसंस्था ही त्यांच्या लेखनाची प्रमख क्षेत्रे आहेत. मळकाल (वाळूचे जंगल) या नाटकात त्यांनी एका वरिष्ठ न्यायमूर्तीच्या कुटुंबजीवनाचे विदारक चित्र रेखाटले आहे. समाजात शांतता व सामंजस्य निर्माण व्हावे म्हणून आटोकाट प्रयत्न करणारे हे न्यायमूर्ती स्वतःच्या कुटुंबात मात्र शांतता व सामंजस्य निर्माण करू शकत नाहीत हे या नाटकांचे मुख्य सूत्र आहे. मानम तल्युम (चमकणारे आकाश) या त्यांच्या नाटकाला ॲकॅडमी पारितोषिक मिळाले आहे. आपल्या नाटकांचे तीन हज़ार प्रयोग झाले असले, तरी त्यापासून आपल्याला फारशी आर्थिक प्राप्ती झाली नाही असे सांगून श्री जोस म्हणाले, ' ही नाटके केरळमधील व राज्याबाहेरील आर्ट क्लब्समधून झाली व होतात. सुरवातीच्या नाटकांच्या पुस्तकावर मी ' परवानगीसाठी पंचवीस रुपये पाठवावेत असे छापत असे. पण त्याचा परिणाम असा झाला की हे आर्ट क्लबवाले नाटकाचे व नाटककाराचे नाव बदलून माझ्या नाटकांचे प्रयोग करू लागले. म्हणून पुढील पुस्तकांतून मी ही सूचना काढून टाकली. त्यामुळे आता पैसा मिळत नसला तरी माझे नाव तरी नाटककार म्हणून जाहीर करण्यात येते.

मल्याळी रंगभूमीवर विनोदी नाटके मात्र फारशी नाहीत व मल्याळी साहित्यातही विनोदाचे दालन समृद्ध नाही असेही श्री. जोस यांनी सांगितले.

सामाजिक जाणिवेच्या मल्याळी नाटकात तोपिल भासी यांचे 'नी एन्ने कम्युनिस्टाक्की' (तुम्ही मला कम्युनिस्ट केलेत) या नाटकाचा क्रम पहिला लागेल. नाटककार हे जेव्हा भूमिगत होते, तेव्हा त्यांनी हे नाटक लिहिले. प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत एकाकी झगडणारा ध्येयवादी तरुण सगळीकडून कोंडीत सापडतो आणि कम्युनिस्ट होण्याशिवाय त्याला गत्यंतर उरत नाही असा या नाटकाचा विषय आहे. केरळमध्ये कम्युनिझम आणण्यात या नाटकाचा बराच वाटा आहे असे विचारवंतांचे मत आहे. 'मुडियेत्र आय पुत्र' या नाटकात श्री. भासी यांनी आत्मचरित्रातील एक प्रकरणच सादर केले आहे. ते कम्युनिस्ट म्हणून पक्षाचे कार्य करीत असता पोलिसांनी त्यांना एका खुनाच्या प्रकरणात अकारण गोवले होते. त्याच विषयावर त्यांनी हे नाटक लिहिले आहे.

पुदिया आकाशम, पुदिया भूमी (नवे आकाश, नवी भूमी) या नाटकात एका मोठ्या धरणावर काम करणाऱ्या दोन इंजिनियरांच्या विरोधी मतांचा संघर्ष दाखवला आहे. अश्वमेधम हे नाटक कुष्ठरोगावर आहे. कुष्ठरोग हा देवीचा शाप आहे अशी महाराष्ट्राप्रमाणेच केरळमध्येही पूर्वी समजूत होती. तो समज दूर करण्याच्या कामी या नाटकाने फार मोठी कामगिरी बजावली आहे. 'अग्निपुत्री' हे एका वेश्येच्या जीवनावरील नाटक. मात्र त्यात नाटककाराने वासनामय उथळ जग दाखवले नसून वेश्येच्या करुण अवस्थेचेच चित्रण केले आहे.

श्री. सी. एन्. श्रीकंठन नायर यांनी मामा वरेरकर यांच्या 'भूमिकन्या सीता' या नाटकावर आधारलेले 'कांचन सीता' हे नाटक लिहिले आहे. केरळमध्ये थोड्या प्रमाणात प्रायोगिक रंगमंचही आहे. त्यात श्री. के. एस्. नंबुद्री यांचे 'समस्या' हे नव्या सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्यांवरील नाटक विशेष गाजले आहे. श्री. पारदूर जॉर्ज यांनी लिहिलेल्या अठरा नाटकांत 'दिव्यबगी' हे खास प्रभाव पाडणारे नाटक. देवाला बळी देण्याच्या प्रथेवर त्यात प्रहार करण्यात आला आहे. त्यांनी आपल्या अनेक नाटकांतून ख्रिश्चन धर्मोपदेशक आणि ब्राह्मण पुजारी यांची धार्मिक ढोंगेही उघड केली आहेत. हरिजनाची नेमणूक पुजारी म्हणून होते, तेव्हा ब्राह्मण पुजारी देवाची मूर्तीच पळवून नेतात असे त्यांनी 'पतनम्' या नाटकात दाखविले असून त्या नाटकाला केरळ साहित्य ॲकॅडमीचे पारितोषिक मिळाले आहे. (भारत सरकारच्या साहित्य ॲकॅडमीप्रमाणेच केरळ राज्य सरकारची स्वतंत्र साहित्य ॲकॅडमी, नाट्य ॲकॅडमी व नृत्य ॲकॅडमी आहेत.) श्री. के. टी. महंमद यांची कन्नगळ (बर्फ) आणि 'इडुत्रियाटम' ही

नाटके विशेष लोकप्रिय असून त्यांनाही केरळ साहित्य ॲकॅडमीचे पारितोषिक मिळाले आहे.

गेल्या पंचवीस वर्षांत केरळमधील रंगमंच जुन्या, पारंपरिक विषयांकडून नव्या आणि समाजप्रबोधनाच्या कलात्मक नाटकांकडे वळला आहे. केरळमध्ये दरसाल तीन ते चार हजार नाट्यप्रयोग होतात. ज्याला आपण व्यावसायिक रंगभूमी म्हणतो, तसा रंगमंच गेल्या दोन तीन वर्षांत सुरू झाला असला तरी वर्गणीदारांच्या क्लबांत नाटके करण्याच्या रूढ पद्धतीमुळे नव्या नाटकांचे मूळ व्यावसायिक रंगभूमीवर फार हळूहळू रुजत आहे. तरीही नव्या सामाजिक जाणिवेची अनेक कलात्मक नाटके सतत येत असून त्यामुळे मल्याळी रंगमंच समृद्ध झाला आहे.

REFBK-0023510
REFBK-0023510
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
823
23590
प्रवास 23/7/92